रामकृष्ण-वाक्सुधा.

द्वितीय वृत्ति.

भाषांतरकार
कृष्णाजी गोविंद किनर.
शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे.

प्रकाशक
भट आणि मंडळी, पुणे.

किंमत एक रुपया.

रामकृष्ण-वाक्सुधा.

('गॉस्पेल ऑफ श्रीरामकृष्ण' या इंग्रजी पुस्तकावरून)

द्वितीय वृष्टि.

भाषांतरकार,
कृष्णाजी गोविंद किनरे,
शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

आवृत्ति पहिली.

प्रकाशक,
भट आणि मंडळी, पुणें.

आक्टोबर १९१५.

किंमत एक रुपया.

हें पुस्तक पुणें येथें **'यशवंत'** छापखान्यांत (कसबा, घर नं. १४८३)
अच्युत चिंतामण भट यांनीं छापून प्रकाशित केलें.

प्रस्तावना.

ज्या मूळ इंग्रजी ग्रंथाचें हें भाषांतर आहे, त्या ग्रंथासंबंधानें, मीं केलेल्या भाषांतरासंबंधानें, व श्रीरामकृष्णांसंबंधानें मला जें कांहीं सांगावयाचें होतें, तें मीं प्रथम वृष्टीच्या प्रस्तावनेंत बहुतेक सर्व सांगून टाकलेंच असल्यामुळें या वृष्टीला प्रस्तावना जोडण्याचें कांहीं कारणच नव्हतें. पण शिष्टाचाराला अनुसरून प्रस्तावना लिहिलीच पाहिजे, म्हणून ही अल्पशी लिहीत आहें.

हें विकट काम करण्याला मी कोणत्याही दृष्टीनें अधिकारी नसतांना केवळ भगवत्कृपेवर भार टाकून मीं तें हातीं घेतलें, असें मीं पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत म्हटलें होतेंच. आतां तें पुरें झालें आहे, ही त्या भगवंताचीच कृपा होय. अर्थात् याबद्दल त्याचे आभार मानणें हें माझें ओघानेंच पहिलें कर्तव्य येतें. नुसत्या शब्दसंस्कारांपुरतेंही आपल्या पूज्य प्राचीन धर्मग्रंथांचें अध्ययन नाहीं, गुरुकृपेचा पाठिंबा मुळींच नाहीं, साधनाचें तर नांवही नाहीं, अशा स्थितींत हें काम हातीं घेतांना माझें मन किती साशंक होतें, याची कल्पना शब्दांनीं देतां येणार नाहीं. तेव्हां भगवंताच्या कृपेचा पाठिंबा नसता, तर हें काम माझ्या हातून तडीसच गेलें नसतें. तात्पर्य, भाषांतराची चारी बाजूंनीं जी वाहवा झाली, तिचें श्रेय त्याला आहे. त्यांत माझा मोठेपणा मुळींच नाहीं, ही गोष्ट येथें मी मोठ्या आनंदानें कबूल करितों.

आतां, मनुष्याच्या अहंकारी प्रवृत्तीला अनुसरून हातीं घेतलेलें विकट काम मी निमित्तकारण होऊन पार पडलें, याबद्दल माझ्या वेड्या मनाला आनंद वाटणेंही कांहींसें साहजिक आहे. पण अज्ञानमूलक आनंद हा अमिश्र कधीं नसतोच. त्याच्याबरोबर त्याच्या सहकारी दुःखाची छाया असावयाचीच. यामुळें माझ्या मनाला जितका आनंद होत आहे, तितकेंच दुःखही वाटत आहे. दुःख एवढ्याकरितांच कीं, भाषांतराचें काम चालू असतांना साहजिक मनावर शब्दसंस्कार होऊन जो एक प्रकारचा आनंद होई, तो आनंद आतां यापुढें व्हावयाचा नाहीं. तरीसुद्धां या सुखदुःखाच्या काल्यांत सुखाचाच भाग ज्यास्त आहे, हें सांगायला नकोच.

असो, श्रीरामकृष्णांचा यांत जो उपदेश दिला आहे, त्याच्या एकदोन विशेषांचा येथें आपण थोडक्यांत विचार करूं. या धर्मभूमींत काळीं काळीं जे सत्पुरुष उत्पन्न होतात, ते तत्त्वतः नवीन असें कांहींच सांगत नाहींत. श्रुतिस्मृतिपुराणोक्त तत्त्वेंच ते कालानुसार नवीन तऱ्हेनें विशद करून सांगत असतात. तत्त्वें जुनीं, मांडणीमात्र निराळी. एकाच धान्याचीं अनेक रुचिकर व खमंग पक्वान्नें करण्यासारखेंच हें आहे. असें जरी आहे, तरी प्रत्येक सत्पुरुषाचा कांही तरी विशेष हा असतोच. परिस्थितीप्रमाणें कांहीं तत्त्वांवर तो विशेष जोर देऊन समाजाची बिघडलेली घडी पुन्हा नीट बसवून निघून जातो. या नियमाला अनुसरून श्रीरामकृष्णांनीं विशेष काय केलें ? रजोगुणप्रधान पाश्चात्त्य ज्ञानमदिरेनें बेहोष झालेल्या आधुनिक सुशिक्षितांच्या डोळ्यांत त्यांनीं चरचरीत अंजन घातलें. त्याच्या प्रभावानें त्यांच्या डोळ्यांवरील धुंदी पार नाहींशी झाली. पाश्चात्त्य सुधारणेची किंमत कळली. ईश्वराचें अस्तित्व मान्य झालें. सगुणोपासनेचें महत्त्व लक्षांत भरलें. पुस्तकी विद्येचा पोकळपणा ध्यानांत आला. भक्तीच्या बळावर अगदीं निरक्षर मनुष्य कोणत्या दिव्य पदावर जाऊन बसतो, हें प्रत्यक्ष पहायाला मिळालें. एवंच, मनुष्यजन्माचें खरें साफल्य कशांत आहे, हें आधुनिक सुशिक्षितांना प्रत्यक्ष दाखवून श्रीरामकृष्णांनीं त्यांचीं बहकलेलीं मनें स्थितीवर आणलीं. अशा रीतीनें धर्मसंस्थापनेचें कार्य त्यांनीं केलें. ही त्यांची एक कामगिरी; व ही राष्ट्रीयदृष्ट्या किती महत्त्वाची आहे, हें सनातन धर्माच्या परंपरेंत वाढलेल्या आमच्या लोकांना सांगावयाला पाहिजे, असें नाहीं.

आसेतुहिमाचल आपला सर्व देश आज एकछत्री अंमलाखालीं आहे. अशी स्थिति त्याला पूर्वीं कधींही आली नव्हती. हा योग अपूर्व आहे. पण या अपूर्व योगावर सर्व हिंदवासीयांनीं सर्व देशांत एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करण्याकरितां झटून प्रयत्न करणें, ही गोष्ट अत्यावश्यक आहे. अशी एक राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाल्यावांचून जें काय आपल्याला राजकीय बाबतींत करावयाचें आहे, त्यांतलें कांहीं करितां येणार नाहीं. जूट हा राष्ट्राचा प्राण आहे. जिथे जूट नाहीं, तिथे राष्ट्रही नाहीं. तेव्हां हिंदुस्थानाला राष्ट्रीयत्व येण्याला आपण सगळे एक आहों—एका कुटुंबांतील माणसांसारखे आहों—या भावनेचा संचार देशा-

च्या चारही कोंपऱ्यांत झाला पाहिजे. मग जूट आपोआप होईल; व जूट झाल्यावर काय साधणार नाहीं? पण आपलेपणा उत्पन्न होऊन सर्वांची अशी जूट बनण्याला ज्या कांहीं अडचणी आहेत, त्यांत धर्मभेदाची अडचण फारच मोठी आहे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, व पारशी असे चार प्रमुख धर्मभेद या देशांत आहेत; शिवाय एका हिंदुधर्माचे शेंकडों पंथ असून प्रत्येक पंथाच्या शाखा व उपशाखा आहेतच. बरें, या सगळ्यांचा परस्परांत विषमभाव आहे. हा विषमभाव दूर करण्याची खटपट करणें म्हणजे एकराष्ट्रीयत्वाचा पायाच भरणें आहे. हें काम श्रीरामकृष्णांनीं फारच उत्तम तऱ्हेनें केलें. एका ठिकाणीं पोंचण्याला ज्याप्रमाणें अनेक मार्ग असतात, त्याचप्रमाणें भिन्न भिन्न धर्मांची अवस्था आहे. एका परमेश्वराकडे जाणारे ते केवळ अनेक मार्ग आहेत. त्यांत श्रेष्ठकनिष्ठ भाव अगदीं नाहीं. निरनिराळ्या भाषेंतले लोक एकाच पदार्थाला निरनिराळीं नांवें देतात; तेवढ्यावरून त्या मूळ पदार्थांत जसा बदल होत नाहीं, तसेंच परमेश्वराचें आहे. सगळ्यांचा परमेश्वर एकच आहे. त्याला निरनिराळ्या धर्मांचे लोक निरनिराळीं नांवेंमात्र देतात. इत्यादि सर्व धर्मांच्या समतेचीं तत्त्वें सर्व लोकांच्या मनांवर ठसविण्याचा श्रीरामकृष्णांनीं, संधी सांपडली तेथें, जोराचा प्रयत्न केला. व जो सूक्ष्म दृष्टीनें पाहील, त्याला ते प्रयत्न यशस्वी झाल्याचीं चिन्हेंही स्पष्टपणें दिसतील. तेव्हां, सर्व धर्मांचें समत्व विशेषेंकरून लोकांच्या मनांवर ठसाविणें, ही श्रीरामकृष्णांची दुसरी राष्ट्रीय कामगिरी होय. त्यांच्या एकंदर कामगिरींत हीच कामगिरी विशेष महत्त्वाची होय, असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं.

ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग असे परमेश्वरप्राप्तीचे तीन मुख्य मार्ग आपल्या शास्त्रांत सांगितले आहेत. त्यांत संसारी जनांनीं कोणता अनुसरावा, हें स्पष्टपणें सांगण्याचें काम श्रीरामकृष्णांनीं फारच ठांसून केलें आहे. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांचें काठिण्य वेळोवेळीं दाखवून संसारी जनांनीं भक्तिमार्गाचेंच अवलंबन करावें, असें त्यांनीं आपल्या अधिकारी वाणीनें सांगितलें आहे. व त्यांत तथ्य नाहीं असें कोण म्हणेल बरें? वेदान्ताच्या व कर्मयोगाच्या गोष्टी संसारी जनांनीं बोलूंच नयेत, असें त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रतिपादिलें आहे.

वेदान्ती शब्दांचा उगीच काथ्या कुटणारांनीं, किंवा 'कर्मण्येवाधिकारस्ते' असें वेळीं अवेळीं म्हणणारांनीं हा परमहंसांचा उपदेश विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे. माझ्या दृष्टीनें ही त्यांची तिसरी कामगिरी होय. भक्तिमार्ग हा सोपा असल्यामुळें संसारी जनांनीं तोच घ्यावा, असें जरी परमहंसांनीं म्हटलें आहे, तरी तो सोपेपणा सापेक्ष आहे हें विसरतां कामा नये. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांच्याशीं तोलून पाहिला असतां तो सोपा आहे. पण एरवीं तो कांहीं सोपा नाहीं. हें नवविधा भक्तीचें अल्पही विवरण ज्यांनीं वाचलें असेल, त्यांना सांगावयाला नकोच.

श्रीरामकृष्णांनीं विशेष कामगिरी कोणती केली, याचें माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें येथपर्यंत अगदीं थोडक्यांत तीन कलमी दिग्दर्शन केलें. श्रीरामकृष्णांची केवढी योग्यता होती, हें वाक्सुधेचे हे दोन भाग वाचणारास सहज कळून येणार आहे. एवढा जरी त्यांचा अधिकार होता, तरी, 'मी गुरु नाहीं, मी केवळ **त्याचा** दास आहें.' असें ते स्पष्ट म्हणत, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. 'जो शिष्य करीत सुटतो, तो गुरुच नव्हे; तो हीन होय.' अशा अर्थाचे स्पष्ट उद्गार त्यांनीं काढिले आहेत. तेही 'राजयोगी' गुरूंनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. गुरु कसा असावा, याचें चित्र त्यांनीं फारच उठावदार काढून दाखविलें आहे. श्रीरामदासांनीं दासबोधांत विस्तरतः व मनाचे श्लोकांत संक्षेपतः या विषयाचें असंदिग्ध विवेचन केलें आहे. तें गुरुपिशांनीं नीट मनन करावें, म्हणजे त्यांची फसगत होणार नाहीं. या संबंधानें मुख्य लक्षांत ठेवावयाची गोष्ट अशी कीं, साधनानें आपली भूमिका तयार होऊन गुरूविषयीं तीव्र तळमळ उत्पन्न झाली कीं, सद्गुरूची गांठ पडण्याला उशीर लागत नाहीं. भक्तवत्सल परमेश्वर अशा भक्तांची गुरूशीं तेव्हांच गांठ घालून देतो.

कमळ फुललें, म्हणजे भ्रमरांना आमंत्रणाची जरूर नसते. ते त्याच्या परिमलानें मोहित होऊन त्याच्यावर आपोआप येऊन झडप घालतात. तद्वत् श्रीरामकृष्णांच्या विज्ञानाचें कमळ ज्या वेळीं विकसित झालें, त्या वेळीं त्याच्या परिमलानें मोहित होऊन अनेक मुमुक्षु जन त्यांच्याभोंवतीं गोळा झाले, व कृतार्थ होऊन गेले. आपल्या गुरुदेवाचें प्रत्यक्ष उदाहरण पाहून खरा सुखाचा

मार्ग त्यांनीं तेव्हांच उचलला. संसारावर लाथ मारून धर्मप्रसाराचें काम करण्यांत आपलें आयुष्य वेंचण्याचा व अशा स्तुत्य रीतीनें आपल्या गुरूचें स्मारक करण्याचा विडा अनेक शिष्यांनीं उचलला. त्यांनीं आपल्या प्रिय गुरूचीं देवळें बांधलीं नाहींत किंवा गुरूचे पुतळेही उभारले नाहींत! जी कामगिरी करण्यांत थोर पुरुष आपलें आयुष्य खर्चून कृतार्थ होऊन जातात, तीच कामगिरी त्याच जोमानें पुढें चालविणें, हेंच थोर पुरुषांचें खरें स्मारक होय! त्यांच्या शिष्यांनीं 'रामकृष्ण मिशन' नांवाची लोकोपयोगी संस्था स्थापन करून व आपण संन्यस्तवृत्तीनें राहून परोपकारार्थ देह झिजविण्याचें व लोकांना धर्मोपदेश करण्याचें पवित्र कार्य उत्तम प्रकारें चालविलें आहे. मद्रासइलाख्यांत व उत्तर हिंदुस्थानांत या मिशनच्या अनेक शाखा आहेत. त्यांनीं शाळा चालविल्या आहेत, गरिबांकरितां अनेक दवाखाने फुकट घातले आहेत,वाचनालयें उघडलीं आहेत, सेवाश्रम स्थापन केले आहेत. अशा अनेक बाजूंनीं देशकल्याणाचें कार्य त्यांनीं चालविलें आहे. अग्नि, पूर, भूकंप, प्लेग, दुष्काळ, अशा आपत्तींत सांपडलेल्या 'नारायणांना' सर्व प्रकारें मदत करण्याला या मिशनचे संन्याशी हालअपेष्टा भोगूनही तयार असतात. मिशनच्या या अनेकांगी कामगिरीबद्दल लोक तर त्याची वाहवा करून त्याला यथाशक्ति द्रव्यसाहाय्य करीत आहेतच, पण सरकारी अधिकाऱ्यांनींही या कामगिरीबद्दल वेळोवेळीं प्रशंसापर उद्गार काढिले आहेत. आपल्या गुरूचें नुसतें देऊळ बांधून तेथें टाळ कुटीत बसण्यापेक्षां गुरुदेवाच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचा सगळ्यांत हा उत्तम मार्ग आहे, हें कोणीही सांगेल. 'जे कां रंजले गांजले' इत्यादि अभंगवाणीनें श्रीतुकाराममहाराजांनींही भगवद्भक्तीचा हाच मार्ग लोकांना दाखवून दिला आहे, हें प्रसिद्धच आहे. तात्पर्य, निष्क्रिय भक्ति निदान हल्लींच्या देशाच्या परिस्थितींत तरी देशाला घातक आहे. तेव्हां भक्तीला असें वळण दिलें पाहिजे कीं, तिनें उत्तम समाजसेवा होऊन परंपरेनें राष्ट्रोद्धाराचे कार्याला मदत होईल. श्रीरामकृष्णांचे अनुयायी यांनीं आपल्या भक्तिमार्गाला अशा प्रकारचें समाजहितसाधक वळण दिलें, याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. महाराष्ट्रांत असें कांहीं तरी व्हावें, अशी इच्छा असल्यामुळेंच मिशनच्या नमुनेदार कामगिरीचा येथें उल्लेख केला आहे.

आतां फक्त आभारप्रदर्शनाचें गोड काम करून ही प्रस्तावना मी पुरी करणार आहें. माझे परममित्र व सत्कवि रा. रा. दत्तात्रेय अनंत आपटे ऊर्फ 'अनंततनय' यांचे यथातथ्य आभार मानणें, हें काम माझ्या शक्तीपलीकडचें आहे. या वृष्टींतलीं सर्व पदें त्यांचींच आहेत. व तीं माझ्या दृष्टीनें इतकीं उत्तम साधलीं आहेत कीं, सांगतां सोय नाहीं. त्यांच्या प्रसादयुक्त पदांमुळेंच भाषांतराला इतका उठाव आला आहे, ही गोष्ट मी मोठ्या आनंदानें कबूल करितों. पुन्हा, हें काम त्यांनीं इतक्या हौसेनें, कळकळीनें, व नियमितपणें केलें आहे कीं, त्यांचा उतराई कसें व्हावें, हेंच मला समजत नाही. त्यांची जोड मला भगवंताच्या कृपेनें झाली, असें म्हटलें पाहिजे. नाहीं तर भाषांतराचें काम अत्यंत निरस झालें असतें.


'चित्रमय जगत्' या मराठींतील मासिकांत अग्रपूजेच्या मानाला अल्पकाळांत पात्र झालेल्या मासिकाच्या व्यवस्थापकांचाही मी फार ऋणी आहें. त्यांनीं क्रमशः सर्व भाषांतर आपल्या मासिकांत प्रसिद्ध करून माझा मूळ उद्देश तडीस नेला, हे त्यांचे मजवर फारच उपकार आहेत.

डेक्कन व्हर्न्यॉक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसायटीनें माझ्या प्रथम वृष्टीला रोख बक्षिस देऊन मला उत्तेजित केलें, याबद्दल मी तिचाही फार आभारी आहें.

प्रथम वृष्टीप्रमाणेंच ही द्वितीय वृष्टिही पुस्तकरूपानें लवकर प्रसिद्ध करण्याला येथील 'भट आणि मंडळी'चेंच साहाय्य कारण झालें आहे. तेव्हां त्याबद्दल मी त्यांच्याही उपकारांनीं बद्ध आहें.

हे सर्व योग यथास्थित जुळवून आणल्याबद्दल पुन्हा एकदां भगवंताला अनन्यभावानें शरण जाऊन मी ही प्रस्तावना पुरी करितों.

पुणें, आक्टोबर १९१५. **भाषांतरकर्ता.**



श्रीदक्षिणेश्वराचें देवालय, कलकत्ता.

रामकृष्ण-वाक्सुधा.

द्वितीय दृष्टि.

बिंदु १ ला.

दक्षिणेश्वरीं श्रीरामकृष्णांच्या सहवासांत एक दिवस.

श्रावण-कृष्ण-प्रतिपदेचा दिवस. तारीख १९ आगस्ट सन १८८३. रविवार असल्यामुळें सर्व भक्तांना स्वाभाविक फुरसत होती. म्हणून ते **श्रीरामकृष्णांचें** दर्शन घेण्याकरितां दक्षिणेश्वरीं काली-मंदिरांत घोळक्या-घोळक्यांनीं येत होते. सर्वांना मुक्तद्वार होतें. जो येईल त्याच्याशीं **महाराज** बोलत होते. सर्व प्रकारचे लोक येत होते—साधु, परमहंस; हिंदु, ख्रिस्ती, ब्रह्मज्ञानी; शाक्त, वैष्णव, शैव; पुरुष, स्त्रीजन. धन्य तूं **राणी रासमणि**! तुझ्याच पुण्याचरणाच्या बळानें त्या सुंदर देवालयाची प्रतिष्ठा झाली, व त्या महापुरुषाचें दर्शन घेऊन त्याची पूजा करण्याकरितां तेथें हजारों लोकांची गर्दी लोटूं लागली!

दुपारची वेळ होती. **महाराज** आपल्या खोलींत धाकट्या पलंगडीवर बसले होते. प्रसादग्रहणानंतर त्यांनीं थोडा आराम केला. विश्रामानंतर वर सांगितल्याप्रमाणें ते पलंगडीवर बसले असतां **एमनें** येऊन त्यांना प्रणाम केला. त्यांनीं त्याला बसायला सांगून

त्याचें व त्याच्या कुटुंबाचें कुशल पुसलें. कांहीं वेळानंतर ते त्याच्याशीं वेदान्तविषयावर बोलूं लागले.

श्रीरामकृष्ण (एमला):—हें पहा, अष्टावक्र संहितेमध्यें आत्मज्ञानाचें विवेचन आहे. 'सोऽहम्' अर्थात् 'मी परमात्मा आहें,' असें आत्मज्ञानी म्हणतात. वेदान्तवादी सर्व संन्याश्यांचें हें मत आहे. पण संसारी जनाला हें म्हणणें ठीक नाहीं. त्याचीं सर्व कर्में चालू असतात; तेव्हां त्याला 'तो निष्क्रिय परमात्मा मी आहें,' असें कसें बरें म्हणतां येईल?

आत्मा निर्लिप्त आहे, असें वेदान्तवादी म्हणतात. सुख-दुःख, पाप-पुण्य, हीं सर्व द्वंद्वें आत्म्याला कोणत्याही रीतीनें अपकार करीत नाहींत; पण देहाभिमानी लोकांच्या मनांवर त्यांचा परिणाम होतो. धुरानें भिंती खराब होतात; पण आकाशावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं.

मी 'ख' आहें,—अर्थात् मी आकाशवत् आहें, (आकाशाप्रमाणें शुद्ध, निरुपाधिक व अलिप्त असा जो परमात्मा तोच मी आहें,) असें कृष्णकिशोरबाबू म्हणत. पण ते परम भक्त होते, त्यांच्या तोंडीं ते शब्द बरोबर साजतात; पण सगळ्यांच्याच तोंडीं तसे ते साजत नाहींत.

पण 'मी मुक्तच आहें,' ही भावना प्रत्येकानें धरणें फारच चांगलें. 'मी मुक्त आहें,' 'मी मुक्त आहें,' असे शब्द मनुष्य जर निरंतर व पावलोपावलीं खऱ्या भावनेनें काढीत राहील, तर तो मुक्त होईल, यांत शंकाच नाहीं. बरें, 'मी बद्ध आहें,' 'मी

बद्ध आहें, ' या भावनेला जो निरंतर धरून बसेल, तो बेटा काय-मचा बद्धच होऊन राहणार.

' मी पापी आहें, ' ' मी पापी आहें, ' असें मनाच्या दुबळे-पणानें जो निरंतर घोकीत राहील, त्याचें पतन निश्चित आहे. ' भक्तवत्सल परमेश्वराचें मी नामोच्चारण करितों, आतां माझ्या ठिकाणीं पाप संभवणार कसें व मला बंधन तरी कशाचें पडणार ? ' असें माणसानें म्हणावें, हेंच चांगलें.

नंतर एमकडे वळून ते म्हणाले:—हें पहा, आज माझें मन बरोबर नाहीं. ' माझी प्रकृति फारच बिघडली आहे, ' असें हृद-याचें[1] मला पत्र आलें आहे. आतां, माझ्या मनाला जी ही हुरहूर लागली आहे, ती मायेमुळें कीं दयेमुळें ?

एम् बिचारा काय बोलणार ? तो स्तब्ध राहिला.

श्रीरामकृष्ण:—माया कशाला म्हणतात, हें तुला समजतें का ?

माया आणि दया.

माता-पिता, बंधु-भगिनी, स्त्री-पुत्र, पुतण्या-पुतणी, वगैरे आप्त-जनांसंबंधानें जें एक प्रकारचें आपल्याला प्रेम वाटतें, त्याचें नांव माया; आणि सर्व भूतांसंबंधानें जें प्रेम वाटतें, त्याचें नांव दया. आतां,

---

१ **हृदय मुकर्जी** (मुखोपाध्याय) हा श्रीरामकृष्णांचा वृद्ध सेवक असून त्यानें वीस वर्षेपर्यंत (सन १८८१ पर्यंत) दक्षिणेश्वरीं राहून परमहंसांची एकनिष्ठेनें सेवा केली. तो त्यांचा लांबचा पुतण्या होता. हुगळी जिल्ह्यांत सिओड म्हणून एक गांव आहे, तें त्याची जन्मभूमि. कमारपूकर ही परम-हंसांची जन्मभूमि; तेथून तें दोन कोसांवर आहे. तो सन १८९९ च्या एप्रिल महिन्यांत आपल्या वयाच्या बासष्ठाव्या वर्षीं परलोकवासी झाला.

माझ्या मनाची स्थिति जी अशी चमत्कारिक झाली आहे, ती कशानें ? मायेनें कीं दयेनें ?

पण **हृदयानें** आजपर्यंत माझें पुष्कळ केलें. चांगलीच त्यानें माझी सेवा केली. माझ्यासाठीं कोणतेंही हलकेंसुद्धां काम करण्याला त्यानें केव्हांही मागें-पुढें पाहिलें नाहीं. पण शेवटीं शेवटीं मला त्यानें चापांतही तसेंच धरलें ! इतकें त्यानें मला छळलें कीं, त्याच्या त्या करड्या अंमलाच्या जाचानें त्रासून जाऊन, गंगेंत उडी टाकून देहत्याग करावा, अशा हेतूनें एक दिवस मी घाटावरसुद्धां गेलों ! पण कांहीं जरी असलें, तरी त्यानें माझें केलें आहे पुष्कळ. या वेळीं त्याला जर कांहीं पैशाची मदत होईल, तर मला बरें वाटेल. पण मीं पैसे मागावे कोणाजवळ ? त्यासाठीं बाबूंजवळ तोंड वेंगाडावें कोणीं ?

बिंदु २ रा.

सुमारें दोनतीन वाजतां **अधर** व **बलराम** हे दोन **महाराजांचे** शिष्य आले. त्यांनीं **महाराजांना** साष्टांग नमस्कार घातला व ते जागेवर जाऊन बसले. ‘ आपलें कसें काय चाललें आहे ? ’ असा त्यांनीं **महाराजांना** प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले, ‘ शरीर ठीक-आहे; पण मन तसें नाहीं. तें कांहींसें कष्टी आहे. ’ **हृदयाच्या** आजारीपणासंबंधानें त्यांनीं अक्षरही काढलें नाहीं.

पुढें बडाबाजारांतील **मलिकांच्या सिंहवाहिनी** नामक देवी

संबंधानें बोलणें निघालें. तेव्हां **महाराज** म्हणाले, ' एकदां मी ती देवी (सिंहवाहिनी) पाहण्याकरितां गेलों होतों. चाषाधोपाड्यांत (कलकत्त्याचा एक भाग) राहणाऱ्या **मलिकांच्या** एका कुटुंबांत ती होती. घर बहुतेक ओसाड होतें. त्या कुटुंबाला अगदीं गरिबी आली होती. घरांत कांहीं ठिकाणीं उकिरडे सांचले होते, घाण पडली होती; कांहीं ठिकाणीं शेवाळ धरलेलें दिसत होतें. भिंतींचा गिलावा बहुतेक पडून गेला होता, व विटांची माती व वाळू झुरूझुरू सारखी पडत होती. **मलिकांचीं** दुसरीं घरें मीं पाहिलीं आहेत; त्यांचें वैभव निराळें. तसें या घराचें नव्हतें. (**एमला**) बरें, याचें कारण काय, हें तुला सांगतां येईल का ?

कारण कांहीं सांगतां येत नसल्यामुळें **एम्** चुप राहिला.

श्रीरामकृष्ण:—असें आहे कीं, जो ज्याचा कर्मभोग असेल, तो कांहीं त्याला सुटत नाहीं. संस्कार, प्रारब्ध, हीं सर्व आपल्याला मानलींच पाहिजेत. (**एमला**) त्या ओसाड घरांत एक गोष्टमात्र मीं पाहिली; ती ही कीं, त्या देवीच्या (सिंहवाहिनीच्या) मुखावर मूर्तिमंत तेज उभें होतें. देवतांच्या मूर्तींमध्यें परमेश्वरी आविर्भाव असतो,—मूर्तींत परमेश्वराची वसति असते,—हें आपण सत्य मानिलें पाहिजे.

मूर्तींत परमेश्वराची वसति.

मी एकदां विष्णुपुराला गेलों होतों. राजानें तेथें पुष्कळ सुंदर देवालयें बांधिलीं आहेत. एका देवळांत भगवतीची मूर्ति आहे. तिचें नांव **मृण्मयी**. त्या देवळाच्या समोर एक मोठें तळें आहे. (**एमला**) पण, आपले केश सुगंधित करण्याकरितां स्त्रिया त्यांना

जो मसाला लावितात, त्या मसाल्याचा मला त्या तळ्याच्या पाण्यांतून वास आला. हें कसें काय ? सांग पाहूं. स्त्रिया **मृण्मयींच्या** दर्शनाकरितां आल्या, म्हणजे तिला तो मसाला अर्पण करितात, हें मला कांहीं ठाऊक नव्हतें. तळ्याच्या कांठीं मीं असतांनाच माझी समाधि लागली; तेव्हां मी देवीची (मृण्मयीची) मूर्तिसुद्धां पाहिली नव्हती; पण त्या समाधीच्या भरांत मला **मृण्मयीचें** कमरेपर्यंत दर्शन झालें. **आईनें मृण्मयीच्या** रूपानें समाधीमध्यें मला दर्शन दिलें.

भक्तांचें सुख-दुःख.

इतक्यांत आणखी भक्तमंडळी आली. नंतर काबूलचें युद्ध व तेथील राजविप्लव यांवर भाषणाचा ओघ फिरला. **याकूबखान** सिंहासनच्युत झाला, असेंही एका भक्तानें सांगितलें. तो **रामकृष्णांना** म्हणाला, '**महाराज, याकूबखान** तर मोठा भक्त आहे ! '

श्रीरामकृष्णः—बाबा, देह म्हटला कीं तिथे सुख-दुःख आलेंच. **कविकंकणाच्या** ' चंडी-'मध्यें असें सांगितलें आहे कीं, महाभक्त **कालवीर** हा कारागृहांत गेला ! तिथे त्याच्या छातीवर मोठा जड धोंडा ठेविला ! इकडे तर **कालवीर भगवतीचा** वरपुत्र !

तात्पर्य इतकेंच कीं, देहधारण झालें म्हणजे सुख-दुःख मागें आलेंच.

श्रीमंत हा केवढा मोठा भक्त ! त्याची आई **खुल्ना** इच्यावर **भगवतीचें** किती प्रेम ! पण अशा **श्रीमंताला** किती विपत्ति भोगाव्या लागल्या ! शेवटीं त्याला फांशीं जावें लागलें !

एक गरीब मनुष्य होता. मोठा भक्त. तो रानांतून लांकडें तोडून आणी व तीं विकून आपला निर्वाह करी. त्याला सुदैवानें आईचें–भगवतीचें दर्शन झालें; तिचें त्याच्यावर कोण प्रेम,– केवढी कृपा! पण रोजच्या धंद्याची कटकट त्याच्या मागची कांहीं सुटली नाहीं! पोटासाठीं त्याला लांकडें शोधून आणून विकावींच लागत!

भगवंताचा अनन्य भक्त संसाराच्या सुस्थितींतच असला पाहिजे, असें कांहीं नाहीं. जनांत जरी कदाचित् तो दरिद्री असला, तरी मनांत तो खूप श्रीमंत असतो. शंखचक्रगदापद्मधारी अशा चतुर्भुज भगवंताचें देवकीला कारागृहांत दर्शन झालें. असा साक्षात्कार जरी तिला झाला, तरी तिच्या कपाळचा कारागृहवास कांहीं सुटला नाहीं.

एम्:—कारागृहवास? मला वाटतें, सर्व दुःखाचें मूळ जो देह, त्याच्यापासूनच तिची सुटका होणें उचित होतें.

महाराज:—असें आहे कीं, पूर्वकर्मानुसार देहाची प्राप्ति होते. प्रारब्ध हेंच मुळीं आहे देहाला कारण. तेव्हां जोंपर्यंत भोगानें प्रारब्धनिवृत्ति झाली नाहीं, तोंपर्यंत देहाचें लोढणें मनुष्यानें वागविलेंच पाहिजे. एक आंधळा होता. त्यानें गंगास्नान केलें. त्या स्नानानें त्याच्या सर्व पापांचें क्षालन झालें. पण त्याचा आंधळेपणा जाऊन त्याची दृष्टि कांहीं शाबूद झाली नाहीं. पूर्वजन्माचें कर्म, तें भोगलेंच पाहिजे!

एम्:—जो बाण धनुष्यापासून सुटला, तो आपलें कार्य करणारच. त्या बाणावर मग कोणाची सत्ता चालणार?

महाराजः—देह सुखी किंवा दुःखी असेल. पण कांहीं जरी झालें, तरी खरा भक्त जो आहे, तो आत्मैश्वर्यांतच–ज्ञानाच्या व भक्तीच्या ऐश्वर्यांतच–सर्व काळ रंगलेला असावयाचा. पांडवांचेंच उदाहरण पहाना! किती विपत्ति त्यांना भोगाव्या लागल्या! काय संकटें त्यांच्यावर कोसळलीं! कसले प्रसंग त्यांना पहावे लागले! पण अशा भयंकर विपत्तीमध्यें त्यांची भगवंतावरील श्रद्धा, निष्ठा, भक्ति तिळमात्रही ढळली नाहीं. त्यांच्यासारखे ज्ञानी, त्यांच्यासारखे भक्त आहेत का कुठे?

बिंदु ३ रा.

विवेकानंदः महाराजांची समाधि.

इतक्यांत नरेन्द्र व **विश्वनाथ उपाध्याय** हे दोघे येऊन दाखल झाले. **विश्वनाथ उपाध्याय** हे नेपाळच्या राजाचे कलकत्त्यांतील वकील–प्रतिनिधि–होते. **महाराज** त्यांना **कॅप्टन** म्हणत; यामुळें त्यांचे सर्व शिष्यही त्यांना त्याच नांवानें संबोधीत. **नरेन्द्राचें** वय तेव्हां सुमारें बावीस वर्षांचें असून तो बी. ए. च्या वर्गांत होता. मधून मधून–विशेषतः रविवारीं–तो **महाराजांचे** दर्शनाकरितां येत असे. त्यांना प्रणाम करून तो बसला.

महाराजांनीं त्याला गायला सांगितलें. खोलीच्या पश्चिमेकडील भिंतीला तंबुरा टांगून ठेवलेला होता. **नरेन्द्रानें** तो काढून घेतला; व तबल्याबरोबर मिळवून घेण्याकरितां तो त्याच्या खुंट्या पिळवटूं लागला. डग्गा, तबला, तंबुरा यांची मिळवणी चालू

असतां सर्व कसे एकदृष्टीनें गायकाच्या मुखाकडे पाहात होते ! कधीं एकदां गाणें सुरू होतें, असें त्यांना होऊन गेलें होतें !

महाराज (नरेन्द्राला):--हें हत्यार आतां तसें (पूर्वीसारखें) वाजत नाहीं.

कॅप्टनः—तें पूर्ण होऊन बसलें आहे; म्हणून आवाज नाहीं. पूर्ण (कांठोकांठ) भरलेल्या भांड्यासारखें.

महाराजः—मग नारदादि सत्पुरुषांसंबंधानें तुझें काय म्हणणें आहे ? ते सिद्धकोटीला जाऊनसुद्धां बोलत होते. ते पूर्ण झाले होते, तरी शब्द काढीत होते.

कॅप्टनः—जडजीवांच्या कल्याणाकरितां ते बोलले.

महाराजः--खरें आहे. नारद व शुकदेव समाधि सोडून खालीं आले होते. जे जीव दुखांत तळमळत होते–त्रिविध तापानें पोळले होते–त्यांची त्यांना दया आली. केवळ परहिताकरितां त्यांनीं बोल काढले.

नरेंद्र पद म्हणूं लागलाः—

पद.

(चाल–तस्करा हातीं...)

शिवद सन्मूर्ति । मूर्ति रम्यकांति । मनोहर विमल पूर्णदीप्ति ॥
चित्तमंदीरीं । सांग कधीं शांति । प्रकाशुनि करिसि कामपूर्ति।ध्रु०।
अनुदिनीं तुजला । तुजला निरखोनी । समुत्कट पूर्णलोलनयनीं।
रूपसिंधूंत । तुझ्या कृपासिंधो । घडे कधिं मज्जन नतबंधो ! ॥
अनंतज्ञान । ज्ञानरूप नाथा ! । उदित हो हृदयीं मम आतां ॥
बावरें चित्त । चित्त मूक झालें । पदाब्जीं रंगुनि तव गेलें ॥

सच्चिदानंदा । नंदामृतनिलया । चिन्नभिं येसी जों उदया ॥
विधूदयीं जेविं । जेविं चकोरासीं । होई; होय तसें मजसीं ॥
पुरविं ही इतुकी । इतुकि तरी आर्ति । मंगला! देइं मना शांति १
परम शांत दांता ! । दांत राजराजा । अलौकिक दिव्य महातेजा !
चरणकमलीं या । कमलिं विजितमाया । मुदा ही कुरवंडिन काया
तदा मानीन । मानीन जन्महेतु । सफल बा धरितां नच किंतू ॥
असा या जन्मीं । जन्मीं स्वभोग । सेवुनी समोदानुराग ॥
काय अधिकार । अधिकार असामान्य । असा ज्या लाभे तो धन्य ।
यदा मी शुद्ध । शुद्ध निष्पाप । बघें तव रूप शार्ङ्गचाप ! ॥
अखिल मम दोष । दोष जाति पूर्ण । प्रकाशें जेविं तिमिर तूर्ण ॥
कदा तो सुदिन । सुदिन परंज्योति । निवारी दासभयभ्रांति ॥ चि०
ध्रुवासम अढळ । अढळ भक्तिभाव । वसो मम हृदयिं हीच हांव ।
असे ही सकल । सकल माझि जोडी । सफल ती करीं हात जोडीं ।
असा मी होतां । होतां सुखमग्न । अहर्निश करुनि तुझें ध्यान ।
प्रभो ! विसरोनि । विसरोनि देहभान । होईन तूंच मी जाण ॥
परी तो दिवस । दिवस सोनियाचा । कधीं बा ! उगवे सौख्याचा ।
तुझ्या हें हातीं । हातिं दीननाथा । उपेक्षूं नको भाग्यवंता ! ॥
पुरविं ही इतुकी । इतुकि तरी आर्ति । दयाघन ! देइं मना शांति ।
चित्त० ॥ ३ ॥

'सच्चिदानंदा । नंदामृतनिलया ।' हे शब्द कानांवर पडतात न पडतात, तोंच **श्रीरामकृष्ण** गाढ समाधींत निमग्न झाले! हात जोडून ते बसले होते. तोंड पूर्वेच्या बाजूला होतें. देह उन्नत होता. आनंदमयी अशा आईच्या रूपसागरामध्यें त्यांनीं खूप खोल बुडी मारिली होती. त्यांच्या ठिकाणीं जागृतीचें अल्पही चिन्ह नव्हतें! त्यांना बाह्य जग शून्य झालें होतें! श्वास वहात होता कीं नव्हता! अवयवांची हाल नव्हती कीं चाल नव्हती! केवळ चित्रासारखे ते

बसले होते! हें राज्य–हें इंद्रियगम्य जग–सोडून ते कुठे तरी दूर दूर गेले होते!

बिंदु ४ था.

समाधि उतरली. पण त्यापूर्वींच, **महाराज** समाधिनिमग्न झाले असें पाहून **नरेन्द्र** खोलींतून पडवींत निघून गेला होता. त्या ठिकाणीं **हज्रा** घोंगडीवर बसून माळ ओढीत होता. **नरेंद्र** त्याच्याजवळ बोलूं लागला.

या वेळीं **श्रीरामकृष्णां**ची खोली लोकांनीं–अर्थात् भक्तांनीं–अगदीं भरून गेली होती. समाधिभंग झाल्यानंतर **नरेन्द्र** कोठें आहे, हें पाहण्याकरितां **महाराजांनीं** एकदां सर्व भक्तमंडळीकडे पाहिलें. तो कांहीं तेथें दिसला नाहीं. तंबुरामात्र जमिनीवर पडला होता! भक्तगणाचे डोळे अगदीं औत्सुक्यपूर्वक **महाराजां**कडे लागले होते.

महाराज (नरेंद्राला उद्देशून):—त्यानें एकदां अग्नि चेतवून दिला. आतां तो गेला काय नी राहिला काय! (कॅप्टन व अन्य भक्त यांना) सच्चिदानंदाचें चिंतन करा; म्हणजे तुम्हांलाही आनंदाची प्राप्ति होईल. चिदानंद इथे आहे, तिथे आहे, सर्वत्र आहे; केवळ विक्षेपाचें--अज्ञानाचें--त्यावर आवरण पडलें आहे. विषयासक्ति जितकी कमी होईल, तितकी ईश्वरभक्ति तुमची वाढेल.

कॅप्टन:—जसे जसे आम्ही कलकत्त्यांतील आपल्या घराच्या जवळ जवळ येऊं, तसे तसे काशीपासून दूर दूर होऊं; आणि जसे जसे काशीच्याजवळ जाऊं, तसे तसे घरापासून दूर होऊं.

महाराजः—श्रीमती (राधा) जशी जशी कृष्णाच्या जवळ येई, तसा तसा त्याच्या मनोहर देहाचा मधुर गंध तिला अधिकाधिक प्राप्त होई. मनुष्य ईश्वराच्या जसा जसा निकट जातो, तशी तशी त्याची भक्ति वाढत जाते. नदी जितकी सागराच्या निकट, तितका तिच्या भरती-ओहटीचा जोर ज्यास्ती.

ज्ञानी व भक्त; ब्रह्म व शक्ति.

ज्ञान्याच्या (वेदान्त्याच्या) अंतरंगीं वाहणारी गंगा एकपथगा किंवा एकांगी असते. त्याला सर्व जग स्वप्नवत् वाटतें. तो नेहमीं स्वस्वरूपीं रंगलेला असतो. पण भक्ताच्या अंतरंगीं वाहणारी गंगा एकांगी नसते. तिला भरती-ओहटी असते. भक्त हासतो, रडतो, नाचतो, गातो. भक्ताला त्याच्याबरोबर क्रीडा करणें आवडतें. ईश्वरसागरांत तो पोहतो, बुडी मारतो, आनंदानें पुन्हा बाहेर येतो. पाण्यांत तरंगणारा बर्फाचा तुकडा जसा 'थै थै' 'थै थै' करतो तसा. (सगळे हासतात.)

ब्रह्माचें ज्ञान आपल्याला प्राप्त व्हावें, ही ज्ञान्याची इच्छा; षड्गुणैश्वर्यपूर्ण, सर्वशक्तिमान् अशा भगवंताची आपल्याला प्राप्ति व्हावी, ही भक्ताची इच्छा. परंतु वस्तुतः ब्रह्म व शक्ति हीं अभेद आहेत. जो सच्चिदानंद आहे, तोच सच्चिदानंदमयी (सच्चिदानंदस्वरूपा शक्ति) आहे. मणि व ज्योति (तेज) यांची वियुक्तभावना कांहीं करितां येणार नाहीं; 'मणि' असें म्हटलें कीं, त्याच्याबरोबर त्याची ज्योति येणारच; बरें, 'ज्योति' असें म्हटलें कीं, मणि तिथे उभाच.

सच्चिदानंदस्वरूप जें परब्रह्म तें मूळ एकच—अद्वितीय; आत्मशक्तीनें तें आविर्भूत झालें. शक्तिभेदानें नामरूपात्मक उपाधिभेद त्याच्यामागें लागला. अर्थात् त्याच्या आविर्भूत शक्तीच्या विविधतेमुळें त्यालाच नाना रूपें व नाना नामें प्राप्त झालीं. म्हणूनच ' **तारे**, असे तें खरें सर्व तूंच ॥ ' असें एका भक्तानें म्हटलें आहे. जिथे कार्य (सृष्टि, स्थिति, लय) आहे, तिथे शक्ति आहे. पण पाणी तें पाणीच;—मग तें स्थिर असो कीं चल असो. जो सच्चिदानंद तीच सृष्टि, स्थिति, प्रलय करणारी आदिशक्ति. **कॅप्टन** तो कॅप्टनच;—तो स्वस्थ बसला, तरी तो **कॅप्टन**च; पूजा करीत असला, तरी तो **कॅप्टन**च; लाटसाहेबांना भेटायला गेला, तरीही तो **कॅप्टन**च. केवळ हे त्याचे उपाधिविशेष आहेत.

कॅप्टनः——होय, खरें आहे **महाराज.**

महाराजः—**केशवसेना**लाही मीं असेंच सांगितलें.

कॅप्टनः—**महाराज, केशवसेन** भ्रष्टाचार आहे, स्वेच्छाचार आहे. त्याला साधु कसें म्हणावें ? तो केवळ बाबू आहे, साधु नाहीं.

महाराज (भक्ताकडे वळून सस्मित):—**केशवसेना**कडे मीं कधीं जाऊं नये, असें **कॅप्टन**चें नेहमीं मला सांगणें असतें.

कॅप्टनः—**महाराज**, पण आपण जाणारच; तिथे मी काय करणार ?

महाराज (त्रासानें):—तूं लाटसाहेबाकडे जावें ! शास्त्राप्रमाणें तो केवळ म्लेंच्छ असतां तूं त्याच्याकडे खुशाल जावें ! आणि तेंसुद्धां केवळ पैशासाठीं ! आणि मीमात्र **केशवसेना**कडे जाऊं

नये का ? तो ईश्वरचिंतन करितो, हरिनाम घेतो ! ' ईश्वर, माया जीव, जगत् हीं सर्व एकच आहेत; जो ईश्वर त्यानेंच या सर्व जीवांचें व जगताचें रूप धारण केलें आहे. ' असें नेहमीं म्हणणारा जो तूं त्यानें तोंडांतून असे उद्गार काढणें कांहीं शोभत नाहीं ! 'खायचे दांत एक आणि दाखवायचे निराळे,' असें असूं नये !

एवढें बोलून **महाराज** एकदम जे खोलींतून बाहेर पडले, ते ईशान्येकडील पडवींत गेले. **कॅप्टन** व इतर भक्त त्यांच्या प्रत्यागमनाची वाट पहात खोलींतच बसून राहिले. **एम्**मात्र त्यांच्या मागोमाग गेला.

त्या पडवींत **नरेन्द्र** हज्राबरोबर बोलत बसलेला होता. हज्रा हा पक्का अद्वैती आहे, केवळ ज्ञानविचारांत रमणारा आहे,—अतएव अगदीं शुष्क आहे, हें **श्रीरामकृष्णां**ना चांगलें ठाऊक होतें. " जग स्वप्नवत् आहे; पूजा, नैवेद्य इत्यादि सर्व म्हणजे केवळ मनाची भूल आहे; ईश्वर अव्यय व अविकार्य आहे; मनुष्यानें निरंतर केवळ स्वस्वरूपाचें चिंतन करावें, दुसरें कसलेंही करूं नये; ' अहं ब्रह्मास्मि. ' " असें तो नेहमीं बोले.

महाराज (सहास्य):-कां ? तुमचें काय बोलणें चाललें आहे ?

नरेन्द्र (सहास्य):—आमच्या काय, मोठमोठ्या गोष्टी चालल्या आहेत !—सामान्य माणसांना त्या कळायच्याही नाहींत !

महाराज (सहास्य):—कांहीं तुम्ही बोला ! पण शुद्ध भक्ति व शुद्ध ज्ञान हीं दोन्ही एकच. शुद्ध ज्ञान मनुष्याला ज्या पदावर

नेऊन बसवितें, त्याच पदावर शुद्ध भक्तिही त्याला नेऊन बसविते. भक्तिमार्ग हा सोपा, चांगला, सरळ व सहज मार्ग आहे.

नरेन्द्रः—खरें आहे; नुसता ज्ञानविचार करून काय हातीं लागणार? '**आई**, तुझ्या भक्तीनें मला वेडा करून टाक.' (**एमला**) हें पहा, मी हल्लीं **हॅमिल्टन** (हॅमिल्टन नांवाच्या इंग्रज तत्त्वज्ञाचे ग्रंथ) वाचीत आहें; तो म्हणतो—"A learned ignorance is the end of philosophy and the beginning of Religion"

महाराज (एमला):—याचा अर्थ काय?

नरेन्द्रः—तत्त्वज्ञानाचा अभ्यास पुरा झाला, कीं मनुष्य पढीक-मूर्ख होऊन बसतो; व मग लागलाच धर्माकडे वळतो.

---

१ मनुष्याला आपल्या बुद्धीची स्वाभाविक घमेंड असते. आपल्या बुद्धीच्या जोरावर तात्त्विक विचार करितां करितां सृष्टीच्या बुडाशीं असलेलीं गूढ प्रमेयें आपण तेव्हांच उकलून टाकूं, असें त्याला वाटतें. त्या भ्रमांत तो विचार करूं लागतो. आपल्या मतें कांहीं सिद्धान्त बांधतो. पण कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत गेल्यावर त्याची मति स्वाभाविक थकते—कुंठित होते. आपली बुद्धिशक्ति आपण कमाल मर्यादेपर्यंत ताणली, तरी अनेक दुर्बोध गोष्टींचा उलगडा कांहीं तिला होत नाहीं, असें त्याला दिसून येतें. आपण आपल्याला मोठे पंडित म्हणवतों खरें, पण शेवटीं आपण मूर्खच, असें त्याच्या प्रत्ययास येतें. आपल्या बुद्धीचा पंगूपणा त्याच्या लक्षांत येतो. असें डोळ्यांत सणसणीत अंजन पडलें कीं, ईश्वरावर त्याची श्रद्धा जडूं लागते. हाच धर्माचा आरंभ. भा० क०

श्रीरामकृष्ण हासून 'थँक् यू (मी तुझा आभारी आहें)' असें म्हणाले; तेव्हां सगळे हासूं लागले; कारण पांचचार शब्दांपलीकडे कांहीं त्यांचें इंग्रजीचें ज्ञान नव्हतें.

बिंदु ५ वा.

कांहीं वेळानें संध्याकाळ होत आली, असें पाहून बहुतेक लोक **महाराजां**चा निरोप घेऊन गेले. **नरेन्द्र**ही गेला.

सूर्यास्त होण्याची वेळ आली. बहुतेक अगदीं संध्यासमय झाला. फरास (देवळांतील दिवाबत्ती करणारा) दिव्यांच्या तजविजीला लागला. कालीचा व विष्णूचा असे दोघे पुजारी गंगेच्या कंबरभर पाण्यांत उभे राहून बाह्य व आंतर शुद्धीकरितां समंत्र स्नान करीत होते. लवकरच जाऊन त्यांना देवतांची आरति व रात्रिकालीन इतर सेवा करावयाची होती. दक्षिणेश्वरग्रामवासी युवकगण हातांत काठ्या घेऊन आपल्या मित्रवर्गासह देवळाच्या बागेंत हवा खाण्याकरितां आला होता. तो गंगेच्या घाटावर इकडे तिकडे फिरून कुसुमगंधवाही निर्मल संध्यासमीरण सेवन करीत करीत खरस्रोत व ईषद्वीचिकंपित असा श्रावणांतील गंगानदीचा प्रवाह अवलोकन करीत होता. त्यामध्यें जे कोणी विशेष चिंतनशील होते, ते पंचवटीच्या विजनप्रदेशांत भ्रमण करितांना दिसत होते. **भगवान् श्रीरामकृष्ण**ही पश्चिमेकडील पडवींत उभे राहून कांहीं वेळपर्यंत गंगेचें दर्शनसुख घेत होते.

अगदीं संध्याकाळ झाली. फरासानें देवळांत जिकडे तिकडे दिवे लावून टाकले. वृद्ध दासीनें येऊन **श्रीरामकृष्णां**च्या खोलींत दिवा लावला व धूप घातला. इतक्यांत शिवाच्या बारा मंदिरांत आरति सुरू झाली. त्यानंतर लागलीच विष्णूच्या व कालीच्या देवळांतही ती सुरू झाली. तास, घंटा, झांजा यांचा संयुक्त व गंभीर निनाद कर्णांना सुखवूं लागला; संनिध वाहात असलेल्या कलकलनिनादिनी गंगेवर तो प्रतिबिंबित झाल्यामुळें त्याचें गांभीर्य व माधुर्य फारच वृद्धिंगत झालें होतें.

तो श्रावण-कृष्ण-प्रतिपदेचा दिवस होता. तेव्हां चंद्रोदयही लवकरच झाला. चंद्राच्या आल्हादजनक किरणांनीं उपवनस्थ वृक्षांचीं मस्तकें व देवालयाचा विस्तृत प्राकार हीं शनैःशनैः प्लावित होऊं लागलीं. ज्योत्स्नास्पर्शानें सुप्रकाशित झाल्यामुळें जणूं काय आनंदाच्या भरांत येऊन भागीरथीसलिल प्रवाहित होतांना नृत्य करूं लागलें.

संध्याकाळ झाल्यानंतर **महाराजांनीं** जगन्मातेला नमस्कार केला, व हातांनीं ताल धरून ते हरिभजन करूं लागले. त्यांच्या खोलीमध्यें अनेक देव, सत्पुरुष व भगवद्भक्त यांच्या तसबिरी होत्या. भक्तगणासह नामसंकीर्तनांत तल्लीन झालेला श्रीगौरांग, यशोदाकृष्ण, सरस्वती, काली, ध्रुव, प्रल्हाद, राजा श्रीराम, श्रीराधाकृष्ण, इत्यादि चित्रें तेथें होतीं. प्रत्येक देवतेच्या चित्रापुढें जाऊन व त्या देवतेचें नांव घेऊन त्यांनीं तिला प्रणाम केला.

नंतर अद्वैतसूचक अशीं आपलीं नेहमींचीं आवडतीं वचनें ते म्हणूं लागले:—

(१) 'ब्रह्म–आत्मा–भगवान्'=अद्वैतवाद्यांचें ब्रह्म, योग्यांचा आत्मा व भक्तांचा भगवान् हीं तिन्ही एकच आहेत;—वेदान्त, योग व भक्ति यांचा समन्वय आहे.

(२) 'भागवत–भक्त–भगवान्'=भजन, भक्त व भज्य ही त्रिपुटी एकच आहे.

(३) 'ब्रह्म–शक्ति, शक्ति–ब्रह्म'=सगुण व निर्गुण यांचें ऐक्य.

(४) 'वेद–पुराण–तन्त्र'=नाना शास्त्रें, पण त्यांचा विषय एकच–परमेश्वर.

(५) 'गीता–गायत्री.'

(६) 'शरणागत, शरणागत.'

(७) 'नाहं नाहं–तुहु तुहु'=मी नाहीं, मी नाहीं, पण तूं; खरें कर्तृत्व तुझ्याकडे. मी केवळ तुझ्या हातांतलें बाहुलें आहें.

(८) 'आमि यंत्र, तुमि यंत्री'=मी यंत्र असून तूं यंत्रचालक आहेस. इत्यादि इत्यादि.

या वचनांचा पाठ झाल्यावर हात जोडून ते जगन्मातेचें चिंतन करूं लागले.

संध्यासमय झाल्यावर चारदोन भक्त गंगातीरावर उद्यानामध्यें फिरावयास गेले होते. देवळांतील आरति आटोपल्यानंतर कांहीं वेळानें एकेक एकेक येऊन ते सर्व श्रीरामकृष्णांच्या खोलींत गोळा झाले. परमहंस खाटेवर बसले होते.

एम्, अधर, किशोरी इत्यादि येऊन त्यांच्या सन्मुख जमिनीवर बसले.

श्रीरामकृष्णः—नरेंद्र, राखाल, भवनाथ, हे नित्यसिद्ध आहेत; ईश्वरकोटींतलेच आहेत. त्यांना शिक्षण नकोच आहे. जें त्यांचें शिक्षण चालू आहे, तेंच ज्यास्त आहे. पहा, **नरेंद्र** कोणाचीच परवा करीत नाहीं. त्या दिवशीं माझ्याबरोबर **कॅप्टन**-च्या गाडींत बसून तो चालला होता. **कॅप्टननें** त्याला मोठेपणा देण्याकरितां त्याला चांगल्या जाग्यावर बसायला सांगितलें. त्यानें त्याच्याकडे लक्षही दिलें नाहीं. शिवाय, आपल्याला म्हणजे कांहीं समजतें, असें तो मला कधीं दाखवीतही नाहीं. न जाणों, मी कदाचित् त्याच्यामागें त्याची लोकांजवळ स्तुति करीन; **नरेंद्र** एवढा विद्वान आहे, असें म्हणेन ! त्याला मायामोह नाहीं, कसलेंही बंधन नाहीं. वागणूक किती सभ्य ! किती अदबशीर ! पुन्हा चौरस;—अनेक गुण त्याच्या एकट्याच्या अंगीं आहेत;—तो गातो, वाजवितो, लिहितो, वाचतो. बरें, इतकें सगळें असून पुन्हा आपला जितेंद्रिय ! मी लग्न करणार नाहीं, असें त्यानें म्हटलें आहे. **नरेंद्र** आणि **भवनाथ** अगदीं एकजीव आहेत ! **नरेंद्र** फारसा मजकडे येत नाहीं. चांगलें आहे तें. कारण त्याला पाहिलें कीं, माझी नेहमीं समाधि लागते, मी विव्हल होतों !

बिंदु ६ वा.

सुरेंद्राच्या बागेंत महोत्सव.

तारीख १६ माहे जून सन १८८४ रोजीं रविवार होता. तिथि ज्येष्ठ-कृष्ण-षष्ठी. त्या दिवशीं **महाराज** सुरेंद्राच्या कलकत्त्याजवळील कांकूरगची येथील बागेंत भोजनाला गेले होते. **सुरेंद्र** गृहस्थाश्रमी असून महाराजांच्या प्रिय शिष्यांपैकीं एक होता. अशा प्रकारच्या भोजनांचे निमित्तानें **महाराजांचे** सर्व शिष्य व भक्त एकत्र जमत असत. खरोखर महोत्सवाचेच प्रसंग ते. अशा दिवशीं टाळ, मृदंग यांच्या श्रुतिमनोहर घोषांत मोठ्या रंगानें नामसंकीर्तन होत असे. सनृत्य भजन करितां करितां **महाराज** प्रेमोन्मत्त होऊन अगदीं देहभान विसरून जात; पुष्कळ वेळा ते समाधिमग्न होत असत. ठीकच आहे, एकदां ब्रह्मानंदीं टाळी लागली, म्हणजे देह कसला आणि जग तरी कसलें !

भजन आटोपलें व भक्तिसुखानें उन्मत्त झालेलीं मनें जरा स्थिर झालीं, म्हणजे **महाराज** आपल्या दिव्य वाक्सुधेनें सर्वांना आकंठ पान करवीत. काय त्या भाषणाची माधुरी ! जगताचा उद्धार करण्याकरितां आत्म्याच्या शुद्ध स्वरूपापासून निघून बुद्धीच्या सरळ उतारानें धो धो वहात सुटलेली दिव्य ज्ञानगंगाच ती ! त्या अमृतरसाच्या मेजवानीच्या मौजेचें वर्णन करण्याची व्यर्थ खटपट करण्यांत अर्थ तरी कोणता ? ज्यांना सुदैवानें त्या वचनामृताच्या आस्वादाचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त झाला, त्यांच्या स्मरणांतून त्याची गोडी कधींही नाहींशी व्हावयाची नाहीं !

असो. या दिवशीं सकाळीं पहिल्यानें संकीर्तन सुरू झालें. गोपींचें श्रीकृष्णावरील प्रेम व श्रीकृष्णाचा विरह झाल्यानंतर राधेची झालेली शोचनीय अवस्था, यांचें रसभरित वर्णन ज्यांत केलेलें आहे, अशीं पदें भजनी मंडळी प्रेमानें गाऊं लागली. मधून मधून **महाराज** भावाविष्ट, समाधिमग्न होत. भजन चाललें असतांना **महाराज** एकदम उभे राहून करुणस्वरानें म्हणाले, " सखे ! माझ्या प्राणवल्लभाला कसा तरी मजजवळ आण; किंवा तो जिथे असेल, तिथे मला तरी घेऊन चल. "

महाराजांना राधेची भावना झाली. आपण राधाच आहों, असें त्यांना अगदीं पूर्णपणें वाटूं लागलें.

महाराजांची समाधि.

वरील उद्गार काढल्यावर ते निर्वाक्–निःशब्द–झाले. देह पुतळ्यासारखा स्थिर झाला. नेत्र अर्धनिमीलित झाले. वृत्ति बाह्यशून्य झाली. अशा रीतीनें ते अगदीं समाधिमग्न झाले.

कांहीं वेळानें प्रकृतीवर–भानावर–आल्यावर ते पुन्हा अगदीं करुणस्वरानें म्हणाले, " सखे ! एवढें माझें काम करशील, तर तुझे माझ्यावर किती उपकार होतील म्हणून सांगूं ! हें पहा, कृष्णप्रेमाचा घडा पहिल्यानें कोणीं बरें मला घालून दिला ? तूंच नव्हे का ? नव्हे का ? "

या उद्गारांत करुणरस इतका ओतप्रोत भरला होता कीं, ते त्यांचे शब्द ज्यांनी ज्यांनीं ऐकले, त्यांच्या डोळ्यांतून टिपेंच पडलीं.

भजनी मंडळीचें पद पुन्हा सुरू झालें. त्या पदांत राधेचे तोंडीं असे उद्गार होते:–" सखे ! नको ग बाई, तें यमुनेवर पाण्याला जाणें ! आतां मी म्हणून कधींच जायची नाहीं ! कारण त्या तिथल्या कदंबवृक्षाचें दर्शन झालें कीं, आपली एकदम प्राणसख्याची मूर्ति मनापुढें उभी राहते, आणि मग मी अगदीं विव्हळ होऊन जात्यें. "

महाराजांनीं दीर्घ श्वास सोडून " हाय ! हाय ! " एवढेच उद्गार काढले. पद संपल्यावर मंडळीनें हरिनामाचा गजर सुरू केला, तेव्हां पुन्हा **महाराज** उभे राहिले. लागलेच समाधिमग्न झाले !

कांहींसे भानावर आल्यावर अस्फुट स्वरानें ते " किष्ट, किष्ट" असें म्हणाले. ते भावनिमग्न असल्यामुळें " कृष्ण, कृष्ण " असा स्पष्ट नामोच्चार त्यांच्या मुखांतून होईना !

पुन्हा नामसंकीर्तन सुरू झालें. मृदंग व करताल वाजूं लागले. **महाराजांनीं** स्वतः, " राधे गोविंद जय ! " असा घोष सुरू केला. ते नाचूं लागले. भक्तही भजनरंगानें उन्मत्त झाल्यामुळें त्यांच्याभोंवतीं फेर धरून आनंदानें नाचूं लागले. तोंडांत सारखें " राधे गोविंद जय ! राधे गोविंद जय ! "

हा सगळा कीर्तनाचा थाट दिवाणखान्यांत झाला. नंतर **महाराज** दिवाणखान्याला लागूनच असलेल्या पश्चिमच्या बाजूच्या एका खोलींत गेले.

गोपींविषयीं बोलतां बोलतां **महाराज** एमला म्हणाले, " काय विलक्षण त्यांचा अनुराग तरी! तमाल-वृक्ष दिसला कीं, त्या प्रेमानें अगदीं वेड्या होऊन जात. "

कृष्ण-प्रेमाचें वेड.

शिष्यः—चैतन्यदेवांचीसुद्धां हीच स्थिति. अरण्य पाहिलें, कीं हें वृंदावनच आहे, असें आपलें त्यांना वाटे!

महाराजः—अहाहा! त्या शुद्ध प्रेमाचा एक बिंदु जर कोणाला प्राप्त होईल! काय अनुराग तो! काय प्रेम तें! नुसतें सोळा आणे नव्हे, किती तरी ज्यास्ती!–पांच रुपये पांच आणे!

कृष्ण व राधा हीं अवतारी माणसें होतीं, याच्यावर कोणाची श्रद्धा असो कीं नसो; त्याचें कांहीं मोठेंसें महत्त्व नाहीं. ईश्वरी अवतारांवर कोणाचा (हिंदूंचा व ख्रिस्त्यांचा आहे त्याप्रमाणें) विश्वास असेल, कोणाचा नसेल. पण भगवंतासंबंधानें तसें अगाध प्रेम आपल्या अंगीं यावें, अशी आतुरता सर्वांना लागली पाहिजे. मुख्य पाहिजे तें हेंच.

मुख्य पाहिजे तें हेंच.

तुम्ही वेडे होणार, तर व्हा; पण विषयानें वेडे होऊं नका, भगवद्भक्तीनें व्हा.

नंतर **महाराज** पुन्हा दिवाणखान्यांत येऊन बसले. शिष्य-मंडळीही मागोमाग आली.

त्यांच्यासाठीं तेथें एक तक्ता ठेवून दिला होता. बसतांना 'ॐ तत्सत्' या मंत्राचा उच्चार करून मग महाराजांनीं तक्त्याला स्पर्श केला. हजारों विषयी जन त्या बंगल्यांत येतजात; अर्थात् ते सगळे त्या तक्त्याचा उपयोग करीत. अशा रीतीनें त्यांच्या संसर्गानें तो विटाळला होता, अपवित्र झाला होता. तेव्हां त्याची शुद्धि करण्याकरितां महाराजांनीं वरील मंत्र उच्चारला.

शुद्धि.

उशीर किती तरी झाला; तरी जेवणाची कोठें तयारी दिसेना. **महाराज** बरेच आतुर झाले. यजमान **सुरेंद्र**. तो तर त्यांचा अगदीं शिष्य. **महाराज** केवल बालस्वभावी! ते म्हणाले, 'काय रे, हा अद्याप जेवायला घालीत नाहीं? **नरेंद्र** कोठें आहे?'

एक भक्त (सहास्य):–महाराज! **रामबाबू** व्यवस्थापक! ते आज सगळें पाहताहेत. (सगळे हासतात.)

महाराज (हासत हासत):–**राम** व्यवस्थापक ना? मग झालें तें बरोबरच!

एक भक्तः–-खरें आहे, महाराज. जिथे **रामबाबू**कडे व्यवस्था जाते, तिथे असेंच होतें. (सगळे हासतात.)

महाराजः–**सुरेंद्र** कोठे आहे? आहा, **सुरेंद्रा**चा स्वभाव किती छान झाला आहे! मोठा स्पष्टवक्ता! खरें बोलायला तो कधींच कोणाला भ्यायचा नाहीं. पुन्हा हाताचा अगदीं सढळ! कोणी त्याच्या जवळ साहाय्यार्थ गेलें, तर रिकाम्या हातानें परत नाहीं येणार.

(एमला) तूं **भगवानदासाकडे** गेला होतास, कसा काय माणूस आहे तो ?

इतक्यांत **निरंजन** आला. तोही त्यांचा शिष्यच होता. त्याला पाहिल्याबरोबर **महाराज** आनंदानें उठून उभे राहिले व सस्मित मुखानें म्हणाले, "काय! आलास तूं एकदां!" त्यांना अगदीं परमानंद होऊन गेला.

सरलता.

महाराज (एमला):–हा छोकरा फार सरळ! सरलता हें पूर्वपुण्याईचें फळ आहे. पूर्वजन्मीं चांगली तपश्चर्या घडली नसेल, तर सरलता अंगीं यायची नाहीं. वक्रता–कपट--अंगीं असेल, तर ईश्वर-प्राप्तीचें नांव नको

पहा ना, जेथें जेथें भगवंताचा अवतार झाला आहे, तेथें तेथें सरलता दिसून येते. दशरथ किती सरळ होता! श्रीकृष्णाचा पिता नंद किती सरळ ! लोक म्हणत "अहाहा ! काय पण नंद-घोषाचा स्वभाव ! "

भगवंताची सेवा.

महाराज (निरंजनाला):—संसारी लोक जशी चाकरी धरितात, तशी तूंही धरली आहे. पण त्यांतले त्यांत थोडा फरक आहे. तूं केवळ आपल्या आईसाठीं चाकरीचा स्वीकार केला आहे ! नाहीं तर, 'धिक् ! धिक् ! भगवंताचीच सेवा तूं केली पाहिजे,' असें मीं म्हटलें असतें.

(मणि मल्लिकाला) पहा, हा छोकरा भारी सरळ आहे; मात्र अलीकडे अलीकडे एक-अर्धी बात मारायला शिकला आहे, एव-ढेंच. त्या दिवशीं मी येईन म्हणाला, आणि आला कांहीं नाहीं.

त्याच्या मुखावर फार वाईट कळा आली आहे. अगदीं काळ-वंडून गेलें आहे तें ! तो हपीसचें काम करतो ना, त्याचा परिणाम हा ! तिथे काय, हिशोब, ठिशोब, हजार भानगडी ! तितक्यांची विवंचना असते !

संसार-सेवेचा दुष्परिणाम.

भवनाथ (एमला):—आपण पुष्कळ दिवसांत दक्षिणेश्वरीं गेलां नाहीं; **महाराजांनीं** आपली चौकशी एकदां मजजवळ केली. 'मी अलीकडे त्याच्या अरुचीला पात्र झालों आहें, हें खरें काय ?' असें मला त्यांनीं विचारलें.

असें म्हणून **भवनाथ** हासूं लागला. **महाराजांनीं** तें सगळ बोलणें ऐकलें. **एम**कडे सप्रेम पाहून ते म्हणाले, 'बरोबर आहे. किती दिवस झाले, तरी तूं आला नाहींस कां ?

एम् फें फें करूं लागला. इतक्यांत **महिमाचरण** आले. ते **काशीपुरांत** राहात असत. **महाराजांवर** त्यांची फार निष्ठा. नेहमीं ते दक्षिणेश्वरीं जात असत. ते जातीनें ब्राह्मण असून त्यांची वडिलार्जित मिळकतही बरी होती. तेव्हां ते आपले स्वतंत्र होते; कोणाची चाकरीबिकरी करीत नसत. चांकले शिकलेले होते. अनेक इंग्रजी व संस्कृत ग्रंथ त्यांनीं पाहिले होते. आध्यात्मिक ग्रंथांचें वाचन व ईश्वराचें चिंतन यांत ते आपला कालक्षेप करीत असत.

महाराज (महिमाचरणांना):—हें काय ! इथे तर जहाज येऊन थडकलें ! या बारीकशा नदींत होडी येणें स्वाभाविक आहे; आणि हें तर केवढें जहाज ! हो, पण बरोबर आहे; हल्लीं पावसाळा आहे ! (सगळे हासतात.)

नंतर गोष्टी होतां होतां भोजनसमारंभांच्या आध्यात्मिक स्वरूपावर भाषणाचा ओघ फिरला.

महाराज (महिमाचरणांना):—लोकांना भोजन कां घालतात बरें ? तेणेंकरून त्या भगवंताचीच सेवा होते, असें नाहीं का तुला वाटत ? सर्व जीवांचे ठिकाणीं तोच अग्निरूपानें राहिला आहे. तेव्हां लोकांना खाऊं घालणें म्हणजे त्यालाच आहुति देणें आहे.

पण असें जरी आहे, तरी पातकी लोकांना खायला कधीं घालूं नये. जे वाईट असतात, ज्यांच्या मनांत ईश्वरासंबंधीं भीति अगदीं नसते, जे भयंकर विषयासक्त असतात, जे व्यभिचारादि महापातकें करितात, त्यांना जेवायला कधीं बोलावूं नये. या लोकांचीं पातकें इतकीं घोर असतात कीं, ते ज्या जागीं बसतात त्या जागची माती खालीं सात हातपर्यंत अपवित्र होते.

हृदयानें एकदां समाराधना घातली. आमंत्रित मंडळींत अनेक खराब लोक होते. तेव्हां मीं **हृदयाला** म्हटलें, " हें पहा, या लोकांना जर तूं खायला घातलेंस, तर मी एकदम या घरांतून चालता होईन ! "

(महिमाचरणांना):—कोणसें म्हणत होतें, कीं तूं पूर्वीं फार जेवणें घालीत असस. अलीकडे मला वाटतें, तुझा घरखर्च वगैरे फार वाढला आहे का ?

बिंदु ७ वा.

नंतर मंडळी जेवावयास उठली. जेवणें आटोपलीं. थोडा आराम झाला. तोंच **प्रतापचंद्र मुजुमदार** आले. ते ब्रह्मसमाजाचे अनुयायी होते. आल्यावर त्यांनीं **रामकृष्णां**ना अभिवादन केलें. **रामकृष्णां**नींही आपलें मस्तक अवनत करून त्यांना उलट नमस्कार केला.

प्रताप:—महाराज, मी दार्जिलिंगला गेलों होतों.

श्रीरामकृष्ण:—पण तेणेंकरून तुझ्या प्रकृतींत फारसा फरक झालेला कांहीं दिसत नाहीं. काय होतें तुला ?

प्रताप:—**केशवबाबूं**ना जें दुखणें झालें, तेंच मला झालें आहे.

नंतर **केशवबाबूं**च्या गोष्टी निघाल्या.

प्रताप:—**केशवबाबूं**ची बाळपणापासून वैराग्यवृत्ति असे. आनंदांत असे बहुत करून ते केव्हांही दिसत नसत. हिंदु-कॉलेजांत शिकत असतांना **बाबू सत्येंद्रनाथ** यांच्याशीं त्यांची चांगली दाट मैत्री जमली. त्यामुळें त्यांचा **देवेंद्रनाथ ठाकुर** (सत्येंद्रनाथांचे वडील) यांच्याशीं सहजच परिचय झाला. **केशवबाबूं**च्या ठिकाणीं दोन्ही होतीं; योगही होता, भक्तिही होती. कधीं कधीं भक्ति त्यांच्या ठिकाणीं इतकी उच्छृंखल होई, कीं तिनें पुष्कळ वेळा ते

अंगदीं मूर्छित होत; तरी आपलेकडून तिचा वेग ते पुष्कळ आवरीत. गृहस्थाश्रमी लोकांना धर्म सुसाध्य करणें, हा त्यांच्या जीवनाचा प्रधान हेतु होता.

लोकमान्यता किंवा कीर्तीची लालसा.

नंतर एका महाराष्ट्रीय बाईसंबंधानें बोलणें निघालें. **प्रतापचंद्रांनीं** सांगितलें कीं, या देशांतील कोणी कोणी स्त्रियासुद्धां विलायतेला जातात. कोणी एक महाराष्ट्रीय बाई तिकडे गेली होती. मोठी पंडिता आहे ती. पण ती ख्रिस्ती झाली. महाराज, आपल्या कानांवर कधीं तिचें नांव आलें आहे का?

श्रीरामकृष्ण:—नाहीं; पण तुझ्या तोंडून मीं जें काय आतां ऐकलें, त्यावरून मला असें वाटतें कीं, त्या बाईला फक्त आपलें नांव करण्याची इच्छा होती.

अहंकार.

नंतर मंडळीकडे वळून ते म्हणाले, " असा अहंकार चांगला नाहीं. जे केवळ कीर्तीच्यामागें लागतात, ते विमूढ झालेले असतात. ते शेवटीं फसतात. सगळें कांहीं ईश्वर करितो व सर्व श्रेय त्यालाच आहे. दुसऱ्या कोणालाही नाहीं; सर्व कर्तृत्व ईश्वराकडे, आपल्याकडे कांहीं नाहीं. ' हे भगवंता, सर्व कांहीं करणारा तूं आहेस, ' असें, जो खरा ज्ञानी आहे, तो म्हणतो. पण जो अज्ञानी व मोहांध आहे, तो ' सर्व मी करितों ' असें म्हणतो.

वासरूं 'हम् मा! हम् मा!' (अहम्, अहम्=मी, मी) करतें.

वासरूं व त्याच्या अवस्था.

या वासराची अवस्था काय होते, हें लक्षांत आणलें, म्हणजे 'मी, मी' करणाराला कशा दुर्गति प्राप्त होतात, हें चांगलें कळून येतें. या 'मी मी' म्हणणाऱ्या वासराच्या वांटयाला काय काय दुःखें येतात, पहा. त्याच्या मानेवर पहिल्यानें नांगराचें जोखड बसतें. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ऊन, पाऊस न म्हणतां त्याला त्या जोखडाखालीं राबावें लागतें. एवढ्यानें त्याच्या दुःखाची कहाणी संपत नाहीं. प्रसंगवशात् त्याच्या मानेवर कसायाचा सुराही पडतो. लोक त्याचें मांस खाऊन टाकतात. चामडें कमावून व रंगवून तयार करितात. त्याचे पुढें जोडे बनवितात. ते जोडे लोकांच्या पायांत जाऊन बसले, म्हणजे मग त्याचे हाल काय विचारतां! लोकांच्या पायांखालीं चेंगरतां चेंगरतां त्याला पुरेवाट होते! पण एवढ्यानेंही भागत नाहीं! चामडें नगाऱ्याला लावतात; आणि काठ्यांनीं त्याला बडव बडव बडवतात! पण त्याच्या आंतड्याची तांत बनून जेव्हां ती पिंजाऱ्याच्या हातीं पडते, तेव्हां कुठे त्या बिचाऱ्या वासराच्या मागच्या दुर्गति संपतात! कारण इतकेंच कीं, तें मग 'हम् मा! हम् मा!' असें म्हणत नाहीं; तर 'तुहूं, तुहूं' [भगवतां, तूंच रे बाबा! तूंच!] असें म्हणतें. 'तुहूं, तुहूं' असें बोलतें, तेव्हां त्याचा कर्मनिस्तार होऊन मुक्ति त्याच्या हातीं येते.

'हे भगवन्, मी कर्ता नाहीं, तूंच कर्ता आहेस;-मी यंत्र आहें व तूं यंत्री आहेस,' असे उद्गार जेव्हां जीवाकडून निघतील,

तेव्हांच त्याची संसारयंत्रणा संपेल; एरवीं संसाराची कर्मकटकट चुकण्याची आशा नाहीं. सर्व व्यवस्था ईश्वराचे हातीं आहे, हें जाणून मनुष्यानें ' मी ' व ' माझें ' यांना अगदीं फांटा दिला, व आपला सर्व तोल ईश्वराच्या अंगावर टाकून दिला, कीं मग मुक्ति मुक्ति ती किती दूर राहणार?

ईश्वरदर्शन झाल्या-नंतरचा अहंकार.

ज्याला ईश्वरदर्शन झालें, तोच खरा ज्ञानी. त्याची वृत्ति बालकासारखी होते. बालकाच्या ठिकाणींसुद्धां एक प्रकारचा अहंकार असतो. पण तो केवळ नांवाचा, खरा नाहीं. कारण, तो अगदीं निर्दोष असतो. प्रौढ मनुष्याचा ' मी ' व बालकाचा ' मी ' यांत पुष्कळच अंतर असतें.

मनुष्याला ईश्वर-दर्शन झालें, कीं त्याचें रूपांतर होऊन जातें. परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें. लोखंडाची तरवार परिसाच्या संसर्गानें सोन्याची बनते. तरवारीचा आकार कायम असतो, पण ती मग कोणाला अपाय करीत नाहीं. आपला अहंकार ईश्वरदर्शनानें पुनीत झाला, कीं मग तो कोणाचेंही अनिष्ट करणार नाहीं.

बालकाचा अहंकार आरशांत पडलेल्या मुखाच्या प्रतिबिंबासारखा असतो. मुखाचें प्रतिबिंब अगदीं तंतोतंत बिंबासारखें—मूळ मुखासारखें—असतें; पण तें अनिष्ट कांहींच करीत नाहीं.

एक भक्तः—जीवाचा हा ' अहंकार ' कसा नाहींसा होईल !

श्रीरामकृष्ण:—ईश्वराचें दर्शन जोंपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत या अहंकाराचा पूर्ण लय होणार नाहीं. ज्याचा अहंकार पार मावळला आहे, त्याला ईश्वरदर्शन झालें आहे, असें निभ्रांत जाणावें.

एक भक्त:—महाराज, कोणालाही ईश्वरदर्शन झालें आहे, असें कशावरून ओळखावें ?

श्रीरामकृष्ण:—ईश्वरदर्शन झाल्याचीं लक्षणें आहेत. ज्याला ईश्वर-दर्शन झालें, त्याचीं श्रीमद्भागवतांत लक्षणें दिलेलीं आहेत. अशा माणसांच्या चार अवस्था असतात–(१) बालकवत्, (२) पिशाचवत्, (३) जडवत्, (४) उन्मादवत्.

ईश्वरदर्शन झाल्याचीं लक्षणें.

ज्याला ईश्वरदर्शन झालें, त्याचा बालकासारखा स्वभाव बनतो. तो त्रिगुणातीत असतो; एकाही गुणाचें त्याला बंधन नसतें. कधीं कधीं तो अगदीं ओंगळ असतो. देहाची निगा अगदीं ठेवीत नाहीं. शुचि व अशुचि हीं दोन्ही त्याला समान असतात; कारण प्रत्येक वस्तु त्याच्या दृष्टीनें त्याला परमेश्वरस्वरूपच दिसत असते. ही त्याची पिशाचवृत्ति. कधीं तो वेड्यासारखा हासतो, कधीं रडतो, कधीं आपल्याशींच बोलत असतो. कधीं एकाद्या सभ्य गृहस्थासारखा नीटनेटका पोषाख तो करतो, तर कधीं नेसूचें सोडून बगलेंत मारतो व बालकासारखा नग्नच हिंडत सुटतो. ही त्याची उन्मादावस्था. बरें, कधीं तो एकाद्या जडवस्तूप्रमाणें अगदीं चुप बसलेला असतो.

एक भक्तः—ईश्वरदर्शन झालें, कीं अहंकार एकदम निःशेष नाहींसाच होतो काय ?

श्रीरामकृष्णः—कधीं कधीं त्याचा अहंकार अगदीं लय पावतो. उदाहरणार्थ, तो समाधिमग्न असला म्हणजे. बाकी प्रायः त्याचा अहंकार असतो; पण तो अगदीं निर्दोष! सोन्याच्या तरवारीसारखा!

बिंदु ८ वा.

विलायत व कांचनपूजा.

महाराज (प्रतापचंद्र मुझुमदार यांस):—तूं विलायतेला गेला होतास, काय काय पाहिलेंस तें सगळें सांग पाहूं.

प्रताप०:—महाराज, ज्याला आपण कांचन म्हणतां, त्याची पूजा करण्यांत विलायतेंतील सगळे लोक चूर झालेले आहेत. कांचनपूजा हेंच त्या राष्ट्राचें मुख्य लक्षण. अपवादादाखल कांहीं कांहीं चांगले लोकही—अनासक्त लोकही—आहेत; पण साधारणपणें रजोगुणाचें प्राबल्य फार. अमेरिकेंतही तोच प्रकार दिसून येतो.

महाराजः—विषयकर्मासक्ति ही विलायतेंत किंवा अमेरिकेंतमात्र आहे, असें कांहीं नाहीं; जिकडे जाल तिकडे ती आहेच! पण लक्षांत ठेव, कर्मकांड हें आदिकांड आहे (विषयकर्में आसक्त बुद्धीनें करणें, हें, उत्क्रांतीच्या दृष्टीनें, व्यक्तीच्या किंवा समाजाच्या अगदीं बाल्यावस्थेचें लक्षण आहे). रजोगुणात्मक कर्में—केवळ नांवलौकिक, मानपान, धनदौलत, वगैरे प्राप्त व्हावीं याच हेतूनें केलेलीं कर्में—अधःपाताला कारण होतात. सत्त्वगुणावांचून

--भक्ति, विवेक, वैराग्य, दया, इत्यादि गुण अंगीं असल्यावांचून —ईश्वरप्राप्तीचें नांवही काढावयास नको. रजोगुणानें तमोगुण वाढत जातो. त्यानें ईश्वराचा विसर पडतो व कामिनी व कांचन याच्या ठिकाणीं आसक्ति वाढते. तेव्हां विलायतेंत व अमेरिकेंत जी कर्मासक्ति दिसून येते–धार्मिक अधःपात करणारी जी विषय-कर्मासक्ति दिसून येते––ती निषिद्ध अतएव त्याज्य आहे.

कर्माचा त्याग कांहीं तुला करितां येणार नाहीं; प्रकृति तुझ्या-कडून तें कराविणारच; मग तुझी इच्छा असो कीं नसो असें जर आहे, तर कर्म तरी यथासांग होऊं दे; कर्म कर, पण अनासक्त होऊन कर. अनासक्त होऊन केलेलें कर्म हें ईश्वरप्राप्तीचें साधन आहे. असें कर्म हें साधन व परमेश्वर हें साध्य.

कर्म करा, पण त्याच्या फलाची आकांक्षा किंवा इच्छा धरूं नका. अनासक्त होऊन कर्म करणें तें हेंच. इहपरलोकीं प्राप्त होणाऱ्या फलभोगांसंबंधानें मन उदासीन असावें; कर्मापासून प्राप्त होणारें सुखही नको व दुःखही नको. पूजाजपतपादि करा, पण केवळ चार लोकांनीं आपल्याला बरें म्हणावें यासाठीं, किंवा कांहीं तरी पुण्य गांठीं पडावें यासाठीं करूं नका.

अशा रीतीनें अनासक्त होऊन कर्म करणें, यालाच कर्मयोग असें म्हणतात. तो फार कठिण आहे;–विशेषेंकरून या कलियुगांत तर फारच कठिण आहे. तेव्हां खरें म्हटलें म्हणजे, मनुष्यानें ज्ञान-मार्गाचें किंवा भक्तिमार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. निष्कामकर्मा-चरण सामान्य जनांला शक्य नाहीं, त्याला तसाच लोकोत्तर पुरुष पा-

हिजे. सामान्य लोकांच्या मनांत तेव्हांच संसारासक्ति शिरते;–केव्हां व कशी शिरते, हें त्यांना कळतही नाहीं. त्यांत आणखी हें कलि-युग! यांत तर आसक्तीचा जोर ज्यास्तीच! अनासक्तबुद्धीनें कर्म करावयाचें, असा मनांत आपण अगदीं मोठा निर्धार करावा; पण कर्म करूं लागावें, तों तिथे आपली आसक्ति आहेच!–केव्हां, कशी, व कुठून येते, कांहीं समतज नाहीं!

आपण मनुष्यें अपूर्ण आहों. पूर्ण होणें, परमेश्वरपद गांठणें, हेंच आपल्या जीविताचें साफल्य आहे. तेव्हां परमेश्वरपदाकडे जाण्याचा अगदीं सोपा व जवळचा मार्ग शोधून काढणें, हें आपलें कर्तव्य आहे. आपण जवळचाच मार्ग धरूं या. आत्मनिवेदन करून व परमेश्वराच्या ठिकाणीं अनन्यभक्ति ठेवून विषयकर्में किमान मर्यादेंत आपण आणूं या.

कर्मयोगाचें खरें आचरण कलियुगांत शक्य नाहीं; तेव्हां ज्ञान-योगापेक्षां किंवा कर्मयोगापेक्षां भक्तियोग–नारदीय भक्तियोग–या युगांत ज्यास्त श्रेयस्कर आहे. दुसऱ्या कोणत्याही योगापेक्षां भक्ति-योगाचे द्वारानेंच परमेश्वरदर्शन घडणें सुकर व सुलभ आहे.

भक्तीचा कर्मांवर परिणाम.

कांहीं झालें, तरी कर्म कांहीं कोणाला सुटत नाहीं. हरएक मनोव्यापार म्हणजे कर्मच आहे. ‘मी चिंतन करितों,’ किंवा ‘मी ध्यान करितों,’ अशी जाणीव मनांत असणें, हेंसुद्धां कर्मच आहे. भक्तिलाभानें विषयकर्मांची नांगी आपोआप मोडते. तीं आपो-

आप नरम पडतात. अर्थात् त्यांत गोडीच वाटेनाशी होते. साखर मिळाल्यावर गुळाला कोण हात लावणार ?

पहिलें असें, कीं, भक्तीनें कर्मांचा व्याप आपोआप कमी होतो; कारण भक्ताचें सारें लक्ष असतें आपल्या साध्याकडे–परमेश्वराकडे. दुसरें, अनासक्त होऊन कर्म करण्याला भक्तीचें मोठें साहाय्य होतें. एकीकडे अनन्यभक्ति परमेश्वरावर ठेवावयाची, व एकीकडे विषयांसाठीं–इंद्रियभोग, संपत्ति, कीर्ति, सत्ता यांसाठीं— जीव टाकावयाचा, या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं माणसाला करितां येणार नाहींत. दोन डगरींवर हात ठेवून सुख होत नाहीं. तेव्हां कमी सुखाची प्राप्ति करून देणारीं विषयकर्में, भक्तिसुखाचा लाभ झाल्यावर, आपोआप कमी कमी होत जातात. उघडच आहे, ज्याला अमृताची गोडी लागली, तो मद्य कशाला पिईल ?

कर्मातच मनुष्यजन्माचें साफल्य आहे, ही समजूत अत्यंत घातक आहे. खरें जीविताचें साफल्य ईश्वरलाभांत आहे. कर्म हा केवळ उपोद्घात आहे; व ईश्वरलाभ हा उपसंहार आहे. तेव्हां कर्म हें एक साधन आहे, साध्य नव्हे.

कर्म हें जीवितसाफल्य नव्हे.

एकदां शंभु मला म्हणाला, " जागोजाग दवाखाने स्थापावे, रुग्णालयें बांधावीं, नसतील तेथें सडका तयार कराव्या, विहिरी पाडाव्या, शाळा घालाव्या, महाविद्यालयें उघडावीं, असें आपलें माझ्या मनाला वारंवार वाटतें. एवढी माझी हौस जर सुदैवानें पुरली, तर मी आपल्याला अगदीं धन्य मानीन." त्यावर मीं

म्हटलें, हीं सगळीं कामें तुझ्या हातून होतील, तर फार चांगलें आहे. पण तुला तीं अनासक्त बुद्धीनें करितां येतील का ? जर तीं तशीं करितां आलीं, तर तीं तुला ईश्वरलाभ करून देतील. नाहीं तर तो कांहीं साधणार नाहीं. पण अनासक्तबुद्धीनें काम करणें फार कठिण आहे. कांहीं असलें, तरी साध्य आणि साधन यांचा घोंटाळा होणार नाहीं, इतकी तजवीज ठेव. निष्काम कर्म हें साधन आहे, व ईश्वरप्राप्ति हें साध्य आहे. मीं पुनःपुन्हा बजावून सांगतों कीं, साध्य व साधन यांचा घोंटाळा केव्हांही करूं नको. जिन्याच्या पहिल्या पायरीवर पाऊल टाकल्याबरोबर आपण माडी गांठली, असें समजूं नको.

कर्म हेंच सर्वस्व आहे,—मानवजन्माचें सार्थक आहे,—असें मानूं नको. परमेश्वराची भक्ति अंगीं यावी, यासाठीं त्याची करुणा भाक. समज, प्रत्यक्ष ईश्वर तुझ्यापुढें येऊन उभा राहिला, व 'वर माग' असें तुला म्हणाला. मग तूं काय मागशील ? 'हे भगवन्, पुष्कळसे दवाखाने, रुग्णालयें, तळीं, विहिरी, रस्ते, धर्मशाळा हीं मला दे.' असें का तूं मागणार ? जोंपर्यंत ईश्वरलाभ झाला नाहीं, तोंपर्यंत या गोष्टींची आपल्याला किंमत वाटते. पण ईश्वराचें एकदां साक्षाद्दर्शन झालें, म्हणजे त्यांचें खरें स्वरूप आपल्या लक्षांत येतें;—त्या क्षणभंगुर आहेत, स्वप्नवत् आहेत, असें आपल्याला मग सत्यज्ञान होतें. आणि मग त्या सच्चिदानंदस्वरूपी परमात्म्याची आपण अशी प्रार्थना करूं कीं, 'हे भगवंता, मला ज्ञान दे; माझें मन तुझ्या पादपद्मीं निरंतर रत होऊन

राहूं दे. ज्या भक्तीच्या जोरावर मनुष्य नराचा नारायण होतो, ज्या भक्तीच्या जोरावर मनुष्याला ईश्वराशीं आपला संतानभाव आहे असें शुद्ध ज्ञान होतें, ती निर्मल भक्ति, नारायणा, माझ्या मनांत उत्पन्न कर. '

तेव्हां हें जें मीं साध्य सांगितलें, तें केव्हांही दृष्टी-आड होऊं देऊं नको. नेहमीं साध्यावर लक्ष असूं दे.

यासंबंधानें मी तुला एक गोष्ट सांगतों:--

लांकूडतोड्या व ब्रह्मचारी: किंवा ' पुढें जा.'

एकदां एक माणूस अरण्यांत लांकडें तोडीत होता. तिथे त्याला एक ब्रह्मचारी दिसला. तो त्या लांकूड-तोड्याला म्हणाला, ' पुढें जा. ' लांकडांचें ओझें घेऊन तो घरीं परत येत असतां, या ब्रह्मचाऱ्यानें मला ' पुढें जा, ' असें कां बरें सांगितलें? हा प्रश्न त्याच्या मनांत सारखा घोळत होता.

यावर कांहीं दिवस लोटले. एके दिवशीं तो बसला असतां सहज त्याला त्या ब्रह्मचाऱ्याचे शब्द आठवले. आणि त्यानें लाग-लाच मनांत असा निश्चय केला कीं, कांहींही होवो, आज लांकडें आणायला बेरंच पुढें जायचें. निश्चयाप्रमाणें बराच लांब गेल्या-वर पाहतो तों तिथे आपले सगळेच चंदनाचे वृक्ष! तेव्हां अत्यंत आनंदित होऊन गाड्यावारी त्यानें चंदनाचें लांकूड आणलें आणि बाजारांत विकून टाकलें. तेणेंकरून तो खूप श्रीमंत झाला. आ-णखी कांहीं दिवस असेच गेले. तो ब्रह्मचारी आपल्याला 'पुढें

जा,' असें म्हणाला, असें पुन्हा एकदां त्याच्या मनांत आलें. तेव्हां अरण्यांत आणखी पुढें जाऊन पहाण्याचा त्यानें निर्धार केला. त्याप्रमाणें लांब वनांत जाऊन पाहतो, तों एका नदीच्या कांठीं आपली रुप्याची खाण! असें होईल, असें त्याला स्वप्नींही वाटलें नव्हतें. त्या खाणींतील रुपें नेऊन नेऊन त्यानें विकून टाकलें. मग काय! त्याचें उखळच पांढरें झालें! तो अगदीं कोट्याधीश बनून गेला! आणखी कांहीं वर्षें लोटल्यावर त्या ब्रह्मचाऱ्याचे शब्द त्याला पुन्हा आठवले. तो आपल्या मनाशींच म्हणाला, "त्या ब्रह्मचाऱ्यानें मला रुप्याच्या खाणीपर्यंतच जा, असें कांहीं सांगितलें नाहीं; 'पुढें जा,' एवढेंच त्यानें मला सांगितलें." झालें, स्वारी जी निघाली, ती त्या नदीच्या पलीकडे गेली. तों तिथें सोन्याची खाण! कांहीं दिवसांनीं आणखी पुढें गेला, तों हिऱ्यांची खाण! तात्पर्य काय, शेवटीं त्याला कुबेराचें ऐश्वर्य प्राप्त झालें!

त्याचप्रमाणें बाबांनो, तुम्ही पुढें जा आणि साध्य दृष्टि-आड होऊं देऊं नका. पुढें चला व साध्याचें संपादन होईपर्यंत मध्यें थांबूं नका. एखाद-दुसरा टप्पा गांठल्यावर प्रवासाचें टोंक आपल्या हातीं आलें, अशा समजुतीनें हुरळून जाऊं नका.

कर्म हा प्रवासाचा पहिला टप्पा आहे. लक्षांत ठेवा, निष्काम कर्माचें आचरण भारी कठिण आहे. तेव्हां आजच्या युगांत भक्तीसारखें सुलभ साधन नाहीं. निष्काम कर्मसुद्धां साध्य नव्हे, तें केवळ साधन आहे.

तेव्हां सारखे पुढें चला; आणि साध्य हातीं येईपर्यंत—भगवंताचें दर्शन घडेपर्यंत—अगदीं थांबू नका.

बिंदु ९ वा.

ब्रह्मसमाजांतील तंटे.

केशवबाबू स्वर्गवासी झाल्यानंतर ब्रह्मसमाजांत जे विवाद सुरू झाले होते, त्यांसंबंधानें मग बोलणें निघालें. **महाराज** (प्रतापचंद्रांना):—तुझ्यांत व तुझ्या समाजांतील इतर मंडळींत कांहीं तंटे उपस्थित झाले आहेत, असें मीं ऐकिलें आहे. पण तुझ्याशीं झगडा करणारे बहुतेक सगळे इकडंतिकडंच आहेत. (सगळे हासतात.)

मुखाला दिव्य तेजाचा उजाळा देणारें मोहक व मधुर स्मित करून व भक्तवृंदाकडे वळून **महाराज** म्हणाले, "हें पाहा, **प्रताप**, **अमृत**, हे सगळे गंभीर आवाज करणारे शंख आहेत. शंखाशंखांतही फरक असतो. सगळेच शंख कांहीं सारखे नसतात. कांहीं असे असतात कीं, त्यांना मुळीं आवाजच नसतो."

सगळे अगदीं पोट धरधरून हासूं लागले.

रसो वै सः ।

ब्रह्मसमाज, हरिसभा, इत्यादि धार्मिक संस्थांत जीं व्याख्यानें चालतात, त्यांसंबंधानें **महाराज** म्हणाले, "कोणाचेंही व्याख्यान ऐकलें, म्हणजे त्या माणसाची किंमत तेव्हांच समजते. मी एकदां एका हरिसभेला गेलों होतों. व्यासपीठावर एक जण पंडित होता. त्याचें नांव **सा**—.

बोलतां बोलतां तो म्हणाला, "ईश्वर नीरस आहे. तेव्हां आम्हीं माणसांनीं आपल्यांतली माधुरी त्याला देऊन त्याला सरस केलें पाहिजे." त्याच्या म्हणण्याप्रमाणें आपल्यांतील माधुरी म्हणजे प्रेम, भक्ति, इत्यादि. हे त्याचे शब्द ऐकून मी अगदीं थक्क झालों! त्या वेळीं एका मौजेच्या गोष्टीचीमात्र मला आठवण झाली. ती गोष्ट अशी:–एक मुलगा होता. तो एकदां म्हणाला कीं, माझ्या मामाच्या घरीं किती तरी घोडे आहेत!–सगळा गोठा भरला आहे घोड्यांनीं!

ही त्या मुलाची गोष्ट ऐकल्यावर जे सुज्ञ होते, त्यांच्या लागलेंच असें लक्षांत आलें कीं, गोठ्यांत घोडे कांहीं असत नाहींत, गुरें असतात; तेव्हां या मुलाची गोष्ट असंबद्ध आहे. हा खोटें बोलत असून याला घोड्यांची माहितीही नाहीं.

ईश्वर नीरस आहे,–त्याच्या ठिकाणीं माधुरी नाहीं, प्रेम नाहीं, आनंद नाहीं,–असें म्हणणें, हें अगदीं असंबद्ध आहे. या म्हणण्यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, आपण काय बोलत आहों, हें त्या बोलणारालाच कळत नाहीं, व ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप व प्रेमस्वरूप अशा भगवंताच्या दर्शनसुखाचा अनुभव त्याला केव्हांही घडलेला नाहीं.

एकदम **प्रतापचंद्रां**कडे वळून ते अगदीं गंभीरपणानें म्हणाले,

भक्ति व वैराग्य.

"तूं बुद्धिमान् आहेस, विद्वान् आहेस, गंभीरात्मा आहेस. **गौर** (चैतन्य देव) आणि **निताई** या दोघां भावांसारखाच तुझा व **केशव**चा संबंध होता. पुरे झालें आतां हें सगळें;–व्याख्यानें, तर्कवितर्क, वादविवाद, संवादविसंवाद,

हीं आतां पुष्कळ झालीं. नाहीं बरें ? तुझा जीव आतां अगदीं कंटाळून गेला असेल ! तुला यांत गोडी वाटते का ? तूं आतां एकच मार्ग धरावा,—केवळ परमेश्वराकडे आपलें सर्व लक्ष लावावें—भक्तिसागरांत उडी घेऊन खोल खोल बुडी मारावी,—हेंच उत्तम."

मुझुमदारः—होय महाराज, आतां तेंच माझें कर्तव्य आहे, यांत संदेह नाहीं. मला समजतें तें. पण माझी सर्व खटपट केशव-बाबूंचें कार्य चालू रहावें, याकरितांच आहे.

महाराज (सहास्य):—केशवचें नांव राहावें, यासाठीं ही सर्व खटपट आहे, असें तुझें म्हणणें. ठीक आहे. कांहीं दिवस गेले, म्हणजे तुझा हा विचार कांहीं टिकणार नाहीं.

आत्मवंचनः स्वार्थपरार्थसंभ्रम.

एका मनुष्याचें एका पहाडावर घर होतें. त्यांत तो आनंदानें राहत असे. तिथें तें घर बांधायला त्या बिचाऱ्याला फार मेहनत पडली होती.

पुढें, एकदां एक मोठें वादळ झालें. तेव्हां तें घरही डळमळूं लागलें. त्या माणसाला मोठी चिंता उत्पन्न झाली. त्याच्या रक्षणार्थ मरुद्देवाला हात जोडून तो म्हणाला, "एवढी माझी गरिबाची झोंपडी पाडूं नको बाबा!" वायुदेवानें त्याचें म्हणणें कांहीं ऐकिलें नाहीं. घर तर आतां पडतेंच, असें वाटायला लागलें. तो फारच फिकिरींत पडला. तितक्यांत हनुमान हा वायूचा पुत्र, हें त्याच्या लक्षांत आलें. तेव्हां तो पुन्हा म्हणाला, "बाबा, हें घर

पाडूं नको. दुसऱ्या कोणाचें नाहीं हें, तुझ्याच पुत्राचें आहे—हनुमंताचें आहे." पण वाऱ्याचा जोर कमी पडेना ! आतां घर कांहीं निभत नाहीं, असें वाटूं लागलें. 'बाबा, हें हनुमंताचें घर आहे!' 'अरे, हनुमंताचें आहे हें!' असें तो पुन्हा पुन्हा सांगत होता; पण ऐकतो कोण! आपल्या म्हणण्याचा कांहीं उपयोग होत नाहीं, असें पाहून तो दुसरी युक्ति योजून म्हणाला, "हें लक्ष्मणाचें घर आहे. संभाळ बाबा तेवढें!" लक्ष्मण हा भगवान् श्रीरामचंद्राचा भाऊ असल्यामुळें वायुदेव त्याच्यावर तरी दया करील, असें त्याला वाटत होतें. पण हनुमंताच्या नांवाचा जितका उपयोग झाला, तितकाच लक्ष्मणाच्या! इकडे घर तर अगदीं कडकड कडकड करूं लागलें! तेव्हां शेवटीं तो मनुष्य अगदीं हताश होऊन दीन स्वरानें म्हणाला, "हें रामाचें घर आहे! रामाचें घर आहे हें! वायुदेवा, संभाळ बाबा आतां तरी!" पण त्या देवाला दया कांहीं आली नाहीं. घराचा एकेक भाग पडायला सुरवात झाली! आपल्या विनवण्यांचा कांहींच उपयोग होत नाहीं, असें पाहून आपला प्राण वांचविण्याकरितां घरांतून बाहेर पडतां पडतां तो म्हणाला, "खरोखर वेताळाचेंच घर आहे हें!" (सगळे हंसतात.)

केशवाचें नांव आतां राहतें कसें, याची तुला काळजी पडली आहे! पण ती काळजी करण्याचें तुला कारण नाहीं. जें कांहीं होतें, तें सर्व ईश्वरी इच्छेनें होतें, हें लक्षांत ठेव. त्याच्याच इच्छेनें **केशवाचे** हातून धार्मिक चळवळ सुरू झाली, व जर ती आतां बंद पडण्याची वेळ आली असेल, तर तेंही त्याच्याच इच्छेनें होत

आहे. जें त्याच्या इच्छेनें आलें, तें त्याच्या इच्छेनें जाईल. तेथें तूं काय करणार? मन पूर्णपणें ईश्वराला अर्पण करणें, हें तुझें कर्तव्य तूं कर;—भक्तिसागरांत एकदम उडी टाक!

असें म्हणून महाराज आपल्या अतुलनीय मधुर कंठानें गाऊं लागले:—

पद

चाल—(हरिभजनावीण काळ घालवूं नको रे.)

मार बुडी घेई ठाव रूपसागराचा ॥ ध्रु० ॥
अतलतलातलवितलीं, तेविं रसातलसुतलीं,
शोध करीं पातालीं, प्रेममौक्तिकाचा ॥ मार० ॥ १ ॥
प्रेमाचें विमल भुवन, हृदयिं असें वृंदावन,
गवसे जरि करिसि यत्न, लाविं शोध त्याचा॥ मार० ॥२॥
ज्ञानदीप धडड जळे, पडदींची धुंदि गळे,
भ्रांतितमा पद न मिळे, परम हा सुखाचा ॥ मार० ॥ ३ ॥
नौकानय कोण करी, कठिण कठिण भूमिवरी,
सुलभ गड्या तेंहि परी, परिस कबिर-वाचा ॥ मार० ॥ ४॥
परिस परिस परिस सदा, त्यजिं खटपट चित्त! मुधा,
आश्रय करिं नित्य मुदा, सद्गुरुपदाचा ॥ मार० ॥ ५ ॥

ऐकलेंस गाणें? व्याख्यानें, वादविवाद, तंटेभांडणें, हीं आतां पुरे झालीं! या समुद्रांत बुडी मार! यांत बुडी मारली, तर मरणाचें भय नाहीं. हा अमृताचा सागर आहे. मीं एकदां नरेंद्राला (विवेकानंद) म्हटलें—

भिऊं नका.

मुझुमदार (मध्येंच):—हा नरेंद्र कोण महाराज?

महाराज––आहे आपला असाच एक छोकरा! असो. मीं **नरेंद्राला** म्हटलें,' ईश्वर रसाचा सागर आहे. या सागरांत बुडी मारावी, अशी तुला इच्छा नाहीं का होत? बरें, समज, इथे एक रुंद तोंडाचें भांडें (अमृत) रसानें भरलेलें आहे, व तूं माशी असून तो रस सेवन करायला तूं अगदीं उतावळा झाला आहेस. तर कुठे बरें बसून तूं त्याचें सेवन करशील? त्यावर **नरेंद्रानें** मला उत्तर दिलें,' मी त्या भांड्याच्या कांठावर बसून खाईन.' मीं म्हटलें, 'कां रे बाबा? कांठावर कां बसणार?' तो म्हणाला, 'पुढें गेलों, तर मी बुडेन आणि मरून जाईन.' मीं म्हटलें, 'बाबा, सच्चिदानंद-सागरामध्यें मरणाचें किंवा दुसऱ्या कोणत्याही दुःखाचें भय नाहीं, हें तुझ्या लक्षांत नाहीं आलें! तो अमृताचा सागर आहे! त्या सागरांत बुडी मारली, तर मृत्यु येत नाहीं, मनुष्य अमर होतो! ईश्वरप्रेमानें– भक्तीनें–आपण वेडे झालों—भक्तीचा अतिरेक आपल्या हातून झाला––तर आपण ठार बुडूं–––अगदीं फुकट जाऊं— अशी मिथ्या भीति कांहीं लोकांना पडते, पण तशी कांहीं भीति तूं धरूं नको.'

माया व दया.

दया व माया यांतील भेद कोणता बरें? जें प्रेम आपला देह, कुटुंब, पंथ, धर्म, किंवा देश यांनीं मर्यादित न होतां जीवमात्राला व्यापून राहतें, त्याचें नांव दया. आपला देह, कुटुंब, पंथ, धर्म, किंवा देश यांच्या बाहेर ज्या प्रेमाचा व्याप जात नाहीं, त्याचें नांव माया. पहिल्या प्रेमाचा अंगीकार करा, तें उदात्त

आहे व तें तुम्हांला ईश्वराची भेट करवील. माया आत्मघातकी आहे. ती तुम्हांला अधोगतीला लावील, बद्ध करील, परमेश्वरापासून विमुख करील.

ज्ञानाचें लक्षण.

ज्ञान कोणतें? ज्ञानी माणसाचे उद्गार असे असतात:–"भगवंता, खरा कर्ता तूं आहेस; मी अकर्ता आहें, निमित्त आहें, तुझ्या हातांतलें केवळ बाहुलें आहें. येथें 'माझें' असें कांहीं नाहीं. सर्व कांहीं 'तुझें' आहे. मी, माझें कुटुंब, माझी धनदौलत, माझ्या अंगचे सद्‌गुण, सर्व कांहीं तुझेंच आहे."

'मी व माझें' हें अज्ञान, 'तूं व तुझें' हें ज्ञान.

धर्मार्थ कामें.

या युगांत भक्तिहीन कर्म हें पंगु होय. पहिल्यानें भक्तीचा आश्रय करा, मग सगळ्या गोष्टी–शाळा, दवाखाने, इत्यादि–तुम्हांला लागतील तर तुमच्यापुढें चालत येतील. आधीं भक्ति, मग कर्म. भक्तिशून्य कर्म पंगु आहे, तें आपल्या पायांवर केव्हांही उभें राहणार नाहीं.

प्रतापचंद्रांनीं नंतर शिष्यांबद्दल चौकशी केली. ते म्हणाले:— महाराज, जे आपल्याकडे येतात त्यांची क्रमाक्रमानें उन्नति होत आहे काय?

महाराजः—मी त्यांना सांगतों कीं, संसार करण्यांत कांहीं दोष नाहीं, मात्र संसारांत दासीसारखें (मोलकरणीसारखें) वर्तन ठेवा. यजमानाच्या घरासंबंधानें बोलतांना दासी 'आमचें घर' असें

संसारांत राहावें कसें: किंवा गृहस्थाला साधन.

म्हणते. पण मनांतले मनांत तिला ठाऊक असतें कीं, हें कांहीं आपलें घर नव्हे; आपलें घर अमक्या गांवीं आहे. ती आपल्या घराचेंच मनांत चिंतन करीत असते. आपल्या कडेवर बसलेल्या यजमानाच्या मुला-संबंधानें बोलतांना ती म्हणते, 'माझा हरिबाळ किनई, आतांसा मोठ्ठा लबाड झाला आहे.' किंवा 'माझ्या हरि-बाळाला आपली बरफी आवडते,पेढा आवडतो, आणि आपलें काय काय तरी आवडतें, खरें ना बाबू?' 'माझा हरिबाळ,' असें ती तोंडानें बोलत असते खरी, पण 'हरिबाळ' कांहीं खरोखर आपला मुलगा नाहीं, हें ती पक्कें जाणून असते. जे इथे येतात, त्यांना मी म्हणतों कीं, 'तुम्ही संसार बेलाशक करा, त्यांत कांहीं दोष नाहीं; पण त्या दासीप्रमाणें अलिप्त भावानें करा. मी त्यांना असें सांगतों कीं, संसारांत आसक्त होऊं नका.—संसार करा पण संसारी होऊं नका,—संसाराचीं सगळीं कामें करा, पण मनांत चिंतन ठेवा आपल्या घराचें.—मनाला परमेश्वराचे चरणांचा वियोग होऊं देऊं नका. परमेश्वरा, तुझ्या पादपद्माची भक्ति आम्हांला दे, अशी नित्य मनांत त्याची प्रार्थना करा म्हणजे तुम्हांला अलिप्तपणें संसारांत राहतां येईल, असें माझें त्यांना नेहमीं सांगणें असतें.'

विलायती अज्ञेयवाद.

कांहीं वेळानें युरोपांतील व अमेरिकेंतील अज्ञेयवादावर भाषणाचा ओघ आला. तेव्हां मुझुमदार म्हणाले, "विलायतेंत लोक तोंडानें कांहीं जरी बोलत असले, तरी ते अंतर्यामीं नास्तिक आहेत

असें कांहीं मला वाटत नाहीं. या जगताचीं सूत्रें हालविणारी कोणी तरी महाशक्ति आहे, असें तिकडील पंडित मानतात.

महाराजः—तेवढें पुष्कळ झालें; शक्तीला तरी मानतात ना?

मुझुमदारः—ईश्वराच्या राज्यांत सत्कार्याला–पुण्याला–पुरस्कार व पापाला दंड आहे, हेंही युरोपियन पंडितांला मान्य आहे.

नंतर **प्रतापचंद्र महाराजांचा** निरोप घेण्याकरितां उठले. तेव्हां **महाराज** म्हणाले, "तुला आतां मी ज्यास्त काय सांगूं? एवढेंच सांगतों कीं, भांडणें, वादविवाद, असल्या कुठल्याही भानगडींत तूं न पडावें, हेंच बरें."

"दुसरी गोष्ट, कामिनी व कांचन हीं मनुष्याला संसारकर्दमांत गाडतात व ईश्वरापासून विमुख करितात, तिकडे पाहूंच देत नाहींत. पहा बरें, बायको चांगली असो वाईट असो, पण जो तो बायकोची आपली वाखाणणीच करीत असतो!"

नंतर **प्रतापचंद्र** निघून गेले.

बिंदु १० वा.

श्रीरामकृष्ण एका पंडिताच्या भेटीस जातात.

स्थळः—कॉलेज स्ट्रीट, कलकत्ता; दिवसः–२५ जून १८८४; तिथिः–आषाढ शुक्ल द्वितीया; या दिवशीं रथजत्रा होती; वेळः–सायंकाळीं ४ ते ६–३०.

पंडित शशधर ज्या घरीं राहात होते त्या घरीं जाण्याकरितां **श्रीरामकृष्ण** जेव्हां गाडींत बसले, तेव्हां पुन्हा त्यांची समाधि

लागली.–त्यांच्या वृत्तीला बाह्य जगाचा लय होऊन ती शांति-निधान व आनंदमय अशा शुद्ध ब्रह्मस्वरूपांत लीन झाली. वृत्तीच्या आपल्या या स्थितीला ते ' आवेश ' असें म्हणत. या स्थितींत योगी अतींद्रिय जगांत संचार करितो.

सायंकाळीं चार वाजतां जेव्हां ते **ईशान**च्या घरून निघाले, तेव्हां पाऊस टिपटिप गळत होता. रस्त्यांत चिखल झाला होता. शिष्यवृंद गाडीच्यामागून हळुहळू पायीं चालला होता. हा भेटीचा प्रसंग फारच बहारीचा होणार, असें वाटल्यावरून ते तेथें मोठ्या उत्सुकतेनें चालले होते. हा रथजत्रेचा दिवस असल्यामुळें पुष्कळ मुलें रस्त्यावर खेळतांना व ताडांच्या पातींच्या पिपाण्या वाजवितांना त्यांच्या दृष्टीस पडत होतीं. गाडी जेव्हां घरासमोर येऊन उभी राहिली, तेव्हां घरच्या यजमानानें व त्याच्या इतर मंडळीनें दारापुढें येऊन मोठ्या आदरानें त्यांचें स्वागत केलें.

माडीवर जातात तों **शशधर** त्यांचें स्वागत करण्याकरितां पुढें येतच होते. ते मध्यम वयाचे दिसत असून त्यांचा वर्ण गौर होता. त्यांच्या गळ्यांत रुद्राक्षमाळा होती. त्यांनीं अत्यंत विनीतभावानें पुढें होऊन **महाराजांना** प्रणाम केला, व ते त्यांना दिवाणखान्यांत घेऊन गेले. त्यांचे शिष्य व इतर लोक त्यांच्यामागून जाऊन दिवाणखान्यांत बसले. होईल तेवढें त्यांच्याजवळ बसावें, व त्यांच्या वाक्सुधेचें सेवन करावें, ही प्रत्येकाची अगदीं आतुरता दिसत होती.

बरोबर आलेल्या शिष्यगणांत **नरेंद्र** (विवेकानंद), **एम्, राखाल, राम,** इत्यादि होते.

महाराज (अर्ध जागृतींत हांसत हांसत संतोषानें):—ठीक, ठीक ! पण तूं काय उपदेश करितोस ?

शशधरः—महाराज, मी शास्त्रांतील तत्त्वें समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असतों.

महाराजः—कलियुगाला विशेषतः नारदीय भक्ति सांगितली आहे. शास्त्रांनीं ज्या कर्मांचा विधि मनुष्याला सांगितला आहे, तीं कर्मे करण्याला मनुष्याला (कलियुगांत) अवकाश आहे कोठें ? आजकाल दशमुळांचा काढा तापाला चालावयाचा नाहीं, हें तुझ्या लक्षांत नाहीं का येत ? काढ्याचा परिणाम होऊन गुण येण्यापूर्वीं रोगी दगावण्याची भीति आहे. तेव्हां आजकाल त्वरित गुणकारी ‘ ज्वरमिश्रण ’च दिलें पाहिजे.

भक्तियोग—कर्मयोग नव्हे.

हें पाहा, पाहिजे तर कर्ममार्गाचा लोकांना उपदेश कर, पण त्यांत शक्य ती छाटाछाट करून टाक. ‘ सब घोडे बारा टक्के ’ असें करूं नको. सर्व कर्मांचें लोणी काढून त्यांच्या हातावर ठेव. संध्येविंध्येसारखीं लांबलचक कर्में करण्याच्या त्रासांत तुम्ही पडूं नका; फक्त गायत्रीमंत्राचा जप करा म्हणजे झालें, असें मी लोकांना सांगतों.

ईशानसारखीं कर्मठ माणसें थोडीं. शास्त्रविधींचा व कर्मांचा

उपदेशच जर करावयाचा असेल, तर तो अशा चारदोन अपवादात्मक व्यक्तींना करावा.

विषयी लोक व व्याख्यानें.

विषयी लोकांना हजारों व्याख्यानें दिलीं,—हवा तितका उपदेश केला,--तरी त्यांच्या मनांवर कांहीं परिणाम होणार नाहीं. दगडांत खिळा मारतां येईल का? तसें करण्याचा जर आपण प्रयत्न केला, तर त्याचें टोंकमात्र मोडून जाईल, दगडाला कांहींच व्हावयाचें नाहीं! सुसरीला तरवारीनें वार केला, किंवा भाल्यानें टोंचलें, काय होणार?

साधूचा कमंडलू चारी धामें करून आला, तरी आपला कडू तो कडूच! त्याचा मूळ स्वभाव का सुटणार आहे? तेव्हां माझें म्हणणें एवढेंच कीं, अशा विषयी लोकांना तुझ्या व्याख्यानांचा—उपदेशाचा--कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. 'कडू कारलें तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी कडू तें कडूच.' त्याचप्रमाणें कितीही उपदेश करा, त्यांचा विषयीपणा का नाहींसा होणार आहे? तो राहणारच!

गुरूला अनुभव.

पण, मला वाटतें, जसा जसा अनुभव येईल, तशा तशा या गोष्टी तुला कळूं लागतील. वासराला एकदम कांहीं उभें राहतां येत नाहीं! उभें रहाण्याचा प्रयत्न करीत असतां तें पहिल्यानें वारंवार पडतें; पण पुनःपुन्हा प्रयत्न करितें.—याच रीतीनें शेवटीं तें उभें राहायला व चालायला शिकतें.

भक्त कोण, विषयी कोण, हें तुझ्या लक्षांत येत नाहीं; पण हा तुझा दोष नव्हे. बादळ उठलें, म्हणजे दश-दिशा धुळीनें भरून जातात. मग हें आंब्याचें झाड, तें चिंचेचें, असें कांहींच उमगतां येत नाहीं. तुझ्या ठिकाणीं नवानुरागाचें—नवीन भक्तीचें—पहिलेंच वादळ जोरानें चालू आहे; तेव्हां, भक्त कोण व विषयी कोण, हें तुला ओळखतां येत नाहीं. तुला सगळे सारखेच दिसतात.

नवानुरागाचा विचारावर परिणाम.

ज्याला ईश्वरलाभ झाला, त्यालाच कर्मांचा त्याग करितां येईल. दुसऱ्या कोणालाही तो करितां येणार नाहीं. संध्यादि कर्में किती दिवस चालू ठेवावयाचीं, असा प्रश्न येतो. याचें उत्तर एवढेंच कीं, ईश्वराच्या नामाचा उच्चार झाल्याबरोबर डोळ्यांतून प्रेमाश्रूंचे पूर वाहूं लागले, व तनु पुलकित होऊं लागली, कीं कर्मांचा काल झाला.

कर्मत्याग व ईश्वरलाभ.

'ॐ राम' असा तूं मुखानें उच्चार केल्याबरोबर जर तुझे डोळे पाण्यानें भरून आले, तर तुला कर्में करण्याची जरूर आतां राहिली नाहीं, असें तूं निश्चित जाण. मग संध्यादि कर्में तूं खुशाल सोड. कर्मांच्या वरच्या पायरीवर आपण चढलों, असें तूं समज. फळ आलें, कीं फूल गळून जातें. भक्ति हें फल, कर्म हें फूल.

सून गरोदर आहे, असें दिसूं लागतांच सासू तिच्यावरचा घरांतल्या कामाचा भार दिवसेंदिवस कमी कमी करूं लागते.

तिला दहावा महिना टेंकला, कीं ती तिच्या हातचें सगळेंच काम काढून घेते.

संध्येचा लय गायत्रींत होतो; गायत्रचिा प्रणवांत (ॐकारांत); व प्रणवाचा समाधींत. घंटेच्या नादावरून या अवस्था चांगल्या लक्षांत येतात. 'घंण' असा घंटेंतून जोरानें निघालेला पहिला आवाज 'घंणऽऽऽऽ' असा सूक्ष्म सूक्ष्म होत होत शेवटीं अनंतांत लय पावतो. नादभेद म्हणून जेवढा आहे, तेवढा ब्रह्मापासून उत्पन्न होऊन नंतर ब्रह्मांतच लीन होतो, असें जें योग्याच्या दृष्टीला दिसतें, त्याचें हें स्पष्ट उदाहरण आहे.

संध्यादि कर्मांचा याच न्यायानें समाधींत लय होतो. अशा रीतीनें ईश्वरलाभ झाला, म्हणजे त्या ज्ञानी पुरुषाकडून आपोआप कर्मांचा त्याग होतो.

बिंदु ११ वा.

समाधीच्या गोष्टी बोलतां बोलतांच महाराजांचे वृत्तींत विलक्षण परिवर्तन झालें. त्यांचा मुखचंद्र दिव्य मधुर तेज बाहेर टाकूं लागला. वृत्ति बाह्यशून्य झाली. मुखांतील शब्द बंद झाला. या स्थितींत कांहीं क्षण गेल्यानंतर ते आपल्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें 'मला थोडें पाणी द्या,' असें म्हणाले.

समाधीनंतर असें त्यांनीं पाणी मागितलें, म्हणजे ते लवकरच पूर्णपणें देहावर येणार, याचें तें निश्चित लक्षण असे.

नंतर ते म्हणाले, 'आई! त्या दिवशीं कृपा करून तूं ईश्वर विद्यासागरांची मला भेट करविलीस! त्यानंतर मीं तुला म्हटलें कीं, आई! कोणा तरी पंडिताची मला भेट घ्यावयाची आहे. आणि आज मला या ठिकाणीं आणून माझी तीही इच्छा तूं पुरविलीस.'

साधन पाहिजे.

मग शशधरांकडे वळून महाराज म्हणाले, "बाबा! तूं आणखी थोडें आपलें सामर्थ्य वाढव. आणखी कांहीं दिवस साधन कर. झाडाला अद्याप तुझा कुठे पायही लागला नाहीं, तोंच इरसाल इरसाल फळें हातीं घालावीं, अशी तुझी इच्छा दिसते! तरी त्यांतले त्यांत इतकें बरें आहे कीं, हें सगळें केवळ लोकांचें बरें करण्याच्या इच्छेनें तूं करीत आहेस."

पांडित्य व विवेक-वैराग्य.

असें म्हणून महाराजांनीं शिर वांकवून शशधरांना नमस्कार केला व म्हटलें कीं, "पहिल्यानें जेव्हां मीं तुझें नांव ऐकलें, तेव्हां लोकांना आपलें असें विचारलें कीं, हा पंडित म्हणजे आपला नुसता पंडितच आहे, कीं कांहीं विवेक-वैराग्य त्याचे अंगीं आहे? ज्या पंडिताचे अंगीं विवेक व वैराग्य हीं नाहींत, त्याचें पांडित्य काय कामाचें? तो पंडितच नव्हे.

गुरुत्व व आदेश.

"आदेश जर झाला असेल, तूं आतां लोकांना धर्मोपदेश कर, अशी आज्ञा भगवंतानें जर कोणाला केली असेल, तर लोकोपदेशाचें काम हातीं घेण्यांत कांहीं दोष नाहीं.

आदिष्ट गुरु आजिंक्य असतो.

" आदेशाचें पाठबळ मिळाल्यावर गुरूच्या अंगीं असें सामर्थ्य येतें कीं, त्याला कोणीही हरवूं शकत नाहीं. वाग्देवतेपासून--माझ्या आईपासून--आलेल्या प्रकाशाच्या केवळ एका किरणाचें तेज-सामर्थ्य -एवढें जबरदस्त असतें कीं, तें मी मी म्हणणाऱ्या पंडितांना-केवळ पुस्तकी विद्वानांना-कचऱ्यासारखें करून टाकतें.

आदिष्ट गुरु संस्था स्थापण्याच्या भानगडींत पडत नाहीं; दवंडी पिटून सभा भरवीत नाहीं; लोकप्रशंसेकडे लक्ष देत नाहीं.

" पावसाळ्या दिवसांत एकदां दिवा लागला, म्हणजे त्याच्या-भोंवतीं जमणारे जे हजारों पतंग असतात, ते आमंत्रणाची कांहीं वाट पहात नाहींत; ते दिव्याच्या ज्योतीवर झांप टाकीत यावयाचेच. ' या ' असें मुळींच त्यांना बोलवावें लागत नाहीं. याच न्यायानें, ज्याला आदेश मिळाला, त्याला श्रोत्यांना हुडकीत जावें लागत नाहीं.--अमुक वेळेला व्याख्यान व्हावयाचें आहे, अशी जाहीर खबर लोकांत प्रसिद्ध करावी लागत नाहीं. श्रोतेच त्याला हुडकीत जातात. असा आदिष्ट गुरु व्याख्यानें देण्याकारितां सभाबिभांच्या कांहीं भानगडींत पडत नाहीं. लोक आपोआप त्याच्याकडे धांव घेतात. त्या चुंबकमण्याचें आकर्षण कोणालाच चुकवितां येत नाहीं.

परमहंसांचें वैराग्य व गुरुत्व.

" मग राजे, महाराजे, सरदार, इनामदार, श्रीमंत लोक, सगळे त्याच्या पायांशीं लोटतात आणि म्हणूं लागतात, " महाराज! आपली काय इच्छा आहे? हे आंबे, मिठाई, मोहोरा, जवाहीर, शाली, इत्यादि

पदार्थ या दासानें आणले आहेत, त्यांचा स्वीकार करण्याचा अनुग्रह आपल्याकडून होईल का?" या सगळ्या लोकांना मी असें उत्तर देतों कीं, "चला!–नको. मला त्यांतलें कांहीं नको! त्यापैकीं कशाची मला किंमत वाटत नाहीं."

"तूं माझ्याकडे ये, असें चुंबकमणि लोहाला कधीं तरी म्हणतो काय? त्याला कधींच तसें म्हणावें लागत नाहीं. लोह आपण होऊन धांवत चुंबकाकडे जातें.–त्याला जावेंच लागतें.

आदिष्ट गुरु व ज्ञान.

"असा गुरु पंडित असत नाहीं,--वेदशास्त्रसंपन्न असत नाहीं, विद्यासंपन्न असत नाहीं,–म्हणून तुला शंका येते का? तो विद्वान् नसतो–पुस्तकी विद्वान् नसतो, पढीक नसतो–म्हणून तुला शंका येते का? छे छे! त्याला ज्ञानाची कमतरता कधींच भासत नाहीं. ज्ञानसागरच त्याचे हातीं लागलेला असतो;—प्रत्यक्ष ईश्वरानेंच त्याला ज्ञान दिलेलें असतें. तेव्हां पुस्तकी विद्या का कुठे त्या ज्ञानाला पुरी पडेल? पोथ्यापुस्तकें घोकून का कुठे ज्ञान होतें?

"तिकडल्या प्रांतांत (परमहंसांचा जन्मग्राम ज्या प्रांतांत होता त्या प्रांतांत) धान्य मोजतांना एक जण माप करीत असतो, व दुसरा एक जण धान्याची रास त्याचेपुढें–त्याचे हाताजवळ–लोटीत असतो. मिळून त्याचेपुढचें धान्य संपतच नाहीं. त्याचप्रमाणें ज्याला आदेश झाला, त्याला आई–केवळ ज्ञानसागरच अशी माझी आई –आंतून ज्ञानाचा सारखा पुरवठा करीत असते. तें ज्ञान कसें बरें संपणार? कधींच नाहीं संपायचें.

" आईचा केवळ एक कृपाकटाक्ष जिथे पडला, तिथे ज्ञानाचा अभाव कधीं तरी होईल का? एवढा आईचा अनुग्रह होण्यासारखें दुर्लभ पुण्यबळ ज्या कोणा पुरुषाचे पदरीं असेल, त्याला ज्ञानाचा कुठला तोटा! म्हणून विचारतों कीं, असा कांहीं आदेश तुला झाला आहे का?"

हज्रा (पंडितांना):–हो तर! तसें कांहीं तरी असलेंच पाहिजे. नाहीं का पंडितजी?

पंडित:–छे! आदेश कुठला! तसें कांहींच नाहीं.

घराचे यजमान:–आदेशबिदेश कांहीं नाहीं. केवळ आपलें कर्तव्य म्हणून ते उपदेश करीत असतात.

अनादिष्ट गुरूंच्या व्याख्यानांची किंमत.

महाराज:–व्याख्यात्याला–उपदेशकाला–गुरूला–आंतून अधिकाराचा जर जोर नसेल,–आदेशानें प्राप्त होणाऱ्या तेजाचा जर जोर अंगीं नसेल,–तर त्याचीं व्याख्यानें (किंवा उपदेश) काय कामाचीं? त्यांची काय किंमत आहे? एकदां एक जण व्याख्यान देतां देतां म्हणाला कीं, "मी पूर्वी दारू पीत असें, यँ करीत असें, नी त्यँ करीत असें." या कबुलीनें व्याख्यात्यानें आपलें अधिकच हंसें करून घेतलें, अर्थात् त्यानें आपलीच किंमत कमी करून घेतली. कारण, कांहीं लोक मनांतले मनांत असें म्हणूं लागले कीं, काय मूर्ख बेटा पहा! काय म्हणतो हा? 'मी दारू पीत होतों!' अशा बोलण्यानें नेहमीं उलट परिणाम होतो. व्याख्यात्याचें आचरण जर धुतल्या तांदळासारखें

स्वच्छ नसेल, तर त्याच्या कोरड्या व्याख्यानानें कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. सेवामुक्त होऊन बैठा पगार खाणारा (पेन्शनर) बारीसालचा एक सदर-अमीन (सब-सज्ज) एकदां मला म्हणाला कीं, "महाराज, आपण धर्मप्रचारार्थ उपदेश करण्याला आरंभ केला आहे ना? ठीक आहे, मीही तसें करण्याला आनंदानें कंबर बांधतों!" त्यावर मीं म्हटलें, "बाबा, मी एक गोष्ट सागतों, ती ऐक. कमारपूकर गांवीं हलधरपूकर नांवाचें एक तळें आहे. त्याचे कांठीं घाण करून लोक त्याचें पाणी अगदीं खराब करीत. रोज सकाळीं घाण करणाऱ्यांच्या डोक्यांवर शिव्यांच्या लाखोलीचा अगदीं वर्षाव होई. पण कांहीं उपयोग होईना! दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हा आपला तोच प्रकार! असें रोज चाले! अखेरीस, 'येथें कोणीं घाण करूं नये,' असें ताकीद-पत्र (नोटीस) एक दिवस सरकारी शिपायानें तेथें आणून लावलें. या अधिकारी वाणीचा काय विलक्षण प्रभाव सांगावा! फिरून घाणीचें नांव नाहींसें झालें!"

म्हणूनच मी म्हणतों कीं, व्याख्यान देणारा माणूस असा अलुताबलुता असून उपयोगी नाहीं. तो अधिकारशस्त्रानें सज्ज असला पाहिजे.—भगवंतानें दिलेल्या अधिकाराच्या चिन्हांनीं विभूषित असला पाहिजे. कमरेला शिपाईगिरीचा पट्टा नसेल, तर लोक त्या शिपायाचें म्हणणें ऐकणार नाहींत. तसेंच, ईश्वराचा आदेश नसेल, तर कोरडया व्याख्यानानें—गुरूपदेशानें—कांहीं व्हावयाचें नाहीं. व्याख्यात्याजवळ—गुरूजवळ—शिपाईगिरीचा पट्टा

पाहिजे,—आपल्या अधिकारीपणाचें चिन्ह पाहिजे—त्याला ईश्वराकडून आदेशच असला पाहिजे.

लोकशिक्षेचें—लोकोपदेशाचें—कार्य ज्यानें हातीं घेतलें, त्याची आध्यात्मिक शक्ति तशीच जबरदस्त असली पाहिजे. कलकत्त्यांत हनुमानपुरीसारखे अनेक पैलवान आहेत, त्यांच्याबरोबर दोन हात करण्याची तयारी पाहिजे. पठ्यांशीं (कुस्तीचे कामांत जे नवशिके आहेत त्यांच्याशीं) शक्तीचा तोरा मिरविण्यांत काय पुरुषार्थ आहे?

चैतन्यदेव ईश्वरी अवतार होते, हें लोकविश्रुत आहे. पण ते जें कार्य करून गेले, त्याचें आतां काय राहिलें आहे? पहा बरें. आतां, ज्यांचें आध्यात्मिक बल शून्य आहे, व ज्यांना ईश्वरी आदेश झालेला नाहीं, त्यांचें काम किती शुष्क असलें पाहिजे बरें!

म्हणून मी म्हणतों कीं, (हा आदेश प्राप्त करून घेण्याकरितां) ईश्वराच्या पादपद्मीं लुब्ध व्हा!

असें म्हणून भक्तीच्या मद्यानें उन्मत्त होऊन महाराज गाऊं लागले:—

पद.

चाल—(हरिभजनावीण काळ०)

मार बुडी घेइं ठाव रूपसागराचा ॥ ध्रु० ॥
अतलतलातलवितलीं, तेविं रसातलसुतलीं,
शोध करीं पातालीं, प्रेममौक्तिकाचा ॥ मार० ॥ १ ॥

(इत्यादि, इत्यादि, बिंदु ९ वा पहा.)

पद संपल्यावर महाराज म्हणाले, "मी उडी टाकून सागरांत खूप भिऊं नको. खोल बुडी मारायला सांगतों, म्हणून भिऊं नको. अगदीं भिऊं नको. तो अमृतसागर आहे.

मीं या नरेंद्राला एकदां म्हटलें कीं, " ईश्वर (अमृत) रसाचा सागर आहे. तूं या सागरांत बुडी मारशील कीं नाहीं? बोल. बरें, समज इथे एक रुंद तोंडाचें भांडें आहे; व तें (अमृत) रसानें अगदीं कांठोकांठ भरलेलें आहे. आणखी असें समज कीं, तूं माशी आहेस, व तो रस पिण्याला अगदीं उतावळा झाला आहेस. तर कुठे बरें बसून तो तूं रस खाशील?" तेव्हां नरेंद्रानें उत्तर केलें कीं, " मी आपला भांड्याच्या कांठावरच बसून खाईन. कारण, जर मी बराच पुढें गेलों, तर खचित बुडून मरेन!" तेव्हां मीं म्हटलें, " बाबा, ईश्वरसागरांत बुडी मारतांना मरणाचें भय बाळगण्याचें तुला कांहीं कारण नाहीं. लक्षांत ठेव, सच्चिदानंदसागर हा अमृताचा सागर आहे. या सागराच्या पाण्यांत मरण कधीं येत नाहीं; उलट, तें पाणी अमरत्व देणारें आहे. भक्तीचा, न जाणों, आपल्या हातून कदाचित् अतिरेक होईल, अशी कांहीं अडाणी लोकांना धास्ती वाटते, पण तशी धास्ती तूं केव्हांही बाळगूं नको."

नरेंद्र व अमृतसागर.

" तेव्हां या अमृतसागरांत बुडी मारून सच्चिदानंदरसाचें आकंठ पान कर.

या मार्गानें ईश्वरलाभ साध, त्याचें प्रत्यक्ष दर्शनसुख अनुभव; मग त्याची वाणी तुझ्या कानीं पडेल तो तुझ्याशीं बोलेल. आणि त्याच्या मनांत आलें, तर तो तुला आपला आदेशही देईल."

बिंदु १२ वा.

अमृतसागराची वाट.

श्रीरामकृष्ण:–हें पहा, अमृतसागराला जाण्याला अनंत मार्ग आहेत. अमुकच मार्गानें गेलें पाहिजे, असें कांहीं नाहीं; कुणीकडून तरी त्या सागरांत जाऊन पडलें म्हणजे झालें.

सर्व मतमतांतरांना समाश्वासन.

समज, एक अमृताचें कुंड आहे. या कुंडांतलें अमृत तुझ्या मुखांत पडलें, कीं तुला अमरत्व आलें. मग तें कसें कां पडेना ! कुंडाच्या उतरत्या बाजूंवरून कुठूनही आस्ते आस्ते तूं चालत जा, आणि त्यांतल्या अमृताचें प्राशन कर. बरें, तूं कांठावरून एकदम आंत उडी टाकलीस, किंवा तुला एकदम आंत कोणीं ढकलून दिलें, तरी काय झालें? कोणीकडून फळ एकच. अमृताचा आस्वाद तुला मिळून तूं अमर होतोसच.

मार्ग अनंत आहेत:––ज्ञान, कर्म, भक्ति, यांपैकीं पाहिजे त्या मार्गानें जा, ईश्वरप्राप्ति होईल; आंतरिक निष्ठामात्र पाहिजे.

योग.

योगाचे प्रकार तीन:–१. ज्ञानयोग, २. कर्मयोग, व ३. भक्तियोग.

१. ज्ञानयोग:–ज्ञानबलानें ईश्वरलाभ करून घेण्याचा हा मार्ग आहे. ब्रह्म जाणावें, हा ज्ञान्याचा हेतु. तो 'नेति' 'नेति' असें म्हणतो; सदसद्विचार करितो; असा विचार करीत करीत, एकेक असद्वस्तूचा त्याग करीत करीत, तो पुढें जात असतो; शेवटीं तो

अशा एका ठिकाणीं येतो कीं, त्या ठिकाणीं विचाराची गति थांबते. त्याची समाधि लागते; आणि ब्रह्माचा अपरोक्षानुभव प्राप्त होतो.

२. कर्मयोगः--म्हणजे कर्माच्या द्वारानें ईश्वराचे ठिकाणीं मन राखणें; तूं हल्लीं ज्याचा उपदेश करतोस तोच. अष्टांगयोग[१] किंवा राजयोग याचें अनासक्त होऊन आचरण झालें, कीं तो कर्मयोगच आहे. तेणेंकरून धारणा व ध्यान यांच्या द्वारें ब्रह्मसाक्षात्कार होतो.

अनासक्त होऊन, आपल्या हरएक कर्माचीं फलें ईश्वराला समर्पण करून, ईश्वरावर अनन्य भक्ति ठेवून गृहस्थांनीं–संसारी जनांनीं–आपलीं सर्व कर्मं केलीं, कीं कर्मयोग झाला. निष्काम भावानें ईश्वराची पूजा करणें, जपतपादि करणें, याचें नांवही कर्मयोगच. ईश्वराचा लाभ–सगुण अथवा निर्गुण ब्रह्माचा लाभ–हेंच कर्मयोगाचें उद्देश्य आहे.

३. भक्तियोगः–म्हणजे ईश्वराचे ठिकाणीं निश्चल मन ठेवून त्याच्या नामगुणांचें अखंड कीर्तन करणें. कलियुगांत भक्तियोग हाच सहजसाध्य मार्ग आहे; भक्तियोग हाच आज युगधर्म आहे.

कर्मयोगाचें काठिण्य.

कर्मयोग फार कठिण आहे. विशेषेंकरून या कलियुगांत तर तो फारच कठिण आहे, हें मीं मघांशीं सांगितलेंच आहे. त्याचीं कारणेंही मीं तेव्हांच सांगितलीं आहेत. कोणतीं ? पहिलें कारण हें कीं, या युगांत मनु-

१. पांतंजल योगाचीं आठ अंगें:–यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि.

ण्याला अवकाश आहे कोठें? जीं नित्यनैमित्तिक कर्मे मनुष्यानें करावीं, असें शास्त्रांचें म्हणणें आहे, तीं सर्व कर्मे करण्याला आज मनुष्याला अवकाश आहे कुठे? कलियुगांत मुळीं आयुष्यच कमी! दुसरें कारण असें कीं, अनासक्त होऊन, फलाची कामना न ठेवतां कर्म करणें भारी कठिण आहे. निष्काम मनानें—इहामुत्रफलभोग-विरक्तीनें—पुण्यकर्माबद्दल इहपरलोकीं पारितोषिकाची आशा किंवा दुष्कर्माबद्दल दंडाची भीति अगदीं मनांत न वागवितां—कर्माचरण करावयाचें, असा करतांना कदाचित् निश्चय तूं करशील; पण पुढें बहुधा असें होतें कीं, तुला न कळत हळूच आपली आसक्ति येऊन तिथे डोकावूं लागते. आतां, तुला पूर्वींच ईश्वरलाभ झाला असेल, तर मात्र गोष्ट निराळी.

ज्ञानयोगाचें काठिण्य.

बरें, या युगांत ज्ञानयोगही तसाच कठिण आहे. पहिलें कारण असें कीं, आपला प्राण केवळ अन्नगत आहे. दुसरें असें कीं, या युगांत मनुष्याला आयुष्य फारच कमी. तिसरें असें कीं, या युगांत देहबुद्धीचा निरास होणें दुष्कर आहे. आणि जोंपर्यंत देहबुद्धीचा अस्त झाला नाहीं, तोंपर्यंत ज्ञानाचा उदयही व्हावयाचा नाहीं. ज्ञान्याची वृत्ति कशी बरें बनली पाहिजे? अशीः—' मी (स्थूल किंवा सूक्ष्म) शरीर नव्हें; मी परमात्मा आहें, केवळ ब्रह्म आहें. मी शरीर नसल्यामुळें शारीरिक विकारांची बाधा मला कधींच व्हावयाची नाहीं;—म्हणजे क्षुधा, तृषा, जन्म, मृत्यु, रोग, शोक, सुख, दुःख, या सर्वांच्या पलीकडे मी आहें.

रोग, शोक, सुख, दुःख इत्यादि विकारांची बाधा जोंपर्यंत मनुष्याला होते आहे, तोंपर्यंत त्याला आपल्याला ज्ञानी असें कसें बरें म्हणवितां येईल? एखादा मनुष्य कांटयांत पडला, त्याला फार लागलें, त्याच्या हातांत कांटे गेले, त्याचा हात खरचटला, पुष्कळ ठिकाणीं फाटला, त्यांतून दरदर रक्त वाहूं लागलें व त्या वेदनांनीं त्याचया मनाची अगदीं तळमळ उडाली. अशी मनाची तळमळ होत असतां माझ्या हाताला लागलेंबिगलें कांहीं नाहीं, मला काय झालें आहे? असें जर तो नुसतें तोंडानें म्हणत राहिला, तर तें त्याचें म्हणणें जसें खरें नव्हे, तसेंच शारीरिक सुखदुःखांच्या विकारांचे परिणाम जोंपर्यंत मनावर होत आहेत, तोंपर्यंत कोणाही मनुष्यानें आपल्याला 'ज्ञानी' म्हणविलें, तर त्याचेंही म्हणणें खरें नव्हे. दोघे सारखेच.

भक्तियोगच युगधर्मः ज्ञानयोग किंवा कर्मयोग नव्हे.

म्हणूनच या युगांत भक्तियोग. दुसऱ्या मार्गांपेक्षां भक्तियोग हा सुलभ आहे. त्यानें कर्माचा व्याप आपोआप अगदीं संपुष्टांत येतो, परमेश्वराचें अखंड चिंतन घडतें. या युगांत परमेश्वराकडे जाण्याला ही अगदीं जवळची वाट आहे.

मार्ग निराळे, पण शेवटीं भेटतात एकाच जागीं.

याचा अर्थ एवढाच कीं, ज्ञानमार्गानें (सदसद्विचारानें अर्थात् ज्ञानविचारानें), किंवा कर्ममार्गानें (अर्थात् निष्काम कर्माचरणानें), परमेश्वराकडे जातां येईल, परमेश्वराची प्राप्ति करून घेतां येईल; पण या युगांत भक्तिमार्गापेक्षां हे मार्ग अवघड आहेत. भक्त

शेवटीं एका जागीं जाईल आणि ज्ञानी व कर्मी हे निराळ्याच जागीं जातील, असें कांहीं नाहीं.

ज्ञानयोगी ब्रह्मसाक्षात्काराचा भुकेला असतो. सांगण्याचा आशय एवढाच कीं, अशा माणसानेंसुद्धां जर भक्तिमार्गाचें अवलंबन केलें, तर त्यांत त्याचें ज्यास्त हित आहे. त्यानें मनांत अनन्य भक्ति ठेवून आपला सर्व भार ईश्वरावर टाकून द्यावा. तो भक्तवत्सल आहे, आपल्या अनन्यभक्ताचें कोड पुरवून त्याला तृप्त करणें, हें त्याचें ब्रीद आहे. तेव्हां भक्ताला ब्रह्मज्ञानाची जर लालसा असेल, तर तीही पूर्ण करण्याला तो समर्थ आहे.

तेव्हां ज्ञान्याला सगुण ब्रह्माचा व निर्गुण ब्रह्माचाही साक्षात्कार घडेल; **मात्र या युगांत त्यानें भक्तीच्या मार्गानें जावें.**

भक्ताला ब्रह्मज्ञान होईल का?

ईश्वराचें साकार रूप पाहावयाला मिळालें, त्याच्याबरोबर मन मोकळें करून बोलायला मिळालें कीं, भक्ताचें सामान्यतः समाधान होतें त्याला बहुधा ब्रह्मज्ञानाची इच्छा नसते. पण ईश्वर इच्छामय आहे, त्याच्या जर मनांत आलें तर तो भक्ताला आपल्या सकल ऐश्वर्याचा पूर्ण अधिकारी करील;—आपलीं सगुण व निर्गुण अशीं दोन्ही स्वरूपें त्याला दाखवील. त्याला भक्तिही देईल, ज्ञानही देईल.

कारण, ज्या माणसानें कलकत्त्यापर्यंत मजल मारली, त्याला तिथलें मैदान, जनरल ऑक्टरलोनीचें स्मारक, तिथला अजबखाना वगैरे ठिकाणीं जाऊन त्यांची माहिती करून घेणें कठिण आहे का?

कलकत्ता कसा हातीं येईल, हाच काय तो मुख्य प्रश्न आहे.

माझ्या आईपर्यंत येमात्र, कीं तुला भक्ति मिळेल इतकेंच नव्हे, तर ज्ञानही मिळेल; ज्ञान मिळेल इतकेंच नव्हे, तर भक्तिही मिळेल.–सविकल्प समाधीमध्यें तिच्या साकार रूपाचें तुला दर्शन घडेल इतकेंच नव्हे, तर निर्विकल्प समाधीमध्यें तिच्या सच्चिदानंद-स्वरूपाचें दर्शनसुख तुला अनुभवितां येईल;–तिथे मग आईच्या कृपेनें भक्ताचा अहंभाव विरून जातो, व नामरूपात्मक साकार स्वरूपांचाही लोप होतो.

भक्ति व कर्म: भक्ताची प्रार्थना.

भक्त म्हणतो, "आई ग, सकाम कर्माचें स्वरूप भारी भयंकर आहे, हें मला दिसतें आहे. त्यांत कामना असते; तेव्हां 'करावें तसें भरावें' या न्यायानें त्याचीं बरींवाईट फळें भोगल्याशिवाय कांहीं सुटका नाहीं. बरें, अनासक्त होऊन कर्म करीन असें म्हणावें, तर तें फारच कठिण आहे. सकाम कर्म करायला जावें, तर आई, त्या व्यापारांत मनाला तुझा विसर पडतो. तेव्हां या सकाम कर्माच्या कचाट्यांतून मला एकदां सोडव ना! नको मला तसलें तें कर्म! जोंपर्यंत तुझ्या दर्शनाचा लाभ होऊन माझ्यामागचें कर्माचें लचांड सुटलें नाहीं, तोंपर्यंत आई, माझा कर्माचा जोजार दिवसें-दिवस कमी कमी कर. व जसजशीं माझीं कर्में कमी कमी करशील, तसतसा, तुझ्या प्राप्तीचें मुख्य साधन जें निर्मल प्रेम, जें आत्मनिवेदन, जी शुद्ध भक्ति तिचा संचार माझ्या अंगांत कर. जें कांहीं थोडेंसें कर्म माझ्या नशिबानें मला करावें लागेल,–तुझ्या कृपेनें माझा कर्माचा

व्याप कमी कमी झाल्यानंतर जें कांहीं अल्पस्वरूप कर्म मला करायचें राहील–तें निष्काम मनानें करण्याचें, आई, मला तूं सामर्थ्य दे. जोंपर्यंत तुझा लाभ होऊन माझ्या जन्माचें खरें सार्थक झालें नाहीं, तोंपर्यंत, आई, माझ्या मनाला नवीन नवीन कर्मांवर–मग तीं निष्काम कां असत ना—उडी घेऊं देऊं नको. मात्र जीं जीं कर्में करण्याला तूं मला 'आदेश'च करशील, तीं तीं कर्में करण्याची बुद्धि मला दे; दुसरीं करण्याची,हे आई, बुद्धि अगदीं देऊं नको."

बिंदु १३ वा.

पंडितः—महाराज, आपण तीर्थयात्रेला किती दूर गेलां होतां?

महाराज (सहास्य):—हां, गेलों होतों कांहीं ठिकाणीं. हज्रा पुष्कळ दूर गेला होता, उंच गेला होता अगदीं; हिमालयांतील हृषीकेशपर्यंत गेला होता. मी इतका दूर नाहीं गेलों, इतका उंचही नाहीं चढलों.

तीर्थयात्रांचें महत्त्वः कर्म व भक्ति.

गिधाडें व घारी आकाशांत खूप उंच भरारी मारतात; पण त्यांची नजर लागलेली असते कुठे? मेलेलीं जनावरें ओढून टाकतात तिथे.

एकदां भक्तीचें वारें आंगांत पक्कें मुरलें, म्हणजे मग तीर्थक्षेत्रें धुंडाळण्याचें प्रयोजन काय? यात्रेच्या निमित्तानें जेव्हां मी काशीला गेलों, तेव्हां तिथे केवढा पण चमत्कार मला दिसला!—

पाहातों तों तिथलें पण गवत आपलें इथल्यासारखेंच, आणि तिथल्या चिंचेचीं पानें पण अगदीं अशींच !

मनांत भक्तीचा लेशही जर नसेल, तर तीर्थाला गेल्यानें कांहीं फलप्राप्ति व्हावयाची नाहीं. अंतःकरणांत भक्तीचा चांगला ओलावा असेल, तर तीर्थक्षेत्रांना गेलेंच पाहिजे, असें मुळींच नाहीं. बसल्या जागींच बसणें बरें. भक्ति हेंच सर्वसार आहे, भक्तीचेंच काय तें खरें प्रयोजन आहे.

हा संसार—कामिनी (कामेच्छा) आणि कांचन (संपत्ति, मान, कीर्ति, सकाम कर्मे, इत्यादि) यांचाच केवळ वाचक असलेला हा संसार–म्हणजे मेलेलीं जनावरें ओढून टाकण्याची स्मशानभूमि होय.

गिधाडें, घारी म्हणजे कोण ठाऊक आहे का? जे लोक लांब लांब गोष्टी बोलतात, शास्त्रविहित सकल कर्मे आपण करतों अशी आढ्यता मिरवतात, तेच. हातानें सर्व शास्त्रोक्त कर्मे करीत असतांना त्यांचें मन असतें विषयांत—पैसा, मान, दैहिक सुख, यांत—लुडबुडत !

पंडितः—खरें आहे महाराज ! अशा स्थितींत यात्रेला जाणें, म्हणजे कौस्तुभमणि लाथेनें उडवून देऊन दुसरीं भिकार हिरेमाणकें शोधीत फिरण्यासारखें होय.

धर्मजागृतिः वेळेशिवाय फळ नाहीं.

श्रीरामकृष्णः—उपदेशाला योग्य असा शिष्याचा काल आला आहे किंवा नाहीं, याचा विचार तुला केला पाहिजे; तरच तुझ्या उपदेशाचें सार्थक होईल. (म्हणजे शिष्याचें मन जर विषयांत रंगत असेल, तर त्याला उपदेश करणें व्यर्थ आहे. मनाला संसाराचा वीट येईल तरच ज्ञानाचा त्यांत प्रवेश होईल. तेव्हां योग्य पात्र पाहून उपदेश कर, म्हणजे त्याचा उपयोग होईल). प्रत्येकाला (संसारांत रमायला) थोडी सवड दिल्यावांचून कितीही उपदेश केला, तरी तो सफल व्हावयाचा नाहीं. (प्रत्येकाला थोडेंबहुत संसारसुख घेऊं द्यावें; मग आपोआप हळुहळू त्याला त्याचा वीट येईल, आणि ज्ञानाचें ग्रहण लवकर होईल. असा वीट आला नाहीं, तोंपर्यंत उपदेशापासून फायदा नाहीं). ज्यांना तूं उपदेश करतोस, त्यांचा (उपदेशग्रहणाला) योग्य असा काळ जर आला नसेल, तर तुझ्या उपदेशानें सहसा त्यांना त्या वेळीं कांहींच फायदा व्हावयाचा नाहीं.

खरी धर्मबुद्धि जागृत होण्याला योग्य समयच यावा लागतो. गुरु हा केवळ निमित्तमात्र आहे. भगवंताच्या प्राप्तीसाठीं मूळ व्याकुलता उत्पन्न झाली पाहिजे. मग गुरूचें नुसतें थोडेंसें साहाय्य मिळालें, कीं काम होतें.

वैद्य तीन प्रकारचे असतात.

गुरूचे तीन प्रकार.

एक प्रकारचे वैद्य असतात, ते येतात, रोग्याला तपासतात, नाडीबिडी पाहतात, औषधाची योजना करितात आणि रोग्याला तें घ्यायला सांगतात. रोग्यानें जर आढेवेढे घेतले, तर फारशा पंचायती न करितां खुशाल आपले निघून जातात. हे अधम प्रकारचे वैद्य होत. त्याचप्रमाणें कांहीं गुरु असतात, ते उपदेश करितात आणि उठून चालते होतात. आपल्या उपदेशानें लोकांचें बरें होतें आहे, कां वाईट होतें आहे, आपल्या उपदेशाचा कांहीं तरी परिणाम होतो आहे किंवा नाहीं, इकडे ते फारसें लक्षच देत नाहींत.

दुसऱ्या प्रकारचे जे वैद्य असतात, ते, औषध घे एवढेंच रोग्याला सांगून रहात नाहींत, याच्याही थोडेसे पलीकडे जातात. रोगी जर औषध घेत नसला, तर ते त्याची नीट समजूत घालतात. हे मध्यम प्रकारचे वैद्य होत. तसेच मध्यम प्रकारचे गुरुही असतात, ते उपदेश करितात एवढेंच नव्हे, तर आपल्या उपदेशाकडे लक्ष देऊन लोकांनीं सन्मार्गानें चालावें, म्हणून ते गोड शब्दांनीं आपलेकडून होईल तेवढी त्यांची समजूत घालतात.

तिसरा एक वैद्यांचा प्रकार असतो. हे उत्तम प्रकारचे वैद्य होत. गोड शब्दांचा कांहीं उपयोग होत नाहीं, असें वाटलें कीं, ते जोरावर येतात. वेळ पडली, तर रोग्याला पालथा घालून, त्याच्या छातीवर पाय देऊन जबरदस्तीनें औषध त्याच्या घशाखालीं लोटण्यालाही ते कमी करीत नाहींत. (सर्व हंसतात.) त्याचप्रमाणें उत्तम

प्रकारचे कांहीं गुरुही असतात, ते शिष्यांना ईश्वरमार्गाला आणण्या-कारितां जोरजबरदस्तीचाही, वेळ पडली तर, उपयोग करण्याला मागेंपुढें पहात नाहींत.

पंडितः–जसे उत्तम वैद्य, तसे उत्तम गुरुही असतात तर! मग वेळेशिवाय फळ नाहीं,—शिष्याचीच योग्य तयारी झाल्याशिवाय ज्ञान व्हावयाचें नाहीं, असें जें आपण म्हटलें, तें कां?

श्रीरामकृष्णः—उत्तम वैद्य आहे, खरें आहे. पण, समज, औषध पोटांतच गेलें नाहीं, तोंडांतून बाहेर आलें, मग तिथे वैद्य तरी काय करणार? वैद्य उत्तम आहे, चांगला मेहनती आहे, पण अशा ठिकाणीं त्याला हातच टेंकावे लागणार.

पात्रापात्र.

योग्य पात्र पाहूनच उपदेश केला पाहिजे. उपदेश करतांना तूं पात्रापात्रविचार करीत नाहींस. माझ्याकडे कोणी तरुण माणूस जर आला, तर, 'तुझ्या घरीं कोण कोण आहेत? घरीं कोणी वडील माणूस आहे कीं नाहीं?' अशी मी पहिल्यानें चवकशी करितों. कारण समज, त्याचा बाप नाहीं, आणि त्यानें पाठीमागें बरेंच कर्ज ठेवलें आहे; संसार पाहण्याला घरांत दुसरें वडील माणूसही कोणी नाहीं; असें असलें, म्हणजे त्या माणसाचें परमेश्वराकडे लक्ष लागावें कसें? नाहींच लागावयाचें कधीं. ऐकलें का बाबा?

पंडितः—होय महाराज, सर्व ऐकलें. माझें अगदीं पुरें लक्ष आहे.

नंतर भाषणाचा ओघ 'ईश्वराची दया' या विषयाकडे वळला.

महाराजः—एक दिवस पुष्कळसे शीख शिपाई (कालीमातेच्या) देवळांत आले. आईच्या देवळासमोरच त्यांचीमाझी गांठ झाली. तेव्हां त्यांपैकीं एक जण म्हणाला, 'ईश्वर दयामय आहे.' मीं हासून म्हटलें, 'असें आहे का? खरेंच? पण तुला कसें कळलें बरें हें?' त्यानें उत्तर केलें, 'कां बरें महाराज! तो आपल्या प्राण्यांला संभाळीत नाहीं का? त्यांच्या सर्व गरजा पुरवीत नाहीं का?' यावर मीं म्हटलें, 'मग त्यांत काय झालें? ईश्वर सर्वांचा पिताच आहे. त्यानें आपल्या मुलांची–आपल्या सर्व प्राण्यांची--काळजी वाहिलीच पाहिजे. त्यानें जर नाहीं वाहिली, तर कोण वाहणार? येऊन ईश्वराच्या मुलांचा संभाळ करावयाचा, हें कांहीं त्या 'पाड्यावरच्या' लोकांचें (अर्थात् तिऱ्हाईतांचें) काम नाहीं!'

नरेंद्रः—मग ईश्वराला 'दयामय' म्हणावयाचें कारण नाहीं तर?

श्रीरामकृष्णः—त्याला 'दयामय' म्हणूं नको, असें कांहीं मी तुला सांगत नाहीं. खुशाल त्याला तसें म्हण. माझ्या बोलण्याचा आशय एवढाच कीं, **ईश्वर आपलाच आहे मुळीं, परका नाहीं कांहीं कुणी!**

पंडितः—किती अमोल शब्द आहेत हे!

श्रीरामकृष्णः—(हळूच एका शिष्याला):–तूं गात होतास; पण आजचीं तुझीं पदें मला कशींशींच वाटलीं. अगदीं अळणी! त्यांत मला गंमतच वाटेना.

विषयपर पदें.

आपल्याच कुटुंबाच्या मुख्याची शिफारस घेऊन जसा एखादा

मनुष्य नोकरी शोधीत असावा, तशी तुझी अवस्था होती. म्हणून तीं पदें माझ्यानें ऐकवतना, तेव्हां मी आपला तेथून चालता झालों.

शिष्य ओशाळला.

महाराजांना पाणी प्यायचें होतें. त्यांच्याजवळ एक पेला भरून ठेवलेला होताच, पण तें पाणी ते पीत ना. पुन्हा नवीन पाणी आणायला त्यांनीं सांगितलें. पुढें असें कळलें कीं, कोणा घोर विषयासक्त माणसाचा त्या पाण्याला स्पर्श झाला होता!–अर्थात् तसें विटाळलेलें पाणी हृदयस्थ जनार्दनाला अर्पण करणें बरें नव्हे, असें महाराजांना वाटलें असावें!

पंडित (हज्राला):—आपण सगळे **महाराजांच्या** संगतींत रात्रंदिवस असतां;–खरोखर आपण अगदीं नेहमीं महानंदांत असतां बुवा!

महाराज (हासत हासत):—आज मोठा भाग्याचा दिवस! आज द्वितीयेच्या चंद्राचें मला दर्शन झालें! द्वितीयेचा चंद्र, असें मीं कां म्हटलें समजलें का?

प्रयाण.

सीता रावणाला म्हणाली, 'तूं पूर्णचंद्र, आणि माझा रामचंद्र द्वितीयेच्या चंद्र.' हें ऐकून रावणाला फारच आनंद झाला; कारण यांतलें खरें मर्म कांहीं त्याच्या लक्षांत आलें नाहीं. सीतेच्या बोलण्याचा आशय असा कीं, रावणाच्या वैभवाचा आतां कळस झाला असून पूर्णचंद्राचा ज्याप्रमाणें पुढें क्षय होऊं लागतो, त्याप्रमाणें त्याचाही क्षय होऊं लागणार! रामचंद्राच्या वैभवाचें तसें नव्हतें, तें

केवळ द्वितीयेच्या चंद्राच्या वैभवासारखें होतें. द्वितीयेच्या चंद्राचें वैभव ज्याप्रमाणें दिवसेंदिवस वाढत जातें, त्याप्रमाणें रामचंद्राचें वैभव वाढणारें आहे. रामचंद्राचा उत्कर्ष होणार, पण रावणाचा अपकर्ष होणार.

एवढें बोलून **महाराज** जाण्याकरितां उठले. पंडित व तेथील त्यांची मंडळी यांनीं त्यांना प्रणाम केला. नंतर **महाराजांनीं** आपल्या शिष्यगणासह तेथून प्रयाण केलें.

बिंदु १४ वा.

स्थळ--दक्षिणेश्वरचें देवालय, कलकत्ता; **जागा**-**महाराजां**ची खोली; **दिवस**-३ आगष्ट १८८४; **वेळ**-दिवसा २ ते रात्रीं ९॥; **मंडळी**-बलराम, एम्, राखाल, शिवपूरचे बाऊल, हज्रा, अधर, राम चतर्जी, भवानीपुरचे कांहीं गृहस्थ, इत्यादि.

महाराज नेहमींप्रमाणें धाकट्या पलंगडीवर बसले होते. त्यांचें तोंड उत्तरेकडे होतें. त्यांच्या खोलीच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील दरवाजांतून पवित्र गंगानदीचें प्रसन्न दर्शन होत होतें. शिवपुरचे '**बाऊल**'[1] खोलींत आंथरलेल्या चटईवर बसले होते. ते गोपीयंत्रावर[2] भक्तिपर पदें म्हणत होते. ते **महाराजांकडे** पण पश्चिमेकडे तोंडें करून बसले होते. बाकीची मंडळी आपलीं तोंडें दक्षिणेकडे व **महाराजांकडे** करून बसली होती.

---

१. एक प्रकारचे वैष्णव भक्त. २. एकतारीसारखेंच एक वाद्य.

एका पदामध्यें योगशास्त्रांत सांगितलेल्या षट्चक्रांचा संबंध आला होता. तें पद संपल्यावर महाराज म्हणाले,—

षट्चक्रें व सप्तभूमि.

तंत्रांतर्गत योगशास्त्रांत जीं सहा चक्रें सांगितलीं आहेत, त्यांचें वेदांत सांगितलेल्या सप्तभूमींशीं अगदीं साम्य आहे. मन जोंपर्यंत विषयासक्त असतें, तोंपर्यंत त्याची वसति पहिल्या तीन भूमींत असते. लिंग, गुह्य व नाभि, या पहिल्या तीन भूमि होत. हृदय ही चतुर्थ भूमि. या भूमींत मन आलें कीं, मनुष्याला ईश्वरीय ज्योतीचें दर्शन होतें. ती ज्योति दिसली कीं, 'काय हें!' 'काय हें!' असे उद्गार त्याच्या तोंडून निघतात. त्यानंतर कंठ, ही पंचम भूमि. या ठिकाणीं मन आलें कीं, मनुष्याला ईश्वरकथांशिवाय कांहीं बोलावें व ऐकावें असें वाटतच नाहीं. बोलतां बोलतां मध्येंच कोणीं जर दुसरा विषय काढला, तर त्याचा जीव लागलाच कासावीस होतो. विषयकथा—कामिनीकांचन यांच्या गोष्टी—कोणीं काढल्या, कीं तो अत्यंत कष्टी होतो. तशा गोष्टी निघाल्या, कीं तो तेथून चालता होतो. पुढें षष्ठ भूमि—कपाल किंवा भ्रूमध्य. इथे मन आलें कीं, ईश्वराचें दर्शन होतें. त्या मनोहर रूपाच्या आलिंगनाचें व स्पर्शनाचें सुख अनुभवावें, असें त्याला लागलेंच वाटतें. पण उपाय चालत नाहीं. कारण कांचेसारखा मध्यें एक पडदा असतो. कंदिलांत दिव्याची ज्योत

१. शरीरांतील षट्चक्रें:—मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा.

असावी, किंवा चौकटींत बसविलेलें एखादें चित्र असावें, तसाच त्याला ईश्वर असतो. दिसतो पण हात लावतां येत नाहीं. ईश्वर-सुखाचा पूर्ण अनुभव त्याला इथे घडत नाहीं; कारण अद्याप थोडेंसें अहंकाराचें पाणी त्याच्या ठिकाणीं शिल्लक असतें. सातव्या भूमीवर मन पोंहोंचलें कीं, अहंकाराचा पुरा नाश होऊन पूर्ण समाधि लागते. येथें मन समाधिस्थ होऊन त्याला बाह्य जगाचें भान राहात नाहीं. या अवस्थेंत योगी एकवीस दिवस जिवंत राहतो. पुढें मृत्यु. या अवधींत तो अन्नपाणी कांहीं घेत नाहीं. तोंडांत दूध घातलें, तर तें पोटांत जात नाहीं, बाहेर येतें.

'ज्ञानी–मी.'

सप्तम भूमीला पोंचून समाधिमग्न झाल्यानंतर कांहीं सत्पुरुष त्या अवस्थेंतून पुन्हा खालीं–जगांत–येतात. पण केवळ लोककल्याणार्थ. त्यांच्या ठिकाणीं 'मी' असतो; पण तो ज्ञानी किंवा शुद्ध 'मी' होय. तो केवळ भासरूप असतो; पाण्यावरच्या रेषेसारखा.

हनुमंताला परमेश्वराच्या सगुण व निर्गुण अशा दोन्ही रूपांचा साक्षात्कार झाला होता; तरी आपला 'दास–मी' त्यानें कायमच्च ठेविला होता. **नारद, सनक, सनंद** आणि **सनत्कुमार** यांनींही आपला 'दास–मी' किंवा 'भक्त–मी' ठेविलाच होता.

हे **नारदादि** केवळ भक्तच होते आणि ज्ञानी नव्हते कीं काय? असा इतक्यांत **महाराजांना** कोणींसा प्रश्न केला. तेव्हां ते म्हणाले:—

नारदादि ब्रह्मज्ञानाला पोंचले होते; तरी निरंतर खळखळ वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणें त्यांचें हरिकीर्तन चालूच होतें. यावरून

त्यांनीं आपला 'ज्ञानी–मी' कायम ठेविला होता असें दिसतें. ते ज्ञानी होते, तसेच भक्तही होते. लोकांना वळण लावण्याकरितां, लोककल्याणाकरितां ते निरंतर हरिभजनाचा घोष करीत असत. जहाज आपण पैलतीराला जातें, इतकेंच नव्हे, तर आपलेबरोबर अनेक लोकांनाही तें तिकडे नेतें. **नारदांसारखे** सत्पुरुष हे जहाजांसारखेच आहेत.

परमहंसांचे दोन प्रकार असतात:—

परमहंस: ज्ञानी 'मी'

पहिला प्रकार:–हे निराकारवादी असतात. **त्रैलंग स्वामी** या प्रकारचे होत. या वर्गांतले सत्पुरुष कांहींसे स्वार्थपर असतात, असें म्हणायला हरकत नाहीं. आपण मुक्त होऊन जावें, इतकीच त्यांची दृष्टि असते.

अप्रत्यक्षपणें महाराजांनीं आपलेंच वर्णन केलें का?

दुसरा प्रकार:–हे साकारवादी तसेच निराकारवादीही असतात. आपल्या भक्तांना ईश्वर साकार रूपानें दर्शन देतो, असें ते म्हणतात.

एखादा नाला नदीला मिळाला; पुढें तसा नदीला मिळाल्यानंतर त्या नदीच्या पाण्याबरोबर त्याचा प्रवाह वाहात जातांना तुम्हीं कधीं पाहिला आहे का? कधीं कधीं असें होतें कीं, त्या नदीच्या पाण्याशीं त्याचा अगदीं एकजीव झाल्याकारणानें त्या नाल्याच्या प्रवाहाचा स्वतंत्र असा अगदीं मागमूगसच राहात नाहीं. पण बारकाईनें पाहिलें, तर पुष्कळ वेळा त्या नाल्याच्या पाण्याची स्वतंत्रपणें चाललेली अगदीं सूक्ष्म अशी गति दिसून येते; व त्या

गतीवरून नदीच्या पाण्यापासून त्याचा प्रवाह निराळेपणानें ओळखतां येतो.

या दुसऱ्या प्रकारच्या परमहंसाची अगदीं बहुतेक हीच स्थिति असते. त्याचा जीवात्मा परमात्म्याशीं ऐक्य पावलेला असतो; तरी त्याचा ' ज्ञानी मी ' कायम असतो;—आणि या त्याच्या रेषेसारख्या सूक्ष्म अहंकारावरून परमात्म्यापासून त्याचा वेगळेपणा दिसून येतो.

बरें, अशा सत्पुरुषाची पाण्यानें कांठोकांठ भरलेल्या घटाशींही तुलना करितां येईल. अशा घटांतलें कांहीं किंवा सर्व पाणी दुसऱ्या पात्रांत ओततां येतें. ब्रह्मज्ञानानें पूर्णावस्थेला पोंचलेला पुरुष हा पूर्ण घट; व शिष्य हा तें दुसरें पात्र.

तेव्हां, ज्या सर्व साधनांच्या द्वारानें आपण भगवंताचा लाभ करून घेतला, तीं सर्व साधनें लोकांना सांगावीं, आणि अशा रीतीनें त्यांचें हित करावें, म्हणून त्यांनीं आपला ' ज्ञानी-मी ' कायम ठेविलेला असतो.

समजा कीं, एखाद्या माणसानें विहीर खणली. विहीर पुरी झाली. त्याची पाण्याची सोय झाली. पण ज्या हत्यारांनीं त्यानें विहीर खणून पाण्याची प्राप्ति करून घेतली, तीं हत्यारें–कुदळ्या, खोरीं, पाहारा, वगैरे–तो बहुधा बाळगूनच ठेवितो. न जाणों दुसऱ्या कोणाला त्यांचा त्याच कामाला उपयोग होईल.

त्याचप्रमाणें अखंड शांतीच्या पदाचें पाणी पिऊन आपल्या अध्यात्म तृष्णेचें शमन केल्यानंतर (स्वतां ब्रह्मज्ञानाची प्राप्ति क-

रून घेतल्यानंतर) दुसऱ्या प्रकारचा जो परमहंस आहे, तो लोकहित करण्याला उत्सुक असतो. याच हेतूनें तो आपला 'ज्ञानी-मी,' 'भक्त–मी,' 'गुरु–मी,' कायम ठेवितो.

कांहीं माणसें आंबे खातात व लागलींच तोंडें पुसून मोकळीं होतात. आपण बुवा आंबे खाल्ले, असा दुसऱ्यांना थांगपत्ताही लागूं देत नाहींत! हीं माणसें केवळ आपल्यापुरतें पाहणारीं. पण दुसऱ्या प्रकारचींही माणसें असतात; तीं आपल्याला आंबे खायचे असले, कीं दुसऱ्यांना द्यायचींच.

वृंदावनांतील गोपींनाही ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झाली होती. पण त्यांना ब्रह्मज्ञान नको होतें. निरंतर श्रीकृष्णप्रेमाचें सुख अनुभवतां यावें, ही त्यांची काय ती इच्छा. तो रसस्वरूप आहे, तेव्हां आपण रसिका होऊन त्याचा संभोग घ्यावा, असें त्यांना वाटे.

'साखर होवोनी राहण्यापरीस ॥ आवडे मनास खाणें सदा ॥१॥'
असें **रामप्रसादानें** म्हटलेंच आहे.

यांत केवळ अनुलोम व विलोम यांचें तत्त्व आहे. तुम्ही निवृत्त

अनुलोम व विलोम.

होऊन किंवा अनुलोम गतीनें परमात्म्याकडे गेलां, कीं तुमचा जीवात्मा परमात्म्यांत लीन होतो. हीच समाधि. तुम्ही पुन्हा तिथून प्रवृत्त होतां. ही विलोमगति. ही गति तुम्हीं घेतली, कीं, तुमचा अहंकार पुन्हा येऊन तुम्हांला चिकटतो. मग तुम्हीं पूर्वस्थितीवर येतां. अर्थात् जिथून अनुलोमगतीनें पहिल्यानें निघालां, तिथे येऊन न्हा बसतां. तिथे आलां कीं, तुमच्या काय बरें अनुभवास येतें?

आपला जीव आणि अखिल ब्रह्मांड हीं त्याच परमात्म्यांत अपक्रांत झालीं होतीं, तेव्हां ईश्वर, जीव आणि जगत् हीं स्वरूपतः एकच आहेत, यांपैकीं कोणत्याही एकाच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान आपल्याला झालें, कीं बाकीच्यांच्या स्वरूपाचाही साक्षात्कार होतो, असें तुमच्या मग प्रत्ययास येतें.

कार्पासगिरीवर एक अग्नीचा स्फुलिंग पडला, कीं त्या गिरीचें भस्म होऊन तो नष्ट होतो; त्याचप्रमाणें भगवंताच्या पवित्र नामाचा भक्तिपुरःसर उच्चार करा, कीं तुमच्या पापाचे डोंगर विरघळून जातील.

पापवाद व भीतीनें ईश्वरभजन. ख्रिस्तीधर्म व ब्राह्मोपंथ.

नरकाच्या किंवा यमयातनांच्या भीतीनें ईश्वराचें भजन करणें, ही गोष्ट साधकाला प्रथमावस्थेंत ठीक आहे. कांहीं लोकांना पापीपणाशिवाय मुळीं दुसरें कांहीं दिसतच नाहीं. ख्रिस्तीधर्म व ब्राह्मोपंथ हेच पहा ना! आपल्या पापीपणाची जाणीव असणें, हेंच काय तें एकंदर धर्माचें सार आहे, असें या ख्रिस्त्यांना व ब्राह्मोंना वाटतें. 'हे प्रभो, मी पापी आहें; कृपा करून माझ्या पापांची मला क्षमा कर.' अशी जो प्रार्थना करील तोच उत्तम भक्त, असें त्यांना वाटतें. पापीपणाची जाणीव उत्पन्न होणें, ही धार्मिकतेची अगदीं खालची व पहिली पायरी आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. धार्मिकतेची याच्याहीपेक्षां वरची पायरी आहे. कोणती? ईश्वराचा मातृभाव किंवा पितृभाव.

अभ्यासाचें बळ काय असतें, हें या लोकांना समजत नाहीं. 'मी

पापी आहें,' 'मी पापी आहें,' असें तुम्ही जन्मभर घोकीत राहिलां, कीं अखेरपर्यंत तुम्ही पापीच राहाल. 'मी बद्ध आहें,' 'मी बद्ध आहें,' असेंच जो नेहमीं म्हणतो, तो बेटा कायमचा बद्धताच भोगीत राहणार ! पण, 'जगाच्या बंधनांतून मी मुक्त आहें,' 'मी मुक्त आहें,' असें जो म्हणतो, तोच खरा मुक्त होय. परमेश्वर हा आपला पिता नाहीं का? अभ्यासाचा जोर हा असा आहे.

बिंदु १५ वा.

नंतर भजनी मंडळीपैकीं कांहींकडे वळून **महाराज** म्हणाले, 'ईश्वरलाभाच्या आनंदाचें सुख ज्यांत मुख्यतः वर्णिलें आहे, अशीं कांहीं पदें म्हणाल का? (**राखालकडे वळून**) काय **राखाल** ! त्या दिवशीं **नवीन नियोगी**च्या घरीं म्हटलेलें तें पद तुला आठवतें का?

हरिनामाच्या मदिरेचा उन्माद.

'**हरिरस ही मधुरा मदिरा ॥ प्राशुनी धुंद हो चतुरा ॥ मन्मना ॥**"

नंतर **शिवपूर**च्या भक्तांपैकीं एक जण म्हणाला, '**महाराज**, कृपा करून आपण एखादें गाणें म्हणतां का?'

महाराजः—मी काय म्हणणार?—हें पहा, तुम्ही म्हणतां तसेंच मीही म्हणतों. बरें आहे, पाहिजे तेव्हां म्हणेन मी.

असें म्हणून कांहीं वेळ ते स्वस्थ राहिले.

\+ \+ \+ \+

त्यांनीं म्हटलेलीं तीन पदें श्रीचैतन्यदेव व श्रीकृष्ण यांसंबं-

धानें म्हणजे वैष्णवभाक्तिपर होतीं. शेवटचीं दोन कालीमातेचीं होतीं. तीं अशीं:—

पद १ लें.

(चाल—चंद्रकांत राजाची कन्या०)

गौरांगाच्या प्रेमरसाच्या ऊर्मी मजसरसीं ॥
येउनि भिडल्या मज्जन घडलें सुखकर या तनुसीं ॥ ध्रु० ॥
प्रेमसागरा सखे ! तयाच्या भरती ही येतां ॥
पाखंडी जन त्यांत बुडाले बघ बघतां बघतां ॥
विश्वहि गेलें विलीन झालें गति होई कैसी ॥
मीहि चालल्यें, गेल्यें, झाल्यें समरस जलधीसीं ॥ गौरांगा० ॥१॥
बसुनि तळासीं असेंचि घ्यावें सुख हें मनिं गमतें ॥
गौरांगाचा प्रेमनक्र हा गिळितो परि तनुतें ॥
होउनि दुःखें विव्हल माझ्या ऐसा जगिं कोणी ॥
मनुज असे का सांग सखे ! जो कर निज देवोनी ॥
उदधींतुनि या वर घे मज हें सुख भोगायासी ? ॥
धन्यवाद मी साच सांगत्यें देइन गे ! त्यासीं ॥ गौरांगाच्या० ॥२॥

पद २ रें.

(चाल—भूपती खरें तें वैभव०)

चल गडे ! बघूं ती गौरांगाची मूर्ति ॥
किति नयनमनोहर पुरवु जिवाची आर्ती ॥ ध्रु० ॥
मज सखे ! दिसे हा सुविहित संगम घडला ॥
नवनीलनीरदा आलिंगन दे चपला ॥
वाहते जणूं बघ लावण्याची सरिता ॥
ही कशी झुळूझुळु कांतिसुधाजलभरिता ॥
(चा० व०) भाजनें करुनि नेत्रांचीं ॥ चल गडे ॥
प्राशुं तें रूपजल जेणें ॥ सुख घडे ॥

मम मनोमीन जलिं जाया ॥ तडफडे ॥
आकंठ सेवुनी रूप सखे! हृदयांतीं ॥
साठवूं भरोनी करूं मनाची शांती ॥ चल गडे ! ॥ १ ॥
हा गौर गौर किति मदनाचा कीं पुतळा ॥
ओतिला गमे जणुं कनकाचा गे! सगळा ॥
हा हृदयसिंधु बघ उचंबळे कीं त्याचा ॥
जो सखे! महार्णव पवित्र मांगल्याचा ॥
येउनी तयाला भरती, उठती भारी ॥
या प्रेमरसाच्या लहरीवरतीं लहरी ॥
(चा० ब०) मार्दवें प्रेमहृदयाच्या ॥ साजणी ॥
तत्तनू त्रिभंगा झाली ॥ शोभिनी ॥
मोहिनी मोहनी घाली ॥ मोहुनी ॥
गौरांगदर्शनें हरिली माझी वृत्ती ॥
कीं जादूनें या नयनिं पाडिली भ्रांती ॥ चल० ॥ २ ॥
माखिली गडे गे! गौरांगाची तनु ही ॥
आळिता घालुनी दह्यांत त्यानें पाहीं ॥
पाहुनी मूर्ति ही प्रेमळ माझ्या वृत्ती ॥
बघ कशा उसळुनी धांवति वरतीं वरतीं ॥
(चा० ब०) जें करी जगाला वेडें ॥ रूपडें ॥
जें भल्या भल्या योग्यांना ॥ नातुडे ॥
तें घडी स्वयें शिव पाहीं ॥ गे गडे!
दाखवी जशी श्रीभक्तिशालिनी हो! ती ॥
वृषभानुनंदिनी सती राधिका सुदती ॥ चल गडे० ॥ ३ ॥

पद ३ रें.

(**चाल**:–हरिभजनावीण काळ०)

मार बुडी घेइं ठाव रूपसागराचा ॥ ध्रु० ॥
अतलतलातलवितलीं, तोविं रसातलसुतलीं,

शोध करीं पातालीं, प्रेममौक्तिकाचा ॥ मार० ॥ १ ॥

(इत्यादि; बिंदु ९ पहा.)

पद ४ थें.

(**चाल**–उद्धवा शांतवन कर०)

सकलांना काली-धन का वद सहजासहजीं मिळतें ॥ ध्रु० ॥
हे मुग्ध मानसा माझ्या, सुलभ न तें जितुकें गमलें ॥
श्यामापदपंकजमननीं, रिझवाया मन वा! अपुलें ॥
दुर्घट तप लांबें केलें। साध्य न तें तरि त्या झालें ॥
(चा० ब०) इंद्राची सत्ता अतुला ॥
संपदा तयाची विपुला ॥
सौख्यशांति भारी विमला ॥
सारीं हीं तुच्छ तयातें ॥
एकनिष्ठभावें ध्यातो, जो कोणी श्रीकालीतें ॥ सकलांना० ॥ १ ॥
प्रेमें जों श्यामाजननी, एकदांच मागें वळुनी ॥
निजभक्तीं पूर्णकृपेनें, मधुकटाक्ष फेंकी हसुनी ॥
मज्जन त्या ब्रह्मानंदीं, लाभतें न मिथ्या मानीं ॥
(चा० ब०) योगीश्वर शिव तो अथवा ॥
मुनिहंस तपोनिधि बरवा ॥
स्वर्गाधिप सुरवर मघवा ॥
ध्याती जरि दुर्लभ पद तें ॥
निर्गुण हा कमलाकांत, उत्कट तरि मिळवाया तें ॥ सक० ॥ २ ॥

पद ५ वें.

(**चाल**–अभाग्याचे घरीं बावा!)

किति मौजेचें यंत्र कळीचें कालीनें केलें ॥
परम चारुता बघतां त्याची स्तिमित चित्त झालें ॥ ध्रु० ॥
औट हात ही उंची त्याची बसुनि त्यांत माता ॥
खेळ खेळते नानापरिचे आवडते चित्ता ॥

धरुनी हातीं सूत्र कळीचें चालवि तें शांता ॥
नेणुनि परि हें, चालक माझा मीच यंत्र बोले ॥ किति० ॥ १ ॥
ज्या यंत्राला विश्वजनींचें ज्ञान पूर्ण होतें ॥
यंत्र न लागे कधीं व्हावया पुनरपि हो! त्यातें ॥
दृढ भक्तीच्या अचलबंधनें ऐशा यंत्रातें ॥
कालीनें या बद्ध आपणा करुनि घेतियलें ॥ किति० ॥ २ ॥

हें जगन्मातेचें पद म्हणून होतें आहे, तोंच त्यांची समाधि लागली. दृष्टि स्थिर व अर्धोन्मीलित झाली. देहाचे सर्व व्यापार बंद पडले. वृत्ति बाह्यशून्य होऊन समाधिसुखांत तरंगूं लागली.

बिंदु १६ वा.

कांहीं वेळानें किंचित् देहावर येऊन ते आईशीं बोलूं लागले:—कशाला त्रास हा, आई! वरून (सहस्रारांतून) इथे खालीं ये! स्वस्थ हो ना आई!

ईश्वरी नेमानेम.

प्रत्येकासंबंधानें—हे आई!—जसा तुझा नेमानेम असेल, तसेंच होईल! काय सांगावें मीं या लोकांना!

ईश्वरप्राप्ति कशी होईल ?

जोंपर्यंत विवेक—सदसद्विचार—व वैराग्य—संपत्ति, मान, इंद्रियसुखें यांचा तिटकारा—हीं अंगीं आलीं नाहींत, तोंपर्यंत ईश्वरप्राप्तीचें नांवही काढावयास नको.

वैराग्याचे अनेक प्रकार आहेत. एकाला मर्कटवैराग्य म्हणतात. संसार-दुःखांनीं अगदीं आंग पोळूं लागलें, कीं हें वैराग्य येतें. पण हें वैराग्य फार दिवस टिकत नाहीं. सर्व सुखांची अनुकूलता आहे, तोटा कशाचा नाहीं, अशी स्थिति

असतां, हीं सर्व सांसारिक सुखें क्षणिक अतएव मिथ्या आहेत, यांच्यापासून खऱ्या सुखाची उपलब्धि व्हावयाची नाहीं, तेव्हां हीं सेव्य नव्हत, असा मनाला बोध होऊन जें वैराग्य येतें, तेंमात्र उत्तम वैराग्य होय.

पण अशा वैराग्याची प्राप्ति चुटकीसरशी कांहीं होत नाहीं. खरी धर्मबुद्धि जागृत होण्याला समयच यावा लागतो. तेथपर्यंत आपण दम धरलाच पाहिजे. पण तोंपर्यंत एक आहे;–गुरूपदेशाचें श्रवण करीत राहाणें चांगलें. कारण, पुढें वेळ आली कीं, मग तो सर्व उपदेश माणसाच्या मनापुढें उभा राहतो; आणि 'हो! हो! अमक्या अमक्या ठिकाणीं अमुक अमुक माणसाचे तोंडून आपण हें ऐकलें आहे खरें.' असे उद्‍गार त्याचे तोंडून निघतात. शिवाय दुसरें असें आहे, कीं, रोज उपदेशाचें श्रवण करितां करितां आपली विषयवासना बहुधा तिळ तिळ नाहींशी होऊन शेवटीं अगदीं निर्मूळ होईल. मदिरोन्मत्त मनुष्य जर भाताची पेज घोंट घोंट घेत राहिला, तर क्रमाक्रमानें त्याची निशा अगदीं उतरून जाते. विषयोन्माद हा दारूच्या निशेसारखाच आहे.

समयावांचून धर्मजागृति नाहीं.

ज्ञानलाभाचे अधिकारी नेहमीं कमीच असायचे. गीतेंत म्हटलेंच आहे कीं, "हजारों माणसांत एखादाच ईश्वर-लाभाची इच्छा करितो. आणि जे त्याला जाणण्याची इच्छा करितात, अशा हजारों लोकांपैकीं एखाद्यालाच त्याची खरी प्राप्ति होते."

ज्ञान्यांची संख्या मर्यादित.

एक भक्तः—

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥

श्रीरामकृष्णः—संसारासक्ति जितकी ज्यास्ती, तितका ज्ञानप्राप्तीचा संभव कमी. ती आसक्ति जितकी कमी, तितका ज्ञानप्राप्तीचा संभव ज्यास्ती. तेव्हां, वैराग्याशीं किंवा विषयसुखांवरील अनासक्तीशीं ज्ञानाचें प्रमाण नेहमीं सम असतें; व विषयासक्तीशीं नेहमीं व्यस्त असतें.

ज्ञान व अनासक्ति.

सच्चिदानंदरूप परमात्म्याचा विचार मनांत आल्याबरोबर अवाक् किंवा स्तब्ध होणें, या अवस्थेला 'भाव' असें म्हणतात. सामान्य जीवांची ईश्वरमार्गांत अगदीं फार फार गति झाली, तर या भावावस्थेपर्यंत व्हावयाची, पुढें नाहीं.

धार्मिकतेच्या पायऱ्या.

प्रेम हें सगळ्यांकरितां नाहीं. तें थोड्यांनाच साध्य होणारें आहे, सर्वांना नाहीं. हीं जीं थोडींशीं माणसें असतात, त्यांचें सामर्थ्य स्वयंभू व दिव्य असून त्यांना ईश्वरी 'आदेश' असतो. ईश्वरी तेज व सामर्थ्य यांचीं तीं अधिकारी असल्यामुळें त्यांची एक निराळी कोटीच असते. श्रीचैतन्यदेवांसारखे अवतारी पुरुष व त्यांच्याच प्रभावळींतले त्यांचे भक्त, हे ह्या कोटींत मोडतात.

प्रेमाचीं मुख्य लक्षणें दोनः—(१) जगत् किंवा संसार मिथ्या आहे, हा बोध असणें; (२) व सामान्य जनांना अत्यंत प्रिय वाटणारा जो देह त्याचें अगदीं भान नसणें.

भाव हा कच्च्या आंब्यासारखा व प्रेम हें पक्क्या आंब्यासारखें आहे. प्रेम ही एक भक्ताच्या हातांत दोरीच आहे; तिनें तो ईश्वराला बद्ध करून टाकितो. अशा रीतीनें खरें म्हटलें, म्हणजे भक्त भगवंताला आपला दास करून ठेवतो. भक्तानें हाक मारली कीं, त्याला आलेंच पाहिजे.

पार्शी पुस्तकांत असें सांगितलें आहे कीं, चामडीच्या आंत मांस, मांसाच्या आंत हाडें, हाडांच्या आंत मज्जा, मज्जेच्या आंत–पुढें आणखी असें काय काय तरी असतें ! पण अगदीं सगळ्याच्या आंत प्रेम असतें.

कृष्णाला त्रिभंग असें नांव आहे. पण त्याचें रूप असें त्रिभंग कसें बरें बनलें ? वस्तु नरम असेल, तरच तिच्या रूपांत बदल होईल. तेव्हां कृष्णाच्या या त्रिकोणी आकृतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, त्याचा देह कशानें तरी अगदीं नरम झाला असावा! आतां, प्रेमाशिवाय दुसऱ्या कशानें बरें तो नरम होणार?

भगवंताची प्रार्थना कशी करावी, हा पुढें आतां प्रश्न येतो.

प्रार्थना कशी करावी.

कांहीं वैषयिक कामना पूर्ण व्हावी, म्हणून भगवंताची प्रार्थना कधींही करूं नये. **नारदां**सारखें नेहमीं मागणें मागावें. **नारदां**च्या स्तवानें **श्रीरामचंद्र** प्रसन्न होऊन म्हणाले, '**नारदा**, काय पाहिजे तो वर माग.' तेव्हां **नारद** म्हणाले, 'प्रभो, मला फक्त भक्ति दे.' 'तथास्तु,' असें म्हणून **श्रीरामां**नीं त्यांना विचारलें, 'पण याशिवाय तुला कांहीं मागायचें नाहीं का?' **नारदां**नीं उत्तर केलें, '**रामा**, तुझ्या जगन्मोहिनी

मायेनें मी कधींही मुग्ध होऊं नये, असें कर.' श्रीरामचंद्र म्हणाले, 'तसें होवो. पण नारदा, अरे, आणखी कांहीं वर माग!' त्यावर नारदांनीं म्हटलें, 'आणखी मला कांहीं नको, रामा!— केवळ भक्ति.'

ज्ञान तिथून सगळें सारखें नाहीं; ज्ञानाचेही प्रकार आहेत. संसारी जीवांना जें ज्ञान असतें, तें पहिल्या प्रकारचें ज्ञान. या ज्ञानाचे अंगीं फारसें सामर्थ्य नसतें. तें केवळ दीपाच्या ज्योतीसारखें आहे. दिव्याच्या ज्योतीचा उजेड किती? फार फार तर खोलीपुरता! तसें हें ज्ञान केवळ संसारापुरतें. घरदार करणें, खाणें, पिणें, देहाचें रक्षण करणें, संततीचें पालनपोषण करणें, इत्यादि संसारी शहाणपणाच्या गोष्टी या ज्ञानानें होतात.

भक्ताचें ज्ञान हें दुसऱ्या प्रकारचें. याचें सामर्थ्य पहिल्यापेक्षां ज्यास्ती. याला चंद्रप्रकाशाची उपमा शोभेल. चंद्रप्रकाशानें घरांतलें दिसतें, बाहेरचेंही दिसतें; पण अगदीं बारीक वस्तु, किंवा दूरची वस्तु कांहीं त्यानें दिसत नाहीं.

सिद्धपुरुषाचें किंवा अवतारी पुरुषाचें ज्ञान हें तिसऱ्या प्रकारचें ज्ञान होय. याचें सामर्थ्य सर्वांत ज्यास्ती. याला सूर्यप्रकाशाची उपमा देतां येईल. यानें आंतल्या, बाहेरल्या, जवळच्या, दूरच्या, बारीक, मोठ्या, सर्व प्रकारच्या वस्तु पाहतां येतात. अशा पुरुषाला गूढ असें कांहींच रहात नाहीं. संसार व जीव यांच्या स्वरूपांसंबंधीं अनेक बिकट प्रश्न तो अगदीं जातां जातां सोडवून टाकतो. मनुष्याच्या खऱ्या हिताचीं जीं तत्त्वें आहेत, त्यांचें त्यानें

केलेलें निरूपण असें असतें कीं, तें लहान पोरालाही सहज समजावें. युगेंच्या युगें सांचून राहिलेला अंधकार त्या वेदान्तमार्तंडाच्या प्रकाशानें कोठच्या कोठें पळून जातो!

ज्ञानप्रकाशाचे हे तीन प्रकार झाले. चौथा एक त्याचा आणखी प्रकार असतो. चंद्र व सूर्य यांचे प्रकाश एकत्र केले, तर जो अद्वितीय मिश्र प्रकाश उत्पन्न होईल, त्याच्यासारखें याचें स्वरूप असतें. **चैतन्यदेवादि** अवतारी पुरुषांचें लोकोत्तर ज्ञान या वर्गांतलें होय;–कारण ते जसे ज्ञानी असतात, तसेच भक्तही असतात. चंद्र व सूर्य हे एकाच वेळीं गगनमंडळांत प्रकाशत असावे, तसें त्या ज्ञानाचें मिश्र व अगदीं अद्वितीय स्वरूप असतें.

महाराज अप्रत्यक्षपणें आपलेंच स्वरूप वर्णितात. ज्ञान व प्रेम हीं दोन्ही अंगीं असलेले चैतन्यदेव.

विषयांत गढलेल्या माणसाला ज्ञानप्राप्तीची—ईश्वरलाभाची—केव्हांही आशा करायला नको. गढूळ पाण्यांत सूर्याचें किंवा दुसरें कसलेंही कधीं तरी प्रतिबिंब पडेल का? मग? आतां असा प्रश्न येतो कीं, याला कांहीं तोडच नाहीं कीं काय? संसारी माणसाला कुठेच का आशेला जागा नाहीं? आहे तर; चांगली जागा आहे. गढूळ पाण्यांत आपण जर कांहीं मलहारक द्रव्य (उ०–तुरटीचा खडा किंवा निवळीचें बीं) टाकलें, तर त्यांतला मळ भांड्याच्या तळीं बसून पाणी स्वच्छ होतें. विवेक व वैराग्य हीं दोन मलहारक द्रव्यें आहेत. तेणेंकरून विषयी जीवांचा विषयीपणा नाहींसा होऊन ते शुद्ध होतात.

संसारी जीवाला आशा.

जीवानें पायरीपायरीनें जाऊन ईश्वरलाभ साधला पाहिजे. त्या पायऱ्या अशाः—

ईश्वरलाभाच्या पायऱ्या.

साधुसमागम—साधुसमागम ही पहिली पायरी होय. सत्संगानें ईश्वरासंबंधानें मनांत श्रद्धा उत्पन्न होते. तेव्हां श्रद्धा ही दुसरी पायरी.

निष्ठा—श्रद्धेची परिणति निष्ठेंत होते. श्रद्धेला हळूहळू निष्ठेचें स्वरूप प्राप्त होतें. तसें झालें, म्हणजे ईश्वरकथांशिवाय कांहीं ऐकावें, अशी इच्छाच होत नाहीं.—त्याचीच निरंतर कांहीं सेवा करावी, असें वाटूं लागतें. ही पायरी तिसरी.

निष्ठेचा विषय किंवा उपास्य दैवत अमुकच असलें पाहिजे, असें कांहीं नाहीं. उपास्य दैवत गुरु असो, सगुण ईश्वर असो, निर्गुण ईश्वर असो, कोणी अवतारी पुरुष असो, किंवा कोणतेंही कुलदैवत असो; कोणतेंही असलें तरी एकच. वैष्णवांची निष्ठा विष्णूवर किंवा श्रीकृष्णावर असते. शाक्तांची शक्तीवर.—तिलाच काली, दुर्गा, इत्यादि नांवें आहेत.

भक्ति—निष्ठेच्या परिपाकाला भक्ति असें म्हणतात. ही चवथी पायरी.

भाव—भक्ति पक्क झाली, कीं तोच भाव. या अवस्थेंत ईश्वराचें स्मरण झाल्याबरोबर मनुष्य निःशब्द किंवा स्तब्ध होतो. ही पायरी पांचवी. सामान्य जनांची गति या अवस्थेच्या पलीकडे कधींच जात नाहीं. फार तर इतकीच!

महाभाव—ही सहावी पायरी होय. ही ईश्वरदर्शनानंतरची आहे.

ही अवस्था म्हणजे परमेश्वरावरील भक्तीचें आत्यंतिक स्वरूप आहे. या स्थितींत भक्त अमिष्टासारखा असतो. कधीं तो हांसतो, कधीं रडतो. त्याला आपल्या देहाचें कांहींच भान नसतें. सामान्य जीवांना देहबुद्धि सुटत नसल्यामुळें त्यांना या स्थितीचा केव्हांच अनुभव येत नाहीं. जे अवतारी पुरुष मनुष्यजातीचा उद्धार करण्याकरितां या लोकीं जन्म घेतात, त्यांनाच ही प्राप्त होते.

प्रेम—ही सातवी व शेवटची पायरी होय. महाभाव व प्रेम हीं जवळजवळच आहेत. ईश्वरभक्तीचा हा कळस आहे. अर्थात् ही स्थिति साक्षात्कारानंतरची आहे. या स्थितीचीं मुख्य लक्षणें दोनः—(१) बाह्य जगाचें कांहीं भान नसणें: (२) व आपल्या देहाचें कांहीं भान नसणें.

चैतन्यदेव या अवस्थेला गेले होते. प्रेमावेशांत ते इतके मग्न झाले होते कीं, बहुधा त्यांना आपल्या देहाचें भान नसे, आणि पूर्वीं पाहिलेल्या ठिकाणाचीही त्यांना ओळख रहात नसे. कोणतेंही वन पाहिलें, कीं तें वृंदावनच आहे, असें आपलें त्यांना वाटे. एकदां ते पुरीला गेले होते. तिथे समुद्र दिसला. झालें, ती यमुनाच आहे, असें त्यांना वाटलें. या आवेशांत ते समुद्रांत उडी घेत. अशा दोनतीन प्रसंगीं तर त्यांच्या भक्तांनीं व आप्तांनीं त्यांची आशाच सोडली होती. ही अवस्था आली कीं, भक्ताला इष्टप्राप्ति होते. त्याला ईश्वर दिसतो. साक्षात्कार होतो. देहाचें सार्थक्य होतें.

इतकें निरूपण झाल्यानंतर ते मंडळीस म्हणाले, "तुम्हांला कांहीं शंका विचारावयाची असली, तर विचारा." पण कोणीच

कांहीं पुढें आलें नाहीं. तेव्हां त्यांनीं आपलें बोलणें पुन्हा सुरू केलें:—

ज्ञानप्राप्तीला योग्य समय आला पाहिजे.

ज्ञान हें एका झटक्यासरसें कांहीं कोणाला प्राप्त करून देतां येणार नाहीं. योग्य वेळ आल्याशिवाय कांहीं त्याची प्राप्ति व्हावयाची नाहीं. समजा, अंगांत सणसणीत ताप भरलेला आहे. अशा वेळीं वैद्याला त्या रोग्याला कोयनेल कांहीं देतां येणार नाहीं. दिलें, तर रोग्याला तें अनिष्ट आहे, हें त्याला ठाऊक असतें. रोग्याच्या अंगांतला ताप पहिल्यानें निवाला पाहिजे, तेव्हां कोयनेलचा उपयोग व्हायचा. आणि ताप कांहीं कालावधीशिवाय निघायचा नाहीं. कधीं कधीं तर असें होतें कीं, ताप आपोआपच जातो; कोयनेल किंवा दुसरें कोणतेंही औषध द्यावेंच लागत नाहीं. ज्ञानलाभाचें अगदीं असेंच आहे. जिज्ञासूचें मन जोंपर्यंत विषयांत रंगलेलें आहे, तोंपर्यंत उपदेशाचा त्याच्यावर कांहीं परिणाम व्हावयाचा नाहीं. अगदीं उपड्या घड्यावर पाणी! संसारसुख भोगायला माणसाला कांहीं अवधि देणें, हेंच चांगलें; कालान्तरानें त्याची विषयासक्ति होत होत आपोआप नाहींशी होईल. आणि उपदेश सफल होण्याला खरा योग्य काल हाच. तोंपर्यंत उपदेश केला काय, आणि नाहीं केला काय, सारखेंच.

माझ्याकडे पुष्कळ माणसें येतात. त्यांतल्या कांहींना परमार्थाची गोडी असते. माझें बोलणें ऐकून त्यांना मोठा आनंद वाटतो. मन रमतें त्यांचें. पण त्यांच्याचबरोबर आलेल्या कांहीं त्यांच्या सोब-

त्यांना तें कांहीं रुचत नाहीं. ते अगदीं कंटाळून जातात. केव्हां एकदां येथून उठतों, असें त्यांना होऊन जातें. मग, 'चलतां ना! चलतां ना!' असें हळूच आपल्या मित्रांच्या मागें त्यांचें सारखें टुमणें लागलेलें असतें. ते कांहीं केल्या उठत नाहींत, असें दिसलें कीं, ही खमंग मंडळी शेवटीं असें म्हणते:–'ठीक आहे, आम्ही पुढें जाऊन नावेंत बसतों तर मग; तुमचें आटपलें म्हणजे तुम्ही मग या तिथे.'

पक्क्या भिंतींत खिळे मारणें कठिण काम आहे. भिंतीला भोंक पडण्याचें नांव नको; खिळ्यांचीं टोंकेंमात्र मोडून जातील.

सुसरीच्या अंगावर तरवार मारण्याची खटपट व्यर्थ आहे. बहुधा तिला एकही वार लागायचा नाहीं.

म्हणूनच मी म्हणतों कीं, योग्य समय हीच या कामांत मुख्य बाब आहे. योग्य काळ आल्यावांचून ज्ञानाचा ठसा उमटावयाचा नाहीं. गुरु हा केवळ निमित्त आहे.

नंतर मंडळी उठून गेली.

महाराज (एमला):—ज्ञानाची किंवा मोक्षाची इच्छा उत्पन्न होणें, हें पुष्कळ अंशीं पूर्वकर्मांचेंच फल आहे.

कर्म.

शिष्य:—खरें आहे महाराज! माणसाची एकंदर अवस्था जाणणें किती कठिण आहे! आज आमच्या डोळ्यांनीं दिसते, तेव ढीच आमची अवस्था आम्ही जाणतों. मागचें पुढचें आम्हांला काय कळतें आहे? मागें कदाचित् आमचे हजारों जन्म झाले असतील. आम्ही घरांतल्या जमिनीवरून चालतों; पण ती कशी केली

आहे, कसली केली आहे, खालीं काय घातलें आहे, याचा कधीं घटकाभर थांबून आम्ही विचारही करीत नाहीं.

महाराजांनीं शिष्याकडे पाहून नुसतें स्मित केलें आणि ते आपल्या जागेवरून उठले. ते पश्चिमेकडील दरवाजाजवळच्या पडवींत आले, आणि वेगानें क्षितिजाकडे जाणाऱ्या सूर्याकडे कांहीं वेळ पाहात राहिले. पुढें पसरलेल्या पवित्र गंगेच्या मनोहर पात्राचेंही त्यांनीं अवलोकन केलें.

बिंदु १७ वा.

साक्षात्परमेश्वरः स्थळ–पंचवटी.

देवळाजवळील गंगामातेच्या घाटावर एक शिष्य इकडे तिकडे फिरत होता. बलरामादि कांहीं भक्त कलकत्त्याला परत जाण्याकरितां नौकारोहण करीत होते, तिकडे त्याचें लक्ष होतें. ऐन उन्हाळ्याचे ते दिवस असल्यामुळें गंगेचा वक्षःप्रदेश तरंगमालांनीं विभूषित झाला होता. पांच वाजून गेले होते. सूर्य अस्ताचलाजवळ येत चालला होता. आकाश मेघाच्छादित होतें; मेघांची शोभा –विशेषेंकरून उत्तरेच्या बाजूला–फारच मनोहर दिसत होती. अग्रभागीं पंचवटी, तिच्यामागें उंच व विशाळ झाऊवृक्ष, त्या दोहोंच्या उजव्या बाजूला वाहणारा शुभ्र गंगानदीचा प्रवाह, पार्श्वभागीं नील मेघांचा रमणीय समुदाय, व त्याच्या प्रतिबिंबानें कृष्णवर्ण झालेलें जान्हवीचें जल, असा रमणीय चित्रपट त्या शिष्याला आपलेपुढें दिसत होता.

हा चेतोहारी चित्रपट पहाण्यांत तो शिष्य अगदीं मग्न होऊन गेला होता. इतक्यांत एकाएकीं त्याचें लक्ष **महाराजां**कडे वेघलें. ते दक्षिणच्या बाजूनें पंचवटीकडे व प्रख्यात झाऊ-वृक्षांकडे येत होते.

महाराजांचें मुख पांच वर्षांच्या बालकाच्या मुखाप्रमाणें प्रफुल्लित व स्मितपूर्ण होतें. पूर्वींच्या मनोहर चित्रपटांत यांच्या सुरम्य व तेजस्वी मूर्तीची भर पडल्यामुळें तो चित्रपट आतां अगदीं अव्यंग व सर्वांगसुंदर दिसूं लागला. एकीकडे ब्रह्मांडाचा विस्तार व दुसरीकडे आपल्या ठिकाणीं तें अखिल ब्रह्मांड प्रतिबिंबरूपानें पाहून त्याचें यथार्थस्वरूप जाणणारी ती स्वयंप्रकाश मूर्ति, असा अद्भुत देखावा त्या शिष्याच्या नजरेला दिसत होता. काय सांगावें ! त्या तेजस्वी पुरुषाचें दर्शन झाल्याबरोबर संसाराच्या–जन्ममरणाच्या–बिकट कोड्याचा उलगडा जवळजवळ झालाच, असें त्या शिष्याच्या मनाला आपोआप वाटूं लागलें. या अवतारी पुरुषामुळेंच तेथील प्रत्येक वस्तूला पवित्रपणा व प्रेमळपणा आला होता;–फार कशाला, तेथील वृक्ष, लता, गुल्म, उद्यानपथ, देवालय, देवप्रतिमा, सेवकगण, प्रत्येक धूलिकण, यांना, याचा तेथें वास घडल्यामुळें, मांगल्य व एक प्रकारचें दिव्य माधुर्य प्राप्त झालें होतें. तेथील प्रत्येक वस्तु भगवत्प्रेमानें थबथबलेली होती, याला कारण हीच दिव्य विभूति होय. त्या अद्भुत स्थानांतील प्रत्येक वस्तूंत–सजीव निर्जीव, निसर्गनिर्मित, मनुष्यनिर्मित, ज्ञानचक्षूनें दिसणारी, चर्मचक्षूनें दिसणारी, अशा प्रत्येक वस्तूंत—या पवित्र पुरुषाच्या

पादस्पर्शानें पुनीत झालेल्या धूलिकणापासून तों देवालयांतील परम-पूज्य मूर्तीपर्यंत, किंवा मानवी कुडीच्या देवालयांत अधिष्ठित हो-ऊन बसलेल्या व जो आंत डोकावून पाहील त्यालाच दिसणाऱ्या साक्षाद्भगवंताच्या मूर्तीपर्यंत प्रत्येक वस्तूंत—याच दिव्य विभू-तींनें दुस्तर मोह भरून टाकला आहे, असें त्या शिष्याच्या मनाला त्या वेळीं अगदीं खरोखर वाटलें. त्या मूर्तीचें दर्शन झाल्याबरोबर जादूनें भारल्यासारखी त्याची अवस्था झाली.

महाराज शिष्याला म्हणाले, "पाऊस येईलसें वाटतें का तुला? छत्री जाऊन आणतोस का तेवढी? आण पाहूं."

तो **महाराजांच्या** खोलींत गेला आणि छत्री घेऊन लागलाच परत आला. नंतर पंचवटींत आल्यावर पुढील संभाषण झालें.

महाराज (शिष्याला):—एवढें काम तुझ्यावर सोंपवून ठेवितों. **बाबुरामला** सांग कीं, **राखाल** इथून गेला, म्हणजे तूं येऊन इथे एकदोन दिवस रहा. नाहीं तर माझ्या मनाला फारच वाईट वाटेल. **बाबूराम** हा मुलगा कसा काय आहेसें तुला वाटतें?

शिष्यः—तो अत्यंत थंड व शांत आहे.

महाराजः—तो सरळ नाहीं का?

शिष्यः—तो अगदीं सरळ आहे, असें कांहीं दिसण्यांत दिसत नाहीं. पण मला वाटतें, याचें कारणही सांगतां येईल. ज्या माण-साचा स्वभाव थंड असतो, तो आंतल्या गांठीचा असतो. तो आपले विचार मन मोकळें करून कधीं दुसऱ्याला सांगत नाहीं; अगदीं मनांतल्या मनांत ठेवितो.

पुढें **महाराज** परत येऊन आपल्या खोलींत बसले.

बिंदु १८ वा.

हज्राबरोबर गोष्टी.

एक वैद्यराजही तेथें आले होते. हे गृहस्थ हरितालभस्म फार उत्तम तयार करीत असत. त्यांना पाहिल्यावर **महाराज** म्हणाले, "याचें औषध मला चांगलें लागू पडतें. माणूस अगदीं योग्य आहे."

हज्राः—खरें आहे, **महाराज**. पण बिचाऱ्याला संसारांत पडावें लागलें आहे. काय करतो!

नवाई व भगवीं वस्त्रें.

कोन्नगराहून नवाई चैतन्य आला होता. तो संसारी असून त्यानें भगवीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. त्याच्या या कृत्यावर हज्रानें चांगली खरमरीत टीका केली.—गृहस्थ होऊन भगवीं वस्त्रें परिधान करावीं? किती भभंकर! यावर **महाराज** म्हणाले, "काय म्हणावें, हेंच मला समजत नाहीं. तरी त्यांतले त्यांत मला एक समाधान आहे. सर्व मनुष्यें—मनुष्यें कशाला, एकंदर सर्व प्राणी—परमेश्वराचेच अवतार आहेत, असें मी मानतों. परमेश्वर सर्व वस्तूंच्या रूपानें नटला आहे. मनुष्यें काय नी एकंदर सृष्टींतील पदार्थ काय, सर्व त्याचींच व्यक्त रूपें आहेत, असें मला स्पष्ट दिसतें. ब्रह्मांडांत ज्या ज्या वस्तु दृग्गोचर होतात, त्या त्या सर्व तोच होऊन बसला आहे! तेव्हां कोणाला काय बोलावें?"

नरेंद्र हज्रा:–नरेंद्र पुन्हा दाव्याच्या भानगडींत पडला.

महाराज:–हां! शक्तीवर निष्ठा नाहीं. मनुष्यानें जन्मास येऊन शक्तीला मानलें पाहिजे.

हज्रा:–खरें आहे! पण तो म्हणतो, मी जर शक्तीला मानून स्वस्थ बसलों, तर सगळ्या लोकांना वाईट कित्ता घालून दिल्या-सारखें होईल!

महाराज:–बरें, त्याला इथे आल्यापासून (म्हणजे माझेपासून) कितीसा फायदा होतोसें तुला वाटतें?

हज्रा:–आपला त्याच्यावर अगदीं जीव आहे.

महाराज (एमला):–तुला अलीकडे तो (नरेंद्र) भेटत नाहीं का? त्याच्या घरीं जाऊन त्याची तेवढी भेट घेशील का? हें पहा! गाडी करून त्याला इथे घेऊन येच एकदां! येशिल का?

नंतर हज्राकडे वळून ते म्हणाले, "भवनाथ इथे येतो, त्याची माझ्यावर फारच निष्ठा आहे. त्यासंबंधानें तुला काय वाटतें? हें पूर्वसंस्कारांचें फळ नव्हे का?"

हरिश व लाटू नेहमीं ध्यानमग्न असत. या त्यांच्या संवयी-संबंधानें ते हज्राला म्हणाले, "काय आहे हें? केवळ आपले ध्यान करीत बसतात! तुझें काय म्हणणें?"

हज्रा:–तसें खरें! नुसतें ध्यान करून काय होणार? आपली त्यांनीं कांहीं सेवा केली असती तर गोष्ट वेगळी.

महाराज (सांवरून घेण्याकरितां):–कदाचित् त्यांचा साधना-

चा काल संपला असेल. ते गेले, तर दुसरा कोणी येईल त्यांच्या जागीं.

माझ्यासंबंधानें तुला काय वाटतें? कधीं कधीं आईवर माझी अनन्य निष्ठा असते आणि कधीं कधीं नसते, हें तूं पहात नाहींस का? मध्येंच मला दुसरे शेंकडों देव आठवतात! नी मग मी त्यांची पण भक्ति तितक्याच निष्ठेनें करितों. बरें, पुन्हा पहावें, तर मी आपला अखंड सच्चिदानंदाचेंच ध्यान करीत बसतों! पतिव्रताधर्म मी कधीं पाळतों नी कधीं पाळीत नाहीं! विलक्षण नव्हे का हें? दुसऱ्या लोकांचें पाहावें तों त्यांची आपली एकनिष्ठा! कोणाची कृष्णावर असते, कोणाची रामावर! कोणाला केवळ ब्रह्मचिंतनांतच आनंद वाटतो!

हज्रा कांहींच बोलला नाहीं.

*　　*　　*　　*

विरोध कीं मेळ? संध्याकाळ झाला. सायंकाळचीं नित्यकर्में आटोपल्यावर महाराज व वर सांगितलेला शिष्य यांची पुन्हा एकदां बैठक झाली. तेव्हां पुढील संभाषण झालें. हिंदूंच्या धर्मशास्त्रांत बाह्यतः दिसणारा विरोध हा संभाषणाचा मुख्य विषय होता.

शिष्यः—महाराज, शास्त्रांत दोन मतें आहेत. कांहीं पुराणांत कृष्णाला चिदात्मा व राधेला चिच्छक्ति—उत्पत्ति, स्थिति, लय

१ हज्रालाच उद्देशून महाराज हें बोलले असावे; कारण माझ्यासारखी 'निष्ठा' कोणाच्या अंगीं नाहीं, असा त्याला अभिमान होता.

करणारी आदिशक्ति—म्हटलें आहे; आणि कांहींत कृष्णालाच काली —आद्यशक्ति—म्हटलें आहे. हें कसें? हा विरोध नाहीं का?

महाराजः—हें दुसरें मत देवीपुराणांत आहे.—या मताप्रमाणें कृष्णच काली आहे. तसें असलें तरी ठीकच आहे. यांत विरोधाचा कुठेच भाग नाहीं. ईश्वर अनंत आहे. तो अनंत रूपांनीं व्यक्त होतो! बरें, त्याच्या प्राप्तीचे मार्गही अनंत आहेत.

शिष्यः—अस्सें! आतां समजलों मी! आपण नेहमीं म्हणतां तसेंच; माडीवर जायचें ही मुख्य गोष्ट! साधन कोणचें कां असेना! दोरी असो, एखादा वांसा असो, लांकडी शिडी असो, किंवा पक्का जिना असो!

महाराजः—अगदीं बरोबर. हें तुला लवकर समजलें, ही केवळ ईश्वराची कृपा! ईश्वराची कृपा नसेल, तर संशयाची पूर्ण निवृत्ति कधीं व्हावयाची नाहीं. तात्पर्य असें, हनुमंतासारखा आपला भाव असावा;— तो एकदां म्हणाला, 'मला वार, तिथि, नक्षत्र कांहीं ठाऊक नाहीं. मला एक रामाचें चिंतन ठाऊक!'

फक्त एक पाहिजे, —भक्ति.

समज, तूं एखाद्या बागेंत आंबे खायला गेलास. तर तिथे आंब्याचीं झाडें किती आहेत, त्यांना डाहळ्या किती आहेत, त्यांना पानें किती आहेत, या हिशोबाचें तुला कांहीं कारण आहे का? शेंकडों झाडें असतील, हजारों डाहळ्या असतील, लाखों पानें असतील: तुला त्यांशीं काय करायचें आहे? कांहीं नाहीं. तूं आंबे खायला आलास, एकदम खायला लाग. त्याचप्रमाणें ईश्वरासंबं-

घानें अनेक वादविवाद करीत बसणें व्यर्थ आहे. तेणेंकरून कालाचा व आपल्या शक्तीचा व्यर्थ व्ययमात्र होणार. अशा रीतीनें कालाचा अपव्यय करीत बसण्यापेक्षां परमेश्वराची भक्ति अंगीं मुरविण्याचा प्रयत्न करणें, हें माणसाचें पहिलें व अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य होय.

सांसारिक कर्में.

शिष्यः—आतां माझी एवढीच इच्छा आहे कीं, आपलीं सांसारिक कर्में दिवसेंदिवस अगदीं कमी कमी व्हावीं. संसारांतील कामांच्या गर्दीनें माणसाचें लक्ष परमेश्वराकडे जाण्याला व्यत्यय येतो, नाहीं का ?

महाराजः—हो, येतो तर; यांत काय शंका ? पण ज्ञानी माणसाला निर्लिप्त होऊन संसारांत रहातां येतें.

शिष्यः—पण तसें निर्लिप्तपणें संसारांत राहण्याला अंगीं विशेष शक्ति लागते. साक्षात्कारानें तसेंच सामर्थ्य अंगीं यावें लागतें. पहिल्यानें साक्षात्कार साधावा, तेव्हां पुढें अलिप्तपणें संसार करण्याची–निष्काम मनानें सांसारिक कर्में करण्याची–गोष्ट ! असेंच नाहीं का महाराज ?

महाराजः–हो, बरोबर आहे तुझें म्हणणें. पण मागील जन्मीं बहुधा तूं या कर्मांची–या संसाराची–इच्छा केली असावी. कृष्ण श्रीमतीच्या (राधेच्या) हृदयांत होता; पण इच्छा झाली तेव्हां त्यानें मनुष्यरूपानें लीला केल्या ! ‘ परमेश्वरा, मला अनन्य भक्ति दे,’ अशी निरंतर प्रार्थना करणें, एवढेंच आतां तुझें काम आहे; तेणेंकरून हीं सर्व बंधनें आपोआप तुटून तुझा व्याप हळुहळू कमी होईल. मनांतून त्याग घडला, कीं काम झालें.

शिष्य (दीर्घ उसासा टाकून):–बैल गेल्यावर झांपा लावावा, तसेंच हें आहेसें मला वाटतें!

महाराज:—ईश्वरी आनंदाचा तुला कधीं अनुभव आहे का?

\+ \+ \+ \+ \+ \+

महाराज:—संसारांत नेहमीं हें तत्त्व ठेव;—यदृच्छालाभ. सहजासहजीं जें मिळेल, त्यांत संतुष्ट असावें; उगीच विषयभोगांकारितां धांवपळ करूं नये. संचय करून ठेवण्यासाठीं उगीच जीव तोडूं नये. ज्यानें परमेश्वराला सर्व मन समर्पण केलें, जो त्याला शरणागत होऊन त्याचा एकनिष्ठ भक्त बनला, तो संसारांतील कोणत्याही गोष्टीची काळजी करीत नाहीं जिथे आय, तिथेच व्यय! एकीकडून पैसा आला, कीं दुसरीकडून खर्च झाला. संचय नाहीं. याचें नांव यदृच्छालाभ! गीतेंत आहे याचें विवरण.

ईश्वरी आनंद. उद्यांची काळजी करूं नका.

मी जें कांहीं बोलतों त्यांत कांहीं मोह असतो, म्हणून लोक मजकडे येतात का? माझ्यासंबंधानें त्यांना काय वाटतें? मजकडे तूं पाहिलेंस म्हणजे तुझ्या मनांत काय विचार येतात?

माझ्याबद्दल तुला काय वाटतें?

शिष्य:–ज्ञान, प्रेम, वैराग्य–आणि इतकें असून पुन्हा सहजावस्था–हे सगळे गुण आपल्या ठिकाणीं एकवटलेले मला दिसतात. या आपल्या सहजावस्थेमुळें सामान्यजनांच्या दृष्टीला आपले ठिकाणीं विशेष असें कांहींच दिसत नाहीं. त्यांना आपण अगदीं चार माणसांसारखेच दिसतां. आपलें खरें स्वरूप त्यांना समजत नाहीं.

म्हणून तीं आपलेकडे फारसें लक्ष देत नाहींत. काणा डोळा करून निघून जातात. पण याच आपल्या सहजतेनें चारदोन निवडक माणसांचें लक्ष आपल्याकडे वेधतें! मनुष्याच्या ठिकाणीं सहसा दिसून न येणारें दिव्य ज्ञान एखादे माणसाचे अंगीं असावें, आणि तरी आपला तो अगदीं साधाच्या साधा असावा, याच गोष्टीचें त्यांना मोठें नवल वाटतें! एकाद्या नदींतून मोठमोठीं लढाऊ जहाजें चालावीं, आणि तीं दिसण्यांत तर एकाद्या भिकार ओढ्यापेक्षां मोठी असूं नये!

महाराज (सस्मित):–**घोषपाऱ्यांत** वैष्णवांचा एक पंथ आहे. ते ईश्वराला '**सहज**' म्हणतात. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, **सहज झाल्यावांचून माणसाला सहजाकडे जातां येणार नाहीं.** बरें माझ्यांत अभिमान (अहंकार) आहे का?

महाराज स्वतां–संबंधानें बोलतात.

शिष्य:–होय, आहे थोडा. पण तो, देहाचें रक्षण व्हावें, भक्तीचें सुख अनुभवितां यावें, भक्तांचा सहवास घेतां यावा, आणि लोकांना उपदेश करितां यावा, या उद्देशानें ठेविलेला आहे. पण परमेश्वराची पुष्कळ प्रार्थना करून तो अहंकार आपण कायम ठेविला आहे, असें म्हणावें लागतें. माझी समजूत अशी आहे कीं, 'समाधि' हीच आपली खरी स्वाभाविक स्थिति आहे. आणि मी म्हणतों कीं, आपल्या ठिकाणीं जो अहंकार आहे, तो आपण केवळ प्रार्थनेनें राखून ठेविला आहे.

महाराजः–खरें आहे. पण मीं नाहीं ठेविला तो; तिचें–माझ्या आईचें–काम आहे तें!

शिष्यः–'नारदमुनि व त्यांचा अहंकार' यासंबंधानें आपण त्या दिवशीं **पंडित शशधरां**जवळ बोलत होतां. तेव्हां आपण म्हटलें कीं, 'कल्पतरूजवळ जावें आणि प्रार्थना करावी. जशी ज्याची प्रार्थना असेल, तसें त्याला फळ मिळेल;–जसें जो मागेल, तसें त्याला मिळेल. परमेश्वर हा कल्पवृक्ष.'

महाराजः–होय. पण प्रार्थना मान्य करणें किंवा न करणें हें आईच्या स्वाधीन आहे.

× + × +

महाराजः–हें पहा, **बाबुराम** म्हणतो, 'संसार!–अरे बाप रे!'

महाराजांचा उपदेश.
संसार भयंकर.

शिष्यः–नुसत्या ऐकीव गोष्टी या! त्यानें संसाराचें काय पाहिलें आहे? केवळ पोर तें!

महाराजः–खरें, खरें म्हणतोस तें. **निरंजन** पहा, किती सरळ आहे!

सरलता.
विवाहताप.

शिष्यः–त्याचा चेहराच मोठा मोहक आहे. ओढून घेतो अगदीं दुसऱ्यांचीं मनें! आणि डोळ्यांचें पाणी तरी काय!

महाराजः–डोळ्यांचें पाणीच कशाला! त्याचें सगळेंच कांहीं निराळें आहे. त्याच्या लग्नाचा जेव्हां बूट निघाला, तेव्हां तो म्हणाला, "कां मला बुडवतां उगीच? कारण एकदां लग्न झालें कीं, मग आटोपलेंच माझें सगळें!"

यानंतर गुरुशिष्यांमध्यें पुढील संभाषण झालें. या वेळीं **राखाल**ही तिथे होता.

महाराज (सहास्य):–लोक म्हणतात, 'दिवसभर काम करून थकल्याभागल्यानंतर एकदां बायकोचें तोंड पाहिलें, म्हणजे काय आनंद होतो म्हणतां !'

[सगळे हंसतात]

शिष्य:–बायको हीच ज्यांना एकंदर सुखाचें निधान वाटते, त्यांची तशी स्थिति होते खरी. (हळूच **राखाल**ला) माझी परीक्षाच चालली आहे ही. आणि **महाराजांचे** प्रश्न तरी कसे अगदीं खोंचदार आहेत.

महाराज (सहास्य):–आया म्हणतात, "माझ्या सोन्याला एखादें 'वृक्षाचें बूड' पाहून दिलें, कीं सुटल्यें एकदांची मी! या संसारतापानें तप्त झाला कीं, घटकारभर छायेंत बसून विश्रांति घ्यायला जागा हवी ना त्याला!" तें 'वृक्षाचें बूड' म्हणजे बायको!

(सगळे हंसतात)

शिष्य:–आईबापांतही परी असतात. सगळेच आईबाप कांहीं एका माळेचे मणी नसतात. जे आईबाप मुक्त असतात, ते आपल्या पुत्रांचीं लग्नें नाहींत करीत. जर त्यांनीं केलीं, तर मग ते चांगलेच मुक्त म्हणायचे!

महाराज नुसते हासले. या वेळीं इतर कांहीं मंडळी होती ती उठून गेली.

महाराज:–मी जेव्हां भावावेशांत असतों, तेव्हां काय होतेंसें तुला वाटतें?

शिष्यः–तेव्हां आपलें मन षष्ठ भूमींत असतें. तिथे आपल्याला ईश्वराच्या दर्शनसुखाचा अनुभव घडतो; आणि नंतर जेव्हां आपण बोलूं लागतां, तेव्हां आपलें मन पंचम भूमीवर उतरलेलें असतें.

आवेश.

महाराजः–मी काय, केवळ त्याच्या हातांतलें बाहुलें आहें. सगळें करतो तोच; मला कांहींच समजत नाहीं.

शिष्यः–काय विलक्षण आत्मनिवेदन हें! यामुळेंच महाराज, लोकांचीं मनें आपण आकर्षण करून घेतां. आपल्या आप्तेष्टांवर मनुष्य जें प्रेम करितें, त्याचें नांव माया, आणि सर्व मनुष्यप्राण्यांवर–किंबहुना एकंदर प्राणिमात्रावर–त्याचें जें प्रेम असतें, त्याचें नांव दया, असें आपण सांगितलें होतें; पण मला वाटतें, माझ्या तें चांगलेंसें मनांत उतरलें नाहीं. दया ही प्रवृत्तिपर आहे, असें नव्हे का?

दया.

महाराजः–दया हा मनोविकार कांहीं वाइटांतला नाहीं. तो मनाचा विकास करितो व मनुष्याला ईश्वराजवळजवळ नेतो.

शिष्यः–पण कांहीं झालें, तरी दया ही प्रवृत्तिमार्गांतली आहे, हें खरें नव्हे का?

× × × ×

शिष्यः–महाराज, आतां आपलें सगळें लक्ष इकडे (परमार्थांत) घालावें, असें माझ्या मनांत फार आहे; आणि यासाठीं संसारकर्में कमी होतील तितकें बरें, असें वाटतें.

शिष्याची पुन्हा प्रार्थना.

महाराजः—ठीक आहे, तसें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. मला वाटतें, ईश्वर तुझी इच्छा पूर्ण करील. पण तुला साकार ईश्वर खरा वाटतो कीं निराकार?

साकार कीं निराकार?

शिष्यः—माझी मजल सगुणापर्यंतच आहे. ईश्वराला गुण व स्वरूप हीं आहेत, इतकें मला स्पष्ट समजतें. पण साकाराच्या (प्रतिमांच्या) साहाय्यावांचून निराकाराची कल्पना मनांत उभीच राहावयाची नाहीं,—निराकाराचें आकलन मनाला व्हावयाचेंच नाहीं,—असें नव्हे का? कसेंही असलें, तरी मूर्तींच्या द्वारानेंच आम्हांला गेलें पाहिजे.

महाराज (सस्मित):—तेव्हां तुला समजलें हें. मनुष्यानें साकाराचें निरंतर ध्यान केलें पाहिजे, असा माझा विशेष कटाक्ष आहे; कारण तेणेंकरून त्याला भक्तियोगाचें साधन सुलभ होतें.

शिष्यः—महाराज, **पंडित शशधर** यांची इकडे (भक्तिमार्गाकडे) कांहीं गति होते आहे का?

महाराजः—होते आहे थोडी थोडी; पण ज्ञानमार्गाकडे त्याचा भर विशेष आहे. अशा कोटींतलीं कांहीं माणसें असतात. पण हा मार्ग (ज्ञानमार्ग) अत्यंत कठिण आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

कांहीं वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. शिष्य अत्यंत लीनतेनें त्या सद्गुरूंच्या पायांशीं बसला होता. **महाराजांची** मुद्रा हास्य व निरामय आनंद यांनीं केवळ झळाळत होती. शिष्यानें आपलें सगळें लक्ष त्या प्रेमल मुखकमलाकडे लाविलें होतें. माझ्यावर कृपा करून मोक्षाच्या मार्गाला मला लावा, असेंच जणूं काय तो

आपल्या केंविलवाण्या नेत्रांनीं त्यांना सांगत होता. आणि गुरु काय करीत असावे बरें? शिष्याच्या अंतःकरणांत शिरून तेथलि ठाव तर ते पहात नसतील ना?

त्याग.

महाराज (उत्तेजनपूर्वक):–मनुष्यानें मनानें संसाराचा त्याग केला, कीं पुष्कळ झालें.

बहिस्त्याग अगदीं आवश्यक नाहीं काय?

शिष्यः—जीं माणसें दुबळीं आहेत, त्यांच्याकरितां हा उपदेश आहे, असें मला वाटतें. जीं वरच्या दर्जाचीं माणसें आहेत, त्यांनीं पूर्ण त्यागाचेंच अवलंबन केलें पाहिजे. त्यांनीं संसाराचा मनानें त्याग केला पाहिजे, इतकेंच नव्हे, तर देहानेंही केला पाहिजे.

महाराजः— मीं वैराग्यासंबंधानें जें कांहीं म्हटलें, तें त्वां ऐकलें आहेच.

शिष्यः–होय; 'संसाराच्या ठिकाणीं विराग,' एवढाच वैराग्य याचा अर्थ नव्हे असें मला वाटतें. विराग अधिक 'कांहीं तरी' म्हणजे वैराग्य. आतां हें 'कांहीं तरी' म्हणजे ईश्वराच्या ठिकाणीं अनुराग. तेव्हां ईश्वराच्या ठिकाणीं अनुराग व संसाराच्या ठिकाणीं विराग मिळून वैराग्य.

महाराज, ईश्वरदर्शन झालें, म्हणजे काय अवस्था असते?

ईश्वरलाभ कसा असतो.

महाराजः–ईश्वरलाभ कसा असतो, हें इतरांना समजेल असें स्पष्ट करून सांगतां येणार नाहीं. तथापि त्या वेळीं जी काय अवस्था होते, तिचें कांहींसें वर्णन करितां येईल.

नाटकाचा प्रयोग पहाण्याकरितां तूं कधीं तरी नाटकगृहांत गेला असशीलच. प्रयोगाला सुरवात होण्यापूर्वीं तेथील लोक राजकीय, सामाजिक, सांसारिक, व्यावहारिक, औद्योगिक, अशा नाना विषयांच्या गप्पा मारण्यांत अगदीं चूर होऊन गेलेले असतात, हें तुझ्या लक्षांत असेल. इतक्यांत दर्शनीपट वर जातो; आणि पर्वत, नद्या, घरें, माणसें, असा रम्य देखावा दृष्टीला दिसूं लागतो! तत्काळ सर्व गडबड शांत होते; आणि प्रत्येक प्रेक्षक आपल्या पुढें चालू असलेल्या नाट्यप्रसंगाकडे अगदीं तन्मय वृत्तीनें पाहूं लागतो.

ईश्वरदर्शनाचा सुयोग ज्याला लाभला, त्याची वृत्ति अगदीं अशीच होते.

संसार व प्रेम.

शिष्यः—प्रेम ही भक्ताच्या हातांत एक दोरी आहे; तिनें तो प्रेमस्वरूप भगवंताला बांधून टाकतो, असें आपण आज म्हटलें. भक्तानें प्रेमानें हाक मारली, कीं तत्क्षणीं येऊन तो पुढें उभा राहतोच. पण असें हें प्रेम गृहस्थाला—संसारी माणसाला—साध्य आहे का?

महाराज कांहीं वेळ कांहीं बोलले नाहींत.

× × × ×

हरिपद.

शिष्यः—हरिपद काय पण पुराण सांगतो! जसा काय अगदीं शास्त्रीच! प्रल्हादचरित्र, श्रीकृष्णजन्मकथा, इत्यादि आख्यानें तो फारच उत्तम सांगतो.

महाराजः—असें का? त्या दिवशीं मीं पाहिलें, त्याचे डोळे अगदीं विलक्षण चढून गेले होते. तेव्हां त्याला मीं विचारलें, तूं फार ध्यान करतोस का? तो आपला मान खालीं घालून उभा राहिला! तेव्हां मीं म्हटलें, इतकें चांगलें नाहीं बरें! 'अति सर्वत्र वर्जयेत्!'

या वेळीं रात्रीचे नऊ वाजले होते. तेव्हां **अधरसेन** आले. कांहीं वेळानें सीताकुंडाच्या गोष्टी निघाल्या. चितगांग प्रांतांत चंद्रनाथ म्हणून एक तीर्थ आहे, तिथे हें कुंड आहे. त्यांतलें पाणी आधणासारखें कढत असतें. कुंडाच्या पाण्यावर अग्नीच्या ज्वाळा दिसतात, असें म्हणतात.

महाराज (अधरांला):—असें कशानें होतें?

अधरसेन (महाराजांना):—त्यांत बोट घातलें, तर भाजतें. त्या पाण्यांत फास्फरस आहे.

महाराज (अधरसेनांना):--हा **राम** (चक्रवर्ती) चांगला माणूस आहे मोठा. तो इथे असतो, म्हणून मला फारशी काळजी करावी लागत नाहीं. नाहीं तर या **हरिशबिरिशांना** (शिष्यांना) जेवायला बोलावून आणायला इथे कोणीही नव्हतें. ते आपले काय, कुठे तरी जाऊन ध्यान करीत बसतात.

अधरसेन हे डेप्युटी माजिस्ट्रेट होते ते असल्या गरीब माणसांना चांगली मदत करीत. म्हणून **महाराजांनीं राम चतर्जी** (तेथील पुजारी) याची गोड शब्दांनीं त्यांना माहिती करून दिली.

———

बिंदु १९ वा.

स्थळ—दक्षिणेश्वर. मंडळी—नरेंद्रादि भक्त.

भक्तियोग.

श्रीरामकृष्ण आपल्या खोलींत धाकट्या पलंगडीवर बसले होते; त्यांनीं समाधींत खूप खोल बुडी मारली होती. जमिनीवर चटया पसरलेल्या असून त्यांवर शिष्य व इतर भक्त बसले होते. ते एकदृष्टीनें **महाराजांकडे** पाहात होते. त्यांमध्यें **महिमाचरण, राम (दत्त), मनमोहन, नवाई चैतन्य, एम्,** वगैरे होते. कांहीं वेळानें **नरेंद्र** आला.

त्या दिवशीं रविवार होता; इंग्रजी तारीख १ माहे मार्च सन १८८५; मराठी महिना फाल्गुन, तिथि पूर्णिमा; तो दिवस **दोल-यात्रेचा** होता.

कांहीं वेळानें **महाराज** देहावर येऊं लागून त्यांची वाक्शक्ति जागृत झाली. तथापि त्यांची वृत्ति त्या परमानंदांतच रंगली होती. ते **महिमाचरणाला** म्हणाले, ‘ बाबा, भक्तीचें माहात्म्य मला सांग. मनुष्याच्या अंगीं भक्ति असणें किती आवश्यक आहे, एवढें मला सांग. ’

महिमाचरणः—नारदमुनींच्या मनांत तपश्चर्या करावी, असें आलें. इतक्यांत आकाशवाणी झालीः—

> आराधितो यदि हरिस्तपसा ततः किम् ।
> नाराधितो यदि हरिस्तपसा ततः किम् ॥
> अन्तर्बहिर्यदि हरिस्तपसा ततः किम् ।

नान्तर्बहिर्यदि हरिस्तपसा ततः किम् ॥
विरम विरम ब्रह्मन् किं तपस्यासु वत्स।
व्रज व्रज द्विज शीघ्रं शंकरं ज्ञानसिंधुम् ॥
लभ लभ हरिभक्तिं वैष्णवोक्तां सुपक्वाम्।
भवनिगडनिबंधच्छेदिनीं कर्तरीं च ॥

अरण्यांत एकान्त स्थानीं नारद तपश्चर्या करीत होते; इतक्यांत त्यांच्या कानांवर अशी आकाशवाणी पडली कीं, 'हरीची जर आराधना केली, तर तपश्चर्येचें प्रयोजन काय? बरें, हरीची जर आराधना नाहीं केली, तर तपश्चर्या करून काय करावयाचें? हरि अन्तर्बाह्य आहे, हा सिद्धान्त जर मनाला पटला, तर तपश्चर्येची काय जरूर आहे? बरें, तो सिद्धान्त जर मनाला पटला नाहीं, तर तपश्चर्या करण्यांत अर्थ तरी काय? तेव्हां वत्सा, पुरे कर; तपश्चर्येंत काय आहे? ज्ञानाचा केवळ सागर असा जो शंकर त्याच्याकडे जा; व वैष्णवांनीं जी हरिभक्ति सांगितली आहे, त्या सुपक्व हरिभक्तीचा त्यांच्यापासून लाभ करून घे. या भक्तीच्या कातरीनें संसाराचीं दृढ बंधनें तुटून जातील.'

महाराजः—ईश्वरभक्तीचे दोन प्रकार आहेत. एका प्रकाराला वैधीभक्ति असें म्हणतात. नानाविध पूजोपचार, जप, पुरश्चरणें हीं या भक्तींत येतात. हा भक्तीचा मार्ग शास्त्रांनीं आंखून दिलेला आहे. या वैधीभक्तीनें समाधीच्या द्वारें ब्रह्मज्ञानाचा लाभ होतो,—जीवात्म्याचा परमात्म्यांत लय होतो; व असा लय झाल्यानंतर मग त्याला वेगळेपणा केव्हांच येत नाहीं. हा जीवकोटीचा—सामान्य जनांचा—मार्ग!

जे पुरुष ईश्वरकोटींतले आहेत, त्यांची गोष्ट वेगळी. त्यांची भक्ति केवळ औपचारिक नसते, आंतरिक असते. तिचा उगम आंतून असतो! आत्म्यांतूनच तिचे फवारे उडत असतात. चैतन्यादि अवतारी पुरुषांना समाधीमध्यें ब्रह्मसाक्षात्काराचें सुख अनुभवितां येतें; बरें, त्या परमपदावरून खालीं येऊन व मातृपितृभावानें परमेश्वराची भक्ति करून भक्तीचा दिव्य रसही त्यांना चाखतां येतो. 'नेति नेति' असें म्हणत जिन्याची एकेक पायरी ते चढत जातात, आणि शेवटीं शिखर गांठतात. शिखर गांठल्यानंतर ते म्हणतात, हेंच तें. पण लागलेंच त्यांच्या असें लक्षांत येतें कीं, जिना ज्या मसाल्याचा (विटा, चुना, माती) बनविलेला आहे, त्याच मसाल्याचें शिखर आहे! दोहोंचें स्वरूप एकच! मग ते वर-खालीं फिरत असतात; —कधीं शिखरावर जाऊन बसतात, तर कधीं जिन्यावरच बसून राहतात!

शिखर म्हणजे समाधींत अनुभवास येणारें ब्रह्म; इंद्रियगोचर जगताचा अनुभव घेणाऱ्या अहंकाराचा तिथे मागमूसही नसतो. बाह्यजग—नामरूपात्मक सृष्टि—हा जिना; एकदां शिखर हातीं आलें, म्हणजे जिना हें मनुष्याच्या इंद्रियांना गोचर होणारें ब्रह्माचेंच केवळ व्यक्त रूप आहे, असें प्रत्ययास येतें.

शुकदेव समाधिमग्न होते;—निर्विकल्प, जड समाधींत अगदीं लीन झाले होते. इतक्यांत, परीक्षितीला त्वां भागवत ऐकवावें, असा निरोप घेऊन तेथें नारद आले. शुकदेव जडाप्रमाणें अगदीं बाह्यशून्य होऊन बसले होते. तेव्हां नारदांनीं वीण्याचा झणत्कार

करून चार श्लोकांत भगवंताच्या स्वरूपाचें प्रेमानें वर्णन केलें. पहिला श्लोक म्हटल्याबरोबर शुकदेवांचें शरीर रोमांचित झालें; दुसऱ्या श्लोकाबरोबर डोळ्यांत प्रेमाश्रु आले; अंतर्यामीं चिन्मूर्ति उभी ठाकली; तिच्या दर्शनाचा अनुभव घडूं लागला! शेवटीं परमोच्चपदावरून खालीं येऊन त्यांनीं नारदांशीं भाषण केलें. शुकदेव ज्ञानी होते, तसेच भक्तही होते. ते ईश्वरकोटींतले होते.

हनुमंताला भगवंताच्या साकारस्वरूपाचा तसाच निराकार स्वरूपाचाही साक्षात्कार झाला होता; तरी तो चिद्घन व आनंदमूर्ति श्रीरामचंद्राचें ध्यान करीत राहिला.

प्रल्हाद व नारद यांचेंही तसेंच. त्यांना ब्रह्मसाक्षात्कार झाला होता; सगुण रूपाचेंही त्यांना दर्शन घडलें होतें. 'सोऽहम्' या महावाक्याचा प्रल्हाद कधीं अनुभव घेई; तर कधीं 'तूं प्रभु, मी दास,' या भावनेच्या सुखांत तो तल्लीन होई. नारद निरंतर भक्तिसुखांतच पोहत असत.

भक्तीची कास धरली, कीं संसाराची चिंता सरली. जोंपर्यंत 'मी मी' म्हणणारा अहंकारराक्षस जिवंत आहे, तोंपर्यंत 'पोट कसें भरेल?' ही चिंता मला जाळीत असते. विषयकर्दमांत लोळण्यांत मीं संतोष मानावा काय? नाहीं, त्या अहंकाराला प्रभूचा दास करून ठेव;–संसाराचा–विषयांचा–गुलाम त्याला बनवूं नको! तूं प्रभु आहेस; आणि प्रभो, मी तुझा दास आहें! नको तो मला संसार! नकोत तीं मला संसारांतील सुखें! निरतिशय सुखाचा, त्या आनंदकंदाच्या शुद्ध व अखंड आनंदाचा उपभोग मला घेऊं दे!

'मी' हा घात करणारा आहे, ईश्वरापासून दूर दूर नेणारा आहे.

भक्त व संसार-चिंता.

पण 'भक्त-मी'—'ज्ञानी-मी'—'बालक-मी' परमेश्वराजवळ नेऊन पोंचविणारा आहे. शंकराचार्यांनीं आपला 'ज्ञानी–मी' कायम ठेविला होता; पण केवळ लोककल्याणासाठीं!

बालकाचा 'मी' अलिप्त असतो; संसारांतील कोणत्याही गोष्टीनें विकृत होऊन त्याचा निर्मळपणा नाहींसा होत नाहीं. प्रसंगीं मूल रागावतें, पण क्षणांत त्याचा राग कुठच्या कुठे निघून जातो. बालक खेळतांना घरकूल तयार करितें; पण क्षणांत त्याची त्याला आठवणही राहात नाहीं. आपल्या खेळगड्यांच्या तें गळ्यांत गळा घालतें, त्यांना अगदीं जीव कीं प्राण करितें; पण जर ते खेळगडी कांहीं दिवस त्याच्या दृष्टीआड झाले, तर तें त्यांना विसरून जातें, व पुन्हा तें नवे सोबती जोडतें. तें आसक्त असें कुठेच नसतें. सत्त्व, रज, तम यांपैकीं कोणत्याही गुणानें तें लिप्त होत नाहीं. समाधीनंतर जो 'भक्त-मी' कायम राहतो, तो संसारांत निर्लिप्त असतो.

सामान्य माणसांनीं भक्तीचें साधन कां करावें, याला आणखी एक कारण असें आहे कीं, अहंकार अगदीं नाहींसा करितां येतच नाहीं. विचारानें कांहीं वेळ कदाचित् तुम्ही तो दाबाल, पण तो वर डोकें केल्यावांचून राहणार नाहीं. पदोपदीं 'मी मी' म्हणणाऱ्या अहंकाराला कायमचा चिरडून तुम्हांला टाकतां येणार नाहीं. हवा तितका विचार करा, 'मी' जायचा म्हणून नाहीं.

'मी' हा कुंभासारखा आहे, आणि ब्रह्म हें अमर्याद सागरासारखें आहे. या सागरांत तो कुंभ बुडविलेला आहे. कुंभाच्या आंत-बाहेर पाणी आहे, जिकडे तिकडे पाणीच पाणी भरून गेलें आहे, ही गोष्ट विचारानें तुम्हांला समजेल; पण जोंपर्यंत तुम्ही विचाराच्या कक्षेंत आहां, तोंपर्यंत कुंभ कायम राहणारच. जोंपर्यंत तुमच्या विचार चालू आहे, तोंपर्यंत ब्रह्म म्हणजे कांहीं तरी सोपाधिक आहे, असें तुम्हांला वाटणार. हा जो नाहींसा न करितां येणारा 'मी' तोच 'भक्त-मी.' कुंभ किंवा अहंकार जोंपर्यंत शिल्लक आहे, तोंपर्यंत 'मी-तूं' आहेतच. 'तूं भगवान्, मी भक्त; तूं प्रभु, मी दास.' हें राहणारच. विचाराची कमान कमालमर्यादेपर्यंत जरी चढविली, तरी 'मी' कांहीं सुटावयाचा नाहीं. कुंभ नाहींसा झाला, कीं मग ती गोष्ट वेगळीच!

बिंदु २० वा.

नरेंद्राला संन्यासाचा उपदेश.

इतक्यांत नरेंद्र आला व महाराजांना प्रणाम करून बसला. महाराज नरेंद्राबरोबर गोष्टी बोलूं लागले. गोष्टी बोलतां बोलतां ते पलंगडीवरून उतरून खालीं जमिनीवर टाकलेल्या चटईवर येऊन बसले. या वेळीं खोली लोकांनीं अगदीं भरून गेली होती; त्यांत महाराजांचे भक्त होते, बाहेरचीही मंडळी फार आली होती.

महाराज (नरेंद्राला):—कसें काय, बरें आहे ना बेटा? गिरिश घोष याचे घरीं तूं नेहमीं नेहमीं जातोस, खरें का हें?

नरेंद्र:–होय महाराज, जातों मी त्याच्याकडे मधून मधून.

गिरिश हा एक **महाराजां**चा नवीन शिष्य होता; सन १८८४ च्या आक्टोबर महिन्यांत तो पहिल्यानें शिष्यगणाला येऊन मिळाला. **महाराज** त्याच्या श्रद्धेच्या थोरपणाची नेहमीं वाखाणणी करीत. ते म्हणत, याची श्रद्धा दोन हातांच्या वेंगेंत कांहीं कवळून धारितां येणार नाहीं. जशी त्याची श्रद्धा जबर होती, तसाच त्याचा अनुरागही (परमेश्वरावरील प्रेम) होता. घरीं असला, कीं निरंतर परमेश्वराचे चिंतनांत निमग्न! नेहमीं आपला हरिरस-मदिरेनें धुंद! **नरेंद्र** बरेच वेळा त्याच्याकडे जाई; **हरिपद**, **नारायण**, **विनोद** इत्यादि मंडळीही त्याच्या घरीं नेहमीं जात असे. अशी मंडळी जमली कीं, त्यांच्या बोलण्याचा विषय आपला एक ठरींव असायचा—**श्रीरामकृष्ण**.

गिरिश संसारी—गृहस्थाश्रमी–होता. पण **नरेंद्र** संसारांत पडणार नाहीं, कामिनी व कांचन यांचा त्याग करून तो धर्मकार्याला आपणाला वाहूत घेईल, ही गोष्ट **महाराजांच्या** लक्षांत आली होती.

महाराज (नरेंद्राला):—**गिरिश घोष** याच्या भेटीला तूं वारंवार त्याच्या घरीं जात असतोस, हें खरें का?

संन्यास. हें पहा, जींत लसूण ठेवलेली आहे अशी वाटी कितीही वेळा जरी धुतली, तरी लसणीचा वास कांहीं जाणार नाहीं. जे पुरुष संसारांत पडलेले नसतात, कामिनी व कांचन यांचा ज्यांना विटाळही झालेला नसतो, ते शुद्ध

पात्रांसारखे—ज्यांना कशाचाही वास लागलेला नाहीं, अशा पात्रांसारखे—होत. अनेक दिवस ज्यांनीं संसारांत काढले—कामिनी व कांचन यांच्या सहवासांत ज्यांनीं अनेक दिवस घालविले,—ते पुरुष लसणीचा वास लागलेल्या भांड्यासारखे होत.

किंवा, असे पुरुष म्हणजे कावळ्यांनीं टोंचल्यामुळें अपवित्र व निरुपयोगी झालेल्या आंब्यासारखे होत.

कोरीं मडकीं असतात, त्यांत दूध ठेवलें तरी हरकत नसते. पण ज्या मडक्यांत एकदां विरजण घातलें आहे, त्या मडक्यांत पुन्हा दूध ठेवण्याची सोय नसते. ठेवलें, तर दूध नासून जाणार! जीं माणसें संसारांत मुळींच पडलीं नाहींत, तीं कोऱ्या मडक्यासारखीं होत; व संसारी माणसें हीं एकदां विरजण घातलेल्या जुन्या मडक्यासारखीं होत.

जे संसारांत पडून भ्रष्ट झाले नाहींत, त्या निर्मळ मनांच्या पुरुषांना भक्तीचा किंवा ज्ञानाचा उपदेश करणें हें कोऱ्या मडक्यांत दूध ठेवण्यासारखें आहे. कोऱ्या मडक्यांत दूध ठेवलें, तर तें नासण्याबिसण्याचें कांहीं भय नसतें. पण ज्यांत पूर्वीं विरजण घातलेलें असतें, अशा जुन्या मडक्यांत दूध ठेविलें, तर तें नासून फुकट जाणार! त्याप्रमाणें एकदां संसारांत पडलेल्या माणसांना केलेला उपदेश व्यर्थ जाणार!

संसारी भक्ताचे दोष.

परमेश्वरप्राप्तीकरितां खटपट करणारीं माणसें संसारी लोकांतही असतात, यांत शंका नाहीं. पण तीं माणसें वेगळीं; त्यांचा एक निराळा वर्गच आहे.

त्यांच्या ठिकाणीं योगही असतो व भोगही असतो. रावण हा या वर्गांतला होता, असें रामायणांत सांगितलें आहे. देवकन्या, नागकन्या, गंधर्वकन्या व असुरकन्या यांच्याशीं त्यानें विवाह केले; पण शेवटीं त्याला रामाचीही प्राप्ति झाली. पुराणांत असें सांगितलें आहे कीं, असुरांनीं नाना भोग भोगले; पण शेवटीं त्यांना नारायणाचाही लाभ झाला.

नरेंद्रः—गिरिश घोष अलीकडे वाईट लोकांची संगति टाळतो.

महाराजः—एका ठिकाणीं बरेच संन्यासी बसले होते. इतक्यांत तिकडून एक बाई जाऊं लागली. तरीसुद्धां सगळ्यांचें ईश्वरचिंतन चाललेंच होतें; त्यांतला एकमात्र तिच्याकडे वांकड्या डोळ्यानें पाहूं लागला. स्त्रीच्या सौंदर्यानें मोहित झालेला तो मनुष्य पूर्वीं गृहस्थाश्रमी होता, व त्यानें संन्यास घेतला तेव्हां त्याला तीन मुलें झालेलीं होतीं.

लसणीचें पाणी केलें आणि बराच वेळ वाटींत घालून ठेवलें; वाटीची घाण जाणार कशी? पूर्वसंस्कार जाणें फार कठिण आहे. बाभळीच्या झाडाला आंबे कसे येणार? 'ज्याच्यापुढें सिद्धि हात जोडून उभ्या आहेत, त्या माणसाला तसाही चमत्कार करितां येईल. पण अशा सिद्धि काय सगळ्यांना प्राप्त होतात?

जीं माणसें संसारांत न पडतां परमेश्वरप्राप्तीच्या मार्गाला लागलीं, त्या माणसांप्रमाणेंच संसारी माणसालाही शुद्ध व निर्मळ होतां येईल; आणि बाभळीच्या वृक्षालाही मधुर आंबे येतील. पण असे चमत्कार करण्याचें सामर्थ्य ईश्वरापासून प्राप्त झालें पाहिजे; आणि ईश्वराला

अशक्य कांहीं नाहीं. तथापि ही ईश्वरी देणगी किती दुर्मिळ आहे !

मुख्य गोष्ट अशी आहे कीं, तूं आपलें तनमनधन परमेश्वराला अर्पण केलें पाहिजे.

पण संसारी मनुष्य, गृहस्थाश्रमी मनुष्य—अरे बापरे ! किती झटें त्याच्यामागें असतात ! त्याला परमेश्वराचें नांव घेण्याला फुरसद असते का ?

एका माणसाला **भागवत** ऐकावयाचें होतें; त्यासाठीं त्याला एक चांगला व्युत्पन्न शास्त्री पाहिजे होता. तेव्हां त्याचा एक मित्र म्हणाला, "आहे, असा एक शास्त्री माझ्या ओळखीचा आहे; अगदीं आपल्याला पाहिजे तसा आहे तो; पण या माणसासंबंधानें एक मोठी अडचण आहे. त्याची कांहीं घरची शेती आहे, तिकडे त्याला रोज पाहावें लागतें. चार नांगर व आठ बैल नेहमीं कामावर असतात. तेव्हां अडचण अशी कीं, त्याला वेळ अगदीं नाहीं." ज्याला शास्त्री पाहिजे होता, तो मनुष्य यावर म्हणाला, 'बाबा, तूं म्हणतोस तसा का शास्त्री मला हवा आहे ? ज्याचें पुष्कळसें शेतभात आहे, नांगर आहेत, बैल आहेत, आणि ज्याला संसाराच्या कामापुढें घटकाभरही फुरसद नाहीं, असा का पंडित मी शोधतों आहें ? (हशा). नाहीं. जो मला **भागवत** ऐकवील, असा पंडित मी शोधीत आहें.'

एक राजा होता. तो रोज भागवत ऐकत असे. रोजचें पुराण आटोपलें, कीं शास्त्रीबुवा त्या राजाला विचारीत, 'महाराज, मीं वाचलेला भाग समजला ना आपल्याला ?' या प्रश्नाला राजा एव-

हेंच उत्तर देई:–' शास्त्रीबुवा, पहिल्यानें तुम्हांला समजलें पाहिजे तें.' शास्त्रीबुवा घरीं गेले, कीं ते राजाचे शब्द त्यांच्या मनांत सारखे घोळत असत. 'तुम्हांला तें पहिल्यानें कळलें का?' असें राजा मला रोज कां म्हणतो? असा तो आपल्या मनांतल्या मनांत विचार करी. तोही भजनसाधन करणारा ब्राह्मण होता. असा कांहीं दिवस विचार करितां करितां त्याच्या मनाला आपोआप जागृति आली. या जगांत हरिभजन हेंच काय तें सार आहे, बाकी सर्व मिथ्या आहे, असा बोध त्याच्या मनाला झाला. झालें. तत्काळ उपरति होऊन त्यानें संसाराचा त्याग केला. ज्या दिवशीं अरण्यांत जाण्याकरितां त्यानें घर सोडलें, त्या दिवशीं त्यानें एका माणसा-बरोबर राजाला निरोप पाठविला कीं, "राजा, भागवताचा खरा अर्थ (म्हणजे भगवंताकरितां सर्वस्वाचा त्याग करा, असा) शेवटीं कळला मला."

संसारी माणसांसंबंधानें माझें मत असें आहे, तरी मी त्यांचा तिरस्कार करितों, असें तुला वाटतें का? नाहीं. अद्वैतज्ञान–ब्रह्म-ज्ञान–मला असें सांगतें कीं, या सर्व सृष्टीच्या रूपानें तेंच (ब्रह्मच) व्यक्त झालें आहे, सर्व नारायणस्वरूपच आहेत. जितक्या बायका म्हणून आहेत, तितक्या सर्व आईच्याच मूर्ति आहेत, असें मला दिसतें. सर्व स्त्रिया मी पूज्य मानितों; वेश्या व सती यांत मा-झ्या दृष्टीला कांहींच अंतर दिसत नाहीं.

काय सांगावें! जो पहावा, तो आपला तुरीची डाळ मागतो! तिच्यापलीकडे कोणाला कांहीं दिसतच नाहीं! कामिनी व कांचन

यांच्यामागें आपले सगळे! याहून वरच्या पायरीवर जाण्याची कोणाचीच हांव नाहीं! लोक स्त्रीच्या लावण्याला भुलून जातात; पैसा, ऐश्वर्य, कीर्ति, मान, पदवी, यांना भुलून जातात; पण ईश्वराच्या स्वरूपदर्शनापुढें ब्रह्मदेवाचें पदही तुच्छ आहे, हें त्या बिचाऱ्यांना कुठे ठाऊक आहे!

एकदां एक जण **रावणाला** म्हणाला, 'आपण **रामाच्या** रूपानें **सीतेपुढें** कां जात नाहीं?' यावर **रावणानें** उत्तर केलें, 'बाबा, अंतःकरणांत एकदां रामरूप पाहिलें, त्या चित्स्वरूपाचें एकदां नुसतें ध्यान केलें, कीं रंभा, तिलोत्तमा, या चिताभस्मासारख्या आहेत, असें वाटूं लागतें. त्यापुढें ब्रह्मपदही तुच्छ वाटतें, मग स्त्रीच्या लावण्याची ती कथा काय!'

सर्वांच्या तुरीच्या डाळीवर उड्या! जे शुद्धात्मे नाहींत, जे संसारानें भ्रष्ट झालेले आहेत, त्यांना ईश्वराची शुद्ध भक्ति व्हावयाची नाहीं; अनन्यभक्ति साधावयाची नाहीं; ईश्वराकडे त्यांचें पूर्ण लक्ष लागावयाचें नाहीं; त्यांचें लक्ष हजार दिशांना धांवत असावयाचें!

संसारी जनांचें दासत्व.

(**मनमोहनला**; हा गृहस्थाश्रमी असून **रामकृष्णांचा** शिष्य होता.) तुला कदाचित् राग येईल, तरी मीं सांगतोंच. मीं **राखालला** म्हटलें, 'पैशाकरितां किंवा संसाराकरितां कोणाचें दास्य तूं पतकरलेंस, कोणाची चाकरी तूं पतकरलीस, असें माझ्या कानांवर येण्यापेक्षां ईश्वराकरितां गंगेंत उडी टाकून तूं मरून गेलास, असें माझ्या कानांवर आलें, तर मला अधिक संतोष होईल!'

(राखाल हा एक तरुण भक्त असून तो या वेळीं महाराजांच्या सान्निध्याला होता. मनमोहनच्या बहिणीशीं त्याचें लग्न झालें होतें.)

पुन्हा नरेंद्राकडे वळून महाराज म्हणाले, कॅप्टनबरोबर एकदां एक नेपाळी बाई येथें आली. ती ऐसराजवर[1] उत्तम भजन करीत होती. तिच्या मधुर आवाजानें खोलींत लोकांची गर्दी लोटली. आपलें लग्न झालें आहे का? असा कोणींसा तितक्यांत तिला प्रश्न केला. तेव्हां तिनें निक्षून असें उत्तर दिलें कीं, 'मी भगवंताची दासी आहें! माझा मालक व नवरा तोच. फक्त नारायणाचीच मी सेवा करित्यें, कोणाही नराची सेवा मी करीत नाहीं! नराची दासी होण्यांत अर्थ कोणता?'

कामिनी व कांचन यांत जर तूं निरंतर बुडालेला असशील, तर ईश्वराचा साक्षात्कार तुला होणार कसा? त्यांत (कामिनी व कांचन यांत अर्थात् संसारांत) असून अनासक्त राहणें फारच कठिण आहे. संसारी माणसाची स्थिति मोठी बिकट आहे. एकीकडे तो बायकोचा दास असतो, एकीकडे पैशाचा दास असतो; आणि इकडे पोटासाठीं ज्याची चाकरी करितो, त्याचा तो दास असतो!

अकबर व फकीर.

अकबर बादशहाचे कारकीर्दींत दिल्लीजवळच्या एका अरण्यांत एक फकीर झोंपडींत रहात असे. या फकिराच्या दर्शनाला अनेक लोक येत असत. त्यांचा आदरसत्कार करावा, असें त्याला फार

१ एक वाद्यविशेष.

वाटे. पण तो दरिद्री असल्यामुळें त्याचा कांहीं इलाज चालेना. शेवटीं त्याच्या मनांत असें आलें कीं, **अकबर** हा साधुफकिरांचा चाहता आहे, तेव्हां आपण जर त्याच्याकडे गेलों, तर तो आपल्याला द्रव्य देईल, व मग आपल्याला अतिथिसत्कार करितां येईल. या विचाराप्रमाणें तो **अकबराकडे** गेला. तेव्हां **अकबर** नमाज पडत होता; म्हणून तो फकीर त्या नमाजघरांतच बसून राहिला. नमाज पडतां पडतां **अकबरशहाचे** तोंडून निघालेले पुढील शब्द त्या फकिरानें ऐकले:—' हे अल्ला, मला आणखी धन दे, सत्ता दे, दौलत दे.' हे शब्द ऐकतांच तो फकीर उठून हळूच खोलींतून जाऊं लागला. तेव्हां **अकबरानें** खूण करून त्याला पुन्हा बसायला सांगितलें.

नमाज संपल्यावर **अकबर** त्या फकिराला म्हणाला, 'आपण माझी भेट घेण्याकरितां आलां; आणि कांहीं न बोलतां आपण निघून जात होतां, हें कसें काय?' फकिरानें उत्तर केलें, 'मी खाविंदांकडे आलों, याचा हेतु असा होता,–पण आपल्याला आतां तो सांगण्यांत काय अर्थ? उगीच आपल्याला तसदी देण्याचें कांहीं कारण नाहीं.' **अकबरानें** काय तें सांगण्याबद्दल जेव्हां पुन्हा पुन्हा त्याला आग्रह केला, तेव्हां तो फकीर म्हणाला, 'माझ्या झोंपडींत अनेक लोक श्रवणार्थ येतात; मी दरिद्री असल्यामुळें त्यांची माझ्या हातून व्हावी तशी व्यवस्था होत नाहीं; तेव्हां कांहीं द्रव्यसाहाय्य मागण्याकरितां आपल्याकडे आलों होतों.' मग आपण कांहीं न बोलतां तसेच कां निघून चाललां होतां? असें **अकबरानें**

विचारलें. त्यावर फकीर म्हणाला, 'आपणही भिकारीच असून अल्लाजवळ धनदौलतीची याचना करीत आहां, असें जेव्हां मला दिसलें, तेव्हां मीं मनांत असा विचार केला कीं, जो स्वतः भिकारी आहे, त्याच्याजवळ हात पसरण्यांत अर्थ काय आहे? जर याचना करायचीच झाली; तर ती अल्लाजवळ करावी, हेंच बरें!'

नरेंद्रः—गिरिज घोष याचे मनांत अलीकडे असलेच विचार घोळत असतात.

महाराजः—तें ठीक आहे; तसेंच पाहिजे. पण अपशब्द बोलून तो आपली जिव्हा विटाळतो कां? माझ्या आजच्या अवस्थेंत असा उद्धटपणा मला सहन होत नाहीं; मेघगर्जना झाली, कीं घराच्या मोठमोठ्या भागांना कांहींच होत नाहीं, पण कांचेचीं तावदानेंमात्र तिनें हादरून खडखडतात! हल्लीं माझी प्रकृति सत्त्वगुणप्रधान आहे, तेव्हां तिला हां हूं अगदीं खपत नाहीं. हृदय अलीकडे माझ्यावर खूप चवताळे, मला वाटेल तसें तोडून बोले; म्हणून आईनें त्याला इथे ठेविलेंच नाहीं, घालवून लावलें!

महाराज (कांहीं वेळानें स्मितपूर्वक नरेंद्रला):—गिरिश घोष याच्या म्हणण्याला (ईश्वर मनुष्यरूपानें अवतरतो या त्याच्या म्हणण्याला) तूं दुजोरा देतोस का?

ईश्वर स्वतः अवतरतो का!

नरेंद्रः-मनुष्यरूपानें ईश्वर अवतरतो, यावर माझा पक्का विश्वास आहे, असें तो म्हणतो. त्याचा विश्वास अगदीं दृढ असल्यामुळें

त्याच्या उलट कांहीं न बोलावें हेंच बरें, असें मला वाटलें. म्हणून मी कांहींच ज्यास्त बोललों नाहीं.

महाराजः–त्याचा विश्वास जबर खरा! तुला नाहीं का तसें वाटत?

महाराज जमिनीवर टाकलेल्या चटईवर बसले होते. त्यांच्याजवळ **एम्** होता; समोर **नरेंद्र** बसला होता. बाकीचे भक्त व दर्शनाकरितां आलेले कलकत्त्याचे इतर लोक सभोंवते बसलेले होते. सर्व अगदीं एकदृष्टीनें **महाराजांकडे** पहात होते.

स्वस्थ बसून **महाराज नरेंद्राकडे** स्नेहपूर्वक पहात होते. कांहीं वेळानें **नरेंद्राला** ते म्हणाले, 'बाबा, कामिनी व कांचन यांचा त्याग जोंपर्यंत झाला नाहीं, तोंपर्यंत कांहीं होणार नाहीं,–देहाचें सार्थक तुला कांहीं करितां येणार नाहीं! हे शब्द बोलतां बोलतांच ते भावापन्न झाले; व सस्नेह दृष्टीनें त्याच्याकडे पहात पहात गाऊं लागले:—

पद.

(**चाल**--उद्धवा शांतवन कर०)

काय म्यां करावें न कळे ॥ नच सुचेचि कांहीं मजला ॥ ध्रु०॥
बोलावें तरिही भीती ॥ न वदावें तरि भय चित्तीं ॥
झाली स्थिति ऐसी कां ही ॥ शांतिलेश हृदयीं नाहीं ॥
हा विशाल वणवा इकडे ॥ व्याघ्र महा निर्दय तिकडे ॥
हा अपार सागर इकडे ॥ हा कडा भयंकर तिकडे ॥
(चा. ब.) **चापातें लावुनि बाण,**
व्याध हा मांडुनी ठाण,
टपला कीं घ्याया प्राण,

(चा. प.) त्यांत मनोमृग सांपडला ॥ काय०॥ १ ॥
भीति हीच चित्तीं उपजे ॥ जाशील हातचा माझें ॥
मोहिनी लाघवी वाणी ॥ योजुनि तुज नेतिल कोणी ॥
लावण्यसरिन्नव मूर्ती ॥ आणुनि तव नयनांपुढती ॥
(चा. ब.) हरिती मम सौख्यनिधान,
माझें चिच्छांतिनिदान,
हा माझा पंचप्राण,
(चा. प.) या भयें जीव हुरहुरला ॥ काय० ॥ २ ॥
मन तुझें कसाला माझे ॥ उतरतां बालका ! चोजें ॥
ठाऊक मला जें कांहीं ॥ देईन तुला लवलाहीं ॥
यांत न कधिं अंतर होणें ॥ वज्रलिपी माझें वदणें ॥
होतां ती मंत्रप्राप्ती ॥ तुज मिळेल अनुपम शांती ॥
हा योग स्वभू यांचा ॥ उत्कर्ष वस्तुलाभाचा ॥
(चा. ब.) भेदता जिरुनि भेदाची,
हो समता एकत्वाची,
भेट तीच सागरविधुची,
(चा. प.) घनयोग मयूरा बाला! ॥ काय० ॥ ३ ॥
नववधूलोलदृष्टीसीं ॥ दयितदृष्टिमीलन तें हें ॥
कीं चपला तेजोराशी ॥ घनहृदया वेष्टीताहे ॥
वा गंगा रम्य शुभांगा ॥ जलधीसिं रंग करिताहे ॥
कीं राधा-श्रीकृष्णांचें ॥ आलिंगन तें हें पाहें ॥
वा धनुर्भंगकर रामा ॥ जानकी मनःसुम वाहे ॥
(चा. ब.) कीं विलाससेवनिं दंग,
कमलांतरिं असतां मृंग,
जें सेवी सुख अव्यंग,
(चा. प.) तेंच हें, जीवशिवलीला ॥ काय० ॥
जाहलें आम्हां जें नाम । कर्णधार सुखविश्राम ॥

त्या विपत्सागरामधुनी ॥ नेली निजनौका तरुनी ॥
यद्बलें, नाम तें घ्याया ॥ हो सिद्ध शीघ्र तूं राया ॥
हें सर्व तुजकडे आहे ॥ मी निमित्त केवळ पाहें ॥
दमयंतीधावितहंसा ॥ धरिं या मन्मानसहंसा ! ॥
(चा. ब.) **लोभवी पाहतां नयन,**
जें क्षितिज तेंच हें जाण,
तें करीं धराया यत्न,
(चा. प.) **साधन नभ वेंघायाला ॥ काय० ॥ ५ ॥**

नरेंद्र कदाचित् आपल्याला नाहींसा होईल–कोणी तरी त्याला आपल्या हातून हिसकून नेईल, अशी **महाराजांना** भीति वाटत होती. ते गात असतांना **नरेंद्राचे** डोळे भरून आले.

एक कोणी बाहेरचा गृहस्थ **महाराजांचे** दर्शनाला पहिल्यानें-च आला होता. तो जवळच बसला असून हें सर्व ऐकत व पहात होता. तो **महाराजांना** म्हणाला, 'महाराज, कामिनी व कांचन यांचा त्याग करणें जर जरूर आहे, तर मग गृहस्थानें–ज्याच्या-मागें कुटुंब लागलें आहे त्यानें–काय करावें?

महाराज:—बाबा, तूं खुशाल आपली बायको व पोरें यांत रहा व गृहस्थाश्रमधर्म पाळ. हें आपलें आमचें दोघांतलें बोलणें आहे; त्यांत तुझा कांहीं संबंध नाहीं.

गृहस्थाला अभयदान व उत्तेजन.

महिमाचरण हा गृहस्थाश्रमी होता. तो हें सगळें ऐकत होता; पण तो चुप बसला होता. त्यानें तोंडांतून एक अक्षरही काढलें नाहीं.

महाराज (**महिमाला**, सस्मित):—पुढें चल. मध्यें थांबू

नको. खोल अरण्यांत शीर, चंदन तुझ्या हातीं लागेल. आणखी पुढें जा, तुला रुप्याची खाण सांपडेल! तिथेही थांबू नको; आणखी पुढें जा. हो, आणखी खोल जा, म्हणजे सोन्याची खाण तुला दिसेल! आणखी पुढें जा. म्हणजे हिरे, माणकें तुझ्या हातीं येतील! पुढें, पुढें चल!

महिमः—आम्हांला पुढें पुढें गेलें पाहिजे, यांत शंका नाहीं. पण, काय सांगावें! कांहीं तरी आम्हांला धरून ठेवतें,--आम्हांला पुढें जाऊंच देत नाहीं. कोणी तरी गुप्तपणें लगाम धरून आम्हांला मागें खेंचतें!

महाराज(सस्मित):—हां! छाटून टाक ती लगाम! त्याच्या नामाच्या खड्गानें तुकडे कर तिचे! **कालीचें** नाम कालाचे पाश तोडण्याला समर्थ आहे.

पितृवियोगानंतर **नरेंद्राला** सांसारिक आपत्तींनीं फार घेरलें होतें. त्याच्यावर अनेक दुःखें व संकटें कोसळलीं होतीं. **महाराज** मधून मधून त्याच्याकडे पाहात होते. सस्नेह व सकरुण दृष्टीनें त्याच्याकडे पाहून व हंसून ते म्हणाले, ‘ तूं शेवटीं चिकित्सक झालास ना? ’

ते पुढील वचनाचा आधार देऊन म्हणाले,–

‘ शतमारी भवेद्वैद्यः । सहस्रमारी चिकित्सकः । ’

(सगळे हासतात.)

नरेंद्रानें या वयांत पुष्कळ पाहिलें,–सुखदुःखांचा फार अनुभव घेतला, असा तर **महाराजांच्या** बोलण्याचा आशय नसेल ना?

नरेंद्र स्मितपूर्वक चुप राहिला.

——--

बिंदु २१ वा.

महाराज व शिष्यमंडळी.

तिसरा प्रहर झाला होता. शिष्य व भक्त बागेंत इकडे तिकडे फिरत होते. महाराजांच्या एमबरोबर हळूहळू गोष्टी चालल्या होत्या. जवळ दुसरें कोणी नव्हतें. बालभक्तांविषयीं ते बोलत होते.

महाराजः—माझें ध्यान चांगलें चाललें आहे, असें पल्टूशिवाय प्रत्येक इसम म्हणतो. पल्टूचें तसें होत नाहीं—त्याचें लक्ष ईश्वराकडे लागत नाहीं, असें कां व्हावें?

एम्:—त्याला परीक्षेकरितां किती तरी वाचावें लागतें. त्यामुळें त्याच्या चित्ताची एकाग्रता बहुधा होत नसावी.

महाराजः—नरेंद्रासंबंधानें तुला काय वाटतें? त्याच्यांत अगदीं लबाडी नाहीं, तो अगदीं सरळ आहे, असें नाहीं का?

संसाराची छाया व नरेंद्र.

एम्—हो, आहे खरें तसें महाराज!

महाराजः—पण अलीकडे त्याला संसाराचे बरेच आघात बसले.

एम्:—होय, त्याचे वडील वारल्यामुळें त्याचें कुटुंब बहुतेक निराधार झालें.

महाराजः—त्याला आपल्या कुटुंबाची बरीच चिंता वाहावी लागते. यामुळें त्याची अंतर्ज्योति संसाराच्या छायेनें कांहींशी ग्रासून गेली आहे. पण असें फार दिवस राहणार नाहीं.

या वेळीं नरेंद्र पडवींत एका वेदान्ती गृहस्थाशीं बोलत होता.

महाराज मधून मधून तिकडे जात व नरेंद्राचें बोलणें लक्ष-पूर्वक ऐकत.

इतक्यांत सगळे शिष्य पुन्हा खोलींत परत आले. महाराजांनीं महिमाचरणाला एखादा स्तोत्रपाठ म्हणण्याला सांगितलें. तेव्हां महानिर्वाणतंत्रांतील पुढील स्तव तो म्हणूं लागलाः—

हृदयकमलमध्ये निर्विशेषं निरीहम् ।
हरिहरविधिवेद्यं योगिभिर्ध्यानगम्यम् ॥
जननमरणभीतिभ्रंशि सच्चित्स्वरूपम् ।
सकलभुवनबीजं ब्रह्म चैतन्यमीडे ॥

(म० तृतीय उल्लास.)

गृहस्थाला अभय.

महिमानें अशींच आणखी कांहीं स्तोत्रें म्हटलीं; तीं तो म्हणत असतां महाराजांचें अंतःकरण आनंदानें अगदीं भरून गेलें. पुढें तो श्रीशंकराचार्य-विरचित शिवस्तोत्र म्हणूं लागला. मी या भवसागरांत बुडत आहें, हे शूलपाणे, माझें रक्षण कर, अशी त्यांत भक्त प्रार्थना करीत आहे. संसार केवळ दुःखमय आहे.—तो एक गहन अरण्यच असून त्यांतून बाहेर पडण्याला वाट सांपडत नाहीं, असेंही त्यांत म्हटलें आहे.

महिमाचरण हा संसारी व गृहस्थाश्रमी होता.

श्रीरामकृष्ण (महिमाला):—संसार हा एक कूप असून त्यांत मनुष्यें बुडतात, किंवा तो गहन अरण्यच असून त्यांतून बाहेर पडण्याला वाट सांपडत नाहीं, असें तूं कां म्हणतोस? तो केवळ दुःखमय आहे, दुःखावांचून त्यांत दुसरें कांहीं नाहीं, असें तूं कां म्हणतोस?

नवीन माणसाला हीं बोलणीं ठीक आहेत. पण निरंतर ज्यानें भगवंताचे चरण धरले आहेत, सुखांत व दुःखांत जो भगवंताचे चरण सोडीत नाहीं, त्याच्या तोंडीं हे शब्द अगदीं शोभत नाहींत. सोडून दे सगळें भय.—भगवंतच तुला हातीं धरून चालवीत आहे. मग दुसऱ्या एका गृहस्थाश्रमी भक्तासारखेच तुझ्या तोंडून उद्गार निघतील:—'हा संसार केवळ आनंदभुवन आहे. तेव्हां मी खातों, पितों, मजा मारतों व आयुष्याचा काळ काढतों. राजर्षि जनक याचें केवढें तेज होतें? त्याला कांहीं कमी होतें का? ऐहिक किंवा पारमार्थिक वैभवाचा त्याला तोटा होता का? छे! नव्हता. जसें त्याचें दुधाच्या वाटीकडे लक्ष असे, तसेंच भगवंताकडेही असे. इकडे व तिकडे दोहींकडे तो सारखाच होता!'

भय कशाचें? ईश्वर तुझा पाठीराखा आहे; त्याला घट्ट धरून ठेव म्हणजे तो तुला हातीं धरून नेईल. अगदीं कांट्यांनीं भरलेलें गहन अरण्य असलें, म्हणून काय झालें? पायांत जोडा घाल, म्हणजे ते कांटे तुझ्या पायांना बोंचणार नाहींत व त्यांतून रक्त निघणार नाहीं. कसलें भय आलें आहे? या संसाराच्या लपंडावांत 'भोग्या'च्या—आपल्या आईच्या—पवित्र अंगाला शीव, म्हणजे तुझ्यावर चोरपण येणार नाहीं. ती कशी अलिप्तपणें डाव चालविते पहा! एकदां तिच्या अंगाला तूं शिवलास, म्हणजे तुला डावांत पुन्हा रखडावें लागणार नाहीं. खरें आहे. तुला मग धांवपळ करावी लागणार नाहीं, व त्या डावांतील चोराप्रमाणें पुन्हा अडकून पडावें लागणार नाहीं. राजर्षि जनक हा दोन तरवारी वाग-

वीत असे, हें तुला ठाऊकच आहे. एक ज्ञानाची तरवार व दुसरी कर्माची तरवार. तरवारी पेलण्यांत जो वाकबगार आहे, त्याला कसलेंही भय नाहीं.

महाराज धाकट्या पलंगडीवरच बसलेले होते. **एम्** त्यांच्याजवळच जमिनीवर बसला होता.

महाराज (एमला):–तो जें काय म्हणाला, त्यानें माझें लक्ष जसें काय ओढून घेतलें आहे;–तें आतां बारीकसारीक गोष्टींकडे लागतच नाहीं.

(**महिमाचरण**, जो पहिला स्तोत्रपर श्लोक म्हणाला, त्याविषयीं हे **महाराजांचे** उद्‌गार होते.)

इतक्यांत भक्तमंडळी पुन्हा गाऊं व नाचूं लागली. **महाराजहीं** त्यांत सामील झाले. संकीर्तन चाललें असतां ते भावमग्न होऊन गाऊं व नाचूं लागले.

कीर्तनान्तीं **महाराज** शिष्यांना म्हणाले, 'भक्तीनें नामसंकीर्तन करणें हेंच मुख्य आहे; बाकी कसलीही किंमत नाहीं. एक भक्तिमात्र वस्तु आहे, बाकी सर्व अवस्तु! तीच एक सत्य, बाकी सगळें मिथ्या!'

\+ \+ \+ \+ \+

सत्य व साक्षात्कार.

सर्व मंडळी बोलत जमिनीवर बसली होती. **नरेंद्र** व **राम** (**दत्त**) या दोघांचा एका मुद्द्यावर कडाक्याचा वाद चालला होता. **राम** हा नुकताच दुखण्यांतून बरा होऊन **महाराजांना** भेटायला आला होता.

ते वादविवाद करीत व शिरा ताणीत असतां **महाराज** त्यांच्याकडे लक्षपूर्वक पाहात होते.

महाराज (एमला):–मला आपले असले वादविवाद आवडत नाहींत. (मोठ्यानें **रामला**) थांब! तुझी अद्याप तब्यत सुधारली नाहीं!–अच्छा! आस्ते आस्ते चालूं द्या! एकेरीवर येऊं नका! (हळूच **एमला**) मला हें आवडतच नाहीं. मी गहिंवरून आईला म्हणें, "आई, एक माणूस म्हणतो, 'तें असें आहे.' दुसरा म्हणतो, 'तें तसें आहे.' तेव्हां सत्य काय तें मला तूं सांग!"

बिंदु २२ वा.

नरेंद्र (विवेकानंद), गिरिश घोष, चुनिलाल, लाटू, एम्, नारायण इत्यादि शिष्यगणासह श्रीरामकृष्ण आपल्या बलरामनामक शिष्याच्या घरीं जातात.

बुधवार फाल्गुन कृष्ण दशमी. बंगाली तारीख २९. इंग्रजी तारीख ११ मार्च सन १८८५. या दिवशीं **श्रीरामकृष्ण बलरामाच्या** घरीं आले होते. **बलराम** हा एक त्यांचा शिष्य होता. ते **दक्षिणेश्वराहून** सकाळीं सुमारें दहा वाजतां येथें आले. त्या दिवशीं त्यांचें भोजन येथेंच झालें.

धन्य तो **बलराम बाबू**! त्याचें घर त्या वेळीं **महाराजांनीं** आपलें प्रधान कर्मक्षेत्र केलें होतें. नवीन नवीन भक्तांना आकर्षण करून घेऊन प्रेमाच्या (भक्तीच्या) रज्जूनें त्यांना बांधून टाकण्याचें कार्य त्यांनीं त्याच ठिकाणीं केलें! येथेंच ते भक्तांसह भजनरंगांत नाचले, गाइले! त्या वेळीं असें वाटे कीं, **श्रीगौरांगानें**

श्रीवासाचे (गौरांगाचा एक प्रिय शिष्य) घरीं हा प्रेमाचा (अर्थात् भक्तीचा) हाटच बसविला आहे !

महाराजांचें आपल्या भक्तांवर केवढें प्रेम! **दक्षिणेश्वर** येथील कालीमंदिरांत ते अगदीं एकटेच बसत व पोरासारखे रडत! त्यांच्या (भक्तांच्या) भेटीसाठीं ते अगदीं व्याकुल होत! रात्रीं त्यांना झोंपही येत नसे! ते **आईला** म्हणत, "आई, कृपा करून त्याला आपल्या कळपांत घे ना! गरीब बिचारा! काय त्याची तुझ्यावर भक्ति आहे! त्याला भेटायची मला किती किती पण इच्छा झाली आहे! **आई**, आण ना त्याला इथे एकदां! किंवा **आई**, तसें नसेल होत, तर मला तरी त्याच्याकडे घेऊन जा!" **बलरामाच्या** घरीं ते उठल्यासुटल्या जात, त्याचें हें तर इंगित नसेल ना? ते आपले ज्याच्या-त्याच्याजवळ असें म्हणत कीं, **बलराम** खरा भक्त आहे; तो जगन्नाथाची रोज सेवा करितो; तेव्हां त्याचें अन्न खरें शुद्ध! पण जेव्हां ते **बलरामाकडे** येत, तेव्हां त्याला ते लागलाच बोलावणीं करायला पाठवीत. ते त्याला म्हणत, "जा; **नरेंद्र**, **राखाल**, **भवनाथ**, **पूर्ण**, धाकटा **नरेंद्र**, **नारायण** इत्यादि सगळ्या भक्तांना बोलावून आण. त्यांना खाऊं घातलें, म्हणजे नारायणाला खाऊं घातल्यासारखेंच आहे. हीं सामान्य माणसें नाहींत. तीं ईश्वरांशच आहेत. यांना खायला घातलेंस, तर तुझें पुष्कळ बरें होईल."

रथजत्रेच्या वेळीं कीर्तनानंदाचें सगळें पीक **बलरामाच्याच** घरीं येत असे. प्रेमाच्या दरबारचा आनंद अनुभविण्याकरितां या ठिकाणीं भक्तांचा मेळा पुष्कळ वेळा जमत असे.

एम् हा जवळच्याच एका इंग्रजी शाळेंत शिक्षत होता. आज दहांच्या सुमारास **श्रीरामकृष्ण बलरामाच्या** घरीं येणार आहेत, अशी बातमी त्याच्या कानांवर गेली होती. मध्यें कांहीं वेळ त्याला काम नसल्यामुळें तो दोनप्रहरच्या सुमाराला **महाराजांना** भेटण्याकारितां आला. येऊन त्यानें **महाराजांना** प्रणाम केला.

दुपारचें जेवण आटोपून **महाराज** दिवाणखान्यांत आराम घेत बसले होते. अल्पवयस्क भक्त त्यांना चारी बाजूंनीं घेरून बसले होते. मधून मधून कांहीं मसाला व कबाबचिनी एका पिशवींतून काढून **महाराज** खात होते.

रामकृष्ण [प्रेमानें एमला]:–आलास तूं ! आज शाळा नाहीं का ?

एम्:–मी हा शाळेंतूनच आलों;–या वेळीं तिथे कांहीं विशेष काम नाहीं.

एक भक्त:–नाहीं, महाराज ! तो काम चुकवून शाळेंतून पळून आला आहे ! [सगळे हंसतात]

इतक्यांत **महाराज** कांहींसे विचारमग्न झाले. कांहीं वेळानें त्यांनीं एमला आपल्याजवळ बसवून घेतलें, व अनेक विषयांवर ते त्याच्याशीं भाषण करूं लागले. ते म्हणाले, "एवढा फडका पिळतोस का ? पीळ बघूं, आणि तेवढी बंडी उन्हांत सुकत घाल. माझे पाय दुखताहेत. त्यांजवर जरा हात फिरवतोस का ?" गुरुसेवा कशी करावी, हें एमला मुळींच ठाऊक नव्हतें. तें **महाराजांनीं** त्याला शिकविलें. तो त्यांच्या सांगण्याप्रमाणें एकेक काम मोठ्या उल्हा-

सानें करूं लागला. तो त्यांचे पाय चेपूं लागला; व महाराज गोष्टींच्या रूपानें उपदेश करूं लागले.

श्रीरामकृष्ण [एमला]:—काय रे, तुला याबद्दल काय वाटतें? आज किती दिवस झाले, असा विलक्षण प्रकार चालला आहे. धातूच्या कोणत्याही जिनसेला मला हात लावायची सोय नाहीं, असें झालें आहे. एकदां मीं वाटीला हात लावला; पुढें काय चमत्कार झाला, तुला ठाऊक आहे का? शृंगीमत्स्याचा कांटा हाताला बोंचल्यासारख्या मला वेदना होऊं लागल्या. हात अगदीं झणझणूं लागला. बरें, तांब्याशिवाय कसें चालणार? एकदां झाऊ-वृक्षांपर्यंत तांब्या घेऊन जावें असा मीं विचार केला. मीं तो फडक्यांत गुंडाळला आणि घेऊन जाऊं लागलों. हातांत घेतलामात्र, तों पुन्हा तशाच वेदना सुरू झाल्या! काय भयंकर वेदना त्या! अखेरीस प्रार्थना करून मीं आईला म्हटलें, 'आई, या वेळीं मला क्षमा कर; मी पुन्हा असें कधीं नाहीं करणार.' मीं कोणत्याही सुखोपभोगापासून अगदीं अलिप्त रहावें, म्हणून हा आईचा इशाराच आहे, असें नाहीं का तुला वाटत?

वैराग्य किंवा खरा संन्यासी.

एम्:—मला वाटतें, **महाराज**, हाच त्याचा खरा अर्थ असावा.

श्रीरामकृष्ण (एमला):—धाकटा **नरेंद्र** नेहमीं नेहमीं मला भेटायला येतो. त्याच्या घरचीं माणसें त्याला काय म्हणतील बरें? अहाहा! काय चांगला मुलगा आहे तो! किती शुद्ध! स्त्रीचा कधीं विटाळही त्याला झालेला नाहीं.

विषयराहित्य व ईश्वराकरितां तळमळ.

एम्:-खरें आहे, महाराज! तो कांहीं सामान्य कोटींतला माणूस नाहीं.

श्रीरामकृष्ण:-खरें आहे. आणखी तो म्हणतो, 'कोणतीही ईश्वरी कथा एकदां माझ्या कानांवर पडली, कीं ती माझ्या मनांत राहते.' म्हणतो, 'मी लहान असतांना रडत असें;-ईश्वर मला दिसेना म्हणून!'

धाकट्या **नरेंद्रा**संबंधानें एमबरोबर अशा अनेक गोष्टी चालल्या होत्या; इतक्यांत एक शिष्य म्हणाला, 'काय, मास्तरसाहेब! आपल्याला शाळेंत जायचें आहे ना परत?'

श्रीरामकृष्ण:-किती वाजले?

शिष्य:-एकाला दहा मिनिटें आहेत.

श्रीरामकृष्ण (एमला):-जा आतां तूं परत; फार उशीर झाला आहे तुला. काम सोडून आला आहेस तूं. (लाटूला) काय रे! **राखाल** कोठें आहे?

लाटू:-गेला तो;-घरीं.

श्रीरामकृष्ण:-काय म्हणतोस? मला भेटल्याशिवाय कसा गेला?

बिंदु २३ वा.

तिसऱ्या प्रहरीं: शिष्यांचे मेळ्यांत.

शाळा सुटल्यावर एम् पुन्हा आला. **बलरामाच्या** दिवाणखान्यांत शिष्यांच्या मेळ्यांत **महाराज** बसले होते, हें पाहून त्याला मोठा संतोष झाला. **महाराजांच्या** मुखावर मधुर स्मित खेळत

असून तें शिष्यवर्गाच्या मुखांवर प्रतिबिंबित झालें होतें. एमनें त्यांना प्रणाम केला. तेव्हां आपलेजवळ येऊन बसण्याला महाराजांनीं त्याला खुणविलें. गिरिश घोष, सुरेश मित्र, बलराम, लाटू, चुनिलाल, इत्यादि अनेक शिष्य त्या वेळीं हजर होते.

श्रीरामकृष्ण (गिरिशाला):–या मुद्द्याचा खल तूं **नरेंद्राबरोबर** कर. पहा, त्याचें काय म्हणणें आहे तें.

अवतारवाद.

गिरिश:—नरेंद्र म्हणतो, "ईश्वर अनंत आहे. जें काय आपण पाहतों, ऐकतों–मग तो एखादा पदार्थ असो, कीं व्यक्ति असो–तें सगळें ईश्वराचा अंश आहे, असेंही आपल्याला म्हणतां येत नाहीं; मग तें सगळें ईश्वर आहे, असें म्हणणें तर दूरच. अनंताचा अंश कोठला? अंश असणारच नाहीं. तोही कल्पनातीतच आहे."

महाराज:—ईश्वर अनंत आहे, यांत शंका नाहीं. पण तो मोठाही आहे, सर्वशक्तिमान् आहे. त्यानें मनांत आणल्यास आपल्या प्रेमस्वरूपानें प्रकट होऊन मनुष्यरूपानें अवतरणें त्याला कांहीं कठिण नाहीं. व तसा तो अवतरतोही. ईश्वर मनुष्यरूपानें अवतरतो ही गोष्ट खरी आहे.

अर्थात् नुसत्या शब्दांनीं–उपमांनीं–ही गोष्ट तितकी स्पष्ट करून सांगतां येणार नाहीं ज्ञानदृष्टीनें तिचा अनुभव आला पाहिजे. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन झालें पाहिजे; तरच खात्री होईल. उपमेच्या द्वारानें तिची फक्त अंधुक अंधुक कल्पना आणून देतां येईल. समज, आपण गाईच्या शिंगाला, किंवा पायांला, किंवा शेंपटीला,

किंवा कांसेला हात लावला, तर आपण गाईलाच हात लावल्या-सारखें झालें नाहीं का ? बरें, गाईसंबंधानें विचार केला, तर आम्हां माणसांना तिचें दूध हेंच मुख्य आहे. तें दूध कांसेंतून येतें. त्याच-प्रमाणें भक्तीचें दूध अवतारी पुरुषांपासून प्राप्त होतें. लोकांना भक्तीचें वळण लावण्याकरितां ईश्वर कधीं कधीं मनुष्यरूपानें अवतरतो.

गिरिशः—नरेंद्र म्हणतो, 'ईश्वराचें स्वरूप जाणतां येईल का ? आपल्या चिमुकल्या मेंदूला त्याची धारणा होईल का ? तो अनंत आहे !'

महाराज (गिरिशाला):—खरें आहे तें. ईश्वराची धारणा कोणाला होणार ? त्याच्या पूर्ण स्वरूपाचें ज्ञान

अनंताची धारणा.

कोणाला होणार ? त्याच्या पूर्ण स्वरूपाचें ज्ञान आपल्याला होणार नाहीं, व तें ज्ञान आपल्याला होण्याची जरू-रही नाहीं. पूर्ण स्वरूपाचें ज्ञान पाहिजे कशाला ? आपल्याला त्याचें प्रत्यक्ष दर्शन झालें,–जगांत तोच काय तो सत्य आहे, ए-वढी गोष्ट आमच्या मनाला पटली, कीं पुरे आहे. अवतारी पुरु-षाचें दर्शन झालें, तरी पुरे आहे. त्याचें (ईश्वराचें) दर्शन झा-ल्यासारखेंच झालें.

समज, एखाद्या माणसानें गंगेवर जाऊन गंगेच्या पाण्याला स्पर्श के-ला, तर तो काय म्हणतो ? तो म्हणतो, 'गंगेचें दर्शन व स्पर्शन क-रून मी आलों.' हरिद्वारापासून गंगासागरापर्यंत–गंगेच्या उगमा-पासून मुखापर्यंत–सगळ्या नदीला त्यानें स्पर्श केला पाहिजे, असें कांहीं नाहीं. [सगळे हासतात]

तुझ्या पायाला स्पर्श केला, कीं तुला स्पर्श केल्यासारखेंच झालें. समुद्रावर आपण गेलों व त्याच्या पाण्याला स्पर्श केला; तर समुद्राला आपण स्पर्श केल्यासारखेंच झालें.

अग्नितत्त्व सगळ्या जागीं आहे, सगळ्या वस्तूंत आहे, तरी इतर पदार्थांपेक्षां काष्ठांत त्याचा अंश ज्यास्त असतो.

गिरिश (सस्मित):–मी आपला त्या अग्नीच्याच शोधांत आहें. जिथे तो सांपडेल तीच जागा मला पाहिजे आहे. दुसरें कांहीं नको.

महाराज (सस्मित):–ठीक! काष्ठामध्यें तो विशेषत्वानें परमेश्वरानें ठेविला आहे. तूं परमेश्वराचे शोधांत आहेस का? ठीक आहे, मनुष्याच्या ठिकाणीं त्याला शोध! इतर वस्तूंपेक्षां तो मनुष्यांत चांगला प्रकाशमान आहे. ज्या माणसांत भक्ति अगदीं ऊर्जितावस्थेला पोंचली आहे,–जो माणूस ईश्वराकरितां सारखा तळमळतो आहे,–ज्याला ईश्वराचेंच वेड लागलें आहे,–जो प्रेमानें बेहोष झाला आहे, त्या माणसांत ईश्वर अवतीर्ण झाला आहे, असें निश्चित जाण.

(एमला):–ईश्वर सर्व वस्तूंत भरलेला आहे, हें खरें आहे; पण सर्व वस्तूंत त्याची शक्ति सारखी प्रकाशित नसते. कोठें कमी असते, कोठें ज्यास्त असते. अवतारी पुरुषांमध्यें त्याची शक्ति अत्यंत प्रकाशित झालेली असते.

गिरिश:–नरेंद्र म्हणतो, 'तो अवाङ्मानसगोचर आहे.'

महाराज:—असेंच नाहीं कांहीं केवळ. विकृत किंवा सोपाधिक मनाला तो गोचर नाहीं, हें खरें आहे; पण शुद्ध मनाला तो गोचर

आहे. बुद्धीला तो गोचर नाहीं; पण शुद्ध बुद्धीला तो गोचर आहे. शुद्ध मन, शुद्ध बुद्धि व शुद्ध आत्मा हीं एकच आहेत. मर्यादित बुद्धीला, किंवा मर्यादित, सोपाधिक, विकृत मनाला—विषयासक्त मनाला—कामिनी व कांचन यांच्यामागें धांवणाऱ्या मनाला—तो गोचर व्हावयाचा नाहीं, हें अगदीं खरें आहे. मनाची विषयासक्ति सुटली, सत्संस्कारांनीं तें शुद्ध झालें, वासना, आसक्ति व संसाराचा छंद यांतून तें मुक्त झालें, कीं त्याला शुद्ध आत्म्याचें स्वरूप प्राप्त होतें.

प्राचीन ऋषींना व मुनींना असाच परमेश्वर दिसला नाहीं काय? चैतन्याच्या द्वारें—शुद्ध मनाच्या द्वारें—त्यांना परमेश्वराचा—चैतन्याचा—साक्षात्कार झाला. शुद्ध मन म्हणजेच अंतरंगीं वास करून असलेला शुद्ध किंवा निरुपाधिक आत्मा, असें त्यांच्या प्रत्ययास आलें.

गिरिश (सस्मित):—नरेंद्र माझ्यापुढें हरला!

श्रीरामकृष्ण:—छे! उलट तो असें म्हणतो कीं, ईश्वर मनुष्य-रूपानें अवतरतो, या गोष्टीवर गिरिश घोषाचा विश्वास आहे; हा त्याचा विश्वास अगदीं अचल आहे; तेव्हां मीं काय बोलावें? अशा ठिकाणीं कांहीं न बोलणें हेंच बरें!

गिरिश (सस्मित):—महाराज, आपण सगळे बोलतों आहों; आपला वाक्प्रवाह सारखा सुरू आहे; पण हा एम् अगदीं तोंडाला कुलूप घालून बसला आहे. कसला एवढा विचार चालला आहे त्याचा? महाराज, कृपा करून सांगाना काय आहे तें?

[सगळे हासतात.]

महाराज (सस्मित):–

श्लोक.

(शार्दूलविक्रीडित.)

जो बोले जणुं भाट कीं बडबडे, वा जो मुखें दुर्बळ,
यत्कर्णीं तुलसीदलें झळकती, चित्तीं परी वादळ,
काढी स्त्री बहु लांबसा पदर जी, कासार नीलान्वित,
पांचांपासुनि दूर या मनुज जो तो हो सुखी निश्चित.

[सगळे हंसतात.]

ज्या माणसाची जीभ नेहमीं चालू असते, तो मनुष्य; ज्याच्या अंतःकरणाचा दरवाजा बंद असतो,–ज्याच्या अंतःकरणाचा ठाव कधीं लागत नाहीं, तो मनुष्य; आपल्या भक्तीचें प्रदर्शन करण्याकरितां जो नेहमीं कानांत तुळशीपत्रें घालतो, तो मनुष्य; जी तोंडावर लांब बुरखा ओढते, ती स्त्री; ज्याच्या पाण्यावर तवंग आलेला असतो, तें तळें; या पांचांसंबंधानें नेहमीं सावध असावें. तवंग आलेल्या तळ्याचें शीतल जल फार बाधक असतें. त्यांत स्नान केलें कीं, सन्निपात! पण आपला एम् तसा नाहीं कांहीं;– तो गंभीरात्मा आहे, म्हणून बोलत नाहीं.

[सगळे हंसतात.]

गिरिशः–पुन्हा म्हणतां का महाराज तें सुभाषित?

चुनिलालः–या एमच्या नांवानें लोक फार ओरडताहेत. आपला धाकटा नरेंद्र हा त्याचा शिष्य आहे; तसेच बाबूराम, नारायण, पल्टू, पूर्ण, तेजचंद्र, हे सर्व त्याचे शिष्यच आहेत. लोकांची कुरकूर अशी आहे कीं, एम् या मुलांना इथे घेऊन येतो;

त्यामुळें त्यांचें अभ्यासाकडे दुर्लक्ष होतें. याचा सगळा दोष ते **एम**-वर ढकलतात.

महाराज:—अरेच्या! त्यांच्या या कुरकुरीवर विश्वास कोण ठेवणार पण?

अशा गोष्टी चालल्या होत्या, इतक्यांत **नारायणानें** येऊन **महाराजांना** प्रणाम केला. **नारायण** गौरवर्ण असून १७।१८ वर्षांचा होता. तो विद्यार्थी असून **श्रीरामकृष्णांचें** त्याच्यावर फार प्रेम होतें. त्यांचा त्याच्यावर इतका जीव होता कीं, ते त्याच्या भेटीसाठीं अगदीं व्याकुल होत. कधीं कधीं आईपुढें बसून ते त्याच्यासाठीं रडत. **नारायण** हा साक्षात् नारायण आहे, असें त्यांना वाटे.

गिरिश (नारायणाला पाहून):—अरे वा! तुला कुणीं लागलीच बातमी पोंचविली, **महाराज** इथे आले आहेत म्हणून? मला वाटतें, हें सगळें **एमचें** कारस्थान आहे. [सगळे हासतात]

श्रीरामकृष्ण:—हां! तोंड आटप ना! आधींच त्या बिचाऱ्याचें नांव बद्दू झालें आहे.

× × × ×

पुढें **नरेंद्रच्या** गोष्टी निघाल्या.

एक शिष्य:—पहिल्यासारखा आतां तो इथे येत नाहीं.

महाराज:—येत नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

साकी.

माध्यान्हींच्या पोटपुजेची चिंता दुर्घट भारी ॥
तिजपुढतीं श्रीकालिदासही विसरे कविता सारी ॥

[सगळे हंसतात]

बलराम:—**शिवू गुहाचा** नातू **अन्नदा गुह** याचा तो मोठा मित्र आहे. त्याच्याबरोबर तो नेहमीं असतो.

महाराज:—होय, त्याचा कोणसा मित्र आहे, तो सरकारी नोकर आहे. त्याच्या घरीं बहुधा ते सगळे जमत असतात. ते आपला ब्राह्मसमाज तिथे भरवितात.

बलराम (सस्मित):—**अन्नदा गुहा**ला ग-ची बाधा फार आहे, असें ब्राह्मण म्हणतात.

श्रीरामकृष्ण:—ब्राह्मणांची बोलणीं नको ऐकूं तूं. त्यांचा स्वभाव तुला ठाऊकच आहे; जो त्यांना यथेच्छ देतो, तो चांगला; बाकी सगळें जग वाईट! (सगळे हासतात.) **अन्नदा**ला मी ओळखतों, छान माणूस मोठा!

प्रतिग्रह व मतामत.

बिंदु २४ वा.

शिष्यांसह भजनानंदांत.

इतक्यांत **महाराजांनीं** भक्तिपर पदें ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. **बलरामा**चा दिवाणखाना लोकांनीं अगदीं चिकार भरला होता. सर्वांचे डोळे **महाराजांक**डे लागले होते; त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द ते उत्कंठेनें ऐकत होते; ते काय करतात, हें ते आतुरतेनें पाहत होते. **तारापदा**ला गायला सांगितलें. श्रीकृष्णाच्या लीला ज्यांत वर्णिल्या आहेत, असें एक पद म्हणण्याला त्यानें सुरुवात केली,—

पद.

(चाल-स्फटिकाचे ते पदपथ सुंदर०)

ध्याइं मना रे ! ध्याइं निरंतर कृष्ण मुरारी कुंजविहारी ॥ ध्रु० ॥
वृंदकिशोरा फणि-वध-चतुरा कातर-भवभय-भंजन-धीरा ॥
गोवर्धनधर यादव-वीरा ललितराधिकाचेतश्चोरा ॥
माधव मधुहर नयनमनोहर मोहन-मंजुल-मुरली-धारी ॥
॥ ध्याइं...१ ॥

अंबुजनेत्रा ! अंबुजवक्त्रा ! नवशिखि-पुच्छकभूषण-शीर्षा !
गोपी-मुखशशिचारुचकोरा ! वनसुममालागलावतंसा !
केशव ! करुणा करिं कलिशमना ! उद्धरिं दीना व्रजवनचारी ! ॥
॥ ध्याइं...॥ २ ॥

यमुनापुलिनक्रीडासक्ता ! योगीजनहृन्मानसहंसा !
भामाधरमधुपानमिलिंदा ! मधु-गोविंदा ! हे धृतवंशा !
श्यामकन्हैय्या ! धरिं या हृदया, रामारंजनरास-विहारी ! ॥
॥ ध्याइं...॥ ३ ॥

श्रीरामकृष्ण (गिरिशाला):—काय गोड पद आहे ! तूं केलेंस का हें ?

एक शिष्य:—होय, महाराज ! चैतन्यलीलेंतील सगळीं पदें त्यानेंच केलीं आहेत.

श्रीरामकृष्ण (गिरिशाला):—हें पद खूप छान उतरलें आहे ! (गायकाला) निताईचें (चैतन्याचा भाऊ) एखादें पद येतें का तुला ?

पुन्हा त्यानें पद म्हटलें. त्यांत निताई प्रेमाचा (भक्तीचा) उपदेश करीत आहे:—

---

१. एक नाटक.

पद.

(**चाल**--माना मानुं नको अपमाना...)

या हो ! भक्तिलिप्सु हो या हो ! प्रेमसुखाचा लाहो;
वृंदावनिं जे राधा देई भक्तिपाठ ते घ्या हो ! ॥ ध्रु० ॥
आली, प्रेमसागरा आली, महा भरति या कालीं,
परी ओहटी क्षणांत लागे, या भक्तिभाग्यशाली ! ॥
वाहे, भक्तिसुधा शतधा हे,
तुंद धुंद व्हा यथेच्छ पिउनी जितुकें निजमन लाहे ।
साचें, दिव्यमधुप्रेमाचें, भक्तिभाग्य राधेचें,
विमलभक्तमणिमाले-माजी स्थान तिचें मेरूचें ॥
गा हो ! श्रीहरी बोला हो !
राधाजीवन जीवें गाउनि फोडा सत्वर टाहो ॥ या हो...
थोडी, प्रेमरसाची गोडी,
घेतां तुटुनी बंध जिवाचे फिटति अघाच्या कोडी ॥
प्राण, होति पूर्ण बेभान, आत्मानंदविलीन,
करितां प्रेमें विमल मनानें भक्तिसुधारसपान ॥
बाष्प, नेत्रीं गळति अपाप, प्राशुनि ते निष्पाप,
नाचे मत्तप्राणमयूरी विसरुनि चेतस्ताप ॥
या हो, प्रेमानंदें गा हो, म्हणुनी राधानाहो,
राधाजीवन जीवें गाउनि फोडा हरिचा टाहो ॥ या हो...

पुढलें पद श्रीगौरांगासंबंधानें होतें:--

पद.

(**चाल**—सुवर्णकेतकीपरि जो दिसतो ...)

धरुनि कोणता फिरसी हेतू गौरांगाच्या वेशीं ॥
काय सुखाचा सौभाग्याचा लाहो तूं मिळवीशी ॥ ध्रु० ॥
मज्जन घडलें भक्तिरसाच्या जलधीमाजी तुजला ॥

उत्कंठेच्या महा मारुतें उदधि तरंगित झाला ॥
सोडुनि गृहकुल तुजसाठीं हे मिळतीलचि भक्त तुशीं ॥
केविं तरी रे मन हें माझें मोहुनिया तूं घेशी ॥ १ ॥
गोकुलिं सखया! गोकुल चारुनि फिरसी रानोरानीं ॥
मोहित केल्या गोपी करिं तूं मोहनमुरली धरुनी ॥
मानभंगिनी गोपींच्या तूं पदिं लोळण घेसी ॥
त्या न ऐकतां खिन्न होउनी किंति रडकुंडी येसी ॥
वदनशशी तव बाष्पसागरीं लागे पोहायासी ॥
केविं तरी हें मन माझें गा! मोहुनिया तूं घेसी ॥ २ ॥

तूं एक पद म्हण, असा सगळे एमला आग्रह करूं लागले. एम् लाजवटपणानें मला माफ करा, असें सगळ्यांना विनवूं लागला.

गिरिश (महाराजांना सहास्य):—महाराज! किती सांगितलें तरी हा एम् पद कांहीं म्हणत नाहीं! (सगळे हंसतात.)

श्रीरामकृष्ण (विरक्तपणें):—तो शाळेंत दांत दाखवील! नी परमेश्वराचें नांव घ्यायला त्याला एवढी लाज वाटते!

एम् कांहीं वेळ अगदीं चिमणीएवढें तोंड करून बसला.

सुरेश मित्र हा एक **महाराजांचा** शिष्य असून तो **महाराजांपासून** दूर बसला होता. **श्रीरामकृष्णांनीं** सस्नेह दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें, व **गिरिश घोषाकडे** बोट करून हंसत ते बोलूं लागले:—

श्रीरामकृष्ण:-(सुरेशाला):—आपण पूर्वीं मूर्खपणांत दिवस घालविले, असें तूं म्हणतोस ना? याची तर तुझ्यावर कडी आहे!
(सगळे हंसतात.)

सुरेश (सहास्य):—खरें आहे महाराज! त्या कामांत तो माझा दादाच आहे. (सगळे हंसतात.)

गिरिश (महाराजांना):—लहानपणीं मीं कधीं अभ्यासाकडे लक्ष दिलें नाहीं, तरी लोक आपले मला विद्वान् म्हणतात; हें कसें काय?

श्रीरामकृष्ण:—महिम चक्रवर्ती यानें अनेक शास्त्रें पाहिलीं आहेत, ऐकलीं आहेत. (एमला) नाहीं का रे एम्?

एम्:—होय महाराज!

गिरिश:—काय म्हणतां आपण महाराज? विद्या? आहे ठाऊक मला विद्या! मीं पुष्कळ विद्या पाहिली आहे! मला नाहीं तिचें एवढें कांहीं वाटत.

महाराज (हंसत हंसत):—विद्येबद्दल मला काय वाटतें, तुला ठाऊक आहे का? पुस्तकें—शास्त्रें—हीं फक्त ईश्वराकडे जाण्याचा मार्ग कोणता, हें दाखवून देतात. तो मार्ग एकदां कळला, कीं मग पुस्तकांचा काय उपयोग? एकान्तांत ईश्वरचिंतन करून आत्मोन्नतीचा मार्ग चोखाळणें, एवढेंच कार्य मग करावयाचें असतें.

एकदां एका माणसाला एक पत्र आलें; त्यांत त्याच्या आप्तांनीं कांहीं जिनसा पाठवून देण्याला लिहिलें होतें. त्याप्रमाणें जिनसा खरेदी करण्याकरितां तो निघाला; पण पाहतो, तों पत्र कुठे सांपडेना! पुष्कळ शोधलें त्यानें; कांहीं पत्ता लागेना. घरांतलीं दुसरीं माणसें पण शोधूं लागलीं. अखेरीस सांपडलें एकदांचें तें पत्र; तेव्हां त्याच्या आनंदाला सीमा नाहींशी झाली! मोठ्या उत्सुक-

तेनें त्यानें तें पत्र घेतलें व वाचलें. त्यांत पांच शेर मिठाई, कांहीं कापड, वगैरे वगैरे जिनसा पाठवाव्या, असें लिहिलें होतें. जिनसांचीं नांवें जेव्हां त्याला समजलीं, तेव्हां त्यानें पत्र दिलें फेकून व तो जिनसा खरेदी करण्याकरितां गेला निघून.

तेव्हां असल्या पत्रांची मातब्बरी कोठपर्यंत ? जिनसांची यादी समजली नाहीं तेथपर्यंत. ती यादी समजली, म्हणजे त्या जिनसा मिळविण्याचा उद्योग करणें, हेंच पुढलें काम.

त्याचप्रमाणें शास्त्रांत ईश्वरप्राप्तीचे उपाय सांगितलेले असतात; एकदां मार्ग कळला, म्हणजे साध्य हातीं येण्याच्या खटपटीला लागणें, हीच पुढची पायरी. वस्तुलाभ—ईश्वरप्राप्ति—हेंच साध्य.

केवळ पुस्तकी विद्येचा काय उपयोग ? नुसतें पांडित्य काय कामाचें ? अनेक श्लोक, अनेक शास्त्रें पंडितांना मुखोद्गत असतील; पण तीं नुसतीं पाठ असून काय फायदा ? शास्त्रांतील तत्त्वें अनुभवांत उतरलीं पाहिजेत. जोंपर्यंत संसारावर आसक्ति आहे, जोंपर्यंत कामिनी व कांचन यांच्यामागें मन लुडबुडतें आहे, तोंपर्यंत नुसत्या वाचनानें ज्ञान किंवा मुक्ति यांचा लाभ कधींही व्हायचा नाहीं.

पंचांगांत इतकी इतकी पर्जन्यवृष्टि होईल, असें सांगितलेलें असतें; पण पंचांग पिळा बघूं, एक थेंबही मिळायचा नाहीं ! एक थेंब तरी पडूं दे, असें जरी तुम्हीं म्हटलें, तरी तो नाहींच पडायचा !

(सगळे हंसतात.)

गिरिश (सहास्य):--महाराज, काय म्हणतां आपण ? पंचांगांतून एक थेंबही नाहीं येणार ? [सगळे हंसतात.]

महाराज (सहास्य):—पंडित बोलेल तोंडानें लांब लांब गोष्टी; पण त्याची नजर कुठे असेल? कामिनी व कांचन, किंवा देहसुख व पैसा यांवर. गिधाड उडतें खूप उंच; पण त्याची नजर असते स्मशानभूमीकडे—मेलेलीं गुरेंढोरें टाकतात तिथे. (सगळे हंसतात) तें आपल्या उंच ठिकाणावरून सारखी नजर लावून बघत असतें; स्मशानभूमि कुठे आहे, मेलेलीं जनावरें कुठे टाकलीं आहेत, मढीं कुठे पडलीं आहेत!

नरेंद्र.

[गिरिशाला]:—नरेंद्र फार चांगला आहे. सगळे गुण त्याच्या आंगांत आहेत. इकडे पाहावें, तर तो गातो, वाजवतो; बरें तिकडे पाहावें, तर विद्येच्या सगळ्या शाखांत आपला निपुण. मोठा सत्यवादी व जितेंद्रिय! त्याच्या अंगीं विवेक आहे, वैराग्य आहे. अनेक गुण त्याच्या ठिकाणीं आहेत.

(एमला):—काय रे? तो चांगला आहे, असें नाहीं तुला वाटत?

एम्:—खरें आहे, महाराज, आहे खरा तो आपण म्हणतां तसा.

श्रीरामकृष्ण (हळूच एमला):—पहा त्याचा (गिरिशाचा) ईश्वरावर केवढा अनुराग व विश्वास आहे तो;—अगदीं पर्वतासारखा अढळ!

एम् सविस्मय **गिरिश**कडे पाहूं लागला. **गिरिश महाराजां**कडे अलीकडेच येऊं लागला होता. पण तो आपला पूर्वपरिचित आहे,—अनेक दिवसांचा मित्र आहे,—आपला स्वकीय बंधुच आहे,—एका सूत्रांत ओंविलेल्या मणिगणांतला एक मणिच आहे, असें एम्च्या मनाला वाटूं लागलें.

× + + +

नारायण म्हणाला, महाराज, कृपा करून कांहीं गाणीं म्हणाल का?

यावर **श्रीरामकृष्ण** आपल्या मधुर कंठानें आईच्या नाम-गुणांचें गायन करूं लागले:--

पद.

(चाल—प्रिये चारुशीले. झंपा.)

नमीं भगवती कालिका विश्वजननी ॥
धन्य होई मना तीस भजुनी ॥ ध्रु० ॥
कडकडुनि भेटुनी, हृदयिं आलिंगुनी,
बाष्पजलिं न्हाणुनी, तिजसि हर्षें ॥
पाहुं ती चिन्मया, तूं नि मी मिळुनिया,
तिजविना लोकिं या, बघुं न कोणी ॥ १ ॥
निरसुनी कामना, पाहुं मग चल मना,
तामरस-लोचना, इंदुवदना ॥
ये परी संगतीं, स्वरसपटु जीभ ती,
कीं वदूं निश्चितीं, धांव जननी ! ॥ २ ॥
घोरपथगामिनी, वासना स्वैरिणी,
निकटनिजवर्तिनी, करिं न तीतें ॥
कृष्णपददर्शिका, ज्ञानदृक्पोषिका,
होउ ती वीथिका, पापहरिणी ॥ ३ ॥

आपण त्रितापतापित संसारी जन आहों, अशी भावना करून **महाराज** दुसरें पद आईला उद्देशून म्हणूं लागले:—

पद.

(चाल—नृपममता रामावरतीं.)

आनंदमयी तूं जननी ॥ कां न मिळे मज तो भुवनीं ॥ वद तरी ॥
पूज्यपादपद्मावीणें ॥ माते ! मी कांहीं नेणें ॥ खचितची ॥

मग तपनतनय नयमूर्ती ॥ कां दावी जीवा भीति ॥ ही अशी ॥
शांकरी, भुवनसुंदरी, सगुणमंजरी,
देउं त्या जननी ॥ उत्तर मी काय निदानीं ॥ वद तरी ॥ १ ॥
नामाची नौका करुनी ॥ हा भवाब्धि जावें तरुनी ॥ खचितची ॥
हीच या मनाची आर्ती ॥ आत्यंतिक उत्कट होती ॥ खचितची ॥
पारि अपार पारावारीं ॥ बुडविशील मज निर्धारीं ॥ खचितची ॥
मानसीं, स्वप्निंही तशी, कुशंका अशी,
पालिनी जननी ॥ आलि न कधीं मजलागोनी ॥ खचितची ॥ २ ॥
पूर्णकाम तव भक्तांशीं ॥ करुनी ने जें मोक्षासी ॥ जननि गे ॥
त्या तुझ्या मधुर नामासीं ॥ घेतों मी रात्रंदिवशीं ॥ जननि गे ॥
दुःखांची तरि ही राशी ॥ अद्यापि न सोडी मजसीं ॥ जननि गे ॥
सुरनुते ! मजसि वाटतें, दुःख हेंच तें,
यांत कीं जननी ॥ मरतां मी न भजे कोणी ॥ तुजसि गे ॥ ३ ॥

पुढें, ज्यांत आईच्या आनंदाचें वर्णन केलें आहे, असें पद त्यांनीं म्हटलें. आई ब्रह्मानंदानें अगदीं वेडी होऊन गेली आहे, असें त्यांना दिव्य दृष्टीनें दिसत होतें.—

पद.

(चाल—सुटला पितृ-दिशेचा वारा...)

असतां जननी ! शिवसंगतीं ॥ होसी मोदमग्न तूं किती ॥ ध्रु० ॥
जारि तूं प्रेमसुधा प्राशुनी ॥ होसी धुंदचि रात्रंदिनीं ॥
(चा. व.) किती नवल हें तरी न ढळे पद या क्षितीं ॥
पारि पडे तळीं शिव हले न लव तो सती ॥ ॥ १ ॥
विपरीत रतातुर तूं जनी ! ॥ पदभर कांपवि तव मेदिनी ॥
उभि तुं शिवहृदयीं मानिनी ! ॥ चढली धुंदि किती लोचनीं ॥
(चा. व. कमान चढली तुझी न बघवे मज संप्रती ॥
शिव दृष्टि पिशाची तशी ताठली किती ॥ अस० ॥ २ ॥

× × × ×

शिष्यगण निस्तब्धपणें गाणीं ऐकत होता. महाराजांच्या वृत्तींत जो बदल झाला होता, तिकडे त्याचें लक्ष लागलें होतें. ' ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी ?' अशी त्यांची अवस्था झाली होती. वृत्ति आत्मानंदांत अगदीं रंगून गेल्यामुळें त्यांना देहभानहीं नव्हतें. हरिरसमदिरेनें ते अगदीं बेहोष झाले होते.

गाणें आटोपलें. कांहीं वेळानें महाराज म्हणाले, आज माझ्यानें नीट म्हणवत नाहीं; सर्दी झाली आहे !

बिंदु २५ वा.

संध्यासमयीं.

संध्याकाळ झाली. सागराचें वक्षःस्थल, निबिड अरण्य, गगनचुंबित पर्वतशिखरें, यांवर अनंताची कृष्णच्छाया पसरली. वायुविकंपित व कलरवपूर्ण अशा नदीच्या तीरावर व दिग्दिगन्तव्यापी परिप्रांतावर तिनें आपलें भयाण स्वरूप प्रगट केलें. असा हा देखावा पाहून क्षुद्र असा जो मनुष्य त्याच्या मनांतही भावांतर होऊन जातें. त्याच्या मनांत विचारमाला सुरू होते. कांहीं क्षणांपूर्वी जो सूर्य चराचर विश्वाला प्रकाशित करीत होता, तो गेला कोठें ? या प्रश्नानें बालकाचें चिमकुलें डोकें गोंधळून जातें ! कारण बालक हें जगाला अपरिचितच असतें. तीच स्थिति त्या महापुरुषाची (रामकृष्णांची) झाली; कारण त्यांची वृत्ति बालकासारखीच असे. आपण निरंतर आईच्या कृपेखालीं व नजरेखालीं आहों, असें त्यांना वाटे. संध्यासमय ! केवढें आश्चर्य हें ! कोणत्या दिव्य शक्तीनें

घडवून आणलें हें? पक्षी वृक्षस्कंधांचा आश्रय करून मधुर शब्द करूं लागले. ज्या मनुष्यांमध्यें चैतन्यजागृति झाली होती, तीं मनुष्येंही त्या आदिकवीचें, त्या कारणांच्या कारणाचें, त्या पुरुषोत्तमाचें नाम गाऊं लागलीं.

बोलतां बोलतां संध्याकाळ झाली. शिष्य जागच्या जागीं बसून राहिले होते. **श्रीरामकृष्ण** मधुर नामाचें गायन करीत होते; व शिष्य उद्ग्रीव व उत्कर्ण होऊन तें ऐकत होते. त्यांच्या मुखांतून स्रवणारी ती नामगंगा किती मिष्ट होती म्हणून सांगावें! तिची मिष्टाई त्या वेळीं जशी त्यांच्या अनुभवास आली, तशी केव्हांच आली नव्हती! केवळ अमृताचा वर्षावच तो!

रामकृष्णांच्या मुखांतून 'आई! आई!' असा सारखा जप चालला होता. कोणाही मुलाच्या मुखांतून 'आई! आई!' हे शब्द तितके प्रेमळपणें व मधुरपणें निघालेले त्यांनीं आजपर्यंत पाहिले व ऐकले नव्हते! **महाराजांच्या** मुखांतून ही सुधाबिंदूंची वृष्टिच होत आहे कीं काय, असा त्यांना घटकाभर भास झाला! अनंत आकाश, गगनचुंबित पर्वत, नीलवर्ण महासागर, दिगंतप्रांत, गहन अरण्य, यांचा आश्रय करून जगन्नायकाचा शोध करण्याचें आतां काय प्रयोजन उरलें? गाईचें शिंग, किंवा पाय, किंवा तिच्या शरीराचा कोणताही भाग आतां पाहण्याचें काय कारण? गाईच्या स्तनांतून भक्तीचें दूध काढावें, असे उद्गार आज महाराजांच्या मुखांतून निघाले! आज याच खोलींत तशाच अवतारी पुरुषाचें मला सुदैवानें दर्शन होत आहे काय? तसें नाहीं म्हणावें,

तर सर्व शिष्यांच्या अशान्त—-त्रिविध तापानें क्षुब्ध झालेल्या—मनांना शांतिलाभ होत आहे, तो कशानें? ही निरानंद व दुःखपूर्ण धरा आनंदपूर्ण कां दिसूं लागली? आपल्यापुढें असलेला हा पुरुष मूर्तिमंत ईश्वर असावा का? तो ईश्वर असो कीं नसो, माझें मन मीं त्याच्या चरणीं अर्पण केलें आहे! आतां तेथून तें हलायचें नाहीं! त्यानें (त्या पुरुषानें) त्याचें (त्या मनाचें) आतां वाटेल तें करावें! त्याला मीं आपल्या जीवनाचा आतां ध्रुवतारा केला आहे! त्याच्या हृदयसरोवरांत तो आदिपुरुष कसा प्रतिबिंबित झाला आहे, हें पाहणें हेंच आतां माझें काम!

कांहीं शिष्यांचे मनांत असे विचार चालले होते. **रामकृष्णां**च्या मुखांतून चाललेला हरिनामाचा—त्या विघ्नदुःखनाशनाच्या नामाचा—व आईच्या नामाचा घोष ऐकून आपण कृतकार्य झालों, असें त्यांना वाटलें.

नामगुणकीर्तनान्तीं **महाराज** आईची प्रार्थना करूं लागले.

प्रार्थना कशी करावी हें महाराज सांगतात.

त्या वेळीं असें वाटलें कीं, प्रार्थना कशी करावी, हें शिकविण्याकरितां साक्षात् प्रेममय भगवंतानें हें मनुष्याचें रूप घेतलें आहे. ते म्हणाले, "आई! मी शरणागत आहें. भक्तांना तुझा विसर पाडणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत, त्या त्या गोष्टींपासून तुझ्या चरणकमलांनीं मला दूर ठेवावें! आई, मला देहसुखाची अपेक्षा नाहीं! लोकमान्यता मला नको! (अणिमादि) अष्टसिद्धींची मला जरूर नाहीं! माझी प्रार्थना आई, एवढीच आहे कीं, तुझ्या पादपद्माच्या ठिकाणीं

माझी शुद्ध—निष्काम, निर्मल, अहेतुक, आंतरिक—अशी भक्ति असो! तसेंच आई, तुझ्या भुवनमोहिनी मायेनें मुग्ध होऊन हें बालक तुला न विसरो! हो! तूं आपल्या अद्भुत मायेनें जें हें संसाराचें—कामिनी व कांचन यांचें—मोहक जाळें त्याच्याभोंवतीं पसरलें आहेस, त्यांत तें (बालक) गुरफटून जाऊन त्याला तुझा विसर न पडो! मोहाला वश होऊन त्याचें मन, आई, त्यांवर (कामिनी व कांचन यांवर) बसणार नाहीं, असें कर. या जगांत तुझ्यावांचून, आई, माझें असें कोणी नाहीं, हें तूं पाहतेस ना! तुझ्या नामाचें कीर्तन करावें कसें, हेंही, आई, मला समजत नाहीं बरें!— आई, मी साधनहीन, ज्ञानहीन, भक्तिहीन आहें! तेव्हां कृपा करून तुझ्या पादपद्मीं माझी भक्ति जडूं दे!"

रात्रंदिवस ज्याच्या मुखांत हरिनाम होतें,—ज्याच्या श्रीमुखांतून नामगंगा निरवच्छिन्नपणें स्रवत होती—त्या महापुरुषाला या सायंसंध्येचें कां बरें प्रयोजन असावें? लोकसंग्रहार्थ—केवळ लोकशिक्षेसाठीं—महाराज हे विधि पाळीत असावे का?

\+ \+ \+ \+

गिरिशानें आपल्या घरीं येण्याबद्दल **महाराजांना** आमंत्रण दिलें होतें. त्याच रात्रीं तिकडे जायचें होतें.

महाराजः—बरीच रात्र होईल, असें नाहीं का तुला वाटत?

गिरिशः—नाहीं, महाराज! आपल्या इच्छेस येईल, तेव्हां आपण परत यावें. मला पण आज **नाटकगृहांत** जायचें आहे;—

१ 'स्टार थिएटर' या नाटकगृहाचा गिरिश व्यवस्थापक होता.

तिथे कांहीं भांडण झालें आहे, तें मला मिटवलें पाहिजे.

माडीवरून खालीं येतां येतां **महाराजांची** वृत्ति पालटली. ते भगवद्भावांत विलीन होऊन गेले; दारूनें झिंगल्यासारखी त्यांची अवस्था झाली! **नारायण** व **एम्** हे त्यांच्याबरोबर होते. **राम, चुनि**, इत्यादि अनेक शिष्य मागून येत होते.

बेभान! त्यांचें इंद्रिय-ज्ञान अगदीं नष्ट होत चाललें आहे, असें दिसूं लागलें. जिन्यावर पाय चुकून ते पडूं नयेत, म्हणून त्यांचा हात धरण्याकरितां **नारायण** पुढें झाला. **महाराजांना** तें आवडलें नाहीं, ते त्रासल्यासारखे दिसले!

कांहीं वेळानें ते **नारायणाला** प्रेमानें म्हणाले, तूं माझा हात धरलास, तर लोकांना वाटेल, मी झिंगलों आहें; मी जातों असाच.

बोसपाऱ्यांतील दुसरें वळण त्यांनीं टाकलें; **गिरिशाचें** घर तिथून जवळच होतें. तितक्यांत ते जलद चालूं लागले. कां, कोण जाणे! शिष्य मागें पडले! कोणत्या दिव्य भावानें त्यांचें हृदय व्यापलें होतें, कांहीं कळेना!

अभिष्टासारखीं पावलें टाकीत ते कां बरें चालले होते? वेदांमध्यें ज्याला वाङ्मनोतीत असें म्हटलें आहे, त्याचें चिंतन करीत असल्यामुळें त्यांची अशी अवस्था झाली असावी काय? कांहीं वेळापूर्वीं **बलरामाच्या** घरीं त्यांनीं असें म्हटलें कीं, प्रपंचमुक्त शुद्ध मनाला **तो पुरुष** अगोचर नाहीं; शुद्ध मनाला त्याचा साक्षात्कार होण्यासारखा आहे,—शुद्ध मनाला **तो** गोचर आहे; आणि शुद्ध मन, शुद्ध बुद्धि व शुद्ध आत्मा हीं एकच आहेत!

तेव्हां असें वाटतें कीं, त्यांना त्या वेळीं त्या पुरुषाचा साक्षात्कार होत असावा! जें जें कांहीं आहे, तें तें ईश्वररूपच आहे, या तत्त्वाची अनुभूति का ही?

इतक्यांत **नरेंद्र** (विवेकानंद) आला. '**नरेंद्र, नरेंद्र, नरेंद्र**' असा **महाराजांचा** किती तरी दिवस जप चालला होता. जसें कांहीं **नरेंद्राचें** वेड लागलें होतें त्यांना! पण आतां असा चमत्कार झाला कीं, **नरेंद्र** प्रत्यक्ष त्यांच्यापुढें उभा राहिला असतां ते त्याच्याशीं एक अक्षरही बोलतना! जिला 'भाव' म्हणतात, तीच का अवस्था ही?—ज्या अवस्थेंत **श्रीगौरांग** (चैतन्य) निरंतर असत असें सांगतात? या भावावस्थेचें मर्म कोणाला कळणार?

गिरिशाचें घर ज्या गल्लींत होतें, त्या गल्लीच्या तोंडाशीं ते येऊन पोंचले. मागें शिष्यगण होता. या वेळीं ते **नरेंद्राशीं** संभाषण करूं लागले. ते म्हणाले, 'बरें आहे ना बाबा? आतांपर्यंत मला तुझ्याशीं बोलवेनाच!' त्यांच्या तोंडांतून पडणारा प्रत्येक शब्द कारुण्यपूर्ण होता.

अद्याप ते दरवाजांत येऊन पोंचले नव्हते. इतक्यांत मध्येंच ते थांबले. **नरेंद्राकडे** पाहून ते म्हणाले, 'एकच शब्दः—हा एक (देही, जीव?) आणि तें दुसरें (जगत्?)'

जीव व जगत् यांचें स्वरूप ते पहात असावे का? तसें असेल, तर कोणत्या भावानें बरें? काय सांगावें? एक त्यांचें त्यांना ठाऊक! स्तब्धपणें ते पहात होते! वेदवाक्याप्रमाणें–वेदवाणीप्रमाणें त्यांच्या मुखांतून एकदोन शब्दमात्र बाहेर पडले!

अथवा, एखाद्यानें अनंत अशा सागराच्या तीरीं जावें, व निःशब्दपणें त्याचा अमर्याद विस्तार पहात असावें; इतक्यांत त्या अनंत तरंगमालेपासून उद्भवणाऱ्या अनाहत शब्दाचे एकदोन प्रतिध्वनिमात्र त्याच्या कानांवर येऊन आदळावे, तसेंच का इथे झालें ?

बिंदु २६ वा.

ईश्वरी अवतार.

द्वारभागीं **गिरिश** उभा होता. **महाराजां**ना आंत नेण्याकारितां तो सामोरा आला होता. शिष्यगणासह **महाराज** आंत येऊन ठेपले; त्यांचें पवित्र दर्शन झाल्याबरोबर त्यांच्या चरणीं तो दंडवत् आडवा पडला ! हा देखावा मोठा आनंदजनक होता, व तो पाहून शिष्यगणाला मोठें कौतुक वाटलें.

महाराजांची आज्ञा होतांच **गिरिश** उठला. त्यांची पदधूली घेऊन त्यानें मस्तकीं धारण केली व आपल्या सर्वांगास चर्चिली. नंतर **महाराजां**ना घेऊन तो माडीवरील दिवाणखान्यांत गेला. तेथें सर्व मंडळी बसली. बसतांना जागेसाठीं अगदीं धडपड उडाली; प्रत्येकाची आपली इच्छा ही कीं, होतां होईल तों **महाराजां**च्या अगदीं जवळ आपल्याला बसायला मिळावें. त्यांच्या मुखांतून स्रवणाऱ्या चिरजीवनदायी वाक्सुधेचें पान करण्याकारितां सर्व अगदीं उत्कंठित झाले होते.

महाराज जों बसायला जातात, तों तिथे एक वर्तमानपत्र पड-

श्रीरामकृष्ण व वर्तमानपत्रें.

लेलें त्यांना दिसलें. वर्तमानपत्रांत काय, विषयी –संसारी–लोकांच्या गोष्टी! विषय, कथा, परचर्चा व परनिंदा यांनीं तीं भरलेलीं असावयाचीं. तेव्हां तीं अपवित्र–अर्थात् त्यांच्या दृष्टीनें. त्यांनीं खूण केली, तेव्हां तें पत्र उचलून ठेवलें. मग ते खालीं बसले. **नित्यगोपाल** यानें त्यांना प्रणाम केला.

महाराज (नित्याला)–आँ! इथे?

नित्य–होय महाराज! मला **दक्षिणेश्वरीं** येववेना. प्रकृति बरी नव्हती. सगळें शरीर ठणकत होतें.

महाराज–आतां कसें काय? बरें आहे ना?

नित्य–तितकें कांहीं बरें नाहीं.

महाराज–एकदम टिपेला न भिडतां एकदोन सूर तूं खालींच रहावें, हें बरें!

नित्य–मंडळी हवी तशी नाहीं. ती माझ्यासंबंधानें वाटेल तें बोलते. त्यामुळें मनाला बरें वाटत नाहीं. भय वाटतें. कधीं मन निर्भय होऊन अंतःशक्तीचा–आत्मशक्तीचा मनाला खूप धीर वाटतो.

महाराज–तसें होणें साहजिक आहे. तुझ्याबरोबर नेहमीं कोण असतो?

नित्य–**तारक**. त्याचीही संगति कधीं कधीं बरी वाटत नाहीं.

महाराज–**नांगटा*** म्हणत असत कीं, आमच्या मठांत एक

---

* **नांगटा** म्हणजे संन्यासी **तोतापुरी**. याच संन्याशाजवळ **श्रीरामकृष्ण** एक वर्षभर वेदान्त शिकले.

सिद्ध असे. तो नेहमीं आपला आकाशाकडे डोळे लावून चालायचा! त्याचा **गणेशगर्जो** या नांवाचा एक सोबती होता. तो त्याला एक दिवस सोडून गेला. तेव्हां त्याला (त्या सिद्धाला) केवढें तरी दुःख झालें. त्याला कांहीं सुचेना! धीर सुटला अगदीं त्याचा!

इतक्यांत **महाराजांची** वृत्ति पालटली. क्षणभर ते निःशब्द झाले! कांहीं वेळानें भानावर येऊन ते म्हणाले, 'तूं आलीस होय? मीही आहें इथेच!' ही बोलणी कोणाला समजणार? देवभाषा का ही?

या वेळीं अनेक शिष्य आले होते; सगळे अगदीं **महाराजां**-जवळ बसले होते. **नरेंद्र, गिरिश, राम, हरिपद, चुनि, बलराम. एम्,** असे किती किती तरी होते.

मनुष्याचा देह घेऊन ईश्वर अवतरतो, या गोष्टीवर **नरेंद्राचा** विश्वास नव्हता. उलट पक्षीं, **गिरिशाची** अशी तीव्र श्रद्धा होती कीं, प्रत्येक युगामध्यें तो अवतार घेतो, व मानवदेह धारण करून या आपल्या मर्त्यलोकीं येतो. या तत्त्वासंबंधानें दोघांनीं आपल्या-समोर वाद करावा, अशी **महाराजांची** इच्छा होती.

श्रीरामकृष्ण (गिरिशाला)–तुम्हीं दोघे जण या मुद्यासंबंधानें इंग्रजींत वाद करा पाहूं. (सगळे हंसतात)

वाद सुरू झाला. पण इंग्रजींत नाहीं, बंगालींत. मधून मधून एकाददुसरा शब्द इंग्रजी निघे. **नरेंद्र** म्हणाला, ईश्वर अनंत आहे. आमच्या तुटपुंज्या बुद्धीला त्याची धारणा व्हावयाची नाहीं. सर्व

मनुष्यांच्या ठिकाणीं त्याची वसति आहे; तो एका विशिष्ट व्यक्तींत तेवढा असतो, असें कांहीं नाहीं.

महाराज (सप्रेम)–बरोबर आहे. याचें जें म्हणणें तेंच माझें आहे. तो सर्वत्र आहे; प्रत्येक वस्तूंत आहे; प्रत्येक माणसांत आहे. पण त्यांत थोडा भेद आहे. सर्व मनुष्यांत व्यक्त झालेली ईश्वरी शक्ति सारखी नसते. कांहीं माणसांत त्याची अविद्याशक्ति प्रकाशित असते; कांहींत विद्याशक्ति प्रकाशित असते. बरें, कांहीं कांहीं पात्रांत त्याची शक्ति विशेष असते, कांहींत कमी असते. तेव्हां सर्व माणसें सारखीं नाहींत.

राम–या वायफळ गप्पा पाहिजेत कशाला?

महाराज– (त्रासून)—छे! छे! त्यांत पुष्कळ अर्थ आहे.

गिरिश (नरेंद्राला)–ईश्वर देह धारण करून येत नाहीं, अवतार घेत नाहीं, हें तुला कसें कळलें?

नरेंद्र—तो अवाङ्मानसगोचर आहे!

महाराज—अगदीं खरें; सोपाधिक व सान्त मनाला तो गोचर नाहीं. पण साधनांच्या द्वारें मनाचा विषयकलंक धुऊन जाऊन तें शुद्ध झालें कीं, त्याला त्याचा साक्षात्कार होतो. मग त्याच मनाला शुद्ध बुद्धीचें स्वरूप प्राप्त होतें; व शुद्ध बुद्धि व शुद्ध आत्मा हीं एकच. याच शुद्ध बुद्धीच्या द्वारें ऋषींनीं निरुपाधिक व शुद्धस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार अनुभविला.

गिरिश (नरेंद्राला) —ईश्वर मनुष्यरूपानें जर नाहीं अवतरला, तर जगाचीं गूढ तत्त्वें उलगडून सांगून स्पष्ट करणारा

कोणी मिळणार नाहीं, हें तुझ्या लक्षांत नाहीं का येत ? ज्ञान व भक्ति यांचा लोकांना उपदेश करण्याकरितां ईश्वर देह धारण करून इथे येतो. तो नाहीं आला, तर लोकांना मार्ग दाखविणार तरी कोण ?

नरेंद्र––कां ? अंतःकरणांतूनच तो ज्ञानप्रेरणा देईल !

महाराज (सप्रेम)––हां, हां ! अंतर्यामी या रूपानें तो ज्ञानमार्ग दाखवील.

याप्रमाणें वाद चांगला रंगांत आला. त्याचें स्वरूप पुढें इतकें गूढ झालें कीं, सामान्य माणसाच्या बुद्धीला त्याचें आकलन होणें कठिण. ‘ अनंत ’ हा विभाज्य आहे का ? त्याचा अंश होणार कसा ? मानवी ज्ञानाच्या मर्यादेसंबंधानें **हॅमिल्टन** काय म्हणतो ? **हर्बर्ट स्पेन्सर** काय म्हणतो ? **टिंडाल** किंवा **हक्सले** काय म्हणतो ? वगैरे वगैरे गोष्टी वादांत निघाल्या.

महाराज (एमला)–हें पहा ! मला आपल्या या गोष्टी रुचत नाहींत. ईश्वर हा तर्कशक्तीच्या पलीकडे आहे. कितीही तर्कशक्ति ताणली, तरी तिनें त्याचें ज्ञान व्हावयाचें नाहीं; एवढेंच नाहीं, मला सर्वत्र तोच दिसतो आहे,–जें जें कांहीं आहे तें तें ईश्वर-स्वरूपच आहे, असें माझ्या नजरेला दिसतें आहे. मग त्याच्या-संबंधानें वाद घालण्यांत अर्थ कोणता ? सर्व वस्तु तद्रूप आहेत, हें मी प्रत्यक्ष **पाहतों आहें.**

तोच हें सर्व झाला आहे; जगांतील सर्व वस्तूंच्या रूपानें तोच

रामानुज व विशिष्टाद्वैतवाद.

नटला आहे. हेंही तोच आहे आणि तेंही—जें जें तो नाहीं असें भासतें तेंही—तोच आहे. अशी एक अवस्था आहे कीं, त्या अवस्थेंत मन व बुद्धि हीं दोन्ही त्या अखंड ब्रह्मांत लीन होऊन जातात. नरेंद्राचें दर्शन झालें कीं, माझें मन अखंडांत लीन होतें,—माझें मन समाधींत विराम पावतें;—याचें कारण काय सांग पाहूं ?

गिरिश (हासत हासत)—महाराज, याशिवाय बाकी सगळ्या गोष्टी मला समजतात, असें का आपल्याला वाटतें?

(सगळे हासतात)

महाराज--अशी माझी समाधि लागली, म्हणजे मी टीप सोडून एकदोन सूर खालीं आल्याशिवाय माझ्या तोंडांतून शब्दच निघत नाहीं.

वेदान्ताचें विवेचन **श्रीशंकराचार्यांनीं** केलें आहे. **श्रीरामानुजाचार्यांनीं**ही एका मताचें प्रतिपादन केलें आहे; त्यांचें मत 'विशिष्टाद्वैत' या नांवानें प्रसिद्ध आहे.

नरेंद्र (रामकृष्णांना)—विशिष्टाद्वैत म्हणजे काय?

महाराज (नरेंद्राला)—विशिष्टाद्वैत हा एक वाद आहे;—**रामानुजांचें** मत आहे तें. ब्रह्म हें जीवजगद्विशिष्ट आहे;—जीव व जगत् हीं सोडून केवळ ब्रह्माची भावना करितां येत नाहीं. हीं तीन मिळून एक (ब्रह्म) होतें;—**एकांत** तीन व तिहींत **एक**.

आपण बेलफळाचें उदाहरण घेऊं. त्याची कवची, बिया व गर हीं निरनिराळीं केलीं. आतां, समज, आपल्याला त्या बेलफळा-

चें वजन काढावयाचें आहे. तेव्हां त्याच्या नुसत्या गराचेंच वजन केलें, तर कांहीं चालणार नाहीं. तेणेंकरून आपल्याला सगळ्या फळाचें वजन कळेल का? कवची, बीज व गर यांचें एकत्र वजन केलें पाहिजे; तरच बेलफळाचें खरें वजन समजेल. पहिल्या विचाराबरोबर आपल्या असें मनांत येतें कीं, त्यांत गर हाच सारमय पदार्थ आहे, कवची नव्हे, किंवा बीज नव्हे. पण आणखी विचार केल्यावर पुढें असें लक्षांत येतें कीं, गर हा ज्या वस्तूचा आहे, त्याच वस्तूची कवची किंवा बीज आहे. तसेंच ब्रह्मासंबंधानें विचार करतांना पहिल्या प्रथम आपण 'नेति, नेति' असें म्हणतों. अर्थात् जीव 'नेति,' जगत् 'नेति' –जीव ब्रह्म नव्हे, जगत् ब्रह्म नव्हे. एक ब्रह्ममात्र वस्तु, बाकी सर्व अवस्तु ! पण पुढें विचार करीत गेलों, म्हणजे आपल्याला निराळाच अनुभव येतो. आपल्या असें प्रत्ययास येतें कीं, गर हा ज्या वस्तूचा आहे, त्याच वस्तूचें बीज व कवची आहे. तेव्हां ज्या वस्तूवरून आपण ब्रह्माचें निषेधात्मक स्वरूप ठरवितों, त्याच वस्तूवरून आपल्याला जीव व जगत् यांची भावना होते. नित्य हें ज्याचें स्वरूप आहे, त्याचेंच लीला (दृश्य जग) हें स्वरूप आहे. यावरून ब्रह्म हें जीवजगद्विशिष्ट आहे, असें **रामानुज** म्हणतात. याचें नांव विशिष्टाद्वैतवाद.

———

बिंदु २७ वा.

ईश्वरदर्शन.

महाराज (एमला)–मी त्याचें स्वरूप प्रत्यक्ष पहात आहें! मग मी विचार (वाद) कां करावा? मला असें प्रत्यक्ष दिसतें आहे कीं, हें सर्व (जगत्) तोच झाला आहे;–तोच (ईश्वर) आपल्याला जीव व जगत् यांच्या रूपानें दिसत आहे! जोंपर्यंत अंतरंगींचें चैतन्य जागृत झालें नाहीं, तोंपर्यंत या स्वरूपाचा अनुभव कोणालाही घडावयाचा नाहीं. चैतन्याचा साक्षात्कार होण्याला चैतन्यच (अंतरात्मा) जागृत झालें पाहिजे. 'नेति नेति' असा विचार कोठपर्यंत? प्रत्यक्ष वस्तुलाभ झाला नाहीं, तेथपर्यंत! अर्थात् 'तोच हें सर्व झाला आहे, हें मी प्रत्यक्ष पहात आहें,' असें नुसतें तोंडानें बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. केवळ बोलण्यांत फायदा नाहीं. ईश्वराचे कृपेनें चैतन्यलाभ झाला पाहिजे. चैतन्यलाभानंतर समाधिलाभ होतो. या अवस्थेंत देहभावना विरून जाते; कामिनी व कांचन यांवरील--संसारावरील–आसक्ति उडते; ईश्वरकथेशिवाय बाकी सर्व गोष्टी निरस वाटूं लागतात; विषयकथा कानांवर पडल्या कीं कष्ट होतात.

अंतरात्मा जागृत झाला--चैतन्यलाभ झाला--कीं, मग परमात्मलाभ घडतो. चैतन्यानेंच चैतन्याचें ज्ञान होतें.

वाद आटोपल्यावर **श्रीरामकृष्ण एमला** म्हणाले, मी असें पाहिलें आहे कीं, विचाराच्या द्वारानें जें ईश्वराचें बौद्धिक ज्ञान होतें, तें निराळें; व ध्यानानें

अवतारवाद आणि साक्षात्कार.

त्याचें जें प्रत्यक्ष ज्ञान होतें, तें निराळें. या दोहोंत फार अंतर आहे. तसेंच, विचार व ध्यान आणि त्याच्या (ईश्वराच्या) कृपेनें झालेला साक्षात्कार यांतही पुष्कळ भेद आहे! त्यानें (ईश्वरानें) कृपा करून 'याला अवतार म्हणतात,' असें जर आपल्याला प्रत्यक्ष दाखविलें,–त्यानें जर लीलेनें घेतलेलें आपलें मनुष्यरूप आमच्या प्रत्ययास आणलें, तर मग तर्कवितर्क, वाद-विवाद यांचें कारणच उरणार नाहीं; मग, 'अवतार म्हणजे काय,' हें कोणीच सांगायला नको.

हें कसें तें तुला स्पष्ट करून सांगतों. समज, एका अंधाऱ्या खोलींत एक माणूस आहे. पुढें त्यानें आगपेटी घेऊन काडी ओढली; तों एकदम जिकडे तिकडे लख्ख उजेड पडला! तसेंच, त्यानें (ईश्वरानें) कृपाळू होऊन जर आपल्याला एकदम लख्ख उजेड दाखविला व अज्ञानांधकार घालवून टाकला, तर सर्व संदेह एकदम व कायमचे दूर होतील. असा विचार (वाद व तर्कवितर्क) करून का त्याचें खरें ज्ञान होणार आहे?

ईश्वर,
–सगुण व निर्गुण.

नंतर महाराजांनीं नरेंद्राला हांक मारून आपल्याजवळ बसविलें, व कुरवाळून त्याला अनेक कुशलप्रश्न विचारले.

नरेंद्र (महाराजांना)–हें पहा, महाराज, मीं कालीचें सारखें दोनतीन दिवस ध्यान केलें; पण त्यापासून कांहींच झालें नाहीं.

महाराज–होईल क्रमाक्रमानें; उतावळा होऊं नको. आई म्ह-

णजे कोण? दुसरें कोणी नाहीं; ब्रह्मच ती. ती ब्रह्माचें केवळ सगुणांग आहे. ब्रह्म तीच **काली**. परमात्मा–ईश्वर–निष्क्रिय आहे, अशी भावना झाली कीं, त्याला ब्रह्म म्हणतात. बरें, तो सृष्टि, स्थिति व लय करणारा आहे, अशी आपण भावना केली, कीं त्यालाच आपण **शक्ति** म्हणतों, **काली** म्हणतों.

ज्याला तुम्ही ब्रह्म असें नांव देतां, त्यालाच मी **काली** म्हणतों.

ब्रह्म व **काली** हीं एकच आहेत, त्यांत कोणताही भेद नाहीं. अग्नि व त्याची दाहकशक्ति हीं जशीं अभिन्न, तशीं तींही अभिन्न. अग्नीशिवाय दाहकशक्तीची, किंवा दाहकशक्तीशिवाय अग्नीची कांहीं कल्पना करितां यावयाची नाहीं. **कालीला** मानलें, कीं ब्रह्माला पण मानलें पाहिजे; व ब्रह्माला मानलें, कीं **कालीला** मानलें पाहिजे. तेव्हां ब्रह्म व **शक्ति** हीं अभेद आहेत. एकच तीं.

बरीच रात्र झाली. **गिरिशाला** नाटकगृहांत जाणें भाग होतें. तेव्हां तो **हरिपदाला** म्हणाला, भाई, कृपा करून एक गाडी आण ना! मला नाटकगृहांत गेलें पाहिजे.

महाराज (हरिपदाला, हांसत हांसत)--हां! गाडी आण बरें! विसरशील! (सगळे हांसतात)

हरिपद (सस्मित)–नाहीं महाराज, चाललों ना आणायला! ही आणलीच! (सगळे हांसतात.)

गिरिश (महाराजांना)–महाराज, आपले चरण सोडून मला माझ्या कामाला नाटकगृहांत गेलें पाहिजे! दुर्दैव माझें! दुसरें काय!

महाराज--कांहीं नाहीं! इकडे, तिकडे, चोहोंकडे पाहिलें पाहिजे.

संसारांत आलिप्त राहून **जनकानें** परमेश्वराकडे लक्ष ठेविलें. त्यानें दोन्ही साधलीं—इह व पर. दुधाची वाटी त्यानें घेतली, पण आत्म्याकडे दुर्लक्ष केलें नाहीं.

गिरिश—आतां हें नाटकगृहाचे व्यवस्थेचें काम तरुण मंडळीवर टाकून आपण मोकळें व्हावें, असें माझे मनांत आहे.

महाराज--छे ! छे ! आहे तें बरें आहे. असलें कांहीं तूं मनांत आणूं नको. अनेकांवर तुझे उपकार होत आहेत.

नरेंद्र (हळूच)–क्षणापूर्वीं यानां हा ईश्वर म्हणाला, अवतार म्हणाला ! आतां त्या अवताराला टाकून हा आपल्या कामाला नाटकगृहांत चालला आहे !

बिंदु २८ वा.

महाराज समाधिमग्न.

नरेंद्राला आपलेजवळ बसवून **महाराज** एकदृष्टीनें त्याजकडे पाहूं लागले. खालीं सरून ते त्याच्या अगदीं जवळ बसले. ईश्वर अवतार घेऊन येतो, या गोष्टीवर **नरेंद्राचा** विश्वास नव्हता म्हणून काय झालें ? त्याच्यावरील **महाराजांचें** प्रेम होतें तसें होतें !

त्याच्या आंगावर हात टाकून ते म्हणाले, "आपली मानखंडना झाली असें का तुला वाटतें ? जाऊं दे ! आमच्या पण मनांची अगदीं तीच अवस्था झाली आहे. आम्हांला किनई तुझ्याबद्दल भारी वाईट वाटतें हो !"*

---

* हे शब्द वृंदावनांतील गोपींच्या तोंडचे (अर्थात् राधेला म्हटलेले) आहेत.

ईश्वर स्वतां अवतार घेतो, ही गोष्ट नरेंद्रानें नाकबूल केली, तेंच बरोबर होतें, असें का महाराजांना अंतर्दृष्टीनें दिसलें? तो (परमेश्वर) आमचा पिता नव्हे का? आमची माता नव्हे का? मग आमच्या अंतरंगीं उजेड पाडून अवतारी पुरुषाला पाहण्याचें सामर्थ्य आम्हांला तो कां बरें देत नाहीं? ज्ञान हें वारस-हक्कानें वास्तविक आपलें असतां तें आपल्या हातीं येत नाहीं, असें पाहून त्याच्या (ईश्वराच्या) मुलानें जर ती गोष्ट आपल्या मनाला लावून घेतली,—ही आपली मानखंडना झाली, असें जर त्यानें मानलें,—तर त्यांत त्याचा काय बरें दोष? असो.

विचार व ईश्वरलाभ.

महाराज (नरेंद्राला)—जोंपर्यंत मनुष्याचे ईश्वराविषयीं विचार, तर्कवितर्क, वादविवाद चालू आहेत, तोंपर्यंत त्याची प्राप्ति त्याला झाली नाहीं, असें निश्चित समजावें. तुम्ही दोघे वाद करीत होतां, पण तें मला नाहीं बरें वाटलें.

एकाद्या घरांत भोजनसमारंभानिमित्त बरीच मंडळी जमली असली, तर तिथे गोंगाट कोठपर्यंत चालतो? जोंपर्यंत हाता-तोंडाची गांठ पडली नाहीं तोंपर्यंत. पहिलें वाढप आटपून मंडळी जेवायला बसली कीं, बहुतेक गडबड शांत होते. मग जसजशी पक्वान्नावर झोड सुरू होते, तसतशी गडबड अगदींच कमी येते. शेवटीं मठ्ठ्यावर पाळी आली कीं, नुसतें 'सप्सप्' असें चालतें. भोजन झालें कीं निद्रा!

जसजसा ईश्वराजवळ तूं जाशील, तसतसा तुझा विचार (तर्क-

वितर्क) कमी पडेल. त्याचा लाभ एकदां झाला, त्याचें एकदां प्रत्यक्ष दर्शन घडलें कीं, शब्द, विचार सगळें बंद! मग निद्रा–समाधि!

एवढें बोलून **महाराजांनीं नरेंद्राच्या** आंगावरून व तोंडावरून प्रेमानें हात फिरविला, व त्याला कुरवाळतां कुरवाळतां ते म्हणाले, 'हरिः ॐ! हरिः ॐ! हरिः ॐ!'

हें सर्व त्यांनीं कां बरें केलें? **नरेंद्राच्या** ठिकाणीं साक्षात् नारायणाचें दर्शन त्यांना झालें असावें का? त्या देहाच्या आश्रयानें असणारा पुरुष त्यांना दिसत असावा का? मनुष्यांत 'ईश्वरदर्शन' म्हणतात, तें हेंच का?

केवढें आश्चर्य! पाहतां पाहतां **महाराजांची** संज्ञा (भान) जात चालली! कांहीं वेळानें बहिर्जगत् त्यांना अगदीं शून्य झालें! **श्रीगौरांगाची** (चैतन्य) जी अर्धबाह्यदशा असे, असें म्हणतात, तीच का ही? इतकें झालें, तरी **महाराजांचा** हात **नरेंद्राच्या** आंगावरच होता! या निमित्तानें ते **नारायणाची**–**नरेंद्राच्या** ठिकाणीं वास करून असलेल्या **नारायणाची**–सेवा करीत असावे का? नाहीं तर ते त्याच्या अंगावरून व पायांवरून हात कां बरें फिरवितें? कीं त्याच्या अंगांत ते शक्तिसंचार करीत होते?

होतां होतां **महाराजांचें** आणखी भावांतर झालें! हात जोडून ते **नरेंद्राला** म्हणाले, "एक गाणें म्हण, म्हणजे बरें होईल. मला कसें बरें उठून उभें राहतां येईल?–माझा **नित्य**!–**गौरांगाच्या** प्रेमानें–भक्तीनें–कसा तो वेडा झाला आहे!"

कांहीं वेळानें पुन्हा ते स्तब्ध झाले! जणूं काय दगडाचा पुतळाच! पुन्हा भावोन्मत्ततेंत ते म्हणाले—

"हा! कृष्णप्रेमोन्मादिनी राधे! संभाळ! यमुनेंत पडशील हो!"

पुन्हा ते समाधिमग्न झाले! कांहीं वेळानें कांहींसे भानावर येऊन ते गाऊं लागले—

पद.

(**चाल**—जन सारे मजला०)

वन दूर किती तें बाई गे! जेथें माझा प्राणविसांवा,
गाई चारित वाजवि पांवा, तत्तनुचा ये सुगंध बरवा,
न चालवे मज पाउलभरही ॥ वन० ॥ १ ॥

यानंतर सर्व जगत् त्यांना शून्य झालें! कशाचेंही भान उरलें नाहीं! नरेंद्र त्यांच्यापुढें बसला होता, पण तोही त्यांना दिसेनासा झाला! आपण केव्हां, कुठे बसलों आहों याची दाद त्यांना राहिली नाहीं! मन, अंतःकरण, प्राण, सर्व कांहीं ईश्वरांत लीन झालें होतें!

इतक्यांत उठून ते म्हणाले:—

पदार्ध.

(**चाल**—श्रीमंत पतीची राणी०)

गौरांगभक्तिचा पेला। प्राशितांचि करितो धुंद ॥
भक्तिसुधारसपानें। आत्मतृप्त होती तुंद ॥

पुन्हा ते खालीं बसले. बसल्यावर ते म्हणाले, "हा इकडे प्रकाश येतांना दिसतो आहे;—पण कुठून तो प्रकाश येत आहे, कांहीं समजत नाहीं." इतक्यांत नरेंद्र गाऊं लागला,—

पद.

(चाल—प्रिये पहा रात्रीचा०)

सुरेश्वरा ! धन्य दिवस उगवे हा चरण दाविले ॥ ध्रु० ॥
जितमाया सुखनिलया । सकल दुःख वारुनिया ॥
दर्शनसुख देउनिया । प्राण मोहिले ॥ १ ॥
पाहुनि तुज सप्तलोक । झाला हा विगतशोक ॥
उपभोगी अतुल तोख । दैन्य लोपलें ॥ २ ॥
राहो हा दीन हीन । तुझिच कृपा सत्य म्हणुन ॥
सुंदर तव कमलचरण । आजि पाहिले ॥ ३ ॥
मोहनिशा ही उडली । ज्ञानउषा ही फुटली ॥
चित्ताची गांठ ढिली । प्रेम दाटलें ॥ ४ ॥
विस्मृतिचें पटल गळे । दृष्टीसीं दृष्टि जुळे ॥
हृदयासीं हृदय मिळे । शून्य राहिलें ॥ ५ ॥

पद ऐकतां ऐकतां **महाराजांना** पुन्हा बहिर्जगत् शून्य झालें ! नेत्र निमीलित झाले ! देह स्तब्ध झाला,—हाल नाहीं कीं चाल नाहीं ! खोल समाधींत त्यांनीं बुडी मारली.

× + + +

कांहीं वेळानें समाधिभंग झाल्यानंतर ते म्हणाले, " मला घरीं (अर्थात् देवळांत) कोण बरें घेऊन जाईल ? "

एखादें बालक एकटें पडलें, जवळ सोबतीला कोणी नसलें, म्हणजे त्याला जिकडे तिकडे अंधकार दिसूं लागतो ! मग कोणी सोबत मिळेल का, म्हणून तें जसें आतुरतेनें पहात असतें, तशीच या वेळीं **महाराजांची** अवस्था दिसली !

रात्र बरीच झाली होती. त्या दिवशीं फाल्गुन कृष्ण दशमी

होती;-अर्थात् अंधार होता. **महाराज** दक्षिणेश्वर येथील देवळांत जाण्यास तयार झाले. ते गाडींत बसले. त्यांना पोंचविण्याकरितां सर्व शिष्य गाडीच्या दोहों बाजूंना उभे राहिले. **महाराजांची** हरिरसमदिरेची धुंदी अद्याप उतरली नव्हतीच.

गाडी चालू झाली. शिष्यमंडळी कांहीं वेळ तिकडेच पहात होती. नंतर जे ते आपापल्या घरीं चालते झाले.

बिंदु २३ वा.

ईश्वर साकार कीं निराकार ?

आश्विन शुक्ल चतुर्दशी तिथि; गुरुवार तारिख २२ आक्टोबर सन १८८५. दुर्गापूजेचा महोत्सव होऊन गेला होता. **श्रीरामकृष्ण** कलकत्त्यांतील श्यामपूर या नांवाच्या भागांत शिष्यगणासहवर्तमान राहत होते. त्यांच्या जिवाला बरें नव्हतें; गळ्याला भयंकर व्याधि जडला होता, व्रणासारखें कांहीं झालें होतें. डा० **सरकार** व दुसरे अनेक वैद्य त्यांना औषधोपचार करीत होते. वर सांगितलेल्या दिवशीं डा० **सरकार**, **गिरिश** (घोष), **ईशान** (मुखोपाध्याय), **एम्** व दुसरे अनेक शिष्य व भक्त तेथें होते.

श्रीरामकृष्ण स्मितपूर्वक प्रत्येकाशीं भाषण करीत होते; **ईशान**, **गिरिश** व **डाक्तर** हेही मधून मधून बोलत होते.

× × × ×

डाक्तर-(ईश्वरी लीलेचें) ज्ञान झालें, कीं, मनुष्य अवाक्

होतो,– त्याची वाणी थांबते; त्याचे नेत्र बंद होतात व अश्रुधारा सुरू होतात ! भक्तीला सुरवात इथेच होते.

श्रीरामकृष्ण–भक्ति ही स्त्री असल्यामुळें तिला अंतःपुरांत जातां येतें. (तर्कसिद्ध) ज्ञानाचें तसें नाहीं; त्याचा प्रवेश दिवाणखान्यापर्यंत किंवा ओटीपर्यंत,--पुरुष बसतात त्या जागेपर्यंत; पुढें नाहीं. त्याचें पाऊल अंतःपुरांत केव्हांही नाहीं पडणार !

डाक्तर–तें खरें. पण वाईट चालीच्या बायकांना–वेश्यांना–अंतःपुरांत घेतां येत नाहीं. म्हणून ज्ञान पाहिजे. 'माझी ईश्वरावर निष्ठा आहे,' एवढें म्हटल्यानें वाटेल त्या अडाणी माणसाला आंत येऊं देणें बरें नाहीं.

श्रीरामकृष्ण–मनुष्याची ईश्वराचे ठिकाणीं भक्ति असली, आणि ईश्वरलाभासाठीं त्याचें अंतःकरण तळमळत असलें, तर अशा माणसाला केवळ भक्तीच्या जोरावर ईश्वरलाभ झाल्यावांचून राहणार नाहीं. मग त्याला खरा मार्ग ठाऊक असो कीं नसो; त्याला ज्ञान असो कीं नसो. ईश्वराकडे जाण्याचा त्याचा मार्ग जरी चुकला असला, तरी परमेश्वर हातीं धरून त्याला आपल्याजवळ नेईल; मात्र ईश्वरासाठीं त्याचे अंतःकरणांत तळमळ असली पाहिजे.

कोणी एक भक्त एकदां पुरीच्या यात्रेला निघाला. पण त्याला पुरीचा रस्ता कांहीं ठाऊक नव्हता. त्यामुळें दक्षिणेकडे न जातां तो पश्चिमेकडे जाऊं लागला. देवदर्शनासाठीं व्याकुळ झाल्यामुळें शेवटीं, मी कोणत्या रस्त्यानें जाऊं, असा त्यानें लोकांना प्रश्न केला.

त्यांनीं उत्तर केलें: ‘ हा नव्हे तो रस्ता, त्या रस्त्यानें जा; दक्षिणेकडे जा, तुम्हीं भलताच मार्ग धरिला आहे.’

डाक्तर–अज्ञानामुळें बिचाऱ्याला खऱ्या मार्गाची भूल पडली!

महाराज–लोकांना आपल्या पुस्तकी ज्ञानाची मोठी घमेंड वाटते, व त्या घमेंडींत ते इतरांच्या चुकांना व भोळेपणाला नांवें ठेवतात. पण खऱ्या भक्ताची भावना अशी असते कीं, भक्तवत्सल परमात्मा आपल्या साहाय्यार्थ उडी घेण्याला नेहमीं तयार आहे. भक्त कांहीं वेळ भलत्या मार्गानें जरी जात असला, तरी कांहीं हरकत नाहीं. आपल्याला काय पाहिजे, हें त्या भगवंताला चांगलें समजतें, आणि शेवटीं तो आपली इच्छा पूर्ण करतोच.

इतक्यांत, ईश्वर साकार कीं निराकार, असा एकानें प्रश्न केला.

श्रीरामकृष्णः–तो साकारही आहे व निराकारही आहे. एकदां एक संन्यासी पुरी येथील जगन्नाथाच्या दर्शनाला गेला. ईश्वर साकार कीं निराकार, हा संशय त्याच्या मनांत डांचत होता. जगन्नाथाच्या मूर्तीचें दर्शन झाल्याबरोबर या गोष्टीचा निकाल लावावा, असें त्यानें ठरविलें. त्याच्या हातीं दंड होताच; तो दंड देवाच्या शरीराला लागतो कीं नाहीं, हें तो पाहूं लागला. त्यानें दंड डावीकडून उजवीकडे फिरविला, त्या वेळीं पुढें कांहीं त्याला दिसलें नाहीं, किंवा कांहीं त्याच्या दंडाला लागलेंही नाहीं! तेव्हां त्यानें सिद्धान्त केला कीं, ईश्वर निराकार आहे. पुन्हा उजवीकडून डावीकडे त्यानें दंड फिरविला; तेव्हां देवाच्या शरीराला त्याचा स्पर्श

ईश्वर साकार कीं निराकार ?

झाला! त्यावरून संन्याशानें असा निर्णय केला कीं, ईश्वर साकार-ही आहे, निराकारही आहे.

पण ही गोष्ट पटणें मोठें कठिण आहे. जो निराकार आहे, तो पुन्हा साकार कसा होणार, हा संदेह मनांत उभा राहतो.

डाक्तर—त्यानें आकार (आकारात्मक सृष्टि) उत्पन्न केले आहेत, त्या अर्थीं तो साकार आहे. बरें, त्यानें मन उत्पन्न केलें आहे; तें आहे निराकार; त्या अर्थीं तो निराकार आहे. तेव्हां साकार, निराकार, दोन्ही त्याला होतां येईल.

महाराजः—जोंपर्यंत मनुष्याला साक्षात्कार झाला नाहीं, तोंपर्यंत या गोष्टी त्याला कळायच्या नाहींत. साधकासाठीं तो नाना भावांनीं व नाना रूपांनीं व्यक्त होतो.

एक रंगारी होता. त्याची आपली रंगाची एक पद्धत ठरलेली होती. पुष्कळ लोक त्याच्याजवळ कापडें रंगवायला आणीत. तुम्हांला कसला रंग पाहिजे? असें तो गिऱ्हाइकाला विचारी. जर गिऱ्हाइकानें 'लाल' म्हणून सांगितलें, तर तो त्याचें कापड आपल्या पिंपांत बुडवी आणि बाहेर काढून म्हणे, हा घ्या तुमचा लाल रंग. मला पिंवळा रंग पाहिजे, असें जर दुसऱ्यानें म्हटलें, तर तो रंगारी त्याचें कापड त्याच पिंपांत बुडवी आणि बाहेर काढी. पण चमत्कार असा कीं, त्याच्या कापडाला पाहावें तों आपला रंग पिंवळा! अशा रीतीनें ज्याला जो रंग पाहिजे असेल, —निळा, नारिंगी, मोतिया, हिरवा—त्याला तो त्याच पिंपांत बुडवून तयार करून देई.

एका माणसानें हा चमत्कार पाहिला. त्याला मोठें आश्चर्य वाटलें. तो त्या रंगाऱ्याकडे येऊन म्हणाला, भाई, मला अमुकच रंग आवडतो असें कांहीं नाहीं. मी तें केवळ तुझ्या इच्छेवर ठेवितों. तुझ्या इच्छेस येईल तो रंग तूं माझ्या कापडाला दे. तूं ज्या रंगानें रंगला आहेस, तो रंग मला पाहिजे.

[सगळे हंसतात.]

भक्ताच्या इच्छेप्रमाणें भगवान् साकार किंवा निराकार बनतो. त्याचें जें रूप व्यक्त होतें, तें तेवढ्यापुरतें सापेक्षतेनें सत्य असतें. म्हणजे तें निरनिराळ्या माणसांच्या दृष्टीनें सत्यच असतें. पण तीं माणसें मर्यादित, उपाधिबद्ध असतात, हें एक; आणि दुसरें असें कीं, त्यांच्या भोंवतालची परिस्थिति निराळी असते. तिचाही परिणाम होतो. आपण खरोखर कोणत्या रंगानें रंगलों आहों, हें फक्त त्या दिव्य रंगाऱ्यालाच माहीत असतें. तो खरोखर कोणत्याही उपाधीनें—आकार वा निराकार, अशा कोणत्याही उपाधीनें—बद्ध नसतो.

एकदां एक मनुष्य आपल्या मित्राला म्हणाला, भाई, मी बाहेर गेलों होतें. तिथे एका वृक्षाच्या बुडाशीं मीं एक लाल रंगाचा सुंदर प्राणी पाहिला. यावर त्याचा मित्र म्हणाला, हां! मींही पाहिला तो प्राणी. आतां, तूं म्हणतोस, तो लाल होता; पण तसें नाहीं, तो हिरवा होता. त्याच वेळीं तिसरा एक माणूस म्हणाला, छे! छे! तसें नाहीं. मींही तो प्राणी पाहिला आहे. पण मला तो पिंवळा दिसला. आणखीही कांहीं माणसें तिथे आलीं. त्यांनींही आपा-

ला अनुभव सांगितला. कोणी म्हणे, त्याचा रंग नारिंगी होता; कोणी म्हणे, निळा होता; कोणी म्हणे, हिरवा होता. अशा रीतीनें कोणाचा रंग कोणाला जुळेना! त्यामुळें त्यांची बोलाचाली सुरू झाली. शब्दानें शब्द वाढतां वाढतां ते हातघाईवर येण्याचे बेतांत आले. इतक्यांत, आणखी एक माणूस तेथें आला. त्यानें सर्वांचें म्हणणें ऐकून घेतलें. नंतर सर्वांना शांत होण्याला सांगून तो म्हणाला, हें पहा, मी त्याच वृक्षाखालीं राहतों व त्या प्राण्याला पुरा ओळखतों. तुमचें प्रत्येकाचें म्हणणें बरोबर आहे. त्या प्राण्याचें नांव सरडा. तो आपले रंग क्षणोक्षणीं बदलतो. तो आतां लाल, तर घटकेंत हिरवा, घटकेंत पिंवळा, घटकेंत निळा, असा नाना रंगाचा होतो. इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं त्याला कोणताच रंग नसतो.

सर्वसंगपरित्याग करून ईश्वरचिंतनाला जो लागला,—संसार-वृक्षाखालीं बसून जो साक्षित्वानें पाहूं लागला,—त्याला ईश्वर कसा आहे, हें समजतें. भगवंत भक्तासाठीं नाना रूपांनीं व्यक्त होतो, हें त्याला माहीत असतें. सरड्याप्रमाणें तो कधीं लाल, कधीं पिंवळा, कधीं नारिंगी, तर कधीं हिरवा असा असतो! कधीं कधीं तर त्याला कोणताच रंग नसतो! तो सर्वशक्तिमान् असून उत्पत्ति, स्थिति व लय यांचें कार्य करीत असतो. त्याच्या ठिकाणीं असे गुण आहेत कीं, ते पाहून आपण थक्कच होऊन जातों. पण हें त्याचें सगुण रूप झालें. याच रूपानें तो मनुष्याला प्रतीत होतो. जसा सगुण, तसाच तो निर्गुणही आहे. बेरंगी सरड्याचे स्वरूपा-

संबंधानें जसें कांहींच सांगतां येत नाहीं, तसेंच त्याचेसंबंधानेंही कांहीं सांगतां येत नाहीं.

तूं म्हणतोस तेंच खरें. तो साकारही आहे, निराकारही आहे. अनंत अशा सागराचेंच उदाहरण घेऊन पहा. थंडीचा अगदीं कडाका पडला कीं, त्याच्या पृष्ठभागाच्या पाण्याचें बर्फ बनतें. पुढें त्या बर्फाला निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे आकार येतात. पण सूर्योदय होऊन त्याच्या किरणांचा मारा त्या बर्फावर सुरू झाला कीं, तें पार वितळून जातें.

ईश्वर हाच अनंत सागर. भक्ति हीच थंडी. थंडीनें ज्याप्रमाणें सागराच्या जलाचें जागोजागीं बर्फ बनून निरनिराळे आकार धारण करितें, त्याचप्रमाणें भक्तीच्या थंडीच्या कडाक्यानें ईश्वर नानारूपांनीं भक्तांना दर्शन देतो. सूर्याच्या किरणांनीं ज्याप्रमाणें बर्फाचे सर्व आकार नाहींतसे होऊन तें पार वितळून जातें, त्याचप्रमाणें ज्ञानसूर्याचा उदय झाल्याबरोबर त्याचीं निरनिराळीं रूपें (त्यानें भक्तासाठीं धारण केलेलीं निरनिराळीं रूपें) पार विरून जाऊन तो समाधींत निर्गुण व निराकार रूपानें प्रतीत होतो.

डाक्तर—सूर्य वर आला कीं, बर्फ वितळून जातें; इतकेंच नव्हे, तर त्या पाण्याची अदृश्य अशी वाफ बनते. हें भौतिक शास्त्रानें आपल्याला कळतें. याअन्वयें आपल्या दृष्टान्ताचा धागा जरा पुढें नेतां येईल, असें नाहीं का आपल्याला वाटत ?

महाराज—या दृष्टान्ताचा अर्थ असा कीं, सदसद्विवेक करितां करितां, 'ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या' या सिद्धान्तावर आपण येऊन

थडकतों. ' जगत् ' या शब्दांत नामरूपात्मक सर्व वस्तूंचा—चिज्जडात्मक सर्व वस्तूंचा—अंतर्भाव होतो, हा वेदान्ताचा सिद्धान्त आहे. विचार करितां करितां समाधि हातीं आली कीं, रूपबीप सगळें उडून जातें. त्या वेळीं मग तो ज्ञानी असें म्हणतो कीं, ईश्वर व्यक्ति नाहीं, सगुण नाहीं. कारण त्याला सगुण म्हटलें कीं, तो मर्यादित होतो. ब्रह्मासंबंधानें तोंडानें कांहींच बोलतां येत नाहीं. कारण सोपाधिक ' मी ' समाधींत विरून जातो. तेव्हां ब्रह्माचें वर्णन करण्याला कोणीच राहात नाहीं. जो वर्णन करणार तोच मुळीं जाग्यावर उरत नाहीं. यावरून ब्रह्म हें निर्गुण आहे. ज्ञानरूप होऊनच त्याचा अनुभव घेतां येतो. मन, बुद्धि यांच्या द्वारानें त्याचें आकलन कधींच व्हावयाचें नाहीं. म्हणूनच तें अज्ञात व अज्ञेय आहे, असें म्हणतात.

यासाठीं असें म्हटलें आहे कीं, भक्ति ही शीतल चंद्रासारखी आहे. ज्ञान हें प्रखर सूर्यासारखें आहे. मीं असें ऐकलें आहे कीं, अगदीं उत्तरेस व अगदीं दक्षिणेस समुद्र आहेत. ते इतके थंड आहेत कीं, त्यांचें पाणी गोठून त्याचे बर्फाचे खडक बनतात. त्यामुळें तेथें जहाजें चालत नाहींत, तीं तेथें गेलीं तर अडकून पडतात.

डाक्तर—भक्ति जर विचारशून्य असेल, तर मनुष्याची गति अशीच कुंठित होते, हें यावरून उघड नाहीं का होत महाराज?

महाराज—याच दाखल्याच्या अनुसंधानानें पुढें विचार करीत जर गेलें, तर त्याची गति कुंठित होते, यांत शंका नाहीं. पण खरें पाहिलें असतां त्याची गति थांबत नाहीं. निरनिराळ्या आकाराचें

बर्फ हें जसें जलाचेंच भिन्न रूप असतें, त्याचप्रमाणें भक्तासाठीं धारण केलेलीं सगुण रूपें हीं सच्चिदानंदसागराच्या जलाचींच केवळ भिन्न रूपें असतात. त्याला (भक्ताला) दुसरें कांहींच दिसत नाहीं, एक ईश्वरमात्र दिसतो. समाधींत ईश्वराच्या ज्या स्वरूपाचा अनुभव येतो, तेंच स्वरूप तो (भक्त) भक्तीच्या बळावर अनुभवितो. तुला जर ज्ञानमार्ग ज्यास्त पसंत असेल, तर 'ब्रह्म सत्य, जगन्मिथ्या' हा विचार तूं कर. तेणेंकरून समाधि हातीं येऊन तुला त्याचा अनुभव येईल. ज्ञानसूर्याच्या प्रखर किरणांनीं नाना आकार धारण केलेलें बर्फ विरून जाऊन अनंत व अमर्याद अशा सच्चिदानंदसागरांत तूं सामरस्य पावशील!

बिंदु ३० वा.

इंद्रियसंयमाचा उपाय.

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)—पुढील लोकांना (ईश्वराचें) साधन होत नाहीं:—

(१) ज्यांना विद्येचा—पांडित्याचा—अहंकार असतो, (२) ज्यांना धनाचा अहंकार असतो, त्यांना ज्ञान कधींच व्हावयाचें नाहीं. 'अमुक ठिकाणीं एक मोठा साधु आला आहे, येतां का त्याच्या दर्शनाला?' असें जर कोणीं या लोकांना म्हटलें, तर ते सतरा सबबी पुढें आणतील, पण येणार म्हणून नाहींत. ते मनांतले मनांत असा विचार करितात कीं, आपण मोठीं माणसें, आपण

कशाला जा त्यांच्या दर्शनाला! तमोगुणाच्या पोटीं, अज्ञानाच्या पोटीं अहंकाराचा जन्म होतो.

× × × ×

या कामक्रोधादि विकारांचें दमन कसें साधायचें? पाथूरेघाट (कलकत्त्याचा एक भाग) येथील **गिरींद्र घोष** म्हणाले, "कामक्रोधादि रिपूंचें निर्मूलन कोणालाही करितां येणार नाहीं. तेव्हां त्यांना आपण निराळें वळण द्यावें. विषयांची कामना धरण्यापेक्षां आपण ईश्वराची कामना धरावी. सच्चिदानंदाच्या सहवासांत आपण रममाण व्हावें. परमेश्वराचे आपण पुत्र आहों, जगन्नाथाचे आपण दास आहों, या गोष्टीचा आपण निरंतर अभिमान धरावा. भगवंताच्या नामावर आपला विश्वास आहे, याबद्दल अभिमान धरून आपण असें म्हणावें कीं, मीं त्याचें पावन नाम घेतलें आहे, आतां मी पापापासून मुक्त झालों. आतां मला बंधन कशाचें? आतां मला मुक्तीची काय काळजी राहिली? ऐहिक वैभव–धनमानपुत्रकलत्रादि–माझें नाहीं, भगवंत व त्याचे भक्त, हेमात्र माझे खरे. धनमानादिकांचा मला लोभ आहे का? छे! नाहीं. ईश्वरप्राप्तीचा मला खरा लोभ आहे, तिच्यासाठींच माझा जीव तळमळतो आहे. अशा रीतीनें षड्रिपूंना वळण देऊन ते ईश्वराभिमुख करितां येतील."

डाक्तर–इंद्रियनिग्रह करणें फार कठिण आहे. इंद्रियें हीं मस्तवाल घोड्यांसारखीं आहेत. त्यांच्या डोळ्यांना अंधाऱ्या घातल्या पाहिजेत. कांहीं कांहीं घोड्यांचे डोळे तर अगदीं पुरे बांधून टाकले पाहिजेत, म्हणजे ते भलतीकडे धांवणार नाहींत.

महाराज–त्याची (ईश्वराची) एकदां कृपा झाली, ईश्वराच्या दर्शनाचा एकदां लाभ घडला, आत्मसाक्षात्कार एकदां झाला, कीं मग कांहीं भय नाहीं. मग षड्रिपूंचें कांहीं चालत नाहीं. त्यांच्या नांग्या मोडून जातात.

नारद, प्रल्हाद, इत्यादि नित्यसिद्ध महापुरुषांच्या डोळ्यांना अशा अंधाऱ्यांची कांहीं जरूर लागत नाहीं. जें मूल बापाचा हात धरून शेताच्या बांधावरून चाललेलें असतें, त्याला आपला हात सुटून चिखलांत पडण्याची धास्ती असते. पण ज्या मुलाचा हात बापानें धरलेला असतो, त्याची स्थिति अगदीं वेगळी असते. तें कधींच खड्ड्यांत पडत नाहीं.

डाक्तर–पण बापानें मुलाचा हात धरणें बरें नाहीं. तेणेंकरून मुलाच्या अंगीं स्वावलंबन येत नाहीं. त्याला परावलंबनाची संवय लागते.

महाराज–ज्यांना ईश्वरलाभ होतो, त्यांचा (सोपाधिक) अहंकार नाहींसा होतो. त्यांच्या ठिकाणीं शुद्ध किंवा निरुपाधिक अहंकारमात्र शिल्लक राहतो. त्यामुळेंच ते आपले व्यवहार चालवितात. पण तो अहंकारही भगवंतांत मिळून गेलेला असतो. त्याला स्वतंत्र असें अस्तित्व नसतेंच. त्यांची वृत्ति बालकांसारखी असते. आपण कांहींच करीत नाहीं, सर्व कांहीं आपली आईच करिते, अशी त्यांची भावना असते. त्यांचें सर्व सामर्थ्य म्हणजे आईचेंच सामर्थ्य! आईवांचून ते पंगू असतात. मूल आईजवळ असलें, म्हणजे त्याला दुप्पट जोर येतोच.

डाक्तर–घोडयांच्या डोळ्यांना जर अंधाऱ्या घातल्या नाहींत, तर ते एक पाऊलही सुधें टाकणार नाहींत. रिपूंचें (अर्थात् इंद्रियांचें) दमन न करितां ईश्वराची प्राप्ति होईल का?

महाराज–तूं जें काय म्हणतो आहेस, त्याला ज्ञानमार्ग असें नांव आहे. त्या मार्गानेंही ईश्वरलाभ होतो. ज्ञानी लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ईश्वरदर्शन पाहिजे असेल, तर पहिल्यानें चित्तशुद्धि साधली पाहिजे. पहिल्यानें इंद्रियजय केला पाहिजे. आधीं साधन मग ज्ञान.

भक्तियोग व ज्ञानयोग.

ईश्वरप्राप्तीचा दुसरा एक मार्ग आहे. त्याला भक्तियोग म्हणतात. ईश्वराचे पादपद्मीं एकदां भक्ति जडली, त्याच्या नामगुणगानांत एकदां आनंद, प्रेम वाटूं लागलें, कीं, इंद्रियनिग्रह साधण्याला निराळे प्रयत्न करायला नकोत. मग षड्रिपु आपोआप वश होतात.

एखाद्याचें मन जर शोकमग्न असलें, तर तो लोकांशीं भांडायला जाईल का? किंवा समारंभांत जेवायला जावें, असें त्याला वाटेल का? किंवा त्याचें मन विषयाकडे ओढा घेईल का? पतंगाला एकदां दिव्याची ज्योत दिसल्यावर तो पुन्हा अंधारांत जाण्याची इच्छा करील का?

डाक्तर (सस्मित)–छे ! नाहीं करणार ! तो ज्योतीवर झडप घालील व वेळ पडल्यास मरूनही जाईल.

महाराज—नाहीं बरें ! तसें नाहीं. पतंगाप्रमाणें भक्ताला मरण येत नाहीं. ज्या दिव्य ज्योतीवर भक्त झडप घालतो, ती ज्योत

त्याला भाजून मारीत नाहीं. तिचें तेज रत्नाच्या तेजासारखें आहे; उज्ज्वल पण स्निग्ध व शीतल. ती ज्योत भाजीत नाहीं, पण शांति देते, आनंद देते.

ज्ञानमार्गाचें काठिण्य.

विचारमार्गानें, ज्ञानयोगाच्या मार्गानें ईश्वरलाभ होतो, पण तो मार्ग फार बिकट. 'मी शरीर नाहीं, मन नाहीं, बुद्धि नाहीं; मला रोग नाहीं, शोक नाहीं, अशांति नाहीं; मी सच्चिदानंदस्वरूप आहें, मी सुखदुःखातीत आहें, मी इंद्रियांना वश नाहीं.' इत्यादि ज्ञानाच्या गोष्टी बोलायला फार सोप्या आहेत, पण अनुभवांत उतरण्याला अत्यंत कठिण आहेत.

कांट्यांनीं हाताला ओरखाडे निघून त्याचें मांस जागजागीं फाटून गेलें आहे, आंतून भळभळ रक्त वाहतें आहे; अशा वेळीं माझ्या हाताला कांहीं झालें नाहीं, मांस फाटलें नाहीं, रक्त येत नाहीं, मला कांहीं होत नाहीं, मी चांगला आहें, असे तोंडांतून शब्द काढणें कांहीं सोपें नाहीं. अज्ञानाचा कांटा ज्ञानाग्नीनें प्रत्यक्ष जाळून टाकला पाहिजे! अज्ञान हेंच सर्व दुःखांचें मूळ आहे. ईश्वरापासून मनुष्याला तेंच दूर ठेवितें.

पांडित्य व ज्ञान.

पुष्कळांना असें वाटतें कीं, पुस्तकांचें अध्ययन केल्यावांचून (ईश्वराचें) ज्ञान व्हावयाचें नाहीं. पण वाचनापेक्षां श्रवण श्रेष्ठ, व श्रवणापेक्षां दर्शन (अनुभव, साक्षात्कार) श्रेष्ठ. पुस्तकें वाचण्यापेक्षां गुरुमुखांतून श्रवण केलें, तर त्याचा ठसा मनावर अधिक चांगला उमटतो. प्रत्यक्ष पाहण्यानें

होणारा ठसा तर उत्तमच. काशीचें वर्णन वाचण्यापेक्षां जो काशीहून जाऊन आला आहे, त्याचे तोंडून तें ऐकणें अधिक श्रेयस्कर; आणि वर्णन ऐकण्यापेक्षां काशीला स्वतां जाऊन तें स्थान पहाणें हें उत्तम.

बुद्धिबळें खेळतांना खेळाडूंपेक्षां बाजूचे प्रेक्षक जे असतात, ते डाव अधिक चांगला सुचवितात. आम्हीं मोठे बुद्धिमान्, असें संसारी लोकांना मनांत वाटत असतें. पण ते विषयासक्त असतात;–धन, मान, सुख इत्यादींत त्यांचें मन लोलुप असतें. ते स्वतां प्रत्यक्ष खेळांत गुंतल्यामुळें खरा डाव त्यांच्या लक्षांत येणें दुरापास्त असतें. संसारत्यागी साधुलोक विषयानासक्त असतात. बुद्धिबळाच्या डावाजवळ बसलेल्या प्रेक्षकांसारखी त्यांची स्थिति असते. संसारांत गुंतलेल्या लोकांपेक्षां ते अधिक बुद्धिमान् असतात, त्यांची बुद्धि अगदीं निर्दोष असते. त्यामुळें संसारी लोकांपेक्षां त्यांना वस्तुस्थितीचें ज्ञान चांगलें असतें. ते स्वतां खेळांत गुंतलेले नसतात, यामुळें त्यांना डाव चांगला समजतो.

डाक्तर (एका शिष्याला)–यांनीं (श्रीरामकृष्णांनीं) पुस्तकें वाचलीं असतीं, तर यांना असें ज्ञान झालें नसतें. फॅरडे यानें प्रकृतीशीं (सृष्टीशीं) तादात्म्य केलें, म्हणून त्याला अनेक शास्त्रीय तत्त्वांचा शोध लागला. पुस्तकी विद्येनें त्याला तसें ज्ञान प्राप्त झालें नसतें. सृष्टिनिरीक्षणाचें त्याला पुष्कळ साहाय्य झालें. गणिताच्या रीति किंवा ठरीव सिद्धान्त घोकल्यानें डोकें बथ्थड होऊन जातें, व तेणेंकरून नवीन शोध लावण्याचें सामर्थ्य त्या डोक्यांत उरत

नाहीं. या गृहस्थांच्या (श्रीरामकृष्णांच्या) अंगीं इतकें ज्ञान आलें याचें कारण त्यांनीं सृष्टीच्या मांडीवर डोकें ठेवलें.

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)—एका काळीं आईच्या भेटीसाठीं तळमळत मीं पंचवटीमध्यें जमिनीवर लोळत पडलेला असें. त्या वेळीं माझ्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह चाले व दर्शन देण्याबद्दल मी आईची सारखी करुणा भाकीं. मी मोठ्या कळवळ्यानें तिला म्हणें: आई, मला अक्षर-ओळखही नाहीं; माझ्यावर कृपा कर, आणि कर्मयोगी निष्काम कर्माचरणानें जें मिळवितात, योगी योग-साधनानें जें अनुभवितात, आणि ज्ञानी विचारानें जें जाणतात, त्याचा साक्षात्कार मला घडीव. आणखी मी काय काय तरी म्हणत असें. हें सर्व ज्ञान मला माझ्या आईनेंच दिलें आहे. तिनें मला किती किती तरी दिलें आहे.

अहाहा! काय आनंदाची अवस्था ती! झोंपेचेंही भान नसे! असें म्हणून **महाराज** गाऊं लागले:—

पद.

(चाल— तस्करा हातीं.)

मोडली माझी । माझि नीज आई! ॥
पुन्हा मी ती न कधीं घेई ॥ ध्रु० ॥
जाहलों जागा । जागा मी जननी ! ॥
कसा तरि आज दैत्यमथिनी ! ॥
दिली मीं परत । परत योगनिद्रा ॥
तुला लखलाभ असो भद्रा ॥
निजे निजविलें । निजविलेंचि आई ! ॥

सदाचें अभय होय पाहीं ॥ मोड० ॥ १ ॥
निशेचें जेथें । जेथ नांव नाहीं ॥
तेथुनी कोणि गुरूभाई ॥
येउनी माते ! । माते प्रेमानें ॥
बोधिलें मजसि अहा ! त्यानें ॥
अनुभवद्युमणी । द्युमणि हृदाकाशीं ॥
तळपला पूर्ण दिव्यराशि ॥
स्नानसंध्याही । संध्याहि म्हणुनि आई ! ॥
गमे मज विफल साच पाहीं ! ॥ मोड० ॥ २ ॥

मीं पुस्तकेंबिस्तकें कांहीं वाचलीं नाहींत. पण पहा ! लोक मला किती मानवात ! याचें कारण काय ? मी आईचें नाम घेतों ! **शंभू मलिक** माझ्यासंबंधानें म्हणे, हे पाहा **शांतिरामसिंग** ! जवळ ना ढाल, ना तलवार ! तरी वाटेल त्याला चीत करायला तयार !

[सगळे हंसतात]

गिरिशचंद्र घोष यांनीं 'बुद्धदेवचरित' या नांवाचें नाटक लिहिलें होतें. तिकडे मग भाषणाचा ओघ फिरला. **गिरिश घोष** यांनीं डाक्तरांना आपल्या नाटकाचा प्रयोग मुद्दाम दाखविला होता, व तो प्रयोग त्यांना फारच आवडला होता.

डाक्तर (गिरिशाला)–दररोज तुम्ही मला नाटकाला नेतां, हें तुम्हांला कांहीं शोभत नाहीं. बरें नाहीं हें ! वाईट माणूस आहां तुम्ही !

श्रीरामकृष्ण (एमला)–काय म्हणतो हा ? मला नाहीं कांहीं कळलें !

एम् (सस्मित)–डाक्तर म्हणतात, आपल्याला त्या खेळाचें अगदीं वेड लागलें आहे !

बिंदु ३१ वा.

श्रीरामकृष्ण (ईशानला)–हा (डाक्तर) अवतार मानीत नाहीं. यावर तुझें काय म्हणणें आहे ?

ईश्वर मनुष्यरूपानें अवतरतो का ?

ईशान–काय बोलावें, महाराज ? अशा विषयांवर वाद करणें, मला कांहीं आवडत नाहीं.

श्रीरामकृष्ण (त्रासिकपणें)—कां ? वेळ पडली, तर खरेंही तुझ्यानें सांगवत नाहीं ?

ईशान (डाक्तरांना)–अहंकार आमच्या श्रद्धेचें खोबरें कारितो. श्रीरामचंद्र हा दिसायला तुमच्या-आमच्यासारखाच मनुष्य होता. पण खरा होता तो परमात्मा. त्याच्या उदरांत ब्रह्मांड होतें. आकाश, चंद्र, सूर्य, नक्षत्रें, समुद्र, पर्वत, जीवजंतु, वृक्षपाषाण, सर्व कांहीं त्याच्या उदरांत होतें !

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)–हें समजायला फार कठिण आहे. जो आपलेसारखाच अनेक उपाधींनीं बद्ध दिसतो, तो पुरुष (तो अवतारी पुरुष) शुद्ध, बुद्ध, नित्य असा परमात्मा कसा असेल ? ज्या महात्म्याला ईश्वरलाभ झालेला असतो, त्याला, जें ब्रह्म तेंच ब्रह्मांडाच्या रूपानें आपल्याला भासमान होतें, हें ठाऊक असतें. तो अनेक उपाधींनीं युक्त असा मनुष्य आहे, असें भासतें, पण खरा तो तसा नसतो. त्याला उपाधि अगदीं नसतात. उदाहरणार्थ,

त्यानें मनुष्याचें रूप घेतलेलें असतें, म्हणून त्या मानवी शरीराच्या पलीकडे तो नसतो, असें त्याच्यासंबंधानें आपल्याला कांहीं म्हणतां येणार नाहीं. तो तिथे (मानवी शरीरांत) असतो तसाच दुसरीकडेही—वाटेल तिथे—त्याच वेळीं असतो. ज्याला साक्षात्कार झालेला असतो, त्याला हें सगळें दिसतें; त्यामुळें त्याचा त्यावर विश्वासही असतो. सामान्य माणसाची ज्ञानदृष्टि कोती असल्यामुळें त्याला हें कांहीं दिसत नाहीं. ज्या भांड्यांत एक शेरच दूध राहणार, त्यांत कांहीं झालें, म्हणून चार शेर राहील का ?

तात्पर्य, ज्या पुरुषांनीं ईश्वरी साक्षात्कार अनुभविला आहे, त्या पुरुषांवर, मनुष्यांनीं अशा बाबतींत श्रद्धा ठेविली पाहिजे. हे पुरुष ईश्वरचिंतनाचेच मार्गांत असतात. कायद्याचे बाबतींत जर आपल्याला सल्ला पाहिजे असला, तर जे धंदेवाले वकील असतील, त्यांनाच नाहीं का तो आपण विचारीत ? आपण कांहीं वाटेल त्या रस्त्यावरच्या माणसाचा सल्ला नाहीं घेत !

\+ + + +

सत्याचें प्रमाण: भौतिकशास्त्र कीं अतींद्रिय ज्ञान ?

ईशान (डाक्तरांना)—आपण अवतार कां मानीत नाहीं ? ईश्वर मनुष्यरूपानें अवतरत नाहीं, असें आपल्याला कां वाटतें ? हाच माझा आपल्याला प्रश्न आहे. ईश्वर साकारही आहे, निराकारही आहे, त्याच्या संबंधानें अशक्य असें कांहीं नाहीं, असें आपण काहीं वेळापूर्वीच कबूल केलें.

श्रीरामकृष्ण (सस्मित)—बाबा, याचें कारण असें आहे कीं,

ईश्वर अवतार घेतो, ही गोष्ट त्याच्या (भौतिक) शास्त्राच्या पुस्तकांत सांगितलेली नाहीं. मनुष्यजातीच्या उद्धाराकरितां परमेश्वर मनुष्याचें रूप घेऊन या मृत्युलोकीं येतो, ही गोष्ट तिथे स्पष्ट शब्दांनीं नमूद केलेली नाहीं. तसें जर तिथे सांगितलेलें नाहीं, तर या गोष्टीवर त्यानें तरी विश्वास कसा धरावा? [सगळे हासतात.]

मी एक मौजेची गोष्ट सांगतों, ऐका. एक माणूस होता, तो एक दिवस आपल्या मित्राकडे गेला. पुढें बोलतां बोलतां तो आपल्या मित्राला म्हणाला, तूं एक ताजी बातमी नाहीं का ऐकलीस? ऐक तर मग. मी काल रस्त्यानें चाललों असतांना तें त्या गल्लींतलें मुकर्जींचें घर एकदम घडघडाँव करून खालीं आलें! तेव्हां त्याचा मित्र म्हणाला, असें का? पण मी वतर्मानपत्रच पाहातों, म्हणजे तूं म्हणतोस तें खरें कीं खोटें, काय तें समजेल. त्यानें वर्तमानपत्र पाहिलें. पण घर पडल्याबद्दल त्यांत कांहींच नव्हतें. नंतर शांतपणें तो आपल्या मित्राला म्हणाला, तुझ्या सांगण्यावर नाहीं आपला बुवा बसत विश्वास! या पत्रांत तसें कांहींच म्हटलेलें नाहीं. त्याच्या मित्रानें उत्तर केलें, पण मीं ती गोष्ट प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिली! तरी त्या माणसाची खात्री कांहीं होईना. शेवटीं तो म्हणाला, हें पाहा, तूं कांहीं जरी म्हटलेंस तरी वर्तमानपत्रांत त्यासंबंधानें कांहींच जर नाहीं, तर मीं ती गोष्ट खरी कशी मानावी बरें? [सगळे हंसतात.]

(भौतिक) शास्त्रांत भौतिक गोष्टींचा विचार केलेला असतो, ही गोष्ट लोक विसरतात. सोपाधिक वस्तूंची चिकित्सा तें कारतें;

निरुपाधिक जगांत त्याचें पाऊलही पडत नाहीं. तिथली माहिती तें काय सांगणार? प्राचीन काळच्या ऋषींसारख्या ज्या पुरुषांनीं ईश्वरलाभ साधलेला असतो, अपरोक्षानुभव घेतलेला असतो, त्यांना तिथलें खरें ज्ञान असतें. 'ईश्वर असा असा आहे,' असें म्हणण्याचा अधिकार फक्त त्यांनाच.

डाक्तरांचें तोंड बंद पडून ते पुढें यावर कांहीं बोलले नाहींत.

गिरिश (डाक्तरांना) **श्रीकृष्ण** हा परमात्मा होता, ही गोष्ट आपल्याला कबूल असलीच पाहिजे. तो **मनुष्य** होता, असें मी आपल्याला म्हणूंच देणार नाहीं. तो सैतान होता, असें तरी एक म्हणा, किंवा ईश्वर होता, असें म्हणा.

सरलता व श्रद्धा.

श्रीरामकृष्ण—बालकासारखें ज्याचें मन सरळ असतें, त्याचीच खरोखर ईश्वरावर श्रद्धा असते. विषयबुद्धीला ईश्वर फार दूर असतो. विषयबुद्धीजवळ नाना संशय उभे असतात. धन, मान, इंद्रियसुख, यांच्या ठिकाणीं मनाची आसक्ति असल्यामुळें त्या मनाचा कल नास्तिकपणाकडे झुकतो. शिवाय अनेक प्रकारचा अहंकार—धनाचा अहंकार, पांडित्याचा अहंकार, वगैरे वगैरे—सारखा फणाणत असतो. (शिष्यांना) पण हा (डाक्तर) सरळ आहे.

गिरिश (डाक्तरांना)—दुटप्पी माणसाला कधींच ज्ञान प्राप्त व्हावयाचें नाहीं, असें नाहीं का, डाक्तरसाहेब, आपल्याला वाटत?

डाक्तर—अलबत ! वाटतें तर ! तसें होणें अशक्य आहे.

श्रीरामकृष्ण—**केशवसेन** किती सरळ होता ! एकदां तो (दक्षि-

णेश्वर येथील) देवळांत आला. सायंकाळीं चार वाजतां तो देवळाची धर्मशाळा पाहात हिंडत होता. मध्येंच त्यानें एकदम विचारलें, या सगळ्या साधुलोकांना नी गरीब-गुरिबांना इतक्यांत जेवण घालावयाचें असेल, नाहीं का ? उशीर झालेला होता, सायंकाळचे चार वाजून गेले होते. त्या लोकांचें त्या दिवसाचें जेवण केव्हांच आटोपलें होतें. या गोष्टी कांहीं त्याच्या लक्षांत आल्या नाहींत. आणि एखाद्या लहान मुलासारखा सरळ आपला त्यानें प्रश्न विचारला. श्रद्धा व ज्ञान हीं समप्रमाणांत असतात. श्रद्धा जिथे कमी, तिथे ज्ञानही कमी ! जिथे श्रद्धा कमी असेल, तिथे पुष्कळ ज्ञानाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. जी गाय वेंचून वेंचून खाते,–खाण्यांत जी विशेष चोखाळ असते,–ती दुधालाही कमीच असते. जी चोखाळ ती दुधाळ नसते. पण जी गाय पुढें येईल त्याचा–मग तें पाला, गवत, पेंढा, कडबा, भुसा, कोंडा, कांहीं असो–फन्ना उडविते, ती दूधही सपाटून देते. तिच्या कासेंतून चरवींत मुसळासारख्या दुधाच्या धारा सुटतात. [सगळे हंसतात.]

बालकासारखा विश्वास–श्रद्धा–जिथे नसेल, तिथे ईश्वरप्राप्तीचें नांव नको. तेव्हां श्रद्धा ही पहिली गोष्ट ! 'हा तुझा दादा हां !' असें एखाद्या मुलाकडे बोट दाखवून आईनें म्हटलें पुरे, कीं, बालकाला तो मुलगा आपला सोळा आणे दादा–खराच आपला वडील भाऊ–वाटतो ! तिथे मग शंकेचें नांव नाहीं ! 'त्या खोलींत बाऊ आहे हां !' असें जर पुन्हा आईनें म्हटलें, तर 'तिथे बाऊ आहे,' या गोष्टीवर त्या बालकाचा सोळा आणे विश्वास बसतो !

बालकासारखी श्रद्धा ज्याच्या ठिकाणीं असते, त्याच्यावर ईश्वराची कृपा होते. संसारी माणसाची हिशोबी बुद्धि ऐहिक नफ्या-तोट्यावर नजर देऊन वस्तूची किंमत ठरवीत असते. मनुष्याचे संकुचित बुद्धीला फार लांबचें दिसत नाहीं. तिला देवलोकांत पाऊल टाकण्याचा अधिकार नसतो. श्रद्धेचा–बालकासारख्या श्रद्धेचा–जर तुम्ही आश्रय कराल, तर ती तुम्हांला देवलोकांत घेऊन जाईल.

डाक्तर (शिष्यगणास)–तथापि, गाईनें जें येईल तें खावें, हें कांहीं बरें नाहीं. माझी एक गाय होती, ती आपलें हवें तें खाई. पुढें मी आजारी पडलों. कां पडलों, कांहीं मला समजेना. होतां होतां, त्या माझ्या दुखण्याचें कारण ती गाय आहे, असें मला समजलें. कारण, पूर्वीं कित्येक दिवस ती कोंडाबिंडा वाटेल तें खात होती! (सगळे हंसतात.) त्याची शिक्षा मला भोगावी लागली! शेवटीं मला हवा पालटण्याकरितां लखनौला जावें लागलें! मी बरा झालों, पण खर्च आला रुपये बारा हजार!

[सगळे ‘ खो खो खो ’ करून हसूं लागले.]

कशानें काय होईल, कांहीं सांगतां येत नाहीं. **पाकपाडा** येथील **बाबूंच्या** घरीं एक सात महिन्यांचें मूल डांग्या खोकल्यानें आजारी पडलें. मी त्याला पहाण्याकरितां गेलों. कांहीं केल्या दुखण्याचें मूळ कारण मला कांहीं सांपडेना. शेवटीं असें कळलें कीं, ज्या गाढवीचें दूध त्या बालकाला पाजीत असत, ती एकदां पावसांत सांपडून भिजली होती!

श्रीरामकृष्ण (सहास्य, शिष्यांना)—काय गृहस्थ पहा! माझी गाडी चिंचेच्या झाडाखालीं होती, म्हणून मला सर्दी झाली, असें म्हणण्यासारखेंच हें झालें! [डाक्तरादि हंसतात.]

डाक्तर (सहास्य)—एकदां एका जहाजाच्या नाखव्याचें कपाळ दुखूं लागलें. भयंकर वेदना होऊं लागल्या त्याला. जहाजावरील सगळे वैद्य जमून विचार करूं लागले,—आतां करावें काय? शेवटीं सर्वानुमतें त्यांनीं जहाजाला पलिस्तर मारलें!

[सगळे हंसतात.]

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)—ईश्वरप्राप्ति व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें निरंतर सत्संग केला पाहिजे. संसारी माणूस कायमचा व्याधिग्रस्त असतो. हा व्याधि दूर होण्याला साधूंचाच विचार घेतला पाहिजे. साधु जें सांगतील, तें नुसतें ऐकून कार्यभाग व्हावयाचा नाहीं. तसें वागायला हवें. औषध पोटांत गेलें पाहिजे, व कडक पथ्य पाळलें पाहिजे.

ईश्वरप्राप्तीचा उपायः साधुसंग व भोगविलासत्याग.

डाक्तर—पथ्य हेंच मुख्य आहे. खरा गुण येण्याला पथ्यच उपयोगीं पडतें.

श्रीरामकृष्ण—वैद्याचे प्रकार तीन असतात—उत्तम, मध्यम, अधम. गुरूचेही तसेच तीन प्रकार असतात. जो वैद्य येतो, रोग्याची नाडी पाहतो व 'हें औषध घे हां,' असें सांगून चालता होतो, तो अधम वैद्य होय. रोगी औषध घेवो, न घेवो, त्याची अशा वैद्याला मुळींच परवा नसते. तो त्याची मुळीं चौकशीच करीत नाहीं.

औषध घेण्याबद्दल जो रोग्याची अनेक प्रकारें समजूत घालतो, तो वैद्य मध्यम. तो मृदु वाणीनें रोग्याला म्हणतो, हें पाहा, जर औषध नाहीं घेतलें, तर तूं कसा बरें बरा होशील? मी देतों हें तूं औषध घे, म्हणजे तुझें दुखणें पाहा कसें तेव्हांच पळून जाईल!

रोगी औषध घेत नाहीं, असें दिसल्याबरोबर जो रोग्याचे छातीला ढोंपर देऊन औषध त्याचे घशांत कोंबतो तो वैद्य उत्तम.

[सगळे हंसतात.]

डाक्तर (सहास्य)—अशीं कांहीं औषधें असतात, कीं तीं घेण्याला बळजबरीच करावी लागत नाहीं. रोग्याचे छातीवर ढोंपरही द्यायला नको आणि जबरीही करायला नको; रोगी अगदीं तीं सुखानें घेतो. उदाहरणार्थ, होमिओपथीचीं औषधें.

[सगळे हंसतात]

श्रीरामकृष्ण (सस्मित)—गोष्ट खरी. पण उत्तम वैद्यानें छातीला ढोंपर लावलें व जबरी केली, म्हणून रोग्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

गुरूचेंही तसेंच. शिष्याला केवळ उपदेशच देऊन जो मोकळा होतो, जो पुढें त्याची बिलकूल वास्तपुस्त घेत नाहीं, तो गुरु अधम. शिष्याचें कल्याण व्हावें, म्हणून जो त्याला उपदेश करितो, शिष्यानें तो उपदेश धारण करून त्याप्रमाणें वागावें, म्हणून त्याची जो पुनःपुन्हा गोड शब्दांनीं समजून घालतो, तो मध्यम. आणि शिष्य कांहीं केल्या ऐकत नाहीं, असें दिसल्याबरोबर जो जबरीनें त्याला आपल्या उपदेशाप्रमाणें करायला लावतो, तो गुरु उत्तम.

कामिनी व कांचन, यांचा त्याग संन्याशांना सांगितला आहे.

संन्यासाचा कडक नियम.

संन्याशांनीं स्त्रियांचीं चित्रेंदेखील पाहूं नयेत. लोणच्याची **आठवण** जरी झाली, तरी तोंडाला पाणी सुटतें. मग त्याचें दर्शन किंवा स्पर्शन झाल्यावर गोष्टच बोलायला नको!

पण ही गोष्ट तुझ्यासारख्या संसारी माणसाला लागू नाहीं. ती केवळ संन्याशांना लागू आहे. मन ईश्वरचरणीं ठेवून व अनासक्त होऊन तूं स्त्रियांचीं संगति केली, तरी हरकत नाहीं. मन अनासक्त व्हावें व ईश्वरचरणीं लागावें, यासाठीं वारंवार एकान्तवासाचें सेवन त्वां करावें. त्या ठिकाणीं माणसाचें–स्त्रीचें किंवा पुरुषाचें–वारेंही नसावें. तिथे तुझ्यावांचून दुसरें कोणीं कोणीं नसावें. अशा ठिकाणीं, भगवंता, मला ज्ञान दे, अशी अगदीं तळमळीनें त्वां परमेश्वराची प्रार्थना करावी. अशा एकान्तांत तूं निदान तीन दिवस तरी–तीन नाहीं तर नाहीं, निदान एक दिवस तरी–राहावें.

एकदोन मुलें झालीं, म्हणजे मग पतिपत्नींनीं भाऊबहिणींप्रमाणें राहावें. व इंद्रियसुखाकडे मनाची धांव पुन्हा जाऊं नये,–पुन्हा मुलेंबाळें होण्याची वेळ येऊं नये–देहाचें सार्थक करण्याला लागणारा मनोनिग्रह आपले आंगीं यावा, यासाठीं त्यांनीं रात्रंदिवस ईश्वराची प्रार्थना करीत असावें.

× × × ×

गिरिश (डाक्तरांना सस्मित)–डाक्तरसाहेब, आपल्याला इथे येऊन तीनचार तास झाले! आपण आपले रोगी पाहण्याला केव्हां

जाणार कांहीं समजत नाहीं. असें वागून आपला धंदा कसा चालणार? बुडेल ना सगळा तो. (सगळे हंसतात.)

डाक्तर–धंद्याचें व रोग्यांचें काय घेऊन बसलां! हे तुमचे **परमहंस** मला सर्वस्वीं बुडविणार! (सगळे हंसतात.)

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना सस्मित)–हें पहा, 'कर्मनाशा' या नांवाची एक नदी आहे. तींत उडी टाकली कीं, मोठाच प्रसंग ओढवतो. तींत स्नान केलें कीं कर्मनाश!–त्या माणसाचे हातून मग कोणतेंही कर्म होत नाहीं. (डाक्तर व इतर हंसतात.)

डाक्तर (एम्, गिरिश व इतर शिष्य यांना)–मित्र हो! तुम्हीं मला 'आपलाच' माना. म्हणजे धंद्याच्या दृष्टीनें नव्हे, तर मी तुमचाच कोणी तरी अगदीं जवळचा आहें, असें समजा!

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)—एक गोष्ट तुला सांगतों. एक अहेतुकी म्हणून भक्ति असते. ही भक्ति ज्याच्या ठिकाणीं असते, तो धन्य होय. प्रल्हादाच्या ठिकाणीं ही भक्ति होती. या वर्गातील भक्त असें म्हणतो, हे ईश्वरा, मला धन, मान, देहसुख, यांतलें कांहीं नको. तुझ्या पादपद्मीं माझी शुद्ध भक्ति राहील असें कर.

अहेतुकी. भक्ति.

डाक्तर–हां! खरें आहे. **काली**च्या मूर्तीपुढें वांकतांना मी लोकांना पाहतों. पण अंतःकरणांत त्यांच्या कांहीं ना कांहीं तरी कामना असते;–चाकरी लागावी म्हणून कोणी प्रार्थना करितो, रोग बरा व्हावा, म्हणून कोणी गयांवयां करितो, वगैरे वगैरे सतरा प्रकार! पण कांहीं तरी कामना!

× × × ×

डाक्तर (श्रीरामकृष्णांना)–आपल्याला हें दुखणें झालें आहे, तेव्हां आपण लोकांशीं बोलूं नये. बरें नाहीं तें. पण मी आलों कीं माझ्याशीं बोलायला कांहीं हरकत नाहीं. (सगळे हंसतात)

श्रीरामकृष्ण (सस्मित)–मला तेवढा बरा कर ना लवकर. पहा बरें काय माझी स्थिति झाली आहे !–मला त्याचें नामस्मरणही–भजनही–करवत नाहीं !

डाक्तर (सस्मित)–नामकीर्तन पाहिजे कशाला ? ध्यान केलें कीं झालें !

श्रीरामकृष्ण–काय बोलतोस हें ! मीं आपला एकांगी व्हावें, असें का तुला वाटतें ? मी माशाचे पांच प्रकार करून खाणारा* आहें;—कढी करून, कालवण करून, तळून, भाजून, पुलावा करून, वगैरे वगैरे. ईश्वराची अनेक प्रकारें सेवा करावी, अशी माझी इच्छा असते.–पूजा करावी, जप करावा, ध्यान करावें, त्याचें नाम घेत नाचावें ! सगळें कांहीं करावें, असें मला वाटतें. पण पहा ! माझ्या मनाप्रमाणें मला कांहीं करितां येत नाहीं !

डाक्तर–एकमार्गी किंवा एकांगी असावें, हें मलाही बरें वाटत नाहीं

श्रीरामकृष्ण–तुझा मुलगा अमृत अवतार मानीत नाहीं. त्यांत कांहीं मोठासा दोष नाहीं. ईश्वर निराकार आहे, अशी भावना

---

* बंगाली ब्राह्मणांत मासे खाण्याचा रिवाज आहे, त्यांत पाप असें तिकडे कांहीं मानीत नाहींत, उलट मासे–फक्त मासे–खाणें हा धर्मच मानतात. हें लक्षांत घेतलें म्हणजे वरील भाषणाचें आश्चर्य वाटणार नाहीं.

× × × ×

ठेविली, तरी त्याची प्राप्ति होईल; बरें तो साकार आहे, असें मानलें, तरीही त्याची प्राप्ति होईल. श्रद्धा व शरणागतता–आत्मनिवेदन–हे दोन गुण विशेषेंकरून पाहिजेत. मनुष्याचे ठिकाणीं अज्ञान असतें, पावलोपावलीं तो भुलतो. त्याचें पाऊल कधींच घसरलें नाहीं, असें व्हावयाचें नाहीं. एकशेरी लोटींत चार शेर दूध कधीं तरी राहिल का ?

अवतार न मानला तर दोष आहे काय ?

तूं ईश्वर साकार मान, कीं निराकार मान, पाहिजे तसा मान; पण व्याकुळ होऊन–अगदीं जिवाला तळमळ लागून–त्याचा धावा तुला केला पाहिजे. खरी किल्ली ही आहे. तो अंतर्यामी आहे; आणि आंतरिक कळवळ्यानें केलेला धावा तो ऐकेलच. व्याकुळता असल्यावर कोणत्याही मार्गानें तूं जा,–साकारवाद्यांच्या मार्गानें जा, कीं निराकारवाद्यांच्या मार्गानें जा,–त्याची प्राप्ति झाल्यावांचून रहाणार नाहीं. पुरणाची पोळी तिकोनी असो, वाटोळी असो, कीं चौकोनी असो, तोंडात घातली, कीं ती मिष्ट लागणारच. तुझा अमृत मोठा चांगला मुलगा. [सगळे हंसतात.]

डॉक्तर–आपलाच चेला तो !

श्रीरामकृष्ण (सस्मित)–या जगांत माझा चेला असा कोणीच नाहीं. मीच सगळ्यांचा चेला आहें. सगळे ईश्वराचे चेले आहेत. ईश्वराचे दास आहेत. मीही ईश्वराचा दास आहें. चांदमामा सगळ्यांचाच मामा* आहे; गांवमामा आहे. [सगळे आनंदानें हंसतात]

---

* ' चंद्र हा सगळ्यांचा मामा आहे,' अशी एक दंतकथा बंगालप्रांतांत आहे. तिला अनुसरून हें वाक्य आहे.

बिंदु ३२ वा.

स्थळ.—श्यामपूकर, कलकत्ता. **दिवस.** — मंगळवार, ता० २७ आक्टोबर सन १८८५. **वेळ.** — सायंकाळ, साडेपांच वाजतां. **मंडळी.**—श्रीरामकृष्ण, नरेंद्र (विवेकानंद), शरद् (शारदानंद), कालि (अभेदानंद), राखाल (ब्रह्मानंद), एम् इत्यादि.

दुर्गापूजेचा राष्ट्रीय महोत्सव आटपून थोडे दिवस झाले होते. **श्रीरामकृष्णांच्या** शिष्यांचीं मनें त्या उत्सवाकडे मुळींच नव्हतीं. कशीं असणार? त्यांच्या गुरुदेवाची प्रकृति अत्यवस्थ असतां त्यांच्या मनांना उल्हास येणार कसा? दक्षिणेश्वर येथील ज्या कालीच्या देवालयांत **श्रीरामकृष्ण** नेहमीं राहत असत, तें देवालय कलकत्त्यापासून बरेंच दूर असल्यामुळें कलकत्त्यांतील वैद्यांना तेथें वारंवार जाणें कठिण होतें. यासाठीं **श्रीरामकृष्ण** श्यामपूकर येथें येऊन राहिले होते. आज तीन महिने त्यांचा मुक्काम तिथेंच असून डा० **सरकार** यांचें औषध त्यांना सुरू होतें. ही व्याधि असाध्य कोटींतली आहे,—मानवी उपायांना आवरणारी नाहीं,—असें डाक्तरांनीं जेव्हां अप्रत्यक्षपणें सुचविलें, तेव्हां बिचारा शिष्यगण पुरा हताश होऊन गेला. तो दिव्य पुरुष, या अफाट संसार-सागरांत आपल्याला निराधार टाकून,—पोरक्या पोरांप्रमाणें किंवा धनगर नसलेल्या मेंढरांप्रमाणें आपली स्थिति करून—लवकरच जाणार, ही गोष्ट त्यांना खरीही वाटेना! कशी वाटणार बरें? त्या सत्पुरुषाच्या गोड सहवासांत जे एकामागें एक अनेक आनंदाचे दिवस त्यांनीं घालविले, ते संपले,—यापुढें ते आतां लाभावयाचे नाहींत,—

हें मनांत आलें, म्हणजे त्यांना ज्या वेदना होत, त्या काय सांगाव्या ! कुठें तरी एका बाजूला जाऊन ते आपलें दुःख अश्रुरूपानें बाहेर टाकण्याचा प्रयत्न करीत. आशेला मरण नसतें म्हणतात, तेंच खरें. आशेला कांहीं आधार नसतां आशा धरून, ते बरे व्हावे, म्हणून ते (शिष्य) परमेश्वराची सारखी करुणा भाकीत. तनमनानें ते त्यांची चाकरी करीत होते, त्यांची शुश्रूषा करीत होते, रात्रंदिवस त्यांना काय पाहिजे, काय नको, इकडे पाहत होते. गुरूनें—**श्रीरामकृष्णांनीं**—संसारत्याग करून जी महत्त्वाची व लोकोत्तर कामगिरी बजावली, तिनें **नरेंद्रादि** तरुण शिष्यांना संसारत्यागाची स्फूर्ति दिली. वैराग्याचे मूर्तिमंत पुतळे म्हणून आज ते (शिष्य) जे गाजत आहेत, ते तरी त्या स्फूर्तीमुळेंच. कारण, ज्या **श्रीरामकृष्णांनीं** ईश्वरलाभासाठीं संसार व तदनुषंगिक मानलेलीं सुखें यांवर लाथ मारली, त्या **रामकृष्णांचें** प्रत्यक्ष उदाहरण--त्या **रामकृष्णांचा** ठळक कित्ता—त्यांच्या डोळ्यांपुढें नव्हता का ?

ज्या अवतारी पुरुषाच्या कीर्तीनें सर्व प्रांत दुमदुमून गेला होता, तो जरी अत्यवस्थ पडला होता, तरी,—काय चमत्कार पहा !—त्याला केवळ पाहाण्यासाठीं, त्याचें ओझरतें तरी दर्शन घेण्यासाठीं लोकांची गर्दी लोटत होती ! **श्रीरामकृष्णांचें** केवळ सांनिध्य मनाला अनुपम शांति व आनंद यांचा लाभ घडविणारें आहे, असें त्यांना वाटे. 'अहाहा ! किती ममताळू ! किती प्रेमळ !' असे त्यांच्याविषयीं ज्याच्या त्याच्या तोंडून आपले उद्गार निघत.

श्रीरामकृष्णांना इतक्या दैहिक यातना होत होत्या, पण सर्वांच्या --गरीबश्रीमंतांच्या, आबालवृद्धांच्या–कल्याणाची चिंता त्यांना जाचीत असल्यामुळें ते त्यांना देवाच्या–आईच्या–गोष्टी सांगत! शेवटीं डाक्तरांनीं शिष्यांना अशी सक्त ताकीद देऊन ठेविली कीं, त्यांना बोलूं देऊं नका व लोकांना त्यांचें दर्शन घेऊं देऊं नका! डा० **सरकार** तासानतास–कधीं कधीं तर सारखे सहासहा, सात-सात तास–त्यांच्याजवळ बसून रहात. ते त्यांना म्हणत, महाराज! आपण ज्याच्या-त्याच्याजवळ किती बरें बोलतां! असें बोलणें आपल्याला बरें नाहीं! माझ्यावांचून कोणाजवळ आपण फार वेळ बोलूं नये;–माझ्याजवळमात्र बोलायला कांहीं हरकत नाहीं.

डाक्तरांचा हा सल्ला कानांला चमत्कारिक लागतो; पण त्याचें खरें कारण असें होतें कीं, त्यांच्या संगतीनें व त्यांच्या मुखांतून स्रवणाऱ्या वाक्सुधेनें त्यांना (डाक्तरांना) अगदीं वेड लावून टाकलें होतें.

विवेकानंद व डाक्तर यांशिवाय या प्रसंगीं, **गिरिश घोष** (प्रसिद्ध बंगाली कवि व नाटककार), डा० **दोकडी**, छोटा **नरेंद्र**, **राखाल**, **एम्**, **शरद्**, वगैरे मंडळी हजर होती.

डाक्तरांनीं हात पाहिला व औषधाची व्यवस्था केली. रोगा-संबंधानें कांहीं वेळ बोलणें झाल्यानंतर **श्रीरामकृष्णांनीं** डाक्त-रांच्या सांगीप्रमाणें औषधाचा एक भाग घेतला. मग डा० **सरकार** जाण्याकरितां उठून म्हणाले, **श्यामबाबू** आतां आपले-जवळ आहेत बोलायला; तेव्हां मला रजा द्यावी.

श्रीरामकृष्ण–कांहीं पदें ऐकण्याची इच्छा आहे का तुझी?

डाक्तर–आहे, इच्छा फार आहे;–पण आपल्या भावाचें उद्दीपन होऊन आपण उन्मत्त व्हाल व लागाल हातवारे करीत धांगडधिंगा घालायला! भाव नेहमीं चेपून ठेवला पाहिजे.

डाक्तर पुन्हा बसले. नरेंद्र (विवेकानंद) मधुर आवाजानें पद म्हणूं लागला. तंबुरा व मृदंग त्याची साथ करूं लागले.

पद.

(चाल–राधाधरमधुमिलिंद.)

रचना तव अनिवार ॥ भगवन् ॥ तीस न पारावार ॥भगवन् ॥
अपारशोभा–अगार केवल अतुल विश्वसंसार! ॥ भग० ॥ ध्रु० ॥
अनुपम तव भांडार ॥ भगवन् ॥ अनुपम तव भांडार ॥
अनंत तारा नभीं चमकती सुरत्नकांचनहार ॥ भगवन् ॥ १ ॥
तेजांचे संभार ॥ भगवन् ॥ तेजांचे संभार ॥
चंद्र किती हे सूर्य किती हे नाहीं अंत न पार ॥ भगवन् ॥ २ ॥
तूंच खरा दातार ॥ भगवन् ॥ तूंच खरा दातार ॥
धनधान्यांहीं वसुंधरा ही सुंदर केली फार ॥ भगवन् ॥ ३ ॥
गाति तुझा बडिवार ॥ भगवन् ॥ गाति तुझा बडिवार ॥
अगणित जन हे देति धन्यता महेश! वारंवार ॥ भगवान् ॥ ४॥

तो दुसरें पद म्हणूं लागलाः—

पद.

(चाल–जरि कुणा श्रीमंताची.)

निबिड घोर तिमिरीं तूझा रम्यरूपराशी।
कोटि सूर्यचंद्रां दिपवी भुलवि लोचनांशीं ॥ ध्रु ॥
याच भागिं गिरिच्या कुहरीं ध्यानमग्न योगी।
अमर्याद अंधाराच्या खोल मध्यभागीं।

दिव्य महा निर्वाणाच्या समुद्रान्तरंगीं ।
परम शांतिपरिमल वाहे खळ न लवहि त्याशीं ॥ निबिड० ॥१॥
महाकालभीषणरूपा आजि तूं धरोनी ।
तिमिररूप काजाळि शेला अंगिं पांघरानी ।
सुखसमाधिमंदिरिं माते! एकली बसोनी ।
करिसि काय सांगें तूं गे! असिस कोण ऐसीं ॥ निबिड० ॥ २ ॥
तुझ्या अभय उभय मृदुल चरणपंकजान्तीं ।
विनत वत्सवत्सलतेची ज्वलित विमल कान्ती- ।
चमचमाट चपला करिते वारिते अशान्ती ।
चिन्मयमुखराशि पोहे अट्टअट्टहासीं ॥ निबिड० ॥ ३ ॥

डाक्तर (एमला)–महाराजांविषयीं विचार केला, तर हें गाणें कांहीं बरें नाहीं. भावोदय झाला, तर मोठा अनर्थ होईल!

श्रीरामकृष्ण (एमला)–काय म्हणतो तो?

एम्–डाक्तरांना अशी भीति वाटते कीं, या गाण्यानें आपल्या भावाचें उद्दीपन होऊन आपली समाधि लागेल!

श्रीरामकृष्ण (हात जोडून डाक्तरांना)–नाहीं, नाहीं बरें बाबा! कशाला माझ्या भावाचें उद्दीपन होतें आहे? ठीक आहे, शांत आहें मी!

पण हे शब्द बोलत असतां असतांच **महाराजांचें** भान हळुहळू हरपत चाललें होतें! होतां होतां गंभीर समाधींत ते मग्न होऊन गेले! शरीर स्तब्ध झालें, हाल ना चाल! डोळे स्थिर झाले! वाचा बंद झाली! काष्ठाच्या किंवा पाषाणाच्या पुतळ्यासारखे ते बनले! अगदीं बाह्यशून्य! मन, बुद्धि, अहंकार, चित्त हीं सर्व अंतर्मुख झालीं! मनुष्यत्वाचें कांहीं चिन्ह त्यांच्या ठिकाणीं

राहिलें नाहीं! नरेंद्राच्या मधुर कंठांतून मधुर गायनाचा प्रवाह पुन्हा चालू झाला. तो पुन्हा म्हणूं लागलाः—

पद.

(चाल—अंकित पदांबुजाची दासी.)

सुंदर दिसे किती ही कांती। काढिली नभाची कांती ॥सुं॥ध्रु०॥
सुंदरमुख हें स्वांतिं उपजवी। नवनीलनीरदभ्रांति ॥ सुं० ॥ १ ॥
हृदयनाथ कीं प्राणनाथ ये। मम मंदिरिं एकांतिं ॥ सुं० ॥ २ ॥
प्रेमसिंधु मम उचंबळे किति। भाग्य पिकेस वसंतिं ॥ सुं० ॥३॥
हृदयवल्लभा! काय धनें तुज। देतां हो तव शांति ॥ सुं० ॥ ४ ॥
प्राण हृदय घे धे मम सारे। माझी हीच विनंति ॥ सुं० ॥ ५ ॥
अहा! पहा मम स्पृहा महा नच। लाधो पदिं विश्रांति ॥सुं०॥ ६

आणखी पद सुरू झालें:—

पद.

(चाल—चंद्रकांत राजाची कन्या.)

पदारविंदीं मरंदपानीं जर नंदानंदा!।
मनोमिलिंद न धुंद होय मम अक्षय गोविंदा! ॥ ध्रु० ॥
काय राहिला मला जीवनीं धणी चक्रपाणी!।
नको नको हें करंट जीवित दुःखाची खाणी ॥ १ ॥
परम रत्न तूं त्या तुज यत्न न हो जरि रक्षाया।
बहु धनराशी धरुन उराशीं जपणें किति वायां? ॥२॥
सुंदरतरसुकुमारकुमाराननचंद्रीं नाहीं-।
प्रेममुखाची छवी जरी तव नेचिछ पहायाही ॥ ३ ॥
कास्य कौमुदी चारु चंद्रमा तिमिरविनिर्मित हीं।
प्रेमचंद्र तव हृदयनभीं जों उदयमान नाहीं ॥ ४ ॥
प्रियतमपत्नीशुचिप्रेमही भासे मज मलिन।
प्रेमकनककोंदणीं तिच्या त्वत्प्रेमरत्न जरि न ॥ ५ ॥

तुजविषयींची शंका जी कां मोहकन्यका रे ! ।
कृष्णसर्पिणीचिरदंशापरि वाटे कंसारे ! ॥ ६ ॥
काय वदूं तुज अधिक मुकुंदा ! मुचकुंदोद्धारा ! ।
आनंदाचा कंद खरोखर तूं वृंदकिशोरा ! ॥ ७ ॥
हृदयरत्न तूं स्वच्छंदा ! मम राधाधरछंदा ! ।
मनोमिलिंद न धुंद होय मम अक्षय गोविंदा ! ॥ पदा०

पद ऐकतां ऐकतां--विशेषेंकरून सतीच्या पवित्र प्रेमाविषयीं पदांत जो उल्लेख होता तो ऐकून—डाक्तरांचे नेत्र पाण्यानें भरून आले व 'आहा ! आहा !' असे उद्गार त्यांच्या तोंडांतून निघाले.

नरेंद्रानें पुन्हा पद सुरू केलें:—

पद.

(चाल—अर्धतनू वारुळीं.)

प्रेमरसार्द्रा मंदसमीरणलहरी गुणसुंदरी ।
वाहती कधिं या हृदयांबरीं ॥ ध्रु० ॥
पूर्णकाम हरिनाम गात कधिं बाष्पाकुललोचनीं ।
निरत हो प्रेमजलावर्जनीं ॥
आत्मा मन कधिं शुद्ध होउनी जाइन वृंदावनीं ।
भुवनिं त्या प्रेमाच्या रंगणीं ॥
हे संसृतिमायाबंध सकल तोडुनी ।
हें हरिमय सारें तसें विश्व मानुनी ।
या भक्तिपथावरि सदा मुदा लोळुनी ।
'होइन केव्हां कंठमणी तव' हीच आस अंतरीं ।
धरुनि मी झुरेन केव्हां हरी ! ॥ प्रेम० ॥ १ ॥
भक्तिशलाका कधीं घेउनी नेत्रतिमिरवारिणी ।
घालिं मी ज्ञानांजन लोचनीं ॥
स्पर्शमणी तूं तुझ्या स्पर्शनें लोहतनू कांचनी ।

कधीं हो नयनमनोमोहिनी ॥
हें धर्माधर्मी वेड सर्व सोडुनी।
या जातिकुलांच्या तटा त्वरित मोडुनी ।
ही रूढिराक्षसी बया सपाटें निवटुनी।
भीतिभावना लज्जाऽहंता चिंता नक्तंचरी ।
कधीं या लंघिन मी श्रीहरी ! ॥ प्रेम० ॥ २ ॥
भक्तराजपदराजीवोद्भृत धूलि स्वांगावरी ।
कधीं मी घेइन नेणें हरी ! ।
शश्वद्वैराग्याचा शेला टाकिन खांद्यावरी ।
कधीं मी सांगें मजला हरी ! ॥
त्या प्रेमरूपिणी सुंदर यमुनाजलीं ।
या उभय करांची सवें जुळुनि अंजुली ।
मी भरूनि उदकांजुलीवरी अंजुली ।
प्राशुनि केव्हां प्रेमधुंद मी विहार हरिपदिं करीं ।
जसा कीं मधुकर कमलाकरीं ॥ प्रेम० ॥ ३ ॥

बिंदु ३३ वा.

ब्रह्म.

इतक्यांत **श्रीरामकृष्णांना** बाह्यसंज्ञा प्राप्त झाली. गायन समाप्त झालें. नंतर, पंडित व मूर्ख, बाल व वृद्ध, स्त्रिया व पुरुष, श्रेष्ठ व पामर, या सर्वांचीं मनें सारखींच मुग्ध करणारें असें संभाषण सुरू झालें. सर्व सभा तटस्थ बसली होती. कोणाच्याही तोंडून एक अवाक्षरही निघत नव्हतें. जो तो एकदृष्टीनें **श्रीरामकृष्णांच्या**, दिव्य आनंदानें व तेजानें उचंबळणाऱ्या मुखाकडे पहात होता. त्यांना होत असलेल्या कठिण व्यथेचें या वेळीं तिथे चिन्ह तरी

दिसत होतें का? छे! नांव नाहीं! त्या वेळीं त्यांचें मुख प्रफुल्ल कमलाप्रमाणें शोभत होतें.–आनंद व ईश्वरी तेज हीं तिथे केवळ लोळत होतीं!

डाक्तरांकडे वळून **श्रीरामकृष्णांनीं** बोलण्याला सुरुवात केली.

श्रीरामकृष्ण—हें पहा, डाक्तर, लज्जा सोडून दे. भगवंताचें नांव घेण्याला, भजनानंदांत नाचण्याला लज्जा कसली? समस्तांची लज्जा त्यजून भगवच्चिंतन करावें. लोक काय म्हणतील, याचा विचारच करूं नये. "लज्जा, घृणा, भीति या सिद्धीला आड येती," हें थोर तत्त्व नेहमीं लक्षांत ठेव. "मी एवढा मोठा माणूस, आणि मी 'हरि हरि' म्हणत नाचावें! हें थोर थोर लोकांच्या कानांवर गेलें, तर ते मला काय म्हणतील? 'अरे! हा डाक्तर 'हरि हरि' म्हणत नाचतो! केवढी शरमेची गोष्ट! याचें बहुतेक डोकें फिरलें!' अशीं लोकें नांवें ठेवतील." असें लाजवट माणसाच्या मनांत येतें.

डाक्तरः—त्या दिशेकडे मला बघावयाचेंच नाहीं. लोकें कांहीं म्हणोत, मला त्याचें कांहीं वाटत नाहीं.

श्रीरामकृष्णः—(सस्मित) वाटत नाहीं कां? पुष्कळ वाटतें!

(सगळे हंसतात.)

श्रीरामकृष्णः—ज्ञान व अज्ञान या दोहोंच्या पलीकडे जा, तर तुला ईश्वराची प्राप्ति होईल. विविधतेचें जें ज्ञान, त्यालाच अज्ञान म्हणतात. सर्वव्यापी भगवंताचें ज्ञान नसणें, हेंच अज्ञान. जगांत जें एकत्व भरून राहिलें

ब्रह्मदर्शन.

आहे, तें न ओळखणें, याचें नांव अज्ञान. पांडित्याचा जो अहंकार असतो, त्याचें मूळ अज्ञानांतच असतें. सर्व भूतांचे ठिकाणीं एक ईश्वर भरून राहिला आहे, अशी जी निश्चयबुद्धि तिला ज्ञान असें नांव आहे. अखिल विविधतेंत एकत्व किंवा अद्वैत पाहणें, तें हेंच. हें तत्त्व विशेषरूपानें अंतःकरणावर ठसलें, कीं त्याला विज्ञान म्हणतात.

तुझ्या पायाला कांटा बोंचला आहे, असें समज. आतां, तो कांटा काढायला दुसरा कांटा पाहिजे. पण दुसऱ्या कांट्यानें पहिला कांटा काढून झाला, कीं, मग तूं काय करतोस? दोन्ही कांटे फेंकून देतोस. तसेंच, अज्ञानाचा कांटा काढून टाकण्याकरितां ज्ञानाचा दुसरा कांटा आणला पाहिजे. मग ज्ञान, अज्ञान दोन्ही टाकून दिलीं पाहिजेत. तर ब्रह्मदर्शन होणार! कारण, ब्रह्म हें ज्ञानाज्ञानातीत आहे.

एकदां लक्ष्मण रामाला म्हणाला, हे राम! वशिष्ठासारखा एवढा ज्ञानी पुरुष, पण तो पुत्रशोकानें विव्हल झाला! आश्चर्याची गोष्ट नव्हे का ही?

यावर रामानें उत्तर केलें:—बाबा, लक्षांत ठेव, ज्याच्या ठिकाणीं ज्ञान—परमेश्वराचें सापेक्ष ज्ञान--असतें, त्याच्या ठिकाणीं (सापेक्ष) अज्ञानही असतें.

परमेश्वराविषयींचें त्यांचें अज्ञान सुटत नाहीं, तें कायमच असतें. कारण ज्ञान व अज्ञान हीं अन्योन्याश्रयी आहेत. अद्वैताचें ज्ञान म्हटलें कीं, तिथे विविधतेची—द्वैताची—जाणीव आलीच. ज्याला

प्रकाशाचें ज्ञान झालें, त्याला अंधकाराचें ज्ञान आहेच. ज्ञानाज्ञान, पापपुण्य, शौचाशौच, धर्माधर्म, यांच्यापलीकडे ब्रह्म आहे.

असें म्हणून **श्रीरामकृष्ण** रामप्रसादाचें पुढील पद गाऊं लागले.

पद.

(**चाल**–झाली ज्याची उपवर दुहिता.)

चाल मना बा! जाउं फिराया। ईशदयानिलसुख सेवाया ॥धृ०॥
कालीजननीकल्पतरूतळिं, चार फळांची अभिरुचि घ्याया ॥१॥
प्रवृत्ती ती तशी निवृत्ती, उभय तुझ्या या सुंदर जाया ॥ २ ॥
संगें घेई निवृत्तीला, कल्पतरूचा पथ दावाया ॥ ३ ॥
तनय तिचा जो विवेकनामा, तत्त्वकथा तो क्षम सांगाया ॥ ४ ॥
शुचिताऽशुचिता सोडुनि जेव्हां, दिव्य मंदिरीं रिघसि निजाया ॥
जननीदर्शन सुलभ, भेद जें, उभय सतींतिल जाई विलया ॥ ६ ॥
अहंकार तो पिता अविद्या, जननी दोघां दूर करीं या ॥ ७ ॥
मोह तयांचा मायाजालीं, सजला तुजला जरि ओढाया ॥ ८ ॥
अढळधृतीच्या अचलस्तंभीं, गुंतविं त्यातें यत्नें सखया!॥ ९ ॥
धर्माधर्मा मेषयुगा या, बांधुनि ठेवीं धरितां न भया ॥ १० ॥
ज्ञानासीनें छेदिं तयांना, करितां बल ते तुज रोधाया ॥ ११ ॥
बोधिं दुरोनी प्रवृत्तीच्या, संताना बा! कोपादिक या ॥ १२ ॥
वळति न जरि ते न चुकें लवही, ज्ञानसागरीं त्यां बुडवाया ॥१२
पथ हा धरितां नलगे तुजला, कृतकर्मांची भीति धराया ॥१३॥
शांतपणानें यमधर्माला, कांहिं न चिंता उत्तर द्याया ॥ १५ ॥
घडतां हें तुज आळवीन मी ‘ बाबा ! दादा ! हे मनराया !॥ १६ ॥
बाळ! लाडक्या! बापू! बेटा!’ कुरवंडिन ही तुजवरि काया१७
भीति न लवही मग मज वाटे,‘ माझें मन ’ तुज खास वदाया १८

श्याम बसूः–महाराज, दोन्ही कांटे–ज्ञानाज्ञानरूपी दोन्ही कांटे –फेंकून दिल्यानंतर मग काय शिल्लक राहतें?

श्रीरामकृष्ण:—वेदांत ज्याला 'नित्यशुद्धबुद्धरूप' असें म्हटलें आहे, तें शिल्लक रहातें. पण त्याचें स्वरूप मी तुला कसें बरें सांगूं? समज, तूप कसें लागतें, असें तुला कोणीं विचारलें, तर तुपाच्या चवीची कल्पना तुला बरोबर सांगतां येईल का? फारच झालें तर कोणी असें म्हणेल कीं, तूप तुपासारखें लागतें! [सगळे हंसतात.]

ब्रह्म अवाङ्मानस-गोचर आहे.

एक मुलगी होती, तिचें लग्न झालेलें नव्हतें. कुंवार होती ती. ती एकदां आपल्या सोबतिणीला म्हणाली, काय ग! तुझ्या नवरा आला आहे, त्याला पाहिलें म्हणजे तुला आनंद होतो तो कसा काय? यावर ती विवाहित मुलगी म्हणाली, हें पहा! काय बरें याचें उत्तर मी तुला देऊं? तुला नवरा मिळाला किनई, म्हणजे तुझें तुलाच तें कळेल हो! वेडे! तो आनंद तोंडानें का सांगतां येणार आहे? मनोमन साक्ष!

पुराणांत असें सांगितलें आहे कीं, भगवती हिमालयाच्या कन्येच्या रूपानें अवतरली. नंतर तिनें (आईनें) नगाधिराजाला नाना रूपांनीं दर्शन दिलें,—आपलीं नानारूपें आपल्या पित्याला दाखविलीं. तीं सर्व रूपें पाहिल्यानंतर गिरिराज आईला म्हणाला, आई, वेदांत ज्या ब्रह्माचें इतकें वर्णन आहे, त्या ब्रह्माचें मला दर्शन होऊं दे. त्यावर भगवतीनें उत्तर केलें, बाबा, ब्रह्मदर्शन व्हावें, अशी आपली इच्छा आहे ना? तर आपण साधुसंग करावा. आपल्या मनांतलि इच्छा पूर्ण होण्याला दुसरा कांहीं मार्ग नाहीं. ब्रह्म हें कसें आहे, हें तोंडानें कांहीं सांगतां येणार नाहीं.

मी केवळ तुझा दास आहें. जसा तुझा हुकूम होईल, तशी तुझी सेवा करावी, एवढाच माझा अधिकार.

चमत्कार असा होतो कीं, जे ग्रंथाचें अध्ययन करितात त्यांना आपला अहंकार येऊन चिकटतो. **टागोर** (ठाकूर) जवळ माझें असेंच ईश्वराविषयीं बोलणें चाललें होतें. तेव्हां तो मला म्हणाला, हें सगळें मला ठाऊक आहे. मी तें पुस्तकांत वाचलें आहे. यावर मीं म्हटलें, जो दिल्लीला जाऊन आलेला असतो, तो, मी दिल्लीला गेलों होतों, असें ऐटीनें सांगून आपल्या प्रवासाची कधीं फुशारकी मिरवीत नाहीं. जो **बाबू** (सभ्य, कुलीन, थोर) असतो, तो, मी ' बाबू ' आहें, असें का सांगत सुटतो? [सगळे हंसतात.]

श्याम बसू—महाराज, **ठाकुरांच्या** मनांत आपल्याविषयीं चांगलाच आदर आहे.

श्रीरामकृष्ण—दक्षिणेश्वरीं एक होती झाडूवाली: काय तिचा अहंकार सांगूं! तिच्या अंगावर दोन दागिने होते. त्यांमुळेंच, मला वाटतें तिला आकाश ठेंगणें झालें होतें! एकदां असें झालें कीं, ती चालली होती आपल्या रस्त्यानें; इतक्यांत एकदोन माणसें कुठे तिच्या बाजूनें जाऊं लागलीं. तेव्हां ती म्हणते कशीः ' हां ! व्हा बाजूला ! ' [सगळे हंसतात.]

यःकश्चित् झाडूवालीची ही गोष्ट! मग इतर लोकांच्या अहंराच्या गोष्टी काय सांगाव्या !

श्याम बसू—महाराज, पापाला दंड आहे, असें सांगतात.

पाप व माणसाचें कर्तव्य.

बरें, इकडे पाहिलें, तर ईश्वरच सर्व कांहीं करतो, आपण त्याच्या हातांत केवळ बाहुलीं आहों. मग या गोष्टींचा मेळ कसा घालायचा ?

श्रीरामकृष्ण—काय तुझी सराफी बुद्धि ही !

विवेकानंद—सराफी बुद्धि म्हणजे अर्थात् हिशोबी किंवा कांटेकोर बुद्धि !

श्रीरामकृष्ण—मी म्हणतों, बाबा, तूं आपला आंबे खा ! बागेंत आंब्यांचीं झाडें किती शें आहेत, त्यांना खांद्या किती हजार आहेत, पानें किती कोटी आहेत, या हिशोबाचें तुला काय कारण ? तूं इथे आंबे खायला आला आहेस; ते खा नी जा !

(श्याम बसूला) ईश्वरसाधन करण्याकरितां या संसारांत तुला मानवजन्म प्राप्त झाला आहे. तेव्हां ईश्वराच्या पादपद्मीं तुझी भक्ति जेणेंकरून जडेल, तें तूं करावें. हें नी तें, शेंकडों गोष्टी तुला हव्यात कशाला ? तात्त्विक विचार करून तुला काय मिळणार ? हें पाहा, अधपाव दारू घेतली, म्हणजे तूं तर्र होतोस; मग गुत्त्यांत किती मण दारू आहे, याचा हिशोब तुला काय होय ? अंमल येईपर्यंत दारू झोंकणें इतकेंच तुझें काम !

डाक्तर—शिवाय परमेश्वरी गुत्त्यांत उमाप दारू आहे. ती कधींच नाहीं संपणार !

श्रीरामकृष्ण (श्याम बसूला)—आणखी, ईश्वराला तूं पूर्ण कुलमुक्त्यारी कां नाहीं देऊन टाकीत ? त्याच्यावर आपला सर्व भार टाक. एखाद्या सज्जनावर जर तूं कांहीं गोष्टींत भार टाकलास,

तर तो काय अन्याय करील? तुझें नुकसान करील? कधीं नाहीं करणार. पापी माणसाला तो पुढें शिक्षा देईल कीं नाहीं देणार, एक त्यालाच ठाऊक!

डाक्तर—त्याच्या मनांत काय आहे, त्याला ठाऊक. मनुष्याला त्याचा हिशोब कसा लागणार? तो मानवी हिशोबाच्या पलीकडे आहे.

श्रीरामकृष्ण (श्याम बसूला)––तुम्हांला, कलकत्त्यांतील लोकांना एक मोठी शिष्टपणाची खोडच लागून राहिली आहे! पाहावें तेव्हां तुमच्या आपलें तोंडीं हें: ईश्वराची ठिकाणीं वैषम्यदोष आहे! मनुष्यांविषयीं त्याची समबुद्धि दिसत नाहीं. तुम्ही म्हणतां, त्यानें कांहीं माणसांना सुखांत नी कांहीं माणसांना दुःखांत कां ठेवावें? या बेट्यांना जसें आपलें मन तसेंच ईश्वराचें मन वाटतें!

कीर्ति किंवा लोकमान्यता हेंच जीवितसाफल्य काय?

हेम आपल्या मित्रमंडळीबरोबर दक्षिणेश्वरीं येत असे. जेव्हां जेव्हां त्याची माझी गांठ पडे, तेव्हां तेव्हां तो म्हणे: 'हें पहा, भट्टाचार्य, जगांत लोभनीय अशी एक वस्तु आहे—मान. नाहीं बरें?' **ईश्वरप्राप्ति हेंच मनुष्यजन्माचें सार्थक आहे, ही गोष्ट फार थोड्यांचे लक्षांत येते.**

सूक्ष्म शरीर.

श्याम बसू—महाराज, स्थूल शरीराहून निराळें असें एक सूक्ष्म शरीर आम्हांला असतें, असें म्हणतात. हें सूक्ष्म शरीर कोणी दाखवील का? स्थूल शरीराला हें सोडून निघून जातें, असें दाखवितां येईल का?

श्रीरामकृष्ण—बाबा, जो खरा भक्त आहे, त्याचें काय अडलें आहे तुला हें दाखवायला? कांहीं मूर्ख माणसें आपल्याला मानतात, किंवा मानीत नाहींत, याची तो मुळींच परवा करीत नाहीं. कांहीं बडीं माणसें आपल्या हातांत असावीं, अशी त्याची मुळींच इच्छा नसते.

श्याम बसू—–बरें, स्थूल शरीर व सूक्ष्म शरीर, यांतला भेद कृपा करून आपण सांगाल का?

श्रीरामकृष्ण—स्थूल देह पंचमहाभूतांचा बनलेला असतो. मन, बुद्धि, अहंकार व चित्त, हीं मिळून सूक्ष्म देह होतो. ज्या शरीरांत ईश्वरी आनंदाचा लाभ अनुभवितां येतो, त्याला 'कारण-देह' अशी संज्ञा आहे. तंत्रांत त्याला 'भगवती-तनु' असें म्हटलें आहे. या सर्वांच्या पलीकडे 'महाकारण-देह' आहे. तो निरुपापाधिक–तुरीय–आहे. त्याचें वर्णन तोंडानें नाहीं करतां येणार.

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण देह.

बिंदु ३५ वा.

साधनांचें प्रयोजन.

श्रीरामकृष्ण–नुसत्या श्रवणानें काय होणार? साधन मुख्य आहे. तें केलें पाहिजे.

'सिद्धि' 'सिद्धि' (भांगेचीं पानें) असें नुसतें तोंडानें म्हटल्यानें काय होणार? त्यानें निशा येईल का? तीं पानें वांटून अंगाला

लावलीं, तरी निशा येईल का ? नाहीं. तीं पोटांतच घेतलीं पाहिजेत.

सुताचे निरनिराळे नंबर असतात. चाळीस नंबरचें सूत कोणतें, एकेचाळीस नंबरचें कोणतें, हें त्या धंद्यांत पडल्याशिवाय कसें कळेल ? जे सुताच्या धंद्यांत असतात, ते, हें अमुक नंबरचें सूत, असें तेव्हांच ओळखतात. म्हणून मी म्हणतों, कांहीं थोडें साधन कर, मग तुला स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या देहांचें आपो-आप ज्ञान होईल.

भक्ति हेंच सार: प्रार्थना कशी करावी ?

जेव्हां जेव्हां तूं ईश्वराची प्रार्थना करशील, तेव्हां तेव्हां, भगवंता ! तुझ्या पादपद्मीं माझी दृढ भक्ति बसो, असेंच त्याच्याजवळ माग. अहल्या शापमुक्त झाल्यानंतर श्रीराम म्हणाला, वर माग. तेव्हां अहल्या म्हणाली, रामा, वर द्यायचा असेल, तर हा दे: मला सूकरयोनि प्राप्त झाली तरी कांहीं चिंता नाहीं; पण रामा ! तुझ्या पादपद्मीं माझें मन निरंतर रतो !

मी आईजवळ नेहमीं फक्त भक्तिच मागतों. आईच्या पादपद्मीं फूल वाहून हात जोडून मी म्हणें, आई, हें आपलें अज्ञान घे, हें आपलें ज्ञानही घे. दोन्ही घे. मला नकोत तीं. मला शुद्ध भक्ति दे. हें तुझें शौच, हें तुझें अशौच; मला कशाला तीं ? मी फक्त शुद्ध भक्तीचा भुकेला आहें. तेवढी मला दे. हें तुझें पाप, हें तुझें पुण्य; मला हेंही नको, तेंही नको. मला तेवढी शुद्ध भक्ति दे. हें तुझें सुख, हें तुझें दुःख; दोन्ही घे आपलीं ! मला त्यांतलें कांहीं

नको ! मला फक्त शुद्ध भक्ति दे. हा तुझा धर्म घे, हा तुझा अधर्म घे; मला त्या दोहोंच्याही पलीकडे ठेव. मला नकोत ते. आई, मला फक्त तुझी शुद्ध भक्ति दे.

धर्माचें फल घेतलें, कीं अधर्माचें फल घेतलेंच पाहिजे. पुण्याचें फळ हवें असलें, कीं पापाचेंही घेण्याची तयारी पाहिजे. ज्ञान घेतलें कीं अज्ञान घेतलें पाहिजे. शौच पाहिजे, तर अशौच टाळतां येणार नाहीं. प्रकाशाचें ज्ञान झालें, कीं, अंधकाराचें ज्ञान आलेंच तिथे. जिथे एकीचा बोध झाला, तिथे बेकीचा झालाच पाहिजे.

ईश्वराचे पादपद्मीं ज्याची भक्ति जडली, तो पुरुष धन्य ! मग तो सूकरमांस खाणारा असला, तरी कांहीं फिकीर नाहीं. पण हविष्यान्न खाऊनही एखादा जर संसारासक्त असेल—

डाक्तर—तर अधमच तो ! त्याला काय फलप्राप्ति होणार ? यावर मी एक गोष्ट सांगतों. बुद्धानें एकदां सूकरमांस खाल्लें. पुढें काय झालें म्हणतां ? पोटशूळ ! मग आराम पडावा म्हणून बुद्धानें घेतली अफू. निर्वाणबिर्वाण काय तें आपल्याला ठाऊकच आहे. अफूनें तो धुंद झाला; बाह्यज्ञान कांहीं राहिलें नाहीं. निर्वाण तें हेंच !

बुद्धदेवाच्या निर्वाणाची ही डाक्तरांनीं केलेली व्याख्या ऐकून सगळे अगदीं पोट धरधरून हासूं लागले. पुन्हा बोलणीं चालू झालीं.

गृहस्थ व निष्काम कर्म.

श्रीरामकृष्ण—(श्याम बसूला) संसार करण्यांत मुळींच दोष नाहीं. पण ईश्वराचे पादपद्मीं मन ठेवून, कामनाशून्य होऊन कर्में केलीं पाहिजेत. समज, एखाद्या माणसाचे पाठीला पुळी झाली आहे. पण

तो माणूस सर्वांबरोबर नेहमींप्रमाणें गप्पागोष्टी बोलत असतो. कदाचित् कांहीं रोजचें कामकाजही करितो. पण त्याचें खरें लक्ष असतें त्या पुळीच्या वेदनांकडे! तसेंच, जरी तूं संसार करीत असलास तरी तुझें लक्ष असलें पाहिजे भगवंताकडे!

जारिणी असते घरांत आपल्या संसाराचीं कामें करीत.पण तिचें लक्ष असतें कुठे? जाराकडे. तद्वत् संसाराचीं कामें करावीं.-प्रभु-चरणीं मनाचा लय लावून संसार करावा. गृहकृत्यें सारीत असतांना तिच्या (जारिणीच्या) मनाची तंद्री लागलेली असते तिच्या जाराकडे. (डाक्तरांना) समजतें का हें?

डाक्तर—त्या बाईसारखी कधींच माझ्या मनाची भावना झालेली नाहीं, तेव्हां तें कसें समजणार?

श्याम बसू—डाक्तरसाहेब, बोलतों याची माफी करा; पण आपल्याला थोडेंसें त्यांतलें कळलें आहे. नाहीं बरें?

[सगळे हंसतात.]

श्रीरामकृष्ण—विशेषेंकरून आज पुष्कळ दिवस तो धंदा करतो आहे. असें नाहीं का? [सगळे हंसतात.]

श्याम बसू—महाराज, थिऑसफीबद्दल आपलें काय मत आहे?

श्रीरामकृष्ण—त्यांतलें तात्पर्य असें आहे: जे लोक शिष्य करीत सुटतात, ते हलक्या प्रतीचेच. बरें, ज्यांना सिद्धीची-नाना प्रकारच्या शक्तींची--अपेक्षा असते, तेही हलक्या प्रतीचेच. उदाहरणार्थ, गंगेच्या प्रवाहावरून चालत जाणें, ही एक सिद्धि आहे; किंवा दूर ठिकाणीं

थिऑसफी.

असलेला मनुष्य काय बोलतो आहे, हें सांगणें, हीही सिद्धिच. अशा लोकांना खरी भक्ति प्राप्त होणें मोठें कठिण आहे.

श्याम बसू—पण महाराज, हिंदुधर्माची पुन्हा स्थापना करण्याचा त्यांचा (थिऑसफिस्टांचा) प्रयत्न आहे.

श्रीरामकृष्ण—असेल कदाचित्. मला त्यांची कांहीं विशेष माहिती नाहीं.

श्याम बसू—-मृत्यूनंतर जीवात्मा कुठे जातो,–चंद्रलोकीं, नक्षत्रलोकीं, इत्यादि गोष्टी थिऑसफीनें कळतात.

श्रीरामकृष्ण—तें असो. पण मी आपला विचार तुला सांगतों. एकदां कोणोसें हनुमंताला विचारलें, आज तिथि कोणती? तेव्हां त्यानें उत्तर केलें, बाबा, वार, तिथि, नक्षत्र मला कांहीं समजत नाहीं. माझा विषयच नाहीं तो. मला केवळ एक समजतें–रामाचें चिंतन.

श्याम बसू—महाराज, 'महात्मे' म्हणून कोणी आहेत, असें थिऑसफिस्ट मानतात. आपला विश्वास आहे का त्यांच्यावर–त्या महात्म्यांवर?

श्रीरामकृष्ण—तुला माझें खरें मानायचें असेल, तर आहे, विश्वास आहे. पण आज या गोष्टी राहूं देत. मला जरा बरें वाटलें, म्हणजे तूं ये. माझ्या शब्दांवर तूं विश्वास ठेव, म्हणजे तुला शांति प्राप्त होईल;–शांतीचा उपाय मी सांगेन. मी पैसे घेत नाहीं, कपडे घेत नाहीं, कांहीं घेत नाहीं, हें तूं पहातोसना? नाटकांतील नटांना उत्तेजन यावें, म्हणून कधीं कधीं मोठमोठीं माणसें

त्यांना बक्षिसें देतात. इथे लोकांना तशीं कांहीं बक्षिसें द्यावीं लागत नाहींत, म्हणून पुष्कळ लोक इथे येतात. [सगळे हंसतात.]

(डाक्तरांना) तुला मला एवढेंच सांगायचें आहे—पण रागावूं नको हो!—कीं, पैसा, मान, व्याख्यानें, इत्यादि इत्यादि संसाराच्या गोष्टी आतां पुष्कळ झाल्या तुझ्या. आतां थोडें ईश्वराकडे लक्ष लाव आणि कधींबिधीं इथे येत जा. ईश्वराच्या कथा ऐकणें चांगलें. त्यानें मनाला उद्दीपन मिळून तें ईश्वराकडे वळतें.

बिंदु ३६ वा.

ईश्वरी अवतार.

कांहीं वेळानें रजा घेण्याकरितां डाक्तर उठले. पण इतक्यांत **गिरिशचंद्र घोष** आले, व त्यांना पाहून डाक्तरांना इतका आनंद झाला कीं, ते पुन्हा बसले. **गिरिशचद्रांनीं महाराजांना** प्रणाम केला व त्यांची चरणधूलि मस्तकीं धारण केली. डाक्तर हें सर्व लक्षपूर्वक पहात होते.

डाक्तर——मी असतांना कांहीं **गिरिश बाबू** यायचे नाहींत; मी जायला निघालों कीं ते यायचे. (सगळे हंसतात.)

नंतर विज्ञानसभेसंबंधानें व तेथें होणाऱ्या व्याख्यानांसंबंधानें **गिरिश बाबूंबरोबर** डाक्तरांचें कांहीं वेळ बोलणें चाललें. या व्याख्यानांविषयीं **गिरिश बाबूंना** मोठी आस्था असे.

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)——एक दिवस मला त्या सभेला नेशील का?

डाक्तर—महाराज, आपण एकदां तिथे गेलां, कीं ईश्वराच्या लीला पाहून-त्याचें बुद्धिकौशल्य, कर्तृत्व पाहून-आपण मुग्ध होऊन जाल; आपलें भानच नाहींसें होईल.

श्रीरामकृष्ण-खरें, खरें तें!

डाक्तर (गिरिश बाबूंना)—सगळें कांहीं करा; पण ईश्वर म्हणून यांची (रामकृष्णांची) पूजा करूं नका. तेणेंकरून या सत्पुरुषाचा तुम्ही घात कराल.

गुरुपूजा.

गिरिश—काय करावें? त्याला, मला वाटतें, कांहीं इलाज नाहीं. ज्या पुरुषानें मला संसारसमुद्रांतून व संदेहसागरांतून वांचविलें, त्याचा मी कसा बरें उतराई व्हावें? तुम्हीच सांगा. ज्याची मीं पूजा करूं नये, असें त्यांच्यांत कांहीं म्हटल्या कांहींसुद्धां नाहीं.

डाक्तर—माझेविषयीं म्हणाल, तर मी सर्व माणसें सारखींच लेखतों. एकदां एक वाण्याचें मूल माझ्याकडे औषधाला आलें. त्याला सारखें शौचाला होई. सगळ्यांनीं नाकांना पदर लावले; पण मीं नाहीं लावला. मी त्या मुलाजवळ अर्धा तास बसलों होतों. डोकीवर पाटी घेऊन भंगी जरी माझ्या बाजूनें गेला, तरी मी नाहीं नाकाला पदर लावीत. छे! ती गोष्ट माझ्या हातून कधींच नाहीं होणार. जसा मी तसाच तो. मीं त्याचा तिटकारा कां करावा? आतां या महापुरुषाविषयीं म्हणाल, तर याच्या चरणीं नम्र होऊन याची पदधूळि मी मस्तकीं धारण करणार नाहीं, असें का तुम्हांला वाटतें? हें पहा-(श्रीरामकृष्णांचे चरणीं नम्र होऊन त्यांची पदधूलि मस्तकीं घेतात.)

गिरिश—पहा, पहा, ' धन्य, धन्य दिवस आजचा ! ' असें सर्व देवसमुदाय म्हणत आहे !

डाक्तर—कोणाच्याही पायां पडणें म्हणजे कांहीं तरी विशेष आहे, असें तुम्हांला वाटतेंसें दिसतें. सगळ्यांचे पायांवर मस्तक ठेवण्याला माझी तयारी आहे. (शेजारच्या गृहस्थांना) आपले चरणांवर मी मस्तक ठेवतों, बरें का ! (दुसऱ्या गृहस्थांना) आणखी आपलेही ठेवतों ! (तिसऱ्यांना) आपलेही ठेवतों, महाराज ! (असें म्हणत म्हणत डाक्तरांनीं अनेकांचे पायांवर मस्तक ठेविलें.)

विवेकानंद (डाक्तरांना)—डाक्तरसाहेब, आम्ही यांना ईश्वराप्रमाणें मानतों. माझें म्हणणें मीच आपल्याला स्पष्ट करून सांगतों. उद्भिज्जकोटि व प्राणिकोटि या दोहोंच्या मध्यें असें एक स्थान आहे—असा एक दुवा किंवा सांधा आहे—कीं, त्या ठिकाणीं ही वस्तु प्राणिकोटींतली कीं उद्भिज्जकोटींतली, हें बरोबर कांहीं सांगतां येत नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्यकोटि व देवकोटि या दोहोंच्या मध्यभागीं असें एक स्थान आहे, कीं, त्या स्थानीं अमुक व्यक्ति ही मनुष्यकोटींतली किंवा देवकोटींतली, हें कांहीं निश्चित करितां येत नाहीं.

डाक्तर—हें पाहा, ईश्वराविषयीं बोलतांना उपमांचा उपयोग करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यानें कांहीं खरा बोध व्हावयाचा नाहीं.

विवेकानंद—मी ' ईश्वर ' असें म्हणत नाहीं, ' ईश्वरतुल्य व्यक्ति, ' असें म्हणतों.

डाक्तर—आपला भाव मनांतले मनांत दाबून ठेविला पाहिजे.

पूज्यभाव जो आहे, तो व्यक्त करून दाखविण्यांत कांहीं मजा नाहीं. माझ्या स्वतांविषयीं म्हणाल, तर—मला सांगायला मोठें वाईट वाटतें कीं,—माझ्या अंतस्थ विचारांची पारख कोणालाच आजपर्यंत करितां आली नाहीं. माझे जे परम मित्र आहेत, त्यांचीसुद्धां समजूत अशी आहे कीं, मी मोठा कठोर, निर्दय आहें. ज्यास्त काय सांगावें ! पण मित्र हो, तुम्हीसुद्धां कदाचित् एक दिवस मला जोडे मारून घालवून द्याल !

श्रीरामकृष्ण (डाक्तरांना)—काय हें डाक्तर ! या लोकांचें तुझ्यावर किती तरी प्रेम आहे ! नवरीच्या मांडवांत जमून बायका जशा नवऱ्या मुलाच्या वाटेकडे डोळे लावून बसतात, तसे हे लोक तूं केव्हां येतोस म्हणून तुझी उत्सुकतेनें सारखी वाट पाहात असतात. [सगळे हंसतात]

गिरिश—डाक्तर, येथील प्रत्येकाला आपलेविषयीं मोठा आदर वाटतो.

डाक्तर—(दुःखानें)—माझा मुलगा—माझी पत्नीदेखील—मला कठोरहृदयी मानते. यांत माझा दोष एवढाच कीं, मी आपलें मन केव्हांच कोणाजवळ मोकळें करीत नाहीं.

गिरिश—तसें असेल, तर निदान आपल्या मित्रांची कींव धरून तुम्हीं आपल्या मनाचा दरवाजा खुला करावा, हें बरें नाहीं का आपल्याला वाटत? तुमचें मन त्यांना समजत नाहीं, हें तुम्ही जाणतांच.

डाक्तर— खरें सांगू का? तुमच्यापेक्षांसुद्धां माझ्या भावना प्रबळ आहेत. (विवेकानंदांना) मी एकटा असलों म्हणजे रडत बसतों. (श्रीरामकृष्णांना) आपण समाधिमग्न असलां म्हणजे लोकांना आपल्या पायांना स्पर्श करूं देतां, हें कांहीं बरें नाहीं. मी बोलतों याचा राग नसावा!

गुरु व जीवांचें पापग्रहण.

श्रीरामकृष्ण—त्या वेळीं मला जाणीव असते, अशी का तुझी समजूत आहे?

डाक्तर—तें चांगलें नाहीं, गैर आहे, हें तर आपल्याला कबूल आहे ना?

श्रीरामकृष्ण—मी भावमग्न असतां माझ्या मनाची कशी अवस्था असते, तें तुला कसें सांगूं? ती अवस्था संपली, म्हणजे माझें मलाच असें वाटतें कीं, माझ्या रोगाचें कारण तेंच! खरी गोष्ट अशी आहे कीं, ईश्वरीभावानें मी वेडा बनतों. त्या उन्मादामुळें तसें होतें. काय करणार?

डाक्तर (शिष्यगणाला)—त्यांना गोष्ट कबूल आहे. त्यांना त्याबद्दल फार वाईट वाटतें. त्यांच्या मनानें तो अन्याय आहे!

श्रीरामकृष्ण (विवेकानंदांना)—तूं मोठा लबाड (बुद्धिमान्) आहेस! तूं बोल ना! सांग त्याला सगळें समजावून!

गिरिश (डाक्तरांना)—डाक्तरसाहेब, आपला अगदींच गैरसमज झाला! भक्तांच्या शरीरांना त्यांच्या पायांचा स्पर्श होतो, म्हणून त्यांना मुळींच वाईट वाटत नाहीं. त्यासाठीं नाहीं त्यांना

दुःख होत. छे! मुळींच नाहीं. त्यांचा देह शुद्ध आहे—अपापविद्ध आहे. भक्तांचें मंगल व्हावें, याच हेतूनें ते त्यांना आपल्या पायांना स्पर्श करूं देतात. पण तेणेंकरून होतें काय? भक्तांचीं पापें आपल्या अंगावर घेतल्यामुळें आपला देह रोगपीडित होतो, असें त्यांच्या मनांत आपलें कधीं कधीं येतें. तुम्ही आपलाच विचार करा. तुम्हीं आपल्याच तोंडानें ती गोष्ट आम्हांला सांगितली. अभ्यासाचे श्रम फार केल्यामुळें एकदां तुमच्या पोटांत भयंकर शूळ उठला, असें तुम्ही म्हणालां. आपण रात्रींचीं जाग्रणें करून अभ्यास केला, याबद्दल तुम्हांला त्या वेळीं दुःख नाहीं का झालें? त्यावरून रात्रीं जागून अभ्यास करणें हा अन्याय आहे, असें का सिद्ध होतें? रोग होतो, त्याबद्दल महाराजांना वाईट वाटत असेल कदाचित्. म्हणून जीवांचें मंगल साधण्यासाठीं त्यांना आपल्या पायांना स्पर्श करूं देणें हा अन्याय आहे, असें का त्यांना वाटतें?

डाक्तर कांहींसे लज्जित झाले व त्यांनीं खालीं मान घातली.

डाक्तर (गिरिश बाबूंना)—मी हरलों, कबूल. आतां तुमचीच पादधूलि मी ग्रहण करितों. (विवेकानंदांना) बाकी कांहीं नाहीं, यांची (गिरिश बाबूंची) बुद्धिमत्ता विलक्षण खरी. ती कांहीं नाकबूल करितां येत नाहीं.

विवेकानंद (डाक्तरांना)—या प्रश्नाचा दुसऱ्या एका बाजूनें-ही विचार करितां येईल. एकादा शास्त्रीय शोध लावण्यांत कोणी आपलें सर्व आयुष्य घालतो.—त्या वेळीं प्रकृतीकडे, श्रमांकडे, कशाकडे त्याचें लक्ष नसतें. आतां, ईश्वरज्ञान हें अत्यंत श्रेष्ठप्रतीचें

शास्त्र आहे. यापेक्षां कोणत्याही शास्त्राची महती ज्यास्त नाहीं. तेव्हां हें ज्ञान संपादण्याकरितां **महाराजांनीं** आपल्या प्रकृतीकडे पाहिलें नाहीं, किंबहुना ती खराब करून घेतली, यांत अस्वाभाविक असें काय आहे?

डाक्तर—बुद्ध, येशू ख्रिस्त, चैतन्य, **महंमद** वगैरे जे धर्माचार्य होऊन गेले, ते सगळे शेवटीं शेवटीं अगदीं अहंकारानें भरून गेलेले होते. त्या सगळयांचें म्हणणें हें, 'मी सांगतों तेंच खरें!' काय बोलणें हें!

अवतार.

असें म्हणून डाक्तर जाण्याकरितां उठले.

गिरिश (डाक्तरांना) डाक्तरसाहेब, आपण पण त्याच दोषाला पात्र आहां, असें नाहीं का आपल्याला वाटत? ते—अगदीं झाडून सगळे—अहंकारी होते, असें आपण म्हणतां. आपल्याला त्यांचा दोष दिसतो, आणि आपल्या पायांशीं काय जळत आहे तें दिसत नाहीं! तोच दोष आपल्याही माथीं येतो, असें नाहीं का आपलें मन सांगत?

डाक्तरांनीं कांहीं उत्तर केलें नाहीं!

विवेकानंद—ईश्वराची जशी पूजा करावी, तशीच जवळ जवळ आम्ही यांची करितों.

श्रीरामकृष्ण एखाद्या बालकाप्रमाणें हंसू लागले.

बिंदु ३७ वा.

भक्तांसाठीं देहधारण.

ठिकाण–काशीपूर येथील बाग. मंडळी–नरेंद्र (विवेकानंद), राखाल, एम्, गिरिश, व इतर भक्त.

श्रीरामकृष्ण शिष्यगणासह काशीपूर येथील बागेंत राहात होते. त्यांची प्रकृति बरींच बिघडलेली असल्यामुळें ते माडीवरील खोलींत पडून होते. संध्याकाळ होऊन गेली होती. **नरेंद्र** व **राखाल** त्यांची पादसेवा करीत होते. **मणि** जवळ बसला होता. **महाराजांनीं** खूण करून त्यालाही आपले पाय चेपायला सांगितलें. तो त्याप्रमाणें त्यांच्या पायांची सेवा करूं लागला. त्यामुळें अर्थात् एक शिष्य मोकळा झाला.

या दिवशीं रविवार होता. इंग्रजी तारीख १४ मार्च सन १८८६ होती. तिथि फाल्गुन शुद्ध नवमी. मागल्या रविवारीं **श्रीरामकृष्णांचा** जन्मदिनोत्सव त्याच बागेंत साजरा केला होता. गेल्या वर्षीं हा त्यांचा जन्मोत्सव मोठ्या थाटानें दक्षिणेश्वर येथील वाडींत झाला होता. पण या वर्षीं ते अत्यवस्थ असल्यामुळें सर्व शिष्यगण विषादसागरांत अगदीं बुडालेला होता; यामुळें पूजाबिजा औपचारिक विधि जेवढे होते तेवढेच झाले. पण जेवणाखावणाचे सार्वजनिक समारंभ कांहीं झाले नाहींत. अर्थात् उत्सव नांवाचा मात्र झाला, त्यांत खरा उत्साह नव्हता.

सर्व शिष्य बागेंतच राहून आपल्या परमपूज्य गुरुदेवाची तनमनानें सेवा करीत होते. मातुःश्री **शारदामणी देवीही**–

श्रीरामकृष्णांची धर्मपत्नी–त्यांची रात्रंदिवस सेवा करण्यांत मग्न असे. सर्व तरुण शिष्य तिथेच असत. त्यांनीं आपलीं घरेंदारें सोडून आपल्याला सर्वस्वीं याच थोर कार्याला–ज्यांनीं या गूढ संसारांत जीवितसाफल्याचा खरा मार्ग त्यांना दाखवून दिला, त्यांच्या शुश्रूषेला–मनोभावानें वाहून घेतलें होतें.

जे वयस्क शिष्य होते,–बहुतेक संसारीच–ते दररोज आपल्या गुरुदेवाच्या समाचाराला येत. त्यांतले कांहीं कधीं कधीं दोनतीन दिवस सारखे तिथेच राहात.

आज त्यांची प्रकृति फारच बिघडली होती. मध्यरात्र झाली. उद्यानभूमि व घर हीं चंद्रप्रकाशानें न्हाल्यामुळें अत्यंत आनंदमय दिसत होतीं. पण शिष्यांच्या मनांना शांति नसल्यामुळें त्या सुंदर देखाव्याकडे त्यांचें लक्षही नव्हतें! कसें असणार बरें? ज्या सत्पुरुषानें त्यांना या रहस्यमय संसाराचें खरें स्वरूप दाखवून दिलें, तो आपल्याला आज सोडून जात आहे, ही शंका त्यांचीं अंतःकरणें पोळीत होती!

जिकडे तिकडे शांतता नांदत होती. सृष्टिसुंदरी अगदीं स्तब्ध होती. मात्र दक्षिणेकडून येणाऱ्या वसंतानिलाबरोबर वृक्षपत्रें हळुहळू हितगुजाच्या गोष्टी करीत होतीं! अशा प्रशांत वेळीं श्रीरामकृष्ण माडीवर आपल्या खोलींत पडले होते. झोंप नाहीं, स्वस्थता नाहीं, अशी त्यांची स्थिति होती! एकदोन शिष्य स्वस्थपणें जवळ बसले होते. केव्हां त्यांना काय लागेल, याचा नियम नसल्यामुळें त्यांना तेथून हालतां येईना. मधून मधून त्यांना झोंप लागलीसें

वाटे. ती निद्रा नसून महायोग असावा का? 'यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ।' अशी जी योगावस्था ती तर ती नसेल ना?

एम् जवळ बसला होता. तोंडांतून शब्दही काढण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं राहिलें नव्हतें. पाषणहृदयालाही विदीर्ण करून टाकणाऱ्या त्या यातना पाहून त्याला कांहीं सुचेनासें झालें होतें. महाराजांनीं खूण करून त्याला आणखी जवळ बोलावलें. नंतर आस्ते आस्ते मोठ्या कष्टानें ते त्याला म्हणाले, "तुम्ही सगळे रडत बसाल, म्हणून मी इतक्या यातना भोगीत राहिलों आहें!– 'आपल्या देहाला एवढे कष्ट होताहेत, तर ठेवा तो आतां देह." असें जर तुम्हीं सगळ्यांनीं म्हटलें, तर हा देह टाकावा म्हणतों!'

एम् अगदीं घाबरून गेला! काय बोलणार बिचारा! हे त्यांचे सकरुण शब्द ऐकून सर्व शिष्यांचीं अंतःकरणें अगदीं फाटून गेलीं! जो त्यांचा पितामाता, जो त्यांचा रक्षणकर्ता, जो त्यांचा वाटाड्या, जो त्यांचा गुरु, जो त्यांचें सर्वस्व, त्याचे हे शब्द! यावर ते काय उत्तर देणार? सगळे बिचारे चुप बसले! 'येशूखिस्तासारखाच हा एक आत्मयज्ञ असावा का?–मनुष्यजातीच्या उद्धाराकरितां–विशेषेंकरून भक्तांच्या उद्धाराकरितां–धनगर नसलेल्या मेंढ्यांप्रमाणें ज्यांची हीनदीन अवस्था होणार त्या भक्तांकरितां–ज्याप्रमाणें ख्रिस्तानें देहविसर्जनाचे रूपानें यज्ञ केला, तसाच हा यज्ञ असावा का?' असा विचार कांहीं भक्तांच्या मनांत आला!

× × × × × ×

रात्र अगदीं 'मी' म्हणूं लागली. **महाराजांचे** दुखण्याचें पाऊल पुढें पुढें पडूं लागलें. काय करणार? कोणता उपाय करावा, असें मंडळीला होऊन गेलें.

कलकत्त्यांतील मित्रमंडळीला निरोप गेला. तशा रात्रीच्या भरांत डॉ. उपेंद्र व कविराज (वैद्यराज) **नवगोपाळ** यांना घेऊन **गिरिश बाबू** धांवत आले. सर्व शिष्यमंडळी **महाराजां**जवळ बसली होती. त्यांची प्रकृति कांहीं बरी असावी, असें दिसूं लागलें. ते म्हणाले, "देहाला यातना आहेत; बरोबर आहे, तसें होणारच. –कारण, देह बोलून चालून आहे पंचभूतांचा बनलेला–हो, जडच तो!"

गिरिशाकडे वळून ते म्हणाले, "या अवस्थेंत मला निरंतर काय दिसत असतेंसें तुला वाटतें? अनेक ईश्वरी रूपें मला दिसत असतात! किती विविध रूपें तीं असतात म्हणून सांगूं! त्या रूपांमध्यें हें रूपही (स्वतःची मूर्ति) मला दिसतें!"

बिंदु ३८ वा.

दुसरे दिवशीं सकाळीं सात-आठ वाजतांची वेळ. या दिवशीं सोमवार होता. तारीख १५ मार्च. **महाराजांची** प्रकृति कांहींशी बरी होती. ते तक्क्याला टेंकून बसले होते, व बेताबेतानें शिष्यमंडळीजवळ बोलत होते. मधून मधून ते आपले विचार खुणांनीं कळवीत होते. **नरेंद्र, राखाल, एम्, लाटू, शशी. थोरला गोपाळ,** इत्यादि मंडळी जवळ बसली होती.

शिष्य अगदीं स्तब्ध होते; त्यांचीं मनें अस्वस्थ होतीं. पूर्व-रात्रींच्या **महाराजांच्या** अवस्थेचें मनांत स्मरण करून, उदास व गंभीर होऊन, ते चुप बसले होते.

श्रीरामकृष्ण (एमला)–मला काय दिसतें, ठाऊक आहे? हें सर्व तोच (ईश्वर) झाला आहे. मनुष्यें व इतर जीव हीं केवळ चर्मावृत आकृति असून त्यांचे अंतरंगीं त्याचें (ईश्वराचें) अधिष्ठान आहे. हात, पाय, डोकें यांचीं सूत्रें तोच चाळवितो!

जीव व जगत् यांच्या रूपानें ईश्वर व्यक्त होतो.

हाच मला एकदां साक्षात्कार झालाः–एकच वस्तु जीव व जगत् यांच्या रूपानें नटली आहे. मेणाचें घर केलें, तर त्याचा प्रत्येक भाग मेणाचा असतो. त्या प्रत्येक भागाचा आकारमात्र निराळा, पण तो बनलेला असतो मेणाचाच. जिकडे पहाल तिकडे मेणच मेण! दुसरें कांहीं नाहीं. तद्वत् बागा, रस्ते, माणसें, गुरें, सर्व कांहीं एका मेणाचेंच बनविलें आहे;–या सर्व एका वस्तूच्या भिन्न विकृति आहेत!

मला असें स्पष्ट दिसतें आहे कीं, स्थांडिल, बलि, व बलिदाता हीं तिन्हीं एकरूपच आहेत.

(जीवांच्या मंगलासाठीं–कल्याणासाठीं–मी आपला बलि देत आहें व बलीच्या रूपानें परमेश्वरच व्यक्त होतो, असा **महाराजां**च्या बोलण्याचा भावार्थ असावा का?)

बोलतां बोलतांच ते निःशक्त स्वरानें म्हणाले, 'आहा! आहा! काय रूप हें!'

पुन्हा ती समाधि आली! **महाराज** बाह्यशून्य झाले! ही भावावस्था त्यांच्या प्रकृतीला चांगली नाहीं, असें शिष्यांना वाटलें. पण ते किंकर्तव्यमूढ होऊन स्वस्थ बसले.

पुन्हा ते देहावर येऊन म्हणाले, आतां गेली माझी सगळी पींडा. मी आतां पहिल्यासारखा झालों.

महाराजांची ती सुखदुःखातीत अवस्था पाहून सर्व शिष्य अगदीं मुग्ध होऊन गेले. **लाटू** तळहातावर डोकें टेंकून दुःखित अंतःकरणानें आपल्या गुरुदेवाकडे लक्षपूर्वक पहात होता.

महाराजांनीं डोळे वर करून शिष्यवृंदाकडे पाहिलें. या वेळीं शिष्यस्नेहानें त्यांचें अंतःकरण अगदीं उचंबळून गेलें होतें. काय प्रेम तें! त्याचें वर्णन तरी कसें करावें! त्याचें आकलन मानवी बुद्धीला कधींही होणार नाहीं. तें केवळ दिव्य होतें, एवढेंच त्याविषयीं म्हणतां येईल.

लहान मुलांना ज्याप्रमाणें आईबाप लडिवाळपणें गोंजारतात, त्याप्रमाणें त्यांनीं **राखाल** व **नरेंद्र** यांना गोंजारलें. त्यांच्या तोंडावरून प्रेमानें हात फिरवून ते त्यांना कुरवाळीत होते;–जणूं काय, ते पांच वर्षांचे बाळच आहेत!

कांहीं वेळानें सद्गदित कंठानें ते **एमला** म्हणाले, कांहीं दिवस जर हें शरीर टिकतें, तर बरेच लोकांना जागृति आली असती!–चैतन्यलाभ झाला असता! पण योगायोग तसा नाहीं! नेमानेम निराळा आहे.

महाराज पुढें काय बोलतात, अशी शिष्यांना अगदीं उत्कंठा

लागून राहिली होती. ते म्हणाले, हो! तशी प्रभूची इच्छा नाहीं. हा भोळा आहे, सरळ आहे; हा मूर्ख आहे, याला विद्येचा गंधही नाहीं; तेव्हां लोक याला तेव्हांच नाडतील! या कलियुगांत कोणी ध्यान करीत नाहीं, जप करीत नाहीं; जो तो लक्ष्मीच्या मागें लागला आहे; विषयांत बुडून गेला आहे. तेव्हां हा कदाचित् अमृत स्वैर उधळील;–जे अपात्र आहेत, ज्यांना भक्तिमार्गाची किंमत समजत नाहीं, अशा माणसांना सर्व कांहीं एकदम देऊन टाकील!

अवतारी पुरुष हा, मनुष्याविषयीं ईश्वराचे ठिकाणीं जी वत्सलता असते, तिचा मूर्तिमंत पुतळा असतो; आणि या लोकांत राहणाऱ्या व प्रजोत्पादन करणाऱ्या प्रत्येक माणसाला जर ईश्वरलाभ झाला व तो त्या सत्पुरुषाच्या भजनीं लागला, तर जग चालणार नाहीं, असा का **महाराजांच्या** वरील उद्गारांचा आशय असावा?

राखाल (सस्नेह)–आपणच सांगा ना महाराज, भगवंताला! म्हणजे तो आणखी कांहीं दिवस आपला देह या लोकीं कायम ठेवील.

श्रीरामकृष्ण–ती ईश्वराची इच्छा आहे. तो वाटेल तसें करील.

नरेंद्र–आपली इच्छा व ईश्वराची इच्छा, या एकच होऊन गेल्या आहेत!

श्रीरामकृष्ण (नरेंद्रराखालादि भक्तांना)–मी सांगून काय होणार? जशी त्याची (ईश्वराची) इच्छा असेल, तसें होईल!

आई व मी आतां अगदीं एकरूपता पावलों आहों, असें मला तर स्पष्ट दिसतें आहे. राधा कृष्णाला म्हणाली, 'कृष्णा, अतः-पर तूं आपलें मानवी रूप मला दाखवूं नको; तूं यापुढें निरंतर माझ्या हृदयांत वास करून रहा.' पण, कृष्णाचें दर्शन व्हावें, अशी लवकरच तिला उत्कंठा लागली. ती त्याच्यासाठीं अगदीं व्याकुळ होऊन गेली. त्याच्यावांचून तिला कांहीं सुचेना. पण भगवदिच्छा बलीयसी! पुष्कळ दिवसपर्यंत कृष्ण कांहीं आला नाहीं!

राखाल (भक्तांना हळूच)–**चैतन्यां**विषयीं–**गौरांगा**वतारा-विषयीं–**महाराज** बोलत आहेत.

एम् (स्वगत)–आईशीं तादात्म्य झालें! ब्रह्मैक्य झालें! आतां निराळेपणानें राहणें मला फार कठिण आहे! पुत्र आईंत लीन झाला, –मिळून गेला! असा का महाराजांच्या बोलण्याचा भावार्थ असावा?

बिंदु ३९ वा.

गुह्यकथा.

भक्त निस्तब्ध बसले होते. **महाराज** सस्नेह दृष्टीनें त्यांकडे पाहात होते. त्यांनीं आपले दोन्ही हात आपल्या हृदयावर ठेविले होते;–बोलण्याला सुरवात करण्याचे ते बेतांत होते.

श्रीरामकृष्ण (नरेंद्रादि शिष्यांना)–इथे (माझ्या अंतरंगीं) दोन व्यक्ति आहेत. एक ती–माझी आई—

पुढें यांचे काय शब्द निघतात, इकडे भक्तांचें सारखें लक्ष लागलें होतें. ते पुढें म्हणाले:—

एक **ती**—माझी आई--दुसरा भक्त. आतां आजार झाला आहे त्या दुसऱ्या व्यक्तीला!—भक्ताला! समजतें ना हें?

शिष्य चुप होते, त्यांनीं तोंडांतून अवाक्षरही काढलें नाहीं.

श्रीरामकृष्ण—अरेरे! कुणाला सांगूं मी हें! नी माझें बोलणें समजणार तरी कुणाला?

कांहीं वेळानें पुन्हा ते बोलूं लागले—

तो (परमेश्वर) मनुष्य होऊन–अवतार घेऊन–भक्तांसह-वर्तमान इथे येतो. पुन्हा भक्त त्याच्याबरोबर (आईकडे) चालते होतात.

राखाल—म्हणून, महाराज, आम्हांला मागें टाकून आपण जाऊं नये!

महाराजांनीं मृदु मृदु हास्य केलें;—त्यांच्या नेत्रांतून अनिर्वचनीय प्रेमाचे फवारे उडत होते! ते पुढें म्हणाले—

बाऊलांचा मेळा अकस्मात् एकादे घरीं येतो;–नाचतो, गातो (आनंदानें नाचत भजन करितो)! पुन्हा एकदम निघून जातो! येतो, जातो! कुणालाच त्याचें कांहीं कळत नाहीं!

[महाराज व सर्व शिष्य स्मित करितात.]

---

१ बाऊल हे सर्वसंगपरित्याग केलेले लोक असून ते केवळ भक्तीनें वेडे झालेले असतात.

कांहीं क्षण स्वस्थ बसून **महाराज** पुन्हा म्हणाले,—

देहधारण केलें, कीं कष्ट आलेच ! कधीं कधीं मी आपला मनांतले मनांत असें म्हणतों, कीं, देव करो, नी मला पुन्हा (इथे, या लोकीं) येण्याची पाळी न येवो !

पण काय,–त्यांतले त्यांत एक विचार आहे; दिव्यरसाच्या मेजवानीचें जर एकाद्याला सुदैवानें निमंत्रण आलें, तर घरच्या डाळभाताची त्याला चव राहात नाहीं.

एम् (स्वगत)–वत्सलतेचा मूर्तिमंत पुतळा असा जो अवतारी पुरुष, त्यानें केवळ भक्तांसाठींच देह स्वीकारलेला असतो. भक्तांचें निमंत्रण–भक्तांचा नैवेद्य–भक्तांची संगति–भक्तांबरोबर विहार, त्याला प्रिय असतो. दुसरें तिसरें त्याला कांहीं आवडत नाहीं. हा का **महाराजां**च्या म्हणण्याचा भावार्थ असावा ? मेजवानीच्या वेळीं वाढलें जाणारें अमृत–दिव्यरस–म्हणजे प्रेम–भक्ति–नव्हे का ?

श्रीरामकृष्ण–जे शुद्धात्मे असतात, जे निस्सीम भक्त असतात, त्यांच्यासाठीं **तो** (परमेश्वर) देहधारण करितो.

नंतर **महाराज** सस्नेह दृष्टीनें **नरेंद्रा**कडे पाहूं लागले.

नरेंद्राला भक्ति व ज्ञान यांचा उपदेश.

महाराज (नरेंद्राला)—एक चांडाल मांसाची कावड घेऊन रस्त्यानें चालला होता. तिकडून **श्रीशंकराचार्य** गंगेवरून स्नान करून येत होते. पुढें त्या चांडालाचा धक्का सहज आचार्यांना लागला. तेव्हां ते रागानें म्हणाले, "काय हें ! शिवलास ना तूं मला !"

यावर चांडालानें उत्तर केलें, "महाराज, मी आपल्याला शिवलों नाहीं, किंवा आपण मला शिवलां नाहीं."

तूं विचार कर आणि मला सांग;-कोण तूं? तूं म्हणजे तुझा देह, कीं मन, कीं बुद्धि? विचार कर आणि तुझें खरें स्वरूप मला सांग. शुद्ध आत्मा निर्लिप्त आहे;-सत्त्व, रज, तम, या तीन गुणांपैकीं एकानेंही तो लिप्त नाहीं.

ब्रह्म कसें आहे, तुला ठाऊक आहे? वायूसारखें आहे. वायु सुगंध, दुर्गंध दोन्ही वाहून नेतो, पण त्या दोहोंपैकीं एकाचाही त्याला गंध नसतो.-तो स्वतां अगदीं अलिप्त असतो.

नरेंद्र-हां! खरें आहे महाराज!

महाराज-ब्रह्म गुणातीत आहे. मायेचे दोन प्रकार आहेत;-अविद्यामाया आणि विद्यामाया. कामिनीकांचन हें अविद्यामायेचें ऐश्वर्य! ज्ञान, वैराग्य, भक्ति, हें विद्यामायेचें ऐश्वर्य! ब्रह्म या दोन्ही मायांच्या पलीकडे आहे. **शंकराचार्यांनीं** विद्यामाया कायम ठेविली होती. आचार्यत्वाचा अहंकार-आचार्य-मी-त्यांनीं ठेविला होता. तुला व या सगळ्यांना माझ्याविषयीं चिंता वाटते,--हाही विद्यामायेचाच खेळ आहे.

विद्यामायेचा आश्रय करितां करितां ब्रह्मज्ञानाचा लाभ होतो. शिडीच्या आश्रयानें वर जातां जातां घराचें छप्पर हातीं आल्यानंतर कांहींना, शिडीवरून पुन्हा खालीं येण्यांत व पुन्हा वर जाण्यांत मोठी मौज वाटते;-ब्रह्मसाक्षात्कार अनुभवल्यानंतरही कांहीं आपली सगुणभक्ति कायम ठेवितात. असें करण्यांत त्यांचे हेतु

दोन असतात: एक, लोकांना किचा घालून त्यांना द्यावयाचा असतो; दुसरा, भक्तिसुखाचा आस्वाद त्यांना पुनःपुन्हा घ्याव-याचा असतो;-भक्तांबरोबर विलास करावयाचा असतो.

नरेंद्रादि शिष्य चुप बसले होते; त्यांनीं तोंडांतून अक्षरही काढिलें नाहीं.

नरेंद्राला उपदेश करण्याचे मिषानें **महाराज** आपलीच अवस्था सांगत असावे का?

नरेंद्र व संसारत्याग.

नरेंद्र—त्यागाचें-वैराग्याचें-महत्त्व, माहात्म्य मी दाखवूं लागलों, कीं कांहीं कांहीं माणसें माझ्यावर अगदीं रागावतात.-एवढाले डोळे करितात.

महाराज (मृदुस्वरानें)-त्याग हा पाहिजेच. ईश्वरलाभासाठीं संसारावर पाणी सोडलेंच पाहिजे.

कांहीं वेळ **महाराज** गंभीरपणें स्वस्थ बसले. त्यांनीं आपल्या अंगप्रत्यंगावरून हात फिरवून म्हटलें, समज, इथे दोन वस्तु आहेत; एका वस्तूच्या पलीकडे दुसरी आहे. पण त्या अशा स्थितींत आहेत कीं, पहिली म्हणजे जवळची वस्तु बाजूला केल्या-वांचून दुसरी कांहीं घेतां येणार नाहीं. तुला जर दुसरी-दूरची, पलीकडची-घ्यायची आहे, तर तुला पहिली वस्तु बाजूला नको का सारायला?

नरेंद्र—अर्थात्, सारलीच पाहिजे महाराज!

महाराज (मृदुस्वरानें नरेंद्राला)—सर्व तुला ईश्वरमय दिसूं लागलें-प्रत्येक वस्तु म्हणजे ईश्वराचीच व्यक्ति आहे, असें तुझ्या

अनुभवास आलें,—म्हणजे ईश्वरावांचून तुला कांहीं तरी दिसेल का? मग संसार म्हणून कांहीं निराळें राहील का?

नरेंद्र—नाहींच राहणार! खचित नाहीं! **संसारत्याग हा केलाच पाहिजे!**

महाराज—सर्व कांहीं तन्मय—ईश्वरमय—आहे, असें पाहिल्यावर अर्थात् तुला मग दुसरें कांहींच दिसणार नाहीं. मग संसार कुठला नी बिंसार कुठला?

पण त्याग मनापासून झाला पाहिजे. इथे जे येतात, त्यांत संसारी कोणी नाहीं. (सस्मित) त्यांतल्या कांहींना होती इच्छा,—बायको असावी म्हणून. (राखाल, एम्, इत्यदि मृदु स्मित करितात.) पण ती तेवढीच. ते संसारांत आहेत पण संसारी नाहींत. —अलिप्त, अनासक्त आहेत. आतां त्यांची ती इच्छा पुरी झाली आहे, तेव्हां आपलें सगळें लक्ष परमेश्वराकडे लावायला त्यांना कांहीं हरकत नाहीं.

नरेंद्र व वीरभाव.

महाराज सस्नेह दृष्टीनें **नरेंद्रा**कडे पाहूं लागले. पाहतां पाहतां ते आनंदानें अगदीं भरून गेले. भक्तांकडे वळून ते म्हणाले,—खूप!

नरेंद्र (महाराजांना सहास्य)—काय 'खूप' महाराज?

महाराज (सहास्य)—त्यागाची तयारी!

नरेंद्राच्या अंगीं त्यागाचें तत्त्व चांगलें बाणलें आहे, असा **महाराजांचे** बोलण्याचा आशय होता.

नरेंद्रादि भक्त कांहीं न बोलतां **महाराजांकडे** पाहात होते. कांहीं वेळानें **राखाल** म्हणालाः—

राखाल (महाराजांना सहास्य)–**नरेंद्राला** आतां आपलें बोलणें चांगलें समजूं लागलें आहे.

महाराजांनीं हासून उत्तर केलें:—

खरें आहे! मला वाटतें, आणखी पुष्कळांना समजूं लागलें आहे. (एमला) नाहीं का रे?

एम्–होय, खरें, अगदीं खरें महाराज!

महाराजांनीं कांहीं वेळ **नरेंद्र** व एम् यांकडे पाहिलें. नंतर त्यांनीं **राखालादि** भक्तांना खूण करून त्या दोघांकडे (नरेंद्र व एम्) बोटानें दाखविलें. पहिल्यानें खूण करून त्यांनीं **नरेंद्राकडे** बोट केलें, नंतर **एम**कडे केलें. त्यांचें इंगित जाणून **राखाल** म्हणाला–

राखाल (महाराजांना सहास्य)– **महाराज**, आपल्या मनांतला भाव असा कीं, **नरेंद्राच्या** ठिकाणीं 'वीरभाव' आहे, व याच्या (एमच्या) ठिकाणीं 'सखीभाव' आहे. [सगळे हंसतात.]

(सखीभाव म्हणजे परमात्म्याचे ठिकाणीं वृंदावनांतील गोपीं-प्रमाणें 'प्रियभाव' ठेवून त्याची भक्ति करणें.)

महाराज हासूं लागले.

नरेंद्र (सस्मित)–**एम्** मितभाषी आहे, लाजवट आहे; म्हणून मला वाटतें, तूं असें म्हणतोस!

महाराज (नरेंद्राला सहास्य)–बरें, माझ्या ठिकाणीं कोणता भाव आहेसें तुला वाटतें?

नरेंद्र—आपल्या ठिकाणीं सर्व कांहीं भाव आहेत महाराज!—वीर-भाव आहे, सखीभाव आहे, सगळें कांहीं आहे. वीराप्रमाणें विवेक-खड्गानें संसाराचें गहन अरण्य छाटून टाकून आपण परमार्थाचा मार्ग चोखाळला आहे. बरें, सखीप्रमाणें आपल्या ठिकाणीं भक्तीचें दिव्य वारेंही आहे!

श्रीरामकृष्ण कोण?

हे शब्द ऐकून महाराज भावपूर्ण झाले. हृदयावर हात ठेवून ते बोलूं लागले.

महाराज (नरेंद्रादि भक्तांना)—मला असें स्पष्ट दिसतें आहे —मी प्रत्यक्ष असें पाहतों आहें—कीं जें जें कांहीं आहे, त्याची उत्पत्ति इथून आहे.

काय समजलें तुला? असें त्यांनीं नरेंद्राला खुणेनें विचारलें.

नरेंद्र—'जें जें कांहीं आहे,' अर्थात् जेवढे म्हणून सृष्ट पदार्थ आहेत, त्यांची उत्पत्ति आपल्यापासून आहे!

महाराज (राखालला सानंद)—पाहिलेंस कसें याला समजतें तें?

नंतर नरेंद्राला त्यांनीं गायला सांगितलें. तो सूर काढून गाऊं लागला. त्याची वृत्ति त्यागाकडे असल्यामुळें त्यानें सुरू केलेलें पद वैराग्यपर होतें.

पद.

नलिनीदलगतजलमतितरलम्, तद्वज्जीवनमतिशयचपलम्।
क्षणमिह सज्जनसंगतिरेका, भवति भवार्णवतरणे नौका॥

एकदोन चरण म्हणून झाल्यावर महाराज नरेंद्राला खूण

करून म्हणाले, काय हें? हे भाव-विचार-अगदींच नवशिक्याला शोभणारे!

नंतर नरेंद्रानें दुसरें सखीभावात्मक पद सुरू

पद.

(चाल—अजि अक्रुर हा नेतो.)

सखि! गोकुळिंचा प्राण कुठे या गेल
मनमोहन मुरलीवाला॥ध्रु०॥
हा विरह न गे! हाक मृत्युची आली
तरि वालि न ये वनमाळी॥
मी गवळ्याची कुरूप साधी मुलगी
मग कैंची टिकणें सलगी!॥
भाग्याची माझ्याहूनी।
नव लावण्याची खाणी।
नव गोपी दिसली कोणी।
मज वंचुनिया तिकडे माधव झुकला
जातीवर भुंगा गेला॥ सखि०॥ १
जो भावाचा मात्र भुकेला भारी।
कोमलमन करुणालहरी॥
तो भुलेल कीं लौकिकलावण्यातें।
कोणा हें ठावें होतें॥
पारि मोहमूढ मी झाल्यें।
मी अपणा विसरुनि गेल्यें।
मधुरूपा त्याच्या भुलल्यें।
निजहृदयीं म्यां धारिलें तत्पदयुगुला
वर्षाघन शारद ठरला॥ सखि०॥
या यमुनेच्या काळ्या डोहामाजीं।

जलसमाधि घेत्यें आजी ॥
कीं तीव्र महा गरल सखे ! पाजोनी।
सोडावें या दुःखांतोनी ॥
वनवल्लरि वा करुनी वलयाकृति गे।
आणुनि दे मजला वेगें ॥
दृढ बांधुनि तीच गळ्याला।
टांगुनि या कृष्णतमाला।
घेईन फांस अपुल्याला।
कीं गात सदा 'श्याम, श्याम' नांवाला।
झिजवीन देह हा अपुला ॥ सखि० ॥३॥

पद ऐकून त्याच्या माधुरीनें महाराज व सर्व भक्त अगदीं मुग्ध होऊन गेले. **महाराज** व **राखाल** यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु झरूं लागले.

व्रजगोपीभावानें उन्मत्त होऊन—गोकुळांतील गोपींप्रमाणें भगवत्-प्रेमानें व्याकुळ होऊन —केवळ वेडा बनून— **नरेंद्र** पुन्हा गाऊं लागला:—

पद.

(चाल—भूपती खरें तें वैभव.)

माधवा ! जिवलगा ! तूंच विसांवा जीवा।
आधार जिवा तूं भक्तभृंगराजीवा ॥ ध्रु० ॥
तुज काय बोलल्यें म्हटलें तुज मीं काई।
कशि काय बोलल्यें कुणास ठाउक बाई ! ॥
हरि ! अभागिनी किति विमूढ नारीजाती।
बहु भोळी तिज नरनीति न ठाव्या असती ॥
आदर्श करींचा पुष्प शिरीं ल्यायाचें।

तूं असमी माझें निधान सौभाग्याचें ॥
सुमन मी तुझें प्रेमानें । करुनिया ।
लेईन तुला मी भारी । जपुनिया ।
लपवीन सहज तुजलागीं । लीलया ।
ठेवीन अशी या कृष्णकुंतलीं देवा ! ।
कीं कोणालाही शोध न तव लागावा ॥
माधवा० ॥१॥

तांबुल सुवासिक असमी तूं या वदना ।
की श्यामसुंदरा ! असमी अंजन नयनां ॥
घालीन लोचनीं अंजन तुज मी करुनी ।
कीं कुणासही तव शंका यावी न मनीं ॥
तूं चंदनचर्चा चार्वी चर्चायाची ।
नवनीलमालिका कंठीं घालायाची ॥
तूं कृष्णागरु मम त्यानें तनु माखोनी ।
तव हार तसा या रुळेल हृदयावरुनी ॥
मी कुडी प्राण तूं माझा । केशवा ।
मी गेह धिरा तूं माझा । माधवा ।
मी पाक्षि पक्ष तूं माझे । यादवा ।
मी मीन दीन, तूं जल या जीवन जीवा ।
मी पिका माधवा ! माधव मम तूं बरवा ॥
माधवा० ॥ ५ ॥

समाप्त



स्वामी विवेकानंद
यांच्या

मुलाखती व संभाषणें.

महाराष्ट्र-समाज जागृत व कर्तव्योन्मुख व्हावा या हेतूनें स्वामी विवेकानंदांच्या सर्व व्याख्यानांचें व लेखांचें उत्तम लेखकांकडून सवडीसवडीनें मराठींत रूपांतर करवून तें **विवेकानंद-पुस्तकमाला** या नांवानें प्रसिद्ध करण्याचें आम्हीं योजिलें आहे. उपरिनिर्दिष्ट पुस्तक हें या मालेंतील पहिलें असून तें आतां विक्रीस तयार झालें आहे. रामकृष्ण-वाक्सुधेचे लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे यांच्याच हातून या पुस्तकाचें भाषांतर झालें असल्यामुळें तें कसें वठलें असेल, हें निराळें लिहावयास नकोच. प्रथम स्वामी विवेकानंद यांचें चरित्र दिलें असून 'श्रीरामकृष्ण' व 'विवेकानंद' अशीं दोन सुंदर चित्रेंहि घातलीं आहेत.

याचे दोन पोटभाग आहेत,—मुलाखती व संभाषणें. स्वामींचीं मतें व कार्यक्षेत्र समजावून घेण्याकरितां येथील व पाश्चात्य देशांतील वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींनीं त्यांच्या मुद्दाम 'मुलाखती' घेतल्या, त्या वेळीं त्यांच्या प्रश्नोत्तरांत अनेक विषय ओघानें आलेले आहेत. त्याचप्रमाणें त्यांचा मुक्काम कलकत्त्यास असतांना त्यांच्या भेटीकरितां आलेल्या हजारों लोकांनीं त्यांना अनेक प्रचलित विषयांसंबंधानें जे अनेक प्रश्न विचारले व त्यांचीं स्वामींनीं आपल्या अधिकारयुक्त वाणीनें जीं उत्तरें दिलीं त्यांचा समावेश 'संभाषणें' या भागांत आहे.

स्त्रीशिक्षण, औद्योगिक शिक्षण, धार्मिक शिक्षण, ब्रह्मचर्य, विवाह, बालविवाह, पुनर्विवाह, जातिभेद, वर्णभेद, गायनशास्त्र, कलाकौशल्य, धर्माचीं सर्व अंगें व उपांगें इत्यादि नानाविषयांवरचीं स्वामींचीं मार्मिक मतें या एकाच पुस्तकांत पहावयास सांपडतील. पृष्ठें ३००. किं. १ रुपया. ट. ख. निराळा.

(हा ग्रंथ डे. व्ह. ट्रॅ. सोसायटीनें पसंत करून त्याबद्दल ग्रंथकारास बक्षीस दिलें आहे.)

रामकृष्ण-वाक्सुधा.

(प्रथम वृष्टि)

लेखक—कृष्णाजी गोविंद किनरे.

स्वामी विवेकानंद यांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं आपल्या शिष्यांना व भक्तांना भाषणप्रसंगानुरोधानें जो अमृततुल्य धर्मोपदेश केला, त्याचा यांत संग्रह आहे. यांत ज्याचें विवेचन आलें नाहीं, असा एकहि धार्मिक प्रश्न नाहीं. तत्त्वें गहन पण विवेचन अत्यंत सुबोध व मनोरम, दृष्टान्त व दाखले अगदीं साधे, रोजच्या व्यवहारांतले, मौजेचे व मनाला तेव्हांच पटणारे, यामुळें ग्रंथ कादंबरीसारखा रसाळ आहे. इतका सोपा व सामान्य वाचकालाहि मनोरम असा धार्मिक ग्रंथ हा मराठींत पहिलाच. चित्रमयजगताचे द्वारें महाराष्ट्रानें या सुधेची लजत पाहिलीच आहे, तेव्हां ज्यास्त वर्णन नको. ग्रंथाचे आरंभीं परमहंसांचें मनोरम व बोधप्रद चारित्र विस्तृतपणें दिलें आहे. छपाई सुंदर. बांधणी मजबूत. चार सुबक चित्रें. पृष्ठें २८८. किंमत १। रुपाया. ट. ख. निराळा.

सुख आणि शांति.

सुख नको कोणाला ? सुखासाठीं तर सर्वांची धडपड चालली आहे. शांतीच्या पोटीं सुख जन्मतें. पण हें खरें असलें, तरी सुखोत्पादक शांतीचा ज्याला लाभ झाला आहे, असा माणूस विरळा. याचें कारण खरें सुख म्हणजे काय व तें मिळवावें कसें, याची स्पष्ट कल्पनाच पुष्कळांना नसते. त्यामुळेंच त्यांचे सुख-प्राप्तीचे प्रयत्न निष्फळ होतात. या पुस्तकाच्या वाचनानें सुख-प्राप्तीचा खरा मार्ग अत्यंत सुलभ होणार आहे. पुस्तक कसें वठलें आहे हें पुढील अभिप्रायांवरून कळून येईल.

ज्ञानांजनः—

लार्ड एव्हबरी यांचा मूळ ग्रंथ फारच सुंदर आहे आणि त्याचें हें भाषांतर देखील तितकेंच किंबहुना अधिकच सुंदर वठलें आहे. सरस आणि ओजस्वी मराठी भाषेचा उत्कृष्ट नमुना जर कोणास पहावयाचा असेल, तर त्यानें हा ग्रंथ अवश्य वाचावा, अशी आम्ही शिफारस करितों. 'सुख आणि शांती'चा लाभ याचे वाचनानें खरो-खर होण्यासारखा असल्यामुळें प्रत्येक सद्ग्रंथसंग्रहेच्छु महाराष्ट्रीयानें या ग्रंथाची एक प्रत अवश्य संग्रहीं ठेवावी. ग्रंथाचें बाह्यांगहि चित्ताकर्षक झालें आहे.

मुमुक्षुः —

सदर ग्रंथ खरोखरीच फार रमणीय व संग्राह्य झाला असून आद्यंत स्वतंत्र, प्रतिभाशाली व प्रसादपूर्ण झाला आहे. रा. मोड-कांचें ग्रथनकौशल्य अनन्यसाधारण आहे. लबक हा इंग्रजी ग्रथ-

कार व मोडक हे मराठी ग्रंथकार, ह्या दोघांच्याहि विचारसरणीचा, ग्रथनकौशल्याचा, बहुश्रुतपणाचा आणि सात्त्विकपणाचा अत्यंत रमणीय संगम प्रस्तुत ग्रंथांत झालेला असल्यामुळें ह्या ग्रंथानें मराठी वाङ्मयास खरोखर मोठी शोभा आणली आहे. असें अद्भुत चातुर्य ह्या ग्रंथाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गद्यग्रंथांत आम्हांस आढळत नाहीं. भाषासरणी तर इतकी सरळ, भारदस्त व कवित्व-पूर्ण आहे कीं, पानामागें पानें उलटतांना चित्तावर सुख आणि शांतीच्या लहरीवर लहरी उठतात! शब्दाची किंवा अर्थाची ओढा-ताण कोठेंहि होत नाहीं. नित्य प्रचारांतल्या सुंदर म्हणी, समर्पक अवतरणें, अल्पाक्षररमणीय भाषेंत सांगितलेल्या चटकदार गोष्टी, मूळावर ताण करणारीं सरस भाषांतरें इत्यादि प्रकार पाहून वाचकांस परमाल्हाद झाल्याशिवाय राहत नाहीं. कांहीं प्रसंग म्हणजे नुसतीं रत्नें आहेत. सर्वत्र मराठी भाषा अत्यंत सहजसुंदर व निर्दोष आहे. एम्. ए. च्या परीक्षेला मराठी ग्रंथ जे नेमण्यांत येतात त्यांत या ग्रंथास अवश्य स्थान मिळावें. किं. रु. २॥८. ट. ख. निराळा.

वैद्यकीय पुस्तकांचे अपूर्व लाट.

लाट नं. १

चरकसंहिता.

हा आर्यवैद्यकाचा ऋषिप्रणीत ग्रंथ असून याच्याइतका प्राचीन ग्रंथ दुसरा कोणताही नाहीं. याच ग्रंथाधारें सर्व वैद्यकग्रंथ उत्पन्न

झाले आहेत. याचे एकंदर भाग १४ असून सर्वांची किं. २३।=
आहे; परंतु तूर्त ५ रु. स देऊं. ट. ख. १ रु. निराळा पडेल.

लाट नं. २

सार्थ वाग्भट.

चरक व सुश्रुत या ग्रंथांचे आधारें वाग्भटानें विद्यार्थिवर्गास विषय सुलभ व्हावा म्हणून हा ग्रंथ तयार केला असून कै० शंकर दाजीशास्त्री पदे यांनीं याचें मराठी भाषांतर केलें आहे. संस्कृत मूळ व मराठी भाषांतर यांसह आम्हीं हा नवीन छापला आहे. किं. रु. ५; परंतु तूर्त २॥ रुपयांस देऊं. ट. खर्च ८ आणे निराळा.

लाट नं. ३

सार्थ माधवनिदान.

आतंकदर्पण व मधुकोश टीका या निदानावरील दोन्ही टीकांचे आधारें हा ग्रंथ मराठींत तयार केला आहे. असा ग्रंथ अद्याप कोणींहि छापला नाहीं. किं. २ रु. परंतु तूर्त किं. १ रु. टपालखर्च ६ आणे.

लाट नं. ४

वनौषधीगुणादर्श.

(भाग १ ते ७)

वनस्पतींचे संपूर्ण गुणदोष व प्रत्येक रोगावर त्यांचा उपयोग ह्यांत दिला आहे. सर्वांची किंमत ७॥ रुपये; परंतु तूर्त २॥ रुपये; टपाल खर्च आठ आणे निराळा.

लाट नं. ५

(१) **आर्यवैद्यकलानिधि**--हा वैद्यकाचा अपूर्व ग्रंथ चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, वाग्भट, निघंट, भावप्रकाश, योगरत्न, योगतरंगिणी, माधवनिदान, शार्ङ्गधर इत्यादि प्राचीन आर्यवैद्यकाचे ग्रंथाधारें मराठींत तयार केला असून, शिवाय जे जे वैद्यकावर प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्या ग्रंथांतील सार ह्या ग्रंथांत आणलें आहे. मराठींत या ग्रंथाएवढा दुसरा ग्रंथ नाहीं. मोठ्या आकाराचीं पृष्ठें सुमारें ६५०, किंमत ६ रुपये. (२) **औषधी बाड**–किंमत २ रु. (३) **रसवैद्य**–किंमत ०१२. (४।५) **सुबोध वैद्यक**, पूर्वार्ध व उत्तरार्ध–किं. ०८ व १ रु. (६) **स्त्रीरोगचिकित्सासार**–किं. १ रु. (७) **बालरोगचिकित्सासार**–किं. ०१२. (८) **बृहत्पाकसंग्रह**–किंमत १॥ रु. (९) **बृहन्निघंटु**–किं. १॥ रु. (१०) **औषधी गुणदोष**–किंमत १॥. (११) **औषधी क्रिया**–किं०८. (१२) **मंत्रतंत्रवैद्यक**–किंमत ०४. (१३) **प्राणिज औषधी**–किं. ०२ (१४) **गोवैद्यक**–किंमत ०२. हीं चौदा पुस्तकें १७॥ रु. किंमतीचीं होत आहेत, तथापि तूर्त कांहीं दिवस फक्त ४ रुपयांस देऊं. टपालखर्च रु. १ निराळा.

आत्मज्ञानाचा अपूर्व ग्रंथ.

आत्मविद्या.

सातारा हायस्कूलचे माजी हेडमास्तर आणि वेदान्त व योगशास्त्र यांत पारंगत असल्याबद्दल महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेले रा. रा. हरि गणेश गोडबोले यांनीं लिहिलेल्या "आत्मविद्या" नामक ग्रंथाची ही सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ति आहे. यांत ग्रथित केलेलीं प्रमेयें अनुभवसिद्ध असून ग्रंथकारांच्या अनुभवसंपन्नतेमुळें त्यांचें विवेचन सुबोध व चित्ताकर्षक असें झालें आहे. अद्वैतसिद्धान्ताचा अभ्यास करूं इच्छिणारांस ह्या ग्रंथाचा फार उपयोग होणार आहे. ह्याचे दोन भाग असून त्यांत पुढील विषय आहेतः—

भाग १ला—१. उपोद्घात. २. वर्णाश्रमप्रतिपालन. ३. वेदान्तशास्त्राचें पुनरुज्जीवन व उपयुक्तता. ४. पुनर्जन्म. ५. प्रारब्ध. ६. वैराग्य. ७. जगन्मिथ्यात्व. ८. मनोलय ९. वासनोपशमन. १०. आत्ममनन. ११. शुद्धनिरूपण. १२. आत्मार्चन. १३. आत्मनिरूपण. १४. जीवन्मुक्ति. १५. निर्वाण. १६. उपसंहार.

भाग २ रा--१. ईश्वरप्रणीत धर्मग्रंथ. २. भारतीय आर्षमहाकाव्यें. ३. अमरत्व. यांपैकीं दुसऱ्या भागांतलि तिन्ही प्रकरणें ह्या आवृत्तींत अगदीं नवीन घातलीं असून त्यांत वैदिक ग्रंथ, भारतरामायण, अमरत्व, इत्यादि विषयांचें विवरण केलें आहे.

ग्रंथाचीं पृष्ठें डेमी द्वादशपत्री साच्याचीं ६००. छपाई सुंदर. बांधणी कापडी. किं. रु. २॥. टपालखर्च निराळा.

चंड शेती–हिंदुस्थानांतील जमीनधाऱ्याच्या पद्धति–चढाओढीचे
ष्परिणाम व त्यांवरील उपाय–संप–मजुरांचे संघ–सहकारिता–
पतपेढ्या–सामाजिक पंथाचा इसिहास–समाजिक पंथी योजना.

पुस्तक ४ थें:–विनिमय–मोल व किंमत–बाजार–मागणी व
रवठा–मूळ किंमतीची मीमांसा–पैसा–नाणीं व त्यांचे प्रकार–
ंदुस्थानांतील चलनी नाणीं–नाण्याच्या मोलाची मीमांसा–अधा-
ात्मक पैसा–पेढीची उत्पत्ति व स्वरूप–बहिर्व्यापारविनिमयपत्रें–
प्रतिबंध व्यापार विरुद्ध संरक्षण.

पुस्तक ५ वें:–राष्ट्रीय जमाखर्च–सरकारचीं कर्तव्यकर्में–उत्प-
ाच्या बाबी–करांचें तत्व–कराची संपातमीमांसा–राष्ट्रीय कर्ज–
ंदुस्थानसरकारचें कर्ज–हिंदुस्थानचा जमाखर्च.

पुस्तक ६ वें:–हिंदुस्थानची सांपत्तिक सद्यःस्थिति व तिला
ागू पडणाऱ्या सिद्धांतांचें विवरण.

जीवितकर्तव्य
अथवा
संसारकर्तव्य.

हा ग्रंथ, प्रसिद्ध पाश्चात्य ग्रंथकार सर जॉन लबक् यांच्या
the use of Life' या ग्रंथाधारें रा. नाबर वकील (सातारा)
ांनीं लिहिला आहे. मूळ ग्रंथ विलायतेंत अतिशय लोकप्रिय
ालेला आहे. तसाच इकडेही तो झाल्यावांचून राहणार नाहीं.
गांत मनुष्यप्राण्याचें कर्तव्य काय? या प्रश्नाचें समर्पक उत्तर ह्या

ग्रंथांत देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्या कर्तव्याचे ऐहिक व पारमार्थिक असे दोन भाग करून प्रत्येक भागांतील कर्तव्य कसें बजवावें हेंही ग्रंथकारानें सांगितलें आहे. या ग्रंथाचीं एकंदर १९ प्रकरणें असून त्यांपैकीं पहिल्या १३ प्रकरणांत ऐहिक कर्तव्याचा व बाकीच्या प्रकरणांत पारमार्थिक कर्तव्याचा विचार केलेला आहे. ऐहिक कर्तव्यासंबंधाच्या विवेचनांत द्रव्याची आवश्यकता, तें मिळविण्याचे उपाय, व्यवहारचातुर्य, श्रम, विश्रांति, मनोरंजन, आरोग्य, राष्ट्रीय शिक्षण, आत्मशिक्षण, वाचन, देशभक्ति, नागरिकांचें कर्तव्य, उद्योग; आणि पारमार्थिक कर्तव्यांत श्रद्धा, सदाशा, सौजन्य, सद्वर्तन, शांति, व सौख्य इत्यादि बाबींचें विवेचन केलेलें आहे. ह्या विवेचनांत मूळ ग्रंथकर्त्यानें जसे मागील थोर ग्रंथकारांचे उद्गार दिलेले आहेत, तसेच प्रस्तुत भाषांतरांतही भाषांतरकारानें इकडील थोर व्यक्ति व कवि यांचे समयोचित उद्गार सुभाषितांप्रमाणें योजिलेले आहेत. यामुळें मूळ विवेचन तत्त्वज्ञानपर असूनही कांहींसें मनोरंजक व हृदयंगम असें झालेलें आहे. प्रपंच आणि परमार्थ हीं दोन्ही यथायोग्य रीतीनें साधून मनुष्यानें आपल्या जन्माचें साफल्य कसें करावें, हें या ग्रंथांत उपदेशिलेलें आहे. भाषांतरकारांचा मराठी भाषेशीं व मूळ ग्रंथकाराच्या विचारांशीं चांगला परिचय असल्यामुळें भाषांतर सुबोध, सरळ व मनोरम असें वठलें आहे. पृष्ठसंख्या ३७५. बांधणी व छपाई उत्तम. किं. रु. २॥. ट. ख. निराळा.

भट आणि मंडळी, बुधवार पेठ, पुणें शहर.